**श्री. विजय वडेट्टीवार** : अध्यक्ष महोदय, पुढील आठवड्यात विदर्भातील धान उत्पादक जिल्ह्यांतील आमदारांची माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक घेणार आहात का ?

अध्यक्ष महोदय, एप्रिल महिन्याअखेर धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाकडून पैसे मिळणार असल्यामुळे आम्ही समाधानी आहोत. माननीय मंत्री महोदयांनी गोंदिया जिल्ह्यात ८६ केंद्र सुरू असल्यासंबंधी सांगितले. अध्यक्ष महोदय, गोंदिया जिल्ह्यात सुरू असलेल्या ८६ केंद्रांची नावे आज किंवा उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहात का ?

**श्री. अनिल देशमुख** : अध्यक्ष महोदय, जी ८६ केंद्र सुरू आहेत, त्यांची नावे सभागृहाच्या पटलावर ठेवली जातील. सन्माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक घेण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला होता. अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे यापूर्वी माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक झाली होती. तरी सुद्धा यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करून सदर बैठक घेऊ.

**डॉ. खुशाल बोपचे** : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये शेवटच्या परिच्छेदात "... अवेळी पावसामुळे झालेल्या नुकसानीकरिता राज्य शासनाने शेतकऱ्यांना मदत जाहीर केली आहे." परंतु या संदर्भात शासनाकडून अद्याप एकाही शेतकऱ्याला मदत मिळालेली नाही व मिळणारही नाही. याचे कारण असे आहे की, शासनाने गोंदिया जिल्ह्यातील आणेवारी ६८ पैसे जाहीर केली आहे. आणेवारीची पद्धत कालबाह्य झाली आहे. यावर्षी अवेळी झालेल्या पावसामुळे नुकसान झालेले आहे. माझा माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, आणेवारीची अट वगळून भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर अशा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना शासनाकडून मदत केली जाणार आहे का ? त्यामुळे ती मदत कोणत्याही शेतकऱ्यांना मिळणार नाही, म्हणून अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना शासनाकडून "खास बाब" म्हणून मदत दिली जाणार आहे काय ?

**श्री. अनिल देशमुख** : अध्यक्ष महोदय, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मदत दिलेली आहे. यामध्ये आणेवारीचा कोणताही प्रश्न नाही. अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचा सर्व्हे करण्यात आला होता. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांनी सर्व्हे केलेले आहेत. त्यांनी आणेवारीच्या भरवशावर रिपोर्ट दिलेला नाही.

**उपाध्यक्ष** : ठीक आहे. दिनांक ११ एप्रिल २०११ रोजी आदिवासी विभागावर अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी या विषयावर बोलावे.

---

## सन २०११-२०१२ च्या अनुदानाकरिता मागण्या : महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग

**उपाध्यक्ष** : आता महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्या, म्हणजे मागण्या क्रमांक सी-१, सी-२, सी-४, सी-५४, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, यू-२, यू-३, यू-४, यू-५, एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-९ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केलेला आहे.

| अ.क्र. | मागणी क्रमांक | प्रभारी मंत्री | मुख्य लेखाशीर्ष | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | रुपये |
| | | | **महसूल व वन विभाग** | |
| २१ | सी-१ | महसूल व खार जमीन मंत्री | २०२९, जमीन महसूल<br>२०४५, विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क<br>२०५३, जिल्हा प्रशासन<br>२०७०, इतर प्रशासनिक सेवा | .. ९,१३,८३,३८,००० |
| २२ | सी-२ | — कित्ता — | २०३०, मुद्रांक व नोंदणी | .. ९५,१२,४२,००० |
| २३ | सी-४ | — कित्ता — | २०५२, सेक्रेटरीएट-सर्वसाधारण सेवा<br>२०५९, सार्वजनिक बांधकामे<br>२०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा<br>२२१७, नगर विकास<br>२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण. | .. १,१०,२५,५४,००० |
| २४ | सी-५ | महसूल व खार जमीन मंत्री | २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | .. १२,८३,७४,००० |
| २५ | सी-६ | वने, मदत पुनर्वसन व भूकंप पुनर्वसन मंत्री. | २२५०, इतर सामाजिक सेवा<br>२२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य.<br>२४०६, वनीकरण व वन्यजीवन | .. ७,५८,७०,००,००० |
| २६ | सी-७ | — कित्ता — | २४१५, कृषिविषयक संशोधन व शिक्षण. | .. ७,४४,९३,९१,००० |
| २७ | सी-९ | — कित्ता — | ४२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च.<br>६२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी कर्जे.<br>४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च.<br>४४१५, कृषिविषयक संशोधन व शिक्षण यावरील भांडवली खर्च. | .. १,०४,२९,००० |
| २८ | सी-१० | — कित्ता — | ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च<br>५४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च.<br>६४०१, पीक संवर्धनासाठी कर्जे | .. ९६,०४,८८,००० |
| २९ | सी-१२ | महसूल व खार जमीन मंत्री | ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे. | .. ७१,७८,११,००० |

| अ.क्र. | मागणी क्रमांक | प्रभारी मंत्री | मुख्य लेखाशीर्ष | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | **पर्यावरण विभाग** | रुपये |
| २०७ | यू-२ | पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री | २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | .. ५०,००० |
| २०८ | यू-३ | — कित्ता — | २२५१, सेक्रेटरिएट-सामाजिक सेवा | .. १,८८,१०,००० |
| २०९ | यू-४ | — कित्ता — | ३४३५, परिस्थिती व पर्यावरण | .. १०,५९,००,००० |
| २१० | यू-५ | — कित्ता — | ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे | .. २४,१७,००० |
| | | | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | |
| ८६ | एल-२ | ग्रामविकास मंत्री | २०५३, जिल्हा प्रशासन | ..१४,५२,९३,३०,००० |
| ८७ | एल-३ | ग्रामविकास मंत्री रोजगार हमी योजना व जलसंधारण मंत्री | २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>२४०६, वनीकरण व वन्यजीवन<br>२४१५, कृषिविषयक संशोधन व शिक्षण<br>२५०१, ग्रामविकासासाठी विशेष कार्यक्रम<br>२५०५, ग्रामीण रोजगार<br>२५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम<br>२५५१, डोंगराळ प्रदेश<br>२७०२, लहान पाटबंधारे<br>२८१०, ऊर्जेची अपारंपरिक साधने | १७,४३,००,१०,००० |
| ८८ | एल-४ | ग्रामविकास मंत्री | ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा | .. १२,०९,१५,००० |
| ८९ | एल-५ | — कित्ता — | ३६०४, स्थानिक संस्था व पंचायत राज्य संस्था यांना नुकसान-भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. | .. २,३०,७४,२८,००० |
| ९० | एल-७ | ग्रामविकास मंत्री रोजगार हमी योजना व जलसंधारण मंत्री | ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च.<br>४५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रमा-वरील भांडवली खर्च.<br>४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च.<br>६२१६, गृहनिर्माणासाठी कर्जे | ४,१८,८०,००,००० |
| ९१ | एल-९ | ग्रामविकास मंत्री | ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे. | .. ५,५१,०६,००० |

**उपाध्यक्ष** : आता (१) महसूल व वन विभाग, (२) पर्यावरण विभाग आणि (३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग या विभागांच्या मागण्या चर्चेला घेण्यात येतील. या विभागांच्या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेसोबत जोडला आहे. विभागांच्या स्वीकृत कपातसूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपातसूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपातसूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपातसूचना मांडणार नाही असे मी गृहीत धरतो.

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासांपैकी सत्तारूढ पक्षात संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील अशी मी अपेक्षा करतो. आता चर्चेला सुरूवात होईल.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महोदय, आता आमच्या पिजन होलमध्ये एक कागद देण्यात आलेला आहे. परवा जो कागद दिला होता, त्यामध्ये कपातसूचना मांडण्याची जी तारीख होती ...

**उपाध्यक्ष** : ती तारीख वाढवून देण्यात आलेली होती, याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महोदय, आज पुन्हा तोच कागद दिलेला आहे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील )** : अध्यक्ष महोदय, मुदत वाढवून देण्यात आलेली आहे

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महोदय, सामजिक न्याय, उद्योग, ऊर्जा अशा ९ विभागांवर कपात सूचना देण्याची तारीख उद्यापर्यंत वाढवून द्यावी.

**उपाध्यक्ष** : ठीक आहे. उद्यापर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे. माझी विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, कोणावरही अन्याय व्हावा अशी आमची भूमिका नसते. सन्माननीय सदस्य वेळेचे बंधन ठेऊन बोलत नाही.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील )** : अध्यक्ष महोदय, आम्हाला किती वेळ दिलेला आहे, तेवढे सांगितले तर आम्ही दिलेल्या वेळेत चर्चा पूर्ण करू.

**उपाध्यक्ष** : सहा तासांपैकी निम्मा वेळ विरोधी पक्षाला देण्यात आलेला आहे. मी पक्षनिहाय वेळ सांगत आहे. काँग्रेस पक्षाला ८२ मिनिटांचा वेळ दिलेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला ६२ मिनिटांचा वेळ दिलेला आहे. बहुजन विकास आघाडीस २ मिनिटांचा वेळ दिलेला आहे. राष्ट्रीय समाजवादी पक्षास १ मिनिटाचा वेळ दिलेला आहे. शिवसेना पक्षास ५८ मिनिटे १८ सेकंदाचा वेळ दिलेला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेस १६ मिनिटे ५९ सेकंदाचा वेळ दिलेला आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना थोड्या वेळानंतर पक्षनिहाय किती वेळ दिलेला आहे, त्याची योग्य ती माहिती देतो. आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेस सुरुवात करावी.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** (विरोधी पक्षनेते) : अध्यक्ष महोदय, महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग या खात्याचे कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत, ही पद्धती संयुक्तिक नाही. हा राज्याचा अर्थसंकल्प आहे. अध्यक्ष महाराज, माझा हा एक मिनिट गृहित धरावयाचा नाही.

महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]

महसूल विभागाच्या संदर्भात सांगावयाचे झाले, तर एका ओळीमध्ये मी माननीय मंत्री महोदयांना काही सूचना करणार आहे. राज्य शासनाने स्टॅम्प ड्युटीमध्ये अवास्तव वाढ केल्यामुळे, सर्वसामान्य आणि गोरगरीब माणसाला त्याचा त्रास व्हायला लागला आहे. कोणत्याही प्रकारचे टॅक्स वाढवित असताना सर्वसामान्य माणसांना परवडेल अशा स्वरूपाच्या महसूलाचे दरपत्रक असले पाहिजे. खरेदी-विक्री ज्यावेळी होत असेल त्यावेळीच निश्चित स्वरूपाची किती स्टॅम्प ड्युटी लागेल, हे सांगणे आवश्यक आहे. काही कालावधीनंतर चार-सहा वर्षांनंतर स्टॅम्प ड्युटी, दंड लावून वसूल केली जाते. त्यामुळे लोक ही स्टॅम्प ड्युटी द्यायला तयार नसतात म्हणून शासनाने हे धोरण बदलले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, मुंबई शहर, नवी मुंबई, पुणे सारख्या मोठमोठ्या शहरामध्ये मॉल उभे राहिले आहेत. त्यांनी बांधकामासाठी लागणारी स्टॅम्प ड्युटी कमी भरली. आता त्यांना शासनाने वाढीव स्टॅम्प ड्युटी भरण्याबाबत नोटिसा दिल्या आहेत. या मॉलवाल्यांनी स्टॅम्प ड्युटी भरली नाही, तसेच राज्य शासन सुद्धा त्यांच्याकडून वसूल करण्यास टाळाटाळ करीत आहे. खरेदी-विक्रीचे व्यवहार होऊन गेले आहेत, त्यामुळे ते आता स्टॅम्प ड्युटी भरण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांना शासनाकडून नोटिसा पाठविल्यानंतर आता स्मरणपत्रे पाठविण्यात आली, परंतु १०० ते १२५ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटीचा महसूल शासनाकडून वसूल झालेला नाही. हे प्रकार तातडीने थांबविण्याची आवश्यकता आहे. या मॉलमध्ये डायनामीक्स मॉल, रघुलीला मॉल, ब्रोएल मॉल, आर मॉल, फोनिक्स मॉल या चार मॉलची एकूण दीड कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी बाकी आहे. ही स्टॅम्प ड्युटीची थकबाकी तातडीने वसूल करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. जे गरीब लोक स्टॅम्प ड्युटी भरत नाहीत, त्यांच्यावर जप्तीच्या नोटिसा पाठवून कारवाई केली जाते, हे उचित नाही.

अध्यक्ष महोदय, शासनाने गृहनिर्माण धोरण जाहीर केले, त्यावेळी सांगितले होते की, स्टॅम्प ड्युटी ही सुपर बिल्टअप एरियावर न लावता फक्त कारपेट एरियावरच लावण्यात येईल. त्याप्रमाणे शासनाने शासन निर्णयही काढला. या राज्यात फ्लॅटची विक्री करीत असताना बिल्डरमंडळी मात्र सुपर बिल्टअप एरियावर स्टॅम्प ड्युटी घेतात. या संदर्भात शासनाकडे अनेक मोठे खटले प्रलंबित आहेत. त्यामुळे राज्य शासनाने याबाबत आपले धोरण जाहीर केले पाहिजे. फ्लॅटच्या संदर्भात केवळ कारपेट एरियावरच स्टॅम्प ड्युटी घेतली जाईल त्या व्यतिरिक्त स्टॅम्प ड्युटी घेतली जाणार नाही, या धोरणाचा काटेकोरपणे अवलंब केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, स्टॅम्प ड्युटीसंदर्भात राज्यात यापूर्वी अनेक घोटाळे झाले. राज्यात तेलगी घोटाळा बराच गाजला. अलीकडच्या कालखंडामध्ये शासनाने १,२,३,५ रुपयांचे मुद्रांक काढून टाकले आहे. आता १० व ५ रुपयांचे स्टॅम्प मिळतच नाहीत. ते बंद झाले आहेत. ज्या ठिकाणी आवश्यकता नाही, तेथे स्टॅम्प ड्युटी लावण्याचे बंधन काढून टाकले पाहिजे. १०० रुपयांपेक्षा कमी रुपयांचे स्टॅम्प लावले जाणार नाहीत, असा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शासनाने स्टॅम्पपेपर आता कमीतकमी ५० रुपयांचा करणे आवश्यक आहे. पूर्वी १० रुपयांचे स्टॅम्पपेपर मिळत होते. आता १०० रुपयांपेक्षा कमी रुपयांचे स्टॅम्पपेपर मिळतच नाहीत.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]**

अध्यक्ष महोदय, शेअर मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात हस्तांतरण होत असते. तसेच अमाल्गमेशनचे मोठमोठे प्रस्ताव असतात. त्यामध्ये स्टॅम्प ड्युटीच्या रकमेत बऱ्याच प्रमाणात तूट येते. यामुळे शासनाच्या महसुलामध्ये लिकेज होत आहे. त्या संदर्भात कारवाई करण्याची गरज आहे. लॅन्ड रेकॉर्ड, सिटी सर्व्हे यामध्ये मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत. त्यामुळे भूमापनाचे प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. आता संगणकीकरण झाले, सर्व व्यवस्था पूर्ण झालेली आहे. जमिनीच्या संदर्भात अर्ज केल्यानंतर किमान ९० दिवसांच्या आत जमिनीची मोजणी झाली पाहिजे. या संदर्भात यंत्रणा कार्यान्वित करण्याची गरज आहे. अर्ज केल्यानंतर २ ते ४ वर्षे होऊन देखील जमिनीची मोजणी होत नाही. शासनाचे रेकॉर्ड जीर्ण झालेले आहेत. टीपण उतारे जीर्ण अवस्थेत आहेत. शासनाने हे सर्व रेकॉर्ड अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे. जीर्ण रेकॉर्ड नवीन केले पाहिजेत. तसेच लॅन्ड रेकॉर्ड, सिटी सर्व्हेमधील सर्व रिक्त पदे तातडीने भरण्याचे काम केले पाहिजे. राज्याचा महसूल वाढविण्याकरिता जी महत्त्वाची पदे आहेत, ती पदे भरण्याची कार्यवाही लवकरात लवकर केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागामध्ये उत्पन्न वाढवून देणारे महत्त्वाचे साधन वाळू, गौण खनिजांवरील रॉयल्टी हे आहे. वाळूच्या संदर्भात सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. आता राज्यामध्ये नवीन वाळू माफिया निर्माण झाले आहेत. राज्यात वाळू उत्खननाकरिता लिलाव पद्धत सुरू आहे, त्यामध्ये ई- टेंडरींग सुरू केले पाहिजे. यामध्ये गुंडगिरी सुरू आहे. दादागिरी, गुंडगिरी व तलवारीच्या जोरावर वाळूचा लिलाव केला जात आहे. या लिलाव पद्धतीमध्ये स्पर्धा निर्माण करण्याची परवानगी दिली पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांकडे बसून टेंडर उघडले जातात. त्यावेळी कोणाच्या खिशात रिव्हॉल्व्हर असते, कोणी गुंड असतो. ज्याच्या हातात बळ आहे, ताकद आहे, तो टेंडर मिळवतो. बाहुबलीचा वर्ग राज्यात सुरू झालेला आहे, असे प्रकार सध्या सुरू झालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, पुणे शहरामध्ये आजूबाजूला अनेक टेकड्या आहेत. या ठिकाणी प्रचंड मोठ्या प्रमाणात खोदकाम सुरू आहे. आज या सर्व टेकड्या सुरक्षित राहिल्या नाहीत. या क्षणी देखील तेथे खोदकाम सुरू आहे. लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आली होती. या बातमीचे कात्रण माझ्याकडे आहे. " कात्रज फोडण्याचे काम सुरू, बोगद्याला धोका" अशी ती बातमी आहे. पुणे शहराच्या आजूबाजूला जेवढ्या टेकड्या आहेत, तेथे सर्वत्र नियमबाह्य खोदकाम सुरू आहे. मी स्वत: कात्रज घाटाच्या वरच्या भागातील बांधकामास भेट दिली होती. तसेच तेथील पाम ट्री सिटीमध्ये बांधकाम सुरू आहे. हे सर्व अनधिकृत बांधकाम आहे. हे बांधकाम सुरू करण्यासाठी कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. नो-डेव्हलपमेंट झोनमध्ये बांधकाम सुरू आहे. या भागामधून प्रचंड प्रमाणात गौण खनिज काढले जात आहे. तसेच जेवढे खनिज काढले जाते, त्यापेक्षा कमी ब्रास दाखविले जाते. मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास मी ही बाब आणून दिली होती. त्यावेळी ते पुण्यामध्ये होते. त्यांनी स्थगनादेश दिला होता. मात्र या ठिकाणी अजूनही काम सुरू आहे. ही कामे तातडीने बंद केली पाहिजेत. किती गौण खनिज काढले गेले आहे, या संदर्भात चौकशी केली पाहिजे. एखादा शेतकरी ट्रॅक्टरमधून आपल्याच शेतातील माती घेऊन जात असेल तर त्याचे ट्रॅक्टर जमा करून घेतले जाते. मात्र हे लोक मोठ्या माणसांचा आशीर्वाद असल्याने त्यांना हात लावण्याची हिंमत होत नाही. आयुक्त, सातारा जिल्हाधिकारी, महसूल आयुक्त यांच्याशी मी या संदर्भात बोललो होतो. सर्व अधिकारी खाजगीमध्ये ही बाब मान्य करतात. अधिकारी मान्य करतात, मात्र त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. त्यांच्यावर कोणाचा दबाव आहे ? मला वाटते की, या संदर्भात महसूल विभागाची

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]**

कोट्यवधी रुपयांची हानी होत आहे. महसूल विभागाच्या संदर्भात आणखीही काही बाबी मी सांगणार आहे. काल अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलत असताना अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीविषयी त्याने ५ लाख रुपये, २ लाख रुपये मागितल्याबाबत आलेल्या लेखी तक्रारींबाबत मी सांगितले. मी याबाबत त्यांना या लेखी तक्रार अर्जाची निदान चौकशी करा, असे सांगितले होते. हा पैसा कुठे जातो, तुमच्या आशीर्वादाने येतो का, असे विचारले, पण माननीय मंत्री यांनी उत्तर दिले नाही. याचा साधा व सरळ अर्थ मी असा घेतला की, माननीय मंत्र्यांच्या आशीर्वादाशिवाय हे होत नाही.

अध्यक्ष महाराज, एके ठिकाणी माननीय मंत्र्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीवर पैसे घेतल्याचे आरोप होतात, त्यांच्याविरुद्ध संपूर्ण महाराष्ट्रातून तक्रारी येतात. या राज्यामध्ये हे काय चालले आहे ? असेच एक भूखंडाचे प्रकरण मी आपल्याला सांगतो, ज्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार आहेत. भिवंडी नगरपालिकेची जी हद्द आहे, तिच्या बाहेर नो-डेव्हलपमेंट झोन आहे. त्या झोनमध्ये जवळपास ८,२५२ मोठमोठ्या गोदामांचे बांधकाम झालेले आहे. ज्या जागेवर गोदामांचे बांधकाम केले आहे, ती जागा एनए केलेली नाही. या गोदामांच्या माध्यमातून किमान १ हजार कोटी रुपयांचा टर्न ओव्हर वर्षाकाठी होत असतो. यावरून त्याची कॉस्ट किती असेल, याची आपल्याला कल्पना येईल. या गोदामांमध्ये केमिकल्सचे मोठे साहित्य आहे. या केमिकल्सचा जर स्फोट झाला तर, भिवंडी शहराला धोका पोहोचू शकेल अशी स्थिती आहे. सदरचे क्षेत्र हे एमएमआरडीएच्या हद्दीतील असून मंजूर विकास नियमानुसार केवळ कृषी पूरक उद्योग करण्यासाठी आरक्षित आहे. शासनाच्या दिनांक २३ सप्टेंबर १९९९ च्या अधिसूचनेनुसार सदरचा भाग हा हरित क्षेत्रातील नो-डेव्हलपमेंट झोनमधील आहे. याच्यामध्ये औद्योगिक किंवा कोणतेही बांधकाम अनुज्ञेय नाही. असे असतानाही सदर परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे बिन शेतीला परवानग्या दिल्या गेल्या. काही ठिकाणी बिन शेतीला परवानग्या घेतल्या गेल्या नाहीत. बिन शेती परवानगी न घेता गोदामांचे बांधकाम तेथे अनधिकृतपणे उभे राहिले. सन २००२ मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी लोकप्रतिनिधींसमवेत विकास कामांचा आढावा भिवंडीला घेतला, तेव्हा त्यांच्या लक्षात हे आणून दिले होते की, ८,१२५ गोदामांचे बांधकाम अनधिकृत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांची नोंद घेतली व तातडीने ही अनधिकृत बांधकामे पाडून टाकण्यात यावीत, अशा स्वरूपाचे आदेश प्रशासनाला दिले. परंतु, माननीय मुख्यमंत्र्यांचे आदेश मानले गेले नाहीत.

जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ५ जुलै २००४ च्या अहवालात असे म्हटले आहे की, भिवंडी नगरपालिकेच्या हद्दीबाहेर सन १९८८ पासून एकूण ८,१२५ गोदामांची बांधकामे अहवालाच्या दिनांकापर्यंत झाली. त्यापैकी सन १९९७-१९९८ पर्यंत त्या ठिकाणी फक्त १४६ गोदामांचे बांधकाम होते. गोंदावेली व दोपोडी या ठिकाणची ही बांधकामे आहेत असे म्हटले आहे. सदर गोदामांच्या बांधकामाच्या मालकांपैकी एक रुद्रप्रभात नुर्मेलिया म्हणून सद्गृहस्थ असल्याचे कळले. शासनाने या बांधकामाबाबत हे आदेश दिले की, हे अनधिकृत, नियमबाह्य बांधकाम आहे ते तोडून टाकण्यात यावे. शासनाने हे बांधकाम अनधिकृत ठरविले. जिल्हाधिकाऱ्यांकडून हे बांधकाम तोडून टाकण्याबाबत आदेश झाले. या आदेशाला स्थगिती घेण्यासाठी हा सद्गृहस्थ मंत्रालयामध्ये आला. त्याने संबंधित विभागाकडे दिनांक ३ सप्टेंबर २००५ रोजी अर्ज केला. इंडियन कॉर्पोरेशन, इंडियन लॉजिस्टीक अँड इंडस्ट्रिअल कॉम्प्लेक्स म्हणून त्या कंपनीचे नाव आहे. त्याने त्यात लिहिले आहे की, दिनांक २६ ऑगस्ट २००५, अपर तहसीलदार, अकृषिक, भिवंडी यांनी बांधकाम

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]**

तोडून टाकण्याबाबत आदेश दिलेले आहेत, त्याला स्थगिती मिळावी, ही विनंती त्याने माननीय मंत्री महोदयांकडे केली. त्याने त्यात मान्य केलेले आहे की, माझ्याकडून मंजूर नकाशापेक्षा जास्त बांधकाम झालेले आहे. सदरचे अनधिकृत बांधकाम असून ते अधिकृत करण्याची परवानगी मिळावी. पीए आणि पीएस काय करू शकतात याचे उदाहरण आजही जिवंत आहे. त्या कालखंडामध्ये तत्कालीन महसूल मंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आली नाही. त्या मंत्र्यांना माहीत नाही की, हे काय आहे. पण त्या मंत्र्यांच्या नावाने त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीने एक पत्र दिले. खाजगी सचिव, महसूल मंत्री यांच्या कार्यालयातून पत्र दिले की, जे मी मघाशी वाचून दाखविले. माहिती सादर करावी व कारवाईस स्थगिती द्यावी, असे मा. महसूल मंत्र्यांचे आदेश आहेत. यासंबंधातील सर्व कागदपत्र असणारी फाईलच माझ्याकडे आहे. ती मी आपल्याकडे देणार आहे.

महसूल मंत्र्यांच्या खाजगी सचिवाने जिल्हाधिकाऱ्यांना लिहिले की, अनधिकृत बांधकाम पाडण्याच्या कारवाईस स्थगिती द्यावी. जी कारवाई आहे त्यास स्थगिती द्यावी, असे मा. महसूल मंत्र्यांचे आदेश आहेत, असे त्यांनी लिहिले. या पत्राची तारीख ३ सप्टेंबर २००५ अशी आहे. मी सगळी कागदपत्रे मंत्र्यांकडे देणार आहे. हा काही मंत्र्याचा उद्योग नाही. मंत्र्याच्या खाजगी सचिवाचा आदेश जिल्हाधिकाऱ्याला गेला. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्याने स्थगनादेश दिला. शासनाचे आदेश असल्यामुळे बांधकाम पाडण्याच्या कारवाईला स्थगिती देण्यात येत आहे. मला समजत नाही, मंत्रालयातील पी.ए. आणि प्रायव्हेट सेक्रेटरी एवढे मोठे झाले की, घोड्यापेक्षा खोगीरच उडायला लागले. ह्या मंत्र्याचा खाजगी सचिव एवढा पॉवरफूल आहे की, ह्या क्षणाला देखील ती स्थगिती सुरू आहे. मंत्र्याची स्थगिती नाही, विभागाच्या सचिवांची स्थगिती नाही, मंत्रालयातील स्थगिती नाही, मंत्रालयातील मंत्र्यांच्या खाजगी सचिवाने दिलेली स्थगिती आजही सुरू आहे. ८,१२५ अनधिकृत गोदामांना दिलेली स्थगिती आजही सुरू आहे. सदर गोदाम पाडून न टाकण्यासाठी स्थगिती दिलेली आहे. यात साधा व्यवहार झालाच नसेल. हा व्यवहार चहा-पाण्यावर झाला असेल काय ? हे तर शक्यच नाही. महसूल विभाग काय चहा-पाण्यावर समाधान मानतो काय. मी तातडीने एका ओळीत सर्व काही सांगणार आहे. त्यामुळे या अनधिकृत गोदामांविरुद्धची कार्यवाही स्थगित झाली. महसूल मंत्र्यांच्या कार्यालयातून स्थगिती मिळत असेल तर राज्यात काय चालले आहे, याची चिंता व चिंतन करण्याची आवश्यकता आहे.

दिनांक २६ जून २००५ रोजी अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी तेथे ५-६ फूट पाणी होते. त्यावेळी मा. पालकमंत्री तेथे गेले. त्यांनी सांगितले की, अनधिकृत गोदामे तातडीने काढून टाकावीत. त्यावेळी सांगण्यात आले की, यास मा. महसूल मंत्र्यांचा स्टे आहे. याची कल्पना मा. महसूल मंत्र्यांना नसावी, असे मला वाटते. या पत्रावर खाजगी सचिवाची सही आहे. हा विषय विधान परिषदेमध्ये दिनांक १४ डिसेंबर २००५ रोजी चर्चेला आला होता. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये हा विषय चर्चेला आला होता. हे बांधकाम अनधिकृत आहे. ते पाडत का नाही, अशी चर्चा झाली. ८,१२५ बांधकामे तेथे आहेत. आजघडीला त्याची किंमत ५ ते ४ हजार कोटींच्या आसपास होते. ही गोदामे मध्य वस्तीत आहे. मुंबई जवळ असल्यामुळे येथे गोडाऊनचे भाडे मोठ्या प्रमाणावर येऊ शकते. विधान परिषदेमध्ये हा विषय आला होता. तेव्हा तत्कालीन उपसभापती श्री. डावखरे साहेब यांनी सदर बांधकामे ताबडतोब काढून टाकावित, स्थगिती उठवून टाकावी, अशा प्रकारचे निदेश विधान परिषदेत देण्यात आले. या विषयावर दिनांक १६ डिसेंबर २००५

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]

रोजी लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. मा. उपसभापतींनी आदेश देऊन सुद्धा या क्षणापर्यंत हे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेले नाही. मा. उपसभापतींचे, शासनाचे आदेश असूनही का कारवाई होत नाही ? हे बांधकाम नियमबाह्य असल्यामुळे शासन ते केव्हा निष्कासित करणार आहे ? सदर बांधकाम तातडीने निष्कासित करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची कालमर्यादेत अंमलबजावणी केली पाहिजे. अनधिकृत बांधकामाशी संबंधित जागामालक, बिल्डर, आर्किटेक्ट यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार तातडीने कारवाई झाली पाहिजे. एमआरटीपीनुसार फौजदारी होऊ शकते. गोदामाची बांधकामे अनुज्ञेय नसताना नगररचना, महसूल व इतर विभागांनी दिलेल्या परवानग्या तत्काळ रद्द करण्यात याव्यात. त्या नो-डेव्हलपमेंट झोनमध्ये असल्यामुळे तत्काळ रद्द करण्यात याव्यात. सदर अनधिकृत गोदामे तत्काळ सील करण्यात यावीत. सदर गोदामांच्या बांधकामांबाबत वेळीच लक्ष दिले असते, तर कारवाई करण्यास अडचण आली नसती. तेव्हा या संदर्भात चौकशी केली पाहिजे. जर कोणी दोषी असेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. मी या संदर्भातील कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांकडे देतो. त्या पत्रावर खाजगी सचिवांची सही आहे. खाजगी सचिवांच्या सौजन्याने इतकी वर्षे व्यवहार झाला, तेव्हा त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात काय, याचे उत्तर आपण दिले पाहिजे. मी ही सर्व कागदपत्रे माहितीच्या अधिकाराखाली आपल्या कार्यालयाकडून घेतलेली आहेत. त्यावर माहितीच्या अधिकाराचा शिक्का देखील आहे. त्यामुळे ही कागदपत्रे अनधिकृत आहेत, असे आपणास म्हणता येणार नाही. आपण या संदर्भात तातडीने चौकशी करावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. जे कोणी नियमबाह्य काम करून किंवा अनधिकृत बांधकामे करून हजार-हजार कोटी रुपये कमवित असतील तर त्याकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे. अशा प्रकारे जमिनी हडप करून, त्यावर बांधकामे करून पैसा कमविणे असे प्रकार सरकारच्या आणि प्रशासनाच्या आशीर्वादाने सुरू आहेत.

अध्यक्ष महाराज, मौजे ताडगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील सर्व्हे क्रमांक २०, २२, २३-ए, २४-ए, २५२, २५, २७, २८-ए, २९, ३०-ए ही सर्व प्रकरणे मी मंत्री महोदयांकडे पाठवितो. या सर्व आदिवासींच्या जमिनी आहेत. श्री. वैभव विजय सावंत यांचे वडील श्री. विजय सावंत हे वैभव डेव्हलपर्स कॉर्पोरेशनचे भागीदार असताना त्यांनी ही खरेदी केली. दिनांक १४ मे १९८७ रोजी नोंदणीकृत खरेदी खताने आदिवासींच्या जमिनी हस्तांतरित केल्या. आदिवासींच्या जमिनी बिगरआदिवासींच्या नावावर हस्तांतरित करावयाची असेल तर महाराष्ट्र जमीन महसूल ॲक्टनुसार सरकारची परवानगी घ्यावी लागते. तसेच कलम ६६ नुसार ३६ व ३६ (अ) नुसार निर्बंध असल्यामुळे तशा नोंदी आदिवासींच्या ७/१२ वर असतात. आदिवासींच्या जमिनी बिगरआदिवासींकडे हस्तांतरित करण्यासाठी परवानगी न घेता त्या हस्तांतरित करण्यात आल्या. सरकारची परवानगी मिळाल्याशिवाय अशा जमिनी हस्तांतरित होत नाहीत. सदर जमीन वैभव डेव्हलपर्स कॉर्पोरेशनकडून खरेदी करणाऱ्या श्रीमती रेखा रामचंद्र नाईक व जमीनधारकामध्ये कुलमुखत्यारपत्र बनवून खरेदी करण्यात आली. श्रीमती रेखा नाईक या शेतकरी आहेत किंवा कसे याचा कोणताही पुरावा आम्ही माहितीच्या अधिकाराखाली घेतलेल्या माहितीमध्ये नाही. त्यात त्या आदिवासी नाहीत. आदिवासींची जमीन आदिवासीला मिळेल अन्यथा ती परत सरकार खात्यात जमा होईल. याठिकाणी नियमांचे पालन झालेले नाही. मग ३६ व ३६ (अ) च्या ७/१२ वर नोंदी असताना व जमीन हस्तांतरणास परवानगी नसताना दुय्यम निबंधकांनी हे खरेदी खत नोंदविले हेच मुळात चुकीचे आहे. ७/१२ वर ३६ आणि

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]

३६ (३) असे लिहिलेले आहे. आजही तशी नोंद आहे. असे असताना याठिकाणी झालेले व्यवहार हे अनधिकृत आहेत. या जमिनीचे क्षेत्र सिलिंग क्षेत्रापेक्षा जास्त असल्यामुळे सिलिंग कायद्याचा देखील भंग झालेला आहे. या सर्व शेत जमिनी असल्यामुळे खरेदीच्या कुळ कायद्यातील तरतुदीनुसार त्यासाठी लागणारी आवश्यक ती परवानगी घेतलेली नाही. श्रीमती रेखा रामचंद्र नाईक यांनी त्या शेतकरी आहेत किंवा कसे याचा कोणताही पुरावा सादर केल्याचे दिसत नाही.

आदिवासींच्या जमिनी दिनांक १४ मे १९८७ रोजी बेकायदेशीररित्या खरेदी केल्यानंतर मूळ जमीनधारकाच्या नावे बिनशेती परवानगी घेण्यात येऊन त्याची नोंद ७/१२ वर घेण्यात आली. मुळात या ठिकाणी एन.ए. ची परवानगी द्यावयास नको होती. एन.ए. ची परवानगी देताना खरेदी कायदेशीर आहे किंवा कसे हे तपासणे आवश्यक होते. या जमिनी आदिवासींच्या असताना त्याबाबत एन.ए. परवानगी सरकारच्या मान्यतेशिवाय कशी देण्यात आली ? दिनांक १४ मे १९८७ रोजीच्या खरेदीखतानुसार १९८९ ते १९९१ या कालावधीत खरेदीखतांच्या नावे फेरफार नोंदी लावण्यात आल्या. जमिनीच्या ७/१२ वर ३६ व ३६ (अ) ची नोंद असताना आणि शासनाची पूर्व परवानगी नसतानाही खरेदी खतानुसार फेरफार नोंदीची कार्यवाही अवैध ठरते. अशा अवैध फेरफार नोंदी तत्काळ रद्द करून ती जमीन सरकार खात्यात जमा करावी. आदिवासींच्या जमिनीवरील ३६ व ३६ (अ) च्या नोंदी रद्द करण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकाऱ्यांना नाहीत. परंतु, अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक १७ जुलै १९९५ रोजी त्या नोंदी रद्द केल्या.

अध्यक्ष महोदय, अपर जिल्हाधिकाऱ्यांना ३६ व ३६ (अ) च्या नोंदी रद्द करण्याचे अधिकारच नाहीत, ते शासनाला आहेत. परंतु, तरीही अपर जिल्हाधिकाऱ्यांनी त्या नोंदी रद्द केल्या. शासनाची परवानगी न घेता, अपर जिल्हाधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक या नोंदी रद्द केलेल्या आहेत. जनजातीच्या व्यक्तींना भोगाधिकार हस्तांतरण करणे, महाराष्ट्र जमीन महसूल ॲक्ट, १९७५ मधील तरतुदीनुसार रितसर प्रस्ताव तयार करूनच बक्षिसपत्र, गहाणखत, खरेदी-विक्री वगैरे व्यवहार तयार होतात, ते येथे करण्यात आलेले नाहीत. माझी मागणी आहे की, यामध्ये अशा प्रकारे गैरव्यवहार झालेला आहे. आपण या जमिनीची किंमत आजच्या बाजारभावाप्रमाणे पहा. तेथे इमारती उभ्या राहिल्या आहेत, बेकायदेशीर एनए करण्यात आले आहेत. अध्यक्ष महोदय, शहरातील जमिनी आहेत. ही जमीन ७८.४८ हेक्टर आहे, म्हणजे २०० एकर जमीन आहे. मध्यवस्तीमधील २०० एकर जमीन अशा रितीने आदिवासी जमिनीचे बेकायदा भाग करून, बेकायदेशीररित्या परवानगी घेऊन, तुमच्या अपर जिल्हाधिकाऱ्यांनी नोंदी रद्द करून, ३६ व ३६ (अ) ची परवानगी न घेता, शासनाच्या पूर्वमान्यतेने हा सगळा गैरव्यवहार केला आहे. माझी विनंती आहे की, आपण तातडीने या संदर्भात कार्यवाही केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये महाराष्ट्र कमाल जमीन धारणा कायद्याचे उल्लंघन केले आहे, सिलिंग ॲक्टचे उल्लंघन केले आहे, महाराष्ट्र मुद्रांक नियम व नोंदणी नियम यांचे उल्लंघन केले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ चे उल्लंघन झाले आहे. मुंबई कुळवहिवाट शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ चे उल्लंघन झाले आहे. आपण या सगळ्यानुसार तत्काळ ते बेकायदेशीर घोषित करावे व त्यासाठी बांधकामासह जमिनी मूळ आदिवासींच्या वारसांना परत करण्यात याव्यात. बेकायदेशीररित्या नोंदविण्यात आलेल्या आदिवासींच्या सदर बाबतीतील खरेदी खत रद्दबातल करण्यात यावे. सन १९८९ ते

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]

सन १९९१ या कालावधीतील खरेदी खताच्या आधारे बिगर आदिवासीच्या नावे करण्यात आलेल्या सर्व फेरफार, नोंदी रद्द कराव्यात. अपर जिल्हाधिकारी, रायगड यांच्या क्रमांक - कुळवहिवाट/कास/३/१५८३, दिनांक ११ जुलै ९५ चे आदेश तत्काळ रद्द करण्यात यावेत.

अध्यक्ष महोदय, अपर जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक ११ जुलै १९९५ च्या आदेशाच्या अनुषंगाने ५१३, दिनांक १४ जुलै १९९५ चा आदेश सुद्धा रद्द करण्यात यावा. अध्यक्ष महोदय, ज्यांनी ज्यांनी यामध्ये अशा रितीने बेकायदेशीर मदत केली, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. १ हजार कोटी रुपयांची जमीन या ठिकाणी आहे. आदिवासींच्या मुलांनी आपल्याकडे अर्ज केलेला आहे. परंतु, त्यांना कोणी दादपुकार घेत नाही, त्यांनी शासनाकडे बऱ्याच वेळा मागणी केली आहे. आम्हाला फसविण्यात आले आहे असे ते सांगत आहेत. आदिवासींना त्या जमिनी त्यांच्या अर्जानुसार परत देण्यात आल्या पाहिजेत. दादपुकार घेणारी प्रभावशाली माणसे आहेत. अध्यक्ष महोदय, आदिवासी इतक्या वेळा सरकारकडे आले, तरी देखील काही होत नाही. ते म्हणतात की, आम्हाला हाकलून देण्यात येते. तुमची जमीन नाही, जमीन हस्तांतरण झाली, आता किती वर्ष झाले, आता काय राहिले आहे, असे म्हटले जाते.

अध्यक्ष महोदय, आताच मला त्यांचे डेलिगेशन भेटले. मी तत्संदर्भात आपल्याकडे विनंती करणार आहे. सन्माननीय सदस्य आपल्या राजकीय पक्षाच्या प्रभावाखाली असल्यामुळे चौकशी होईल की नाही, याविषयी त्यांना शंका आहे. यासंबंधीचे सन १९८७ पासून सन २०११ पर्यंतची सर्व कागदपत्रे मी आपल्याकडे पाठवितो. तुमच्या कार्यालयाची ही कागदपत्रे आहेत, त्यावर सही, शिक्के आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी आणि त्या आदिवासींना न्याय द्यावा. आता मी वन विभागासंदर्भात बोलतो.

अध्यक्ष महोदय, सभागृहात माननीय वन मंत्री, माननीय वन राज्यमंत्री उपस्थित नाहीत. आता ३ वाजून २९ मिनिटे झाली आहेत. आपण माननीय मंत्री येईपर्यंत १५ मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी. मी वारंवार सांगितले होते.

**श्री. जयंत पाटील** : अध्यक्ष महोदय, मी आहे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महोदय, तुम्ही काय कार्यवाही करणार ? मी अगोदरच ऑब्जेक्शन घेतले आहे. ( गोंधळ ) अध्यक्ष महोदय, हे काय चालले आहे ? आपण सभागृहाचे कामकाज १५ मिनिटांसाठी स्थगित करावे.

( गोंधळ )

**उपाध्यक्ष** : माननीय वन मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २९ मिनिटांनी १० मिनिटांसाठी स्थगित झाली. )

**स्थगितीनंतर**

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

**डॉ. पतंगराव कदम** : अध्यक्ष महोदय, शेतकरी कामगार पक्षाचा मोठा मोर्चा आलेला आहे. त्या मोर्चाला सामोरे जाऊन निवेदन स्वीकारण्यासाठी मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने गेलो होतो. त्यामुळे मी सभागृहात उपस्थित नव्हतो.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या संदर्भात बोलायचे झाले तर आज वाघांची संख्या वाढते आहे आणि त्याचबरोबर वन्य प्राण्यांची संख्याही वाढते आहे, असे अनेक ठिकाणचे चित्र आहे. हरण, रानडुक्कर, नीलगाय, सांबर यांची संख्या वाढत असल्यामुळे त्यांच्याकडून पिकांची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे.

अध्यक्ष महोदय, वैजापूर, कोपरगाव या तालुक्यातील शेतकऱ्यांचे निवेदन माझ्याकडे प्राप्त झाले आहे. भोगेवाडी, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर या गावातील शेतकऱ्यांनी सह्यांचे निवेदन माननीय वन मंत्र्यांकडे पाठविले आहे. वन्य प्राण्यांकडून होणाऱ्या पीक हानीचा मोठ्या प्रमाणावर त्रास होत असल्यामुळे हे शेतकरी गेल्या ४ वर्षापासून वारंवार पत्रव्यवहार करीत आहेत. परंतु, शासनाकडून त्याची दखल घेतली गेली नाही. पिकाच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येतात. परंतु, गुंठ्याला केवळ २० रुपये नुकसान भरपाई मिळते. माझ्या मतदारसंघात किंवा महाराष्ट्रात सर्वत्र अशीच स्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, वाघांची संख्या वाढली पाहिजे. परंतु, पिकांचे अतोनात नुकसान करणाऱ्या वन्य प्राण्यांना प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. जंगलातील हरण शेतांमध्ये येणार नाही, यासाठी चर खोदून कंपाऊंड घालण्याचे काम वन विभागाने केले पाहिजे. एखाद्या शेतकऱ्याने हरणाला मारले तर आपण त्याला जेलमध्ये टाकतो. त्याऐवजी वन विभागानेच या वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत असल्यामुळे वन विभागाने तातडीने याबाबत कार्यवाही करावी. कोपरगाव, वैजापूर किंवा सर्वच तालुक्यांकडे या दृष्टीने शासनाने लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये मुक्ताईनगर तालुक्यात वाघांची संख्या ९ आहे. उन्हाळ्यामध्ये त्यांना जंगलात पाणी मिळत नसल्यामुळे ते जंगलाच्या बाहेर येतात. महाराष्ट्रातील सर्व जंगलांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी वन विभागाला शासनाने विशेष निधी द्यावा आणि वन विभागाने वन्यप्राणी जंगलाच्या बाहेर येऊन पिकांची हानी करणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने जंगलतोड होते. आज आपल्याला सॅटेलाईटच्या माध्यमातून सर्व ठिकाणचे चित्र हिरवेगार दिसत असले तरी प्रत्यक्षात ते चित्र परंपरागत झाडांचे नाही. सुबाभूळ, ऑस्ट्रेलियन बाभूळ यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे सॅटेलाईटव्दारा जंगल हिरवे दिसत आहे. परंतु, जी परंपरागत झाडे आहेत, ती तोडून टाकली गेली आहेत. अनेक ठिकाणी सागाच्या झाडांची तोड होते, सागाची अवैध वाहतूक होते. जळगाव जिल्ह्यात चोपडा, यावल, रावेर या परिसरात मोठ्या प्रमाणात जंगल तोडले जात आहे. हा भाग मध्य प्रदेश राज्याला लागून असल्यामुळे आपल्या राज्यातील सागाची तोड करून गुन्हेगार मध्य प्रदेश राज्यात जातात. मध्य प्रदेश राज्य पोलिसांना कळविण्यापूर्वी ते फरार होतात. त्यामुळे या सागाची तोड करणाऱ्या गुन्हेगारांचा वन विभागाने कडक बंदोबस्त करावा, अशी माझी मागणी आहे.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]**

अध्यक्ष महोदय, वन अधिकाऱ्यांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, वाहन यांची व्यवस्था करणे गरजेचे झाले आहे. सध्या मोटार सायकल आणि लाठ्या-काठ्या यांच्या साहाय्याने वन अधिकारी वनाचे रक्षण करीत आहेत. परंतु, आता मोटार सायकल आणि लाठ्या-काठ्यांचे यूग राहिलेले नाही. त्यामुळे राज्यातील जंगल भागात काम करणारे पोलीस अधिकारी, वन अधिकारी यांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे दिली तर ते जंगलाच्या आतमध्ये जाऊ शकतील आणि वन संपत्तीचे रक्षण करू शकतील.

अध्यक्ष महोदय, जळगाव जिल्ह्यातील एक प्रकरण मी माननीय वन मंत्र्यांकडे पाठविले होते. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांकडेही पाठविले होते. जामनेर, जिल्हा जळगाव येथील गट नंबर ९५९ ही जमीन जैन नामक एका ज्येष्ठ राजकीय पुढाऱ्याची आहे. या जमिनीचे क्षेत्रफळ २०.६ हेक्टर एवढे आहे. ही जमीन साग लागवडीखाली आहे, असे दाखविले. त्या ठिकाणी ८७,६०० रोपांची लागवड करणे शक्य असताना प्रत्यक्ष उताऱ्यावर मात्र १ लाख ५० हजार रोपांची लागवड झाल्याचे दाखविण्यात आले आणि खोट्या नोंदी करण्यात आल्या आहेत. सन २००१-२००२ मध्ये ८२ हजार सागाची तोडणी करण्यात आली. त्याचे उत्पन्न १ कोटी ४५ लाख आहे, असे दाखविण्यात आले. याबाबत उताऱ्यावर केलेल्या नोंदी बोगस करण्यात आल्या आहेत. तेथील स्थानिक आर.एफ.ओ. यांनी बनावट पासेस तयार करून दिले आहेत. त्यांचे नंबर बनावट आहेत, त्यावर मोटार सायकल व रिक्षाचे क्रमांक आहेत. एका मोटार सायकलवरून १,२०० मोठी झाडे तसेच रिक्षातून १,४०० झाडे वाहून नेल्याचे दर्शविण्यात आले आहे. यातील काही क्रमांक अस्तित्वात नाहीत. अशा प्रकारची बनावटगिरी तेथे करण्यात आलेली आहे. सदर क्षेत्रात प्रमाणापेक्षा दुप्पट लागवड दाखविण्यात आली आहे. सागवान वृक्ष लागवडीच्या नोंदी पाहिल्या तर यातून फक्त १ कोटी ४५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळणे अशक्य आहे. परंतु, इन्कम टॅक्स वाचविण्यासाठी हे उद्योग करण्यात आले आहेत. इन्कम टॅक्सकडे हे प्रकरण गेले, त्या विभागाने या प्रकरणाची तपासणी केली. ती प्रॉपर्टी सील केली, त्याबाबतची कारवाई अलाहिदा सुरू आहे. याबाबत तहसीलदार व प्रांत अधिकारी यांनी अशा बनावट नोंदी केल्या याबाबत मंत्री महोदय काय कारवाई करणार आहेत. शासनाने सन २००६ मध्ये तहसीलदार व प्रांत अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले. राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध कोणतीही कारवाई होत नाही. हा भ्रष्टाचार काही एका व्यक्तीने केलेला नाही. पीक पाहणी करण्यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी जळगाव यांनी दिनांक १८ ऑगस्ट २००६ रोजी दिले. परंतु, वन विभागाने पीक पाहणीची खात्री केलेली नाही. इन्कम टॅक्स विभागाने तपासणी केली, ती वेगळी आहे. त्यामुळे तहसीलदार व प्रांत अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, जामनेर यांना याबाबत जाबही विचारण्यात आलेला नाही.

अध्यक्ष महोदय, वन विभागाने सदर जमिनीत लागवड केलेल्या १ लाख ५० हजार झाडांपैकी ८२ हजार झाडांची कापणी करण्यासाठी परवानगी व वाहतूक निर्गत पासेस दिल्याचे दस्ताऐवज तयार केले. त्याचे अवलोकन केले असता हे सर्व बनावट व बोगस असल्याचे आढळून आले आहेत. ऑटोरिक्षाद्वारे १,२२८, मोटर सायकलद्वारे १,५५० बल्ल्यांची वाहतूक केल्याबाबत बनावट पासेस तयार करण्यात आल्या आहेत. संबंधित वन अधिकाऱ्यांनी याची पाहणी करून तपासणी करावयास पाहिजे होती. परंतु, तसे करण्यात आले नाही. मुख्यमंत्री महोदयांनी हे प्रकरण चौकशीसाठी दिले आहे. सीसीएफ तेथे जाऊन आले आहेत. वन

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]

विभागांच्या सचिवांकडे हे प्रकरण आले आहे. मंत्री महोदयांनी आज सांगितले पाहिजे की याबाबत तातडीने कारवाई करण्यात येईल. नाही तर राजकीय दबावापोटी मंत्री महोदयांना भेटीगाठी संस्कृतीत ते भेटले आणि त्यांनी विनंती केली तर हे प्रकरण तसेच थंड बस्त्यात जाऊ शकते. सर्व पेपर मी मंत्री महोदयांकडे पाठवितो. हे पेपर मंत्रालयात आहेत. यासंदर्भात कारवाई करावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, पुनर्वसनाच्या संदर्भात मुंबई, ठाणे व नवी मुंबईसाठी शाई आणि काळू प्रकल्प मुरबाड व शहापूर तालुक्यात करण्यात येत आहेत. मिरा-भाईंदर, भिवंडी या महानगरपालिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी मुरबाड व शहापूर तालुक्यात हे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पाचे पाणी या शहरांना द्यावयाचे आहे. तेथील शेतकऱ्यांची अशी मागणी आहे की, आमच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे. प्रकल्पात जी गावे जातात त्यांच्या पुनर्वसनासाठी पॅकेज तयार केले पाहिजे. मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत लक्ष घालून पुनर्वसनाचे पॅकेज तयार केले. परंतु पुनर्वसन खात्याच्या प्राधिकरणाकडे ही कार्यवाही अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. प्रकल्पगस्तांसाठी असलेले पॅकेज तातडीने प्राधिकरणाने परवानगी दिली पाहिजे. त्यानंतर या कामांना सुरुवात होईल. शेतकऱ्यांच्या जमिनी व घरे गेली आहेत. त्या रेशोनुसार त्यांना पाणी मिळाले पाहिजे. या दोन मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास खात्याच्या संदर्भात बोलत असताना या विषयावर खूप काही बोलता येण्यासारखे आहे. जिल्हापरिषदांकडील कारभार वाढला आहे. केंद्र व राज्य सरकारने गाडगेबाबा स्वच्छता अभियानापासून अनेक योजना जिल्हापरिषदांकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. पी. बी. पाटील समितीने अहवाल दिला आहे, त्यानुसार युती शासनाच्या काळात स्वतंत्र ॲडिशनल सीईओ आस्थापना निर्माण करण्यात आलेली होती. ॲडिशनल सीईओ म्हणून आपण त्यातून नव्याने पद निर्माण केले. हेतू असा होता की, तो डेप्युटी सीईओ लेव्हलपर्यंत सेवा करून सेवानिवृत्त होत होता. त्यामधून ॲडिशनल सीईओचे पद निर्माण केले आणि जिल्ह्यामध्ये जसे कलेक्टर आणि ॲडिशनल कलेक्टर आहेत त्याप्रमाणे सीईओ आणि ॲडिशनल सीईओ ही पदे झाली. परंतु ॲडिशनल कलेक्टरला आयएएस नॉमिनेशनमध्ये संधी आहे. तशी संधी पदोन्नतीने ॲडिशनल सीईओला नाही. इतकी वर्षे सेवा केल्यानंतर वयाच्या ५०-५५ व्या वर्षी तो ॲडिशनल सीईओ होतो. त्यानंतरही त्याला ती संधी उपलब्ध नाही. यामध्ये माझ्या दोन मागण्या आहेत. जर सिनियर ॲडिशनल सीईओ असेल तर आपण जसे ज्युनियर आयपीएस अधिकाऱ्याची एखाद्या लहान जिल्ह्यामध्ये डीएसपी म्हणून नियुक्ती करतो. त्याप्रमाणे जो सिनियर ॲडिशनल सीईओ असेल त्याच्याकडे लहान जिल्हापरिषदा किंवा मोठ्या जिल्हापरिषदा दिल्या तरी नुकसान होणार नाही. कारण त्यांना कामाचा अनुभव असतो. त्यामुळे त्यांची काही ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती करण्याच्या संदर्भात आपण कार्यवाही करावी.

तसेच, आयएएस नॉमिनेशनच्या संदर्भात नॉन सिव्हिल सर्व्हिस यातून कधी तरी एखादी संधी मिळते आणि कधी तरी एखादा अधिकारी त्या पदापर्यंत जातो. त्यामुळे आयएएस नॉमिनेशनच्या संदर्भात नॉन सिव्हिल सर्व्हिसेसच्या कोट्यातील १५ पदांवर व इतर ४५ संवर्गातील अधिकाऱ्यांशी स्पर्धा करून अत्यल्प प्रमाणात निवडीच्या सिलेक्शन प्रक्रियेच्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील ३३ जिल्हापरिषदांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भारतीय प्रशासकीय सेवा संवर्गातील पदे मंजूर आहेत. भारतीय प्रशासकीय

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) ]**

सेवेतील अधिकाऱ्यांना प्रथम नियुक्तीचे पद म्हणून उपजिल्हाधिकारी हे पद देतात, तसे सिनियर ॲडिशनल सीईओ मी मघाशी सांगितले त्याप्रमाणे सीईओ पद देण्यात आले पाहिजे. नागरी प्रशासनातील प्रशासकीय अनुभव विचारात घेता आयुक्त म्हणून १५ ''ड'' वर्ग महानगरपालिकांमध्ये नियुक्ती देण्याचा निर्णय जसा पूर्वी शासनाने नगरविकास विभागाच्या सीईओच्या संदर्भात घेतला तसा आपल्याला सुद्धा यासंदर्भात निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अति. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जे विकास केडरमधील अधिकारी आहेत त्यांना आयएएस नॉमिनेशनमध्ये प्राधान्य मिळाले पाहिजे आणि त्या रेश्योमध्ये वाढ झाली पाहिजे. यासाठी सिव्हिल सर्व्हिसेसमधून प्रयत्न करून त्यांना अधिकाधिक आयएएसच्या संधी कशा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. कारण यांना त्यामध्ये काम करण्याची संधीच उपलब्ध नाही.

अध्यक्ष महोदय, यामधील मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती देण्यासाठी किमान ५० टक्के जागा ज्या आहेत, त्या डी-केडर केल्या पाहिजेत. शासनामध्ये ज्याप्रमाणे ५० टक्के नॉमिनेटेड आयएएस असतात आणि ५० टक्के डायरेक्ट आयएएस आहेत, अशा स्वरूपाचा एक विचार यासंदर्भात ५० टक्के सीईओ पद डी-केडर करून नॉन-आयएएस पदे करण्याबाबत शासनाने तत्काळ निर्णय घ्यावा. जेणेकरुन त्यांना न्याय मिळू शकेल आणि प्रशासनाला वेग येईल.

अध्यक्ष महोदय, मी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याची तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. बाळा नांदगावकर** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही सभागृहात समाज हिताचे वेगवेगळे विषय उपस्थित करीत असतो. परवा सभागृहामध्ये नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि मराठी भाषा विभाग या चार अत्यंत महत्त्वाच्या मागण्यांवर चर्चा झाली. मी सभागृहामध्ये मुंबई आणि महाराष्ट्रातील गिरणी कामगारांविषयी बोललो होतो. गिरणी कामगारांना कमीत कमी पैशामध्ये घरे मिळाली पाहिजेत, अशी मी माझ्या भाषणामध्ये विनंती केली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित होते. मी त्यावेळी बरेच विषय उपस्थित केले होते. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये त्या मुद्द्यांचा साधा नामोल्लेख सुद्धा केला नाही. मी ही बाब यासाठी सांगत आहे की, विधान परिषदेत जेव्हा गिरणी कामगारांच्या घरांचा विषय उपस्थित करण्यात आला, त्यावेळी राज्याचे माननीय राज्यमंत्री यांनी त्या बाबतीत शासनाची कोणती भूमिका आहे, यासंबंधी उत्तर दिले. अध्यक्ष महोदय, मी गिरणी कामगारांच्या विभागातील आमदार आहे. गेल्या चार टर्मपासून गिरणी कामगार मला निवडून देत आहे. मी लोकसभेच्या निवडणुकीसाठी उभा राहिलो असता, मला तेव्हाही प्रचंड मतदान केले होते. अशा परिस्थितीत मी या सदनात गिरणी कामगारांच्या प्रश्नाविषयी बोललो तेव्हा या सदनात माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते, त्यांच्याकडे नगरविकास विभाग आहे. त्यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात गिरणी कामगारांचा साधा उल्लेखही केला नाही. यामुळे मला फार वाईट वाटले. विधान परिषदेत याच विषयासाठी राज्याचे माननीय राज्यमंत्री

**[ श्री. बाळा नांदगावकर ]**

उत्तर देतात. परंतु या सदनात माननीय मुख्यमंत्री आमच्या प्रश्नांना उत्तर देत नाहीत. आमच्या भावना समजून घेतल्या जात नाही. त्यामुळे आम्ही या सभागृहात कशासाठी यावयाचे ? या गोष्टीमुळे आम्हाला अतिशय चीड येते, संताप होतो. कोणते सभागृह ज्येष्ठ, कोणते सभागृह कनिष्ठ याच्या खोलात मी जाणार नाही. आम्हाला लोकांनी निवडून या सभागृहात पाठविलेले आहे. अध्यक्ष महोदय, आमच्या भावना माननीय मुख्यमंत्री महोदयांना तसेच राज्याच्या मंत्रिमंडळाला समजल्या पाहिजेत. याच उद्देशाने मी हा विषय येथे उपस्थित केला.

अध्यक्ष महोदय, मध्यंतरी राज्यातील आदिवासींचा मोर्चा मुंबईत आझाद मैदानावर आला होता. हा मोर्चा ६५० ते ७०० कि.मी. वरून चालत आला होता. ज्या जमिनीवर आदिवासी राहतात त्या जमिनींचे पट्टे मालकी हक्काने मिळावेत, ७/१२ उताऱ्यावर त्यांच्या नावाचा समावेश व्हावा, यासाठी सदर मोर्चा आला होता. परंतु अजूनही शासनाने त्यासंबंधी निर्णय घेतलेला नाही. माझी महसूल मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात मूळ पुरुष असलेल्या आदिवासींना जमिनीचे पट्टे देण्यासंबंधी व ७/१२ उताऱ्यावर त्यांची नावे येण्यासंबंधीचा उल्लेख करावा.

अध्यक्ष महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणावर बेदखल कुळे आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात "राहील त्याचे घर, कसेल त्याची जमीन", असा कायदा झाला. या राज्यातील बेदखल कुळांचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. हा प्रश्न किती वर्षे प्रलंबित ठेवणार आहात ? शासन हा प्रश्न कधी तरी सहानुभूतीने सोडविणार आहे का ? माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, राज्यातील बेदखल कुळांचा प्रश्न सोडविण्यासंबंधी या अधिवेशनात सांगावे आणि पुढील अधिवेशनात त्यासंबंधी विधेयक आणा व राज्यातील बेदखल कुळांचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढावा.

अध्यक्ष महोदय, राज्यात बागायती जमिनींप्रमाणे जिरायती जमिनी आहेत. तेथे रब्बी व खरिपाची पिके घेतली जातात. शासन नापिकी जमिनींचा प्रश्न सोडविणार आहे का ? शासनाकडून कधी तरी या भागांचा विचार केला जाणार आहे का ?

अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षी तत्कालीन वित्त मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी गुरुवार, दिनांक २५ मार्च २०१० रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणातील भाग क्रमांक - पहिला या अर्थसंकल्पीय भाषणाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. पान क्रमांक १८ वरील अनुक्रमांक ५५ असे नमूद केलेले आहे की, " जागतिक किर्तीचे क्रिकेट खेळाडू श्री. सचिन तेंडुलकर हे देशासाठी गौरव ठरलेले आहेत. क्रिकेटच्या क्षेत्रात त्यांनी अद्वितीय योगदान दिले आहे. राज्यातील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सुप्रसिद्ध किक्रेटपटू श्री. सचिन तेंडुलकर यांच्या खेळाडू जीवनावर मुंबई शहरात भव्य क्रीडा संग्रहालय उभारण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात येईल." पण कोणत्याही निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. मान्यवर खेळाडू श्री. सचिन तेंडूलकर यांच्यासाठी कोणताही भूखंड आरक्षित केलेला नाही.

**[ श्री. बाळा नांदगावकर ]**

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात रोज नवनवीन भूखंड घोटाळ्याची प्रकरणे बाहेर काढीत आहेत. त्यामध्ये ओन्ली विमल, हिरानंदानी, आकृती अशा बड्या लोकांच्या भूखंड घोटाळ्याची प्रकरणे बाहेर काढीत आहेत. जागतिक किर्तीच्या महान खेळाडूसाठी राज्य शासन भूखंड आरक्षित करू शकत नाही, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट राज्य सरकारला म्हणावी लागेल. महानगरपालिकेला कलम ३७ खालील डायरेक्शननुसार भूखंड दिले जातात. ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. येथे चांगल्या गोष्टीसाठी भूखंड मिळत नाही, ही खंत आहे. वानखेडे स्टेडियमचे आधुनिकीकरण केले. नवी मुंबई येथे डी. वाय. पाटील स्टेडियम उभारले गेले. माननीय डॉ. पतंगराव कदम यांची अनेक विद्यापीठे आहेत. त्यांनी मनात आणले तर ते देखील उद्या एखादे भव्य स्टेडियम बांधू शकतील. सचिन तेंडूलकरच्या सन्मानार्थ पूर्व किंवा पश्चिम उपनगरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारण्याची गरज आहे. परंतु दादांनी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. महान खेळाडूसाठी मुंबई उपनगरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम बांधण्याची गरज आहे. याकरिता महानगरपालिकेने किंवा शासनाने भूखंड आरक्षित करण्याची कार्यवाही केली पाहिजे. मुंबई शहरात अनेक मोकळ्या जागांवर झोपड्या उभ्या केल्या जातात, पण महान खेळाडूसाठी मुंबई उपनगरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम बांधण्यासाठी भूखंड आरक्षित केला जात नाही, ही खरी दुर्दैवाची गोष्ट आहे. आज अनेक आरजी, पीजीचे प्लॉट आहेत. शासनाने महान खेळाडू श्री. सचिन तेंडूलकरसाठी एखादे स्टेडियम उभारले तर काहीही फरक पडणार नाही. याकरिता राज्य शासनाने एखादा भूखंड आरक्षित करून क्रिकेट स्टेडियम उभारण्याची कार्यवाही करावी, अशा प्रकारची विनंती करून मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

**श्री. शशिकांत शिंदे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या अर्थसंकल्पात महसुलात वाढ होण्यासाठी अनेक उपाय सुचविण्यात आलेले आहेत. विरोधकांकडून सुद्धा रोज महसूल आणि जमिनींच्या घोटाळ्यांची अनेक प्रकरणे बाहेर काढली जात आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगावकर यांनी जमिनींचे किती महत्त्व आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. अण्णा हजारे गेली दोन दिवस अधिकाऱ्यांवर आणि शासनावर जरब बसावी म्हणून लोकसभेत लोकपाल विधेयक मंजूर करण्याकरिता उपोषणास बसलेले आहेत. लोकसभा आणि विधानसभेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विधानसभेत २८८ सन्माननीय सदस्यांच्या विचारविनिमयातून कायदे केले जातात. एखाद्या बाहेरच्या मान्यवर व्यक्तीच्या आग्रहाखातीर विधेयक मंजूर करायला लागलो तर सभागृहाचे महत्त्व कसे अबाधित राहणार हा देखील खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. विरोधी पक्षाकडून दररोज एखाद्या गैरव्यवहाराच्या प्रकरणातील पुरावा देण्याचा उल्लेख केला जातो. माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेता येऊ शकते. जर लोकपाल विधेयक मंजूर झाले तर शासनातील अधिकारी, राजकारणी लोकांवर जरब बसणार आहे. विरोधी पक्षाकडून दररोज एका घोटाळ्याच्या संदर्भातील प्रकरणे बाहेर काढली जात आहेत. अशा प्रकारे केलेल्या आरोपाचे पुढे काय होते ते सदनातील २८८ सन्माननीय सदस्यांना कळले पाहिजे, या विचाराचा मी आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगावकर यांनी

**[ श्री. शशिकांत शिंदे ]**

सचिन तेंडुलकरच्या जमिनीसंदर्भातील माहिती दिली. श्रीमंताला कोणतीही गोष्ट सहज मिळते, परंतु गरिबाला मात्र स्वत:ला राहण्यासाठी घर मिळत नाही, ही एक शोकांतिका आहे. हिरानंदानी बिल्डरचा विषय निघाला. ही बिल्डर मंडळी शासनाची जमीन हडप करतात. वन विभागाची परवानगी घेतली जात नाही. पर्यावरणाची परवानगी घेतली जात नाही. अशा प्रकारे कसलीही परवानगी न घेता मोठमोठ्या जमिनी हडप करून त्यावर मोठमोठे टॉवर उभे करतात. पूर्वी विमल शहा बिल्डरचे नाव ऐकले होते. मुंबईत कोणकोण बिल्डर्स मंडळी आहेत, याची मला कल्पना नाही. परंतु आता चतुर्वेदी बिल्डर्सचे नाव सातत्याने चर्चेत येत आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग, वन विभागात भ्रष्टाचार झाला असेल तर त्या भ्रष्टाचाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली, याबाबतची माहिती सदनाला होणे आवश्यक आहे. कायदा करण्यामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग असतो, याबद्दल वादच नाही. त्यामुळे या कायद्याचा वचक सभागृहातील २८८ लोकप्रतिनिधींनाही असणे आवश्यक आहे. बऱ्याच प्रकरणांसंदर्भात तडजोडी केल्या जातात. तडजोडी केल्यानंतर मग त्यासंबंधी वर्तमानपत्रातून टिका केली जाते. त्यानंतर त्या प्रकरणाला राजकीय रंग दिला जातो. परंतु असे प्रकार होता कामा नये.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाचा महसूल वाढला पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत नाही. शासकीय जमिनी विकसकांना देताना किंवा अन्य प्रोजेक्टसाठी देत असताना किंवा अन्य कसलीही परवानगी देत असताना त्यातून शासनाला महसूल मिळालाच पाहिजे या मताचा मी आहे.

अध्यक्ष महोदय, एखाद्या उद्योगपतींविरुद्ध किंवा बिल्डर्सविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप झाले असतील, त्यानंतर त्यांच्याविरुद्ध पुढील जी काही कारवाई झाली असेल त्याबाबतची माहिती या सदनाला मिळाली पाहिजे, ती जाणून घेण्याचा आमचा हक्कच आहे. बऱ्याच वेळेला एखाद्या बिल्डरच्या नावाची चर्चा या सभागृहात होते. त्यानंतर पुढच्या वेळेस मात्र त्याचे नाव चर्चेला येत नाही. त्यामुळे विश्वासार्हतेला तडा जातो. मग राज्यात भ्रष्टाचाराच्या प्रकरणांविरुद्ध आंदोलने, उपोषण केली जातात. मग सन्माननीय आमदार हे भ्रष्टाचारी आहेत, पैसे घेणारे आहेत अशा प्रकारचे आरोप राजकीय मंडळीवर होतात, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून जमिनीचे व्यवहार असतील किंवा अन्य शासनाच्या पॉलीसी असतील त्यासंदर्भातील जो काही निर्णय होणार आहे, जी काही मध्यस्थी होणार आहे त्या निर्णयाचे दाखले या सदनाला मिळाले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. या सदनामधून आमच्यापर्यंत पोहोचले पाहिजे. हा अधिकार विरोधी पक्षाचा आहे, तसाच तो सत्ताधारी पक्षाचाही आहे. याप्रमाणेच हा अधिकार प्रामाणिकपणे जनतेचाही असला पाहिजे. कोणत्याही पक्षाने राजकीय सूडबुद्धीने राजकारण करू नये. चांगल्या कामासाठी तडजोड केली तरी चालेल, परंतु भ्रष्टाचारासंबंधी कसलीही तडजोड होता कामा नये.

अध्यक्ष महोदय, राज्याचा महसूल वाढविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना ठराविक टारगेट देण्यात येते. जिल्हाधिकारी हे तालुक्याच्या तहसीलदारांना काही टारगेट देतात. त्यानंतर संबंधित खात्याचा अधिकारी आपल्या अधिकाराचा वापर करून महसूल वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. ठराविक टारगेट दिल्यानंतर ते पूर्ण करण्यासाठी त्याला सर्वसामान्य माणसांकडून वसुली करावयाची असेल तर त्यासाठी वेगळी शक्ती वापरावी लागते. एखादा श्रीमंत माणूस असेल त्यासाठी वेगळी क्लृप्ती लढवावी लागते. परंतु ऐनकेनप्रकारे

**[ श्री. शशिकांत शिंदे ]**

ते अधिकारी आपणास ठरवून दिलेले टारगेट पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, असे होत असताना कधी कधी अशी परिस्थिती होते की, चोर सोडून साध्या माणसाला त्रास जास्त होतो. एखाद्याच्या घराच्या बाहेर रेतीचा ढीग पडला असेल तर त्यावर दंड आकारणारेही आम्ही पाहिले आहेत. मात्र जे लोक वाळूच्या गाड्या बाहेर सोडतात. त्यांच्यावर कर आकारला जात नाही. आमचे म्हणणे आहे की, जे लोक चोरी करतात, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मात्र जे लोक प्रामाणिक आहेत, त्यांच्यावर कारवाईचा बडगा येणार नाही, याकडे लक्ष दिले पाहिजे. लक्ष्य पूर्ण करण्यासाठी या प्रामाणिक लोकांवर कारवाई केली जाऊ नये. त्यांना कारवाईचा त्रास होणार नाही, याकडे लक्ष दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, गौण खनिजाचा लिलाव टेंडर पद्धतीने केला जातो. या संदर्भात सभागृहात चर्चा झालेली आहे. गौण खनिज घेणारे लोक कोण आहेत ? आमचे असे म्हणणे आहे की, शासनाने या गौण खनिज लिलावामध्ये पुढाकार घ्यावा. गौण खनिजाच्या माध्यमातून किती टक्के उत्पन्न जमा होते ? त्यापैकी किती टक्के उत्पन्न शासनाला मिळते ? हे शासनाला कळत नाही, महसूल विभागाला समजत नाही काय ? अनेक ठिकाणी ४ टनाच्या गाडीऐवजी २ टनाची गाडी भरली जाते. त्या बाबत काय करता येईल, याचा विचार करणे आवश्यक आहे. मात्र या संदर्भात कारवाई केली आहे, असे केवळ दाखविण्याची भूमिका घेतली जाते. यामुळे अडचणी निर्माण होतात. गौण खनिजाच्या बाबतीत कोर्टाने निर्णय दिलेला आहे. गौण खनिजाचा वापर करण्याबाबत पूर्वी पालकमंत्र्यांना अधिकार दिला होता. ज्या ठिकाणी गौण खनिजाचे उत्पादन होते, त्या गावातील आजूबाजूच्या ३ किमी. पर्यंतच्या रस्त्यांना किंवा गावातील सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्या, असा कोर्टाने निर्णय दिला होता. हे प्रकरण हायकोर्टमध्ये गेले, त्यावेळी असा निर्णय दिला की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन करणारी एक वेगळी समिती गठित करावी. ज्या गावातील गौण खनिजाचे उत्पन्न होते, तेथे या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी केली गेली नाही. २ -३ वर्षे होऊन देखील नियमानुसार गौण खनिजाच्या निधीचा उपयोग शासन करीत नसेल तर यासारखे दुसरे कोणते दुर्दैव नाही. गावातील रस्ते खराब झाले असतील, पाईपलाईन फुटली असेल, गटारे नसतील तर गौण खनिजामधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग या सर्व सोयीसुविधा देण्याकरिता केला गेला पाहिजे. मात्र तसे केले जात नाही. त्यामुळे गावातील लोकांनी गौण खनिज उत्खननाचे काम बंद पाडले. अशा वेळी गावातील लोकांवर कारवाई केली जाते. रॉयल्टींच्या माध्यमातून १० ते २० टक्के उत्पन्न गावातील सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी देण्याचा नियम आहे. मात्र प्रशासकीय विलंबामुळे २ ते ३ वर्षे हा निधी वापरला जात नाही. यामध्ये फार मोठी चूक आहे. गौण खनिज उत्खननासाठी परवानगी घेण्याकरिता नागपूरला जावे लागते. यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. जुन्या परंपरा बाजूला ठेवून जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर निर्णय घेऊन मुख्यमंत्र्यांकडील समितीकडून निधी देण्याची कारवाई करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने महसूल विभागाच्या माध्यमातून राज्यात एक खिडकी योजना सुरू केली होती. मात्र मी आता त्या संदर्भात बोलत नाही. सामान्य माणसाला तलाठ्याकडून काय त्रास होतो, याचा विचार केला तर आपल्याला दिसून येईल की, या ठिकाणी बऱ्याच अडचणी आहेत. तहसीलदार कचेरीमध्ये होणाऱ्या कामाच्या संदर्भात पारदर्शकता आली पाहिजे. त्या करिता शासनाने निर्णय घेणे गरजेचे आहे.

**[ श्री. शशिकांत शिंदे ]**

देखील शासनाच्या ताब्यात ज्या जमिनी आहेत, त्या जाहीर करणे गरजेचे आहे. जमिनींचे अधिकार कोणाकडे आहेत, हे सांगणे आवश्यक आहे. त्या जमिनींच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. ही काळाची गरज आहे. शासनाने या बाबत निर्णय घेतला नाही तर जे श्रीमंत लोक आहेत, त्यांच्याच मालकीच्या या जमिनी होतील. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या ठिकाणी ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत, त्या बाबत विचार करावा.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास कार्यक्रम राज्यात सुरू करण्यात आला आहे. आतापर्यंत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामपंचायतीकडे किती निधी पोहोचतो हा खरा प्रश्न आहे. केंद्र शासनाने, राज्य शासनाने ग्रामपंचायतीला अधिकार देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. प्रत्यक्ष कामाच्या संदर्भात मी या विभागाच्या संदर्भात २ ते ३ सूचना करणार आहे. ग्रामीण भागामध्ये पांदण रस्ते तयार करण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्र्यांना मी सांगणार आहे की, आज एमडीआर व ओडीआरचे रस्ते सोडले तर, ग्रामीण भागातील ७० टक्के रस्ते हे जिल्हापरिषदेच्या अधिपत्याखाली आहेत. त्याला आज पैसे उपलब्ध करावयाचे म्हटले तर फक्त एसआर हा एकमेव निधी उपलब्ध होऊ शकतो. परंतु, दुर्दैवाने ते पैसे उपलब्ध होऊ शकत नाहीत. याबाबत प्लानिंग केले गेले पाहिजे. या सदनातील सर्व सदस्यांची हीच भावना आहे की, जिल्हापरिषदेच्या अंतर्गत असलेल्या ज्या रस्त्यांच्या कामासाठी निधी मिळू शकत नाही. त्या निधीच्या संदर्भातील काय भूमिका घ्यायची याबाबत ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. आम्ही जर बजेटमध्ये ही कामे टाकली तर, सांगितले जाते की, फक्त स्टेट हायवे आणि एमडीआरचे रस्ते घेतले जातात. जिल्हापरिषदेच्या अंडर असलेले रस्ते घेतले जात नाहीत. सर्वांची भूमिका आहे की, सप्लिमेंटरी बजेटसाठी का होईना पण स्वतंत्रपणे एक ठराविक निधी या जिल्हा परिषदेच्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांसाठी मिळणे गरजेचे आहे. पूर्वी यासाठी निधी मिळत होता. आता त्यासाठी नाबार्ड मधून, पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून निधी मिळत नाही. याची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

मी पीएमएसवाय बद्दल एवढेच बोलणार आहे की, याबाबतीत प्रस्ताव गेलेले आहेत. याबाबतीत राज्याला टार्गेट दिले जाते. आज राज्याच्या समितीमध्ये मी आहे, अध्यक्ष महोदय आपणही आहात, आपण जर पाहिले तर पीएमएसवायच्या कामामध्ये महाराष्ट्रातील किती रस्ते व्हावेत, याबाबत जिल्ह्याला टार्गेट दिले जाते. आपण निकष ठरवला की, १ हजार पर्यंत जेवढे रस्ते असतील तेवढे घेतले पाहिजेत. परंतु, प्रत्यक्षात तसे होत नाही. गेल्या काही वर्षांपासून पीएमएसवाय मधील कामाची जी क्वॉलीटी आहे, ती पाहिली तर तेथे सुद्धा भ्रष्टाचार पोहोचला असे म्हटले तर, ते वावगे ठरणार नाही.

अध्यक्ष महाराज, मी २ रस्त्यांबाबत सांगतो, पाहिजे तर त्याबाबत मी लेखी निवेदन देतो. खेडचा कोरेगावचा रस्ता असेल किंवा कटापूर ते कोरेगावचा रस्ता असेल, हे रस्ते २००९ साली मंजूर झाले. परंतु, ठेकेदारांनी हे काम घेऊनही आजपर्यंत तेथे रस्ता केला गेला नाही. त्याबाबत कारवाई करावी, अशी आम्ही मागणी केली तर त्या संदर्भातही कायद्याच्या चौकटीमध्ये फार मोठ्या प्रमाणावर विलंब होत आहे.

अध्यक्ष महोदय, पंतप्रधान ग्राम सडक योजनेमध्ये मला वाटते की, ५०० च्या वर १६ वा, १७ वा असे टप्पे येणार आहेत. त्या टप्प्यामध्ये महाराष्ट्रातील जेवढी गावे असतील ती घेणे गरजेचे आहे. त्या संदर्भामध्ये आपण केंद्रामध्ये पाठपुरावा करून याबाबत नियोजन करण्याची गरज आहे. ज्यांच्या कामाची काही

**[ श्री. शशिकांत शिंदे ]**

क्वॉलिटी नाही अशा अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई झाली पाहिजे. अशा अधिकाऱ्यांना वरिष्ठ अधिकारी पाठीशी घालताना दिसतात. याबाबत अधिकाऱ्यांकडून असे सांगितले जाते की, "त्याला नोटिस देतो". परंतु, त्याने जर त्या प्रकारचा गैरप्रकार केला असेल तर पोलीस कस्टडी दिली पाहिजे किंवा त्याच्यावर पोलीस कारवाई झाली पाहिजे, असे मला वाटते. अशा प्रकारचे कडक धोरण स्वीकारण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत मी विनंती करणार आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी माननीय श्री. आर. आर. पाटील ग्रामविकास मंत्री होते, त्या काळात त्यांनी ग्रामस्वच्छता अभियान काढले. आता ग्रामविकास मंत्री म्हणून माननीय श्री. जयंत पाटील साहेब आले त्यांनी पर्यावरणविषयक स्पर्धा लावली. जिल्हापरिषदेच्या, ग्रामपंचायतीच्या सरपंचांना सारखे स्पर्धेत उतरावे लागत आहे व स्पर्धेत उतरल्यानंतरही कामांसाठी पैसे मिळत नाहीत, अशी त्यांची भावना झालेली आहे. महाराष्ट्र हिरवागार व्हावा, महाराष्ट्रामध्ये पर्यावरणाचे संतुलन व्हावे, ही त्यांची चांगली कल्पना आहे. या स्पर्धेमध्ये आमच्या ग्रामपंचायतीच्या सरपंचांना फार कष्ट करावे लागत आहेत. वसुलीसाठी जर काही सूट दिली तर वसुलीच्या नियमामध्ये किंवा कुठल्याही नियमामध्ये ते अडकले तर त्यांची अडचण होते. मी माननीय मंत्र्यांना सांगेन की, स्पर्धा तर आपण ठेवाच पण आपण या स्पर्धेतून पैसेही द्या. परंतु, केवळ स्पर्धेतून पैसे न देता इतर पद्धतीने ग्रामपंचायतीपर्यंत निधी पोहाचविण्याचा संकल्प केलेला आहे, त्या पद्धतीने तो निधी देण्याबाबतीतील भूमिका घेणे गरजेचे आहे.

यशवंत ग्राम समृद्धी योजना बरीच वर्षे बंद होती. माननीय श्री. जयंत पाटील यांचे मी अभिनंदन करेन की, त्यांनी बऱ्याच वर्षांनंतर ही योजना सुरू केली. पण ती गुप्ततेत केली. त्यांनी ग्रामसमृद्धी योजनेतून ज्या ग्रामपंचायतींना फायदा हवा आहे, त्यांनी ठराविक रक्कम दोन दिवसांत जमा करण्याबाबत इंटरनेटद्वारे प्रसिद्ध केले. त्यांना वाटले की, ग्रामपंचायतीचे सदस्य इंटरनेटचा वापर करीत नसतील. परंतु, या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माननीय श्री. जयंत पाटील यांना कळले की, ग्रामपंचायतीचे सरपंच/सदस्य संगणक क्षेत्रात पुढे गेलेले आहेत. ग्राम समृद्धी योजनेचा लाभ मिळण्यासाठी महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी केवळ दोन दिवसांत ५४ कोटी रुपये जमा करण्याचा विक्रम केला. तेवढ्यामध्ये आपले भागून जाईल. जास्त पैसे आल्यामुळे त्यांच्यासमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता यासाठी परत निधी कुठून उपलब्ध करून द्यायचा. यशवंत ग्राम समृद्धीचे पैसे ज्यांनी भरले आहेत, त्या लोकांना सुद्धा आपण न्याय देण्याची भूमिका घ्यावी, अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी जलसंधारण विभागावर बोलणार आहे. पूर्वी अनुशेष होता, तो आता दूर झालेला आहे. जलसंधारण विभाग दुष्काळी भागासाठी काम करते. या खात्यासाठी जी तरतूद करण्यात येते, ती फार अपुरी असते. गाळ काढण्यासाठी, दुरुस्ती करण्यासाठी २ ते ३ लाखांची तरतूद करण्यात येते. पाझर तलावांच्या दुरूस्तीसाठी पैसा काढणे आणि भ्रष्टाचार करणे हेच काम केले जाते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. जिल्ह्याला आपण पैसे दिलेले असतील. त्यातून फक्त ४ कामे घेण्यात यावीत व ती पूर्ण करण्यात यावीत. केंद्रातून आपल्याला ७० टक्के निधी मिळत आहे. २० टक्के निधी राज्य शासन देणार आहे आणि १० टक्के निधी लोकवर्गणीतून जमा करणार आहोत. जलसंधारण विभागाच्या माध्यमातून ल.पा. ची कामे, पाझर तलावाची कामे घ्यायला आपल्याला संधी आहे. या कामासाठी पैसे उपलब्ध

[ श्री. शशिकांत शिंदे ]

होण्यासाठी आम्ही जिल्हा नियोजन समितीला तरतूद करायला लावली. असे असताना राज्य शासनाने केंद्र शासनाकडे किती किमतीचा प्रस्ताव पाठविला आहे, हे देखील आम्हाला कळले पाहिजे. राज्य शासन २० टक्के निधी देऊन जलसंधारणाची १०० टक्के कामे होणार असतील तर याला प्राथम्य द्यावे व या कामासाठी बजेटमध्ये तरतूद करावी. जेणेकरून जास्तीत जास्त पैसा हा पाणी अडविण्यासाठी आणि जिरवण्यासाठी उपयोगात येईल.

यानंतर मी वन खात्यावर बोलणार आहे. श्री. पतंगराव कदम यांनी वन खात्याचा कारभार स्वीकारल्यानंतर वन खाते बहरायला लागले आहे. सगळीकडे वनांची वाढ होत आहे. त्यांनी तशा प्रकारची पावले उचलली आहेत. मंत्री म्हणून मी त्यांच्याकडून अपेक्षा करणार आहे. भोपाळ आणि नागपूरला फेऱ्या आम्हाला माराव्या लागतात, मारू नये असे मला वाटते. आपण सक्षमतेने निर्णय घेणारे मंत्री आहात. भोपाळ आणि नागपूरला आम्ही जावे का ? हा आमचा प्रश्न आहे. मी येथे एकच उदाहरण देणार आहे. मी सातारा येथे एक बैठक घेतली होती. एमआयडीसीचे अधिकारी कोल्हापूर डिव्हीजनला बसतात म्हणून आम्ही त्याला विरोध केला. आम्ही मागणी केली की, त्यांनी आठवड्यातून दोन दिवस सातारा येथे बसावे. तसा निर्णय शासनाने घेतला. म्हणून माझी मंत्र्यांना विनंती आहे की, काही तरी करून नागपूरचे डिव्हीजन पुण्यामध्ये काही दिवसांकरिता आणावे. येथील कामांना गती देण्यासाठी आपण तत्परता दाखविणे गरजेचे आहे. मी उदाहरण देतो. रस्त्याच्या कामांना परवानगी मिळावी म्हणून वन विभागाकडे प्रस्ताव जातात. पण त्या कामास वर्षानुवर्षे परवानगी मिळत नाही. एकदा गेल्यानंतर तेथे सर्व त्रुटी सांगायला पाहिजे. पण त्याची पूर्तता केल्यानंतर दुसऱ्या त्रुटी काढण्यात येतात. त्या पूर्ण केल्या की, तिसऱ्या त्रुटी काढण्यात येतात. श्री. पतंगराव कदम साहेबांनी एका बाजूला प्राणी वाढवायला सुरुवात केली. वन क्षेत्र वाढविण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. पण हे वन खाते आपल्या अधिपत्याखाली काम करीत आहे काय ? अशी शंका आमच्या मनामध्ये येते. कारण त्यांना काही विचारले तर ते केंद्राकडे बोट दाखवतात. म्हणून आमची आपल्याकडून अपेक्षा आहे की, आपल्यासारखा खमका मंत्री असताना वन खाते महाराष्ट्रातून चालते आहे, हे दिल्लीला दाखविणे गरजेचे असल्यामुळे त्याप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक आहे. मला खात्री आहे की, हे दाखविल्याशिवाय दिल्लीकरांना देखील आपले वजन कळणार नाही.

कोरेगाव-खटाव येथील बोधेवाडी ते चिंचणी रस्ता दोन तालुक्यांना जोडणारा आहे. सदर रस्त्याच्या कामासाठी एक महिन्यात परवानगी देण्यात येईल, असे मला सांगण्यात आले. परवानगी देत नसाल तर कायदा हातात घेऊन मीच कामाला सुरुवात करतो असे सांगितले. दोन वर्षे झाली तरी अजून त्या रस्त्याला परवानगी मिळालेली नाही. आपण निर्णय घेतला, पण तो प्रत्यक्षात कागदावर का येत नाही. आपले अधिकारी फक्त त्रुटी काढण्यात आणि नकार घंटा वाजवण्यात धन्यता मानतात, असा आमचा समज आहे. लोकांच्या उपयोगाचे जे प्रकल्प असतील त्यांना ताबडतोब मंजुरी द्यावी आणि त्यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या दूर करून एका सकारात्मक दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. मी या ठिकाणी ज्या काही सूचना केलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी व्हावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

[ श्री. शशिकांत शिंदे ]

अध्यक्ष महाराज, आता माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित झालेले आहेत, मघाशी ते सभागृहात नव्हते. या सदनामध्ये भ्रष्टाचारा संदर्भात अनेक आरोप होतात. परंतु त्या आरोपांचे पुढे काय होते हे आम्हाला समजत नाही. "सामना" चित्रपटामध्ये मारुती कांबळेचे पुढे काय झाले ? हे सिनेमा संपल्यानंतर देखील कळले नाही. श्री. चतुर्वेदी जगले का वाचले, त्यांचे पुढे काय झाले, याची काहीच माहिती नाही. त्यांच्या संदर्भात काय निर्णय झाला ? आपणास दिल्लीवरून लगेच दबाव येईल आणि काही करू नका असे म्हटल्यावर आपली अडचण होईल. तेव्हा तोडपाणी होते किंवा कसे याची माहिती देखील आम्हाला मिळाली पाहिजे. अन्यथा आम्हाला देखील उद्यापासून एकेक फाईल घेऊन आरोप करून आमचे वजन वाढविण्यासाठी काही तरी केले पाहिजे. मी या ठिकाणी शंका व्यक्त केली आहे. आमच्या मनात जी शंका आहे ती व्यक्त करणे गरजेचे आहे. त्यामुळे या ठिकाणी सुद्धा पारदर्शकता असावी, एवढीच आमची मागणी आहे त्याचा विचार करावा एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

**श्री. विवेक पंडित** : अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, महसूल विभागाबद्दल आतापर्यंत बरेच काही बोलले गेले आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने राज्यात कशा पद्धतीने भ्रष्टाचार होत आहेत हे आपण सर्वांनी पाहिले आहे. मला या ठिकाणी एका गोष्टींचा उल्लेख करावयाचा आहे की, ऑगस्ट २०१० मध्ये उपविभागीय अधिकारी, भिवंडी, यांनी जो भ्रष्टाचार केला तो मी कागदोपत्री माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणलेला आहे. त्याची रीतसर चौकशी झाली. त्यासंदर्भात दिनांक ६ डिसेंबर २०१० रोजी कोकण विभागीय आयुक्तांनी आपला अहवाल प्रधान सचिवांकडे पाठविला. दिनांक २८ डिसेंबर २०१० रोजी प्रधान सचिवांनी सदरहू अहवाल शासनाकडे पाठवून एकाच दिवशी एकाच प्रकरणामध्ये दोन वेगवेगळे निर्णय दिले. पहिला निर्णय त्यांनी अपील मान्य करण्याचा दिला तर त्याच दिवशी त्याच प्रकरणात अपील फेटाळण्याचा दुसरा निर्णय दिला. मी मंत्री महोदयांकडे तीन प्रकरणे दिली होती त्यामध्ये तथ्य आहे. "अधिकारी बेजबाबदारपणे वागलेले आहेत. त्यांनी कायदाबाह्य वर्तन केलेले आहे म्हणून त्यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे" अशी शिफारस प्रधान सचिवांनी केली असताना शासनाने फक्त त्या अधिकाऱ्याची बदली केली, परंतु त्यांना निलंबित केले नाही. मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, जर आपणास शासकीय अधिकाऱ्यांवर वर्चस्व ठेवावयाचे असेल, भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालायचे नसेल आणि आपले तसे धोरण आहे असे आपण म्हणत असाल तर आपण प्रत्यक्षात कृती का करीत नाही याबद्दल त्यांनी खुलासा करावा.

अध्यक्ष महाराज, महसूल विभाग हा राज्याचा अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. अनेक विभागांची कामे या विभागाकडे आहेत. नागरीपुरवठा विभाग हा स्वतंत्र विभाग व्हावा असे केंद्र शासनाने सांगितलेले असताना सुद्धा आपल्याकडे तसा स्वतंत्र विभाग झालेला नाही. आपण ते काम महसूल विभागातील कर्मचाऱ्यांकडे देत आहोत. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व इतर योजनांची कामे देखील महसूल विभागाकडे आहेत. राज्यात अत्यंत अपुरा कर्मचारीवर्ग आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत आहे आणि त्याचा परिणाम लाभार्थ्यांचे नुकसान होण्यावर होत आहे. अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे लाभार्थ्यांना चार-चार महिने संजय गांधी निराधार योजनेचे किंवा अन्य योजनांचे पैसे मिळत नाहीत. ही राज्यभरातील वस्तुस्थिती

[ श्री. विवेक पंडित ]

आहे. तेव्हा रिक्त जागा तातडीने भरल्या पाहिजेत. तसेच नागरी पुरवठा विभाग स्वतंत्र करणार आहे काय याचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला तर मला आनंद होईल. तसेच, आदिवासींच्या जमिनींचा प्रश्न आहे. शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. भिवंडी उप विभागीय अधिकाऱ्यांचे मी उदाहरण देतो. आदिवासींच्या जमिनी महसूल अधिकाऱ्यांच्या साथीने कशापद्धतीने हडप केल्या जातात, त्यांचे हे एक उत्तम उदाहरण आहे. सुमारे ६८०० एकर जमीन दापचरी प्रकल्पाकरिता संपादित करण्यात आली. ज्या प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्यात आली होती, त्या प्रकल्पासाठी, त्याचा वापर होत नसेल तर त्या जमिनी मूळ मालकाला परत देण्याची आवश्यकता आहे. दापचरी प्रकल्पाची संपादित केलेली ६८०० एकर जमीन ही सर्व आदिवासींची आहे. त्या जमिनी विविध कारणांकरिता वापरल्या जातात. अध्यक्ष महोदय, माझी मागणी आहे की, आपण ज्या कारणासाठी जमिनी संपादित केल्या आहेत, त्या दुधाच्या व्यवसायासाठी वापरणार नसाल तर त्या मूळ आदिवासींना परत करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मला अतिशय महत्त्वाचा आणखी एक मुद्दा मांडायचा आहे. आता सन २०११ चे जनगणनेचे प्रोव्हिजनल रिपोर्टस् आले आहेत. त्यामध्ये देशातील सर्वात मोठा जिल्हा म्हणून ठाणे जिल्हा गणला गेला आहे. १ कोटी १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या ठाणे जिल्ह्याची आहे. १९८९ साली सन्माननीय नेते श्री. शरदचंद्रजी पवार यांनी शहापूरला असे जाहीर केले होते की, ठाणे जिल्ह्याचे विभाजन केले जाईल. परंतु, इतकी वर्षे उलटून गेल्यानंतर सुद्धा जिल्हा विभाजनाचा प्रश्न प्रलंबित आहे. या जिल्ह्यात ७ महानगरपालिका आहेत, १४ तालुके आहेत. कुपोषितांचा आणि आदिवासींचा हा तालुका आहे. परिणामी, मानव विकास निर्देशांकामध्ये फार मोठ्या प्रमाणात फरक पडत आहे.

अध्यक्ष महोदय, एका बाजूला ठाणे शहर आहे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आहे. मिरा-भाईंदर सारखा भाग आहे आणि दुसऱ्या बाजूला जव्हार-मोखाडासारखा भाग आहे. ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित आहे, रेंगाळत राहिला आहे. आपण त्याबाबतचा निर्णय केव्हा घेणार आहात ? अध्यक्ष महोदय, महसूल प्रशासनाला सुद्धा हा जिल्हा सांभाळणे अवघड झाले आहे. आम्ही जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला बसतो, त्यावेळी सन्माननीय आमदार, सन्माननीय खासदार आणि जिल्ह्याचे अधिकारी यांना बसायला, नियोजन बोर्ड मोठे असून सुद्धा जागा नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जिल्हा विभाजनाचा प्रश्न आता ऐरणीवर आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्ह्याच्या जनतेने आंदोलन करण्याची वाट शासनाने पाहू नये, असे माझे मत आहे. मला महसूल विभागासंदर्भात आणखी एक महत्त्वाचा विषय मांडायचा आहे. सदर मुद्दा वाळूच्या धोरणासंदर्भातील आहे. पारंपरिक डुबी पद्धतीने रेती, वाळू काढणारे शेतकरी होते, त्यांची शेती उद्ध्वस्त झाली म्हणून ते रेती, वाळूचा व्यवसाय करायला लागले. आपण ती सर्व क्षेत्रे लिलावाने का काढली आहेत, हा माझा प्रश्न आहे. आपण वाळू माफिया, रेती माफिया असे म्हणतो. परंतु, या लिलाव पद्धतीमुळे आपणच माफिया तयार करीत आहोत. ज्यांच्याकडे जास्त पैसा आहे, त्यांनी लिलाव घ्यायचा आणि शेतकऱ्यांकडून स्वामित्व धन वसूल करायचे, असे काही ठेकेदार आपण तयार करीत आहोत.

[ श्री. विवेक पंडित ]

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, ज्या ठिकाणी पारंपरिक पद्धतीने रेती, वाळू काढणारे आहेत, त्या ठिकाणी परवाना पद्धतच आवश्यक आहे. ही लिलावाची पद्धत, त्या ठिकाणाहून तत्काळ रद्द करण्यात यावी. आपण धोरणामध्ये चालढकल करीत आहात. एका बाजूला आपण म्हणता की, उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आम्ही करीत आहोत. परंतु, अध्यक्ष महोदय, उच्च न्यायालयाने असे कोणतेही आदेश दिलेले नाहीत. माननीय उच्च न्यायालयाने सांगितले आहे की, शासनाने या बाबतीत धोरण ठरवावे. शासनाने लिलावाचे धोरण ठरवावे असे सांगितलेले नाही. माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, आपणाला माफिया उभे करायचे नसतील, शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा असेल तर निश्चितपणे यासंदर्भात धोरण आखण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगांवकर यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला. रत्नागिरी जिल्ह्यात बेदखल कुळांचा प्रश्न आहे. किमान दीड दशक त्या ठिकाणी बेदखल कुळे, शेतमजुरांसारखी आहेत. आपल्या जमिनी नावावर व्हाव्यात, म्हणून ते झगडत आहेत. आमचे धोरण बदलले पाहिजे. बेदखल कुळांच्या बाबतीतील नोंद ७/१२ च्या उताऱ्यामध्ये होण्याकरिता काय करावे, याबाबत धोरण स्पष्ट होत नाही. रायगड जिल्ह्यातील दळी जमिनींचा प्रश्न आहे. ब्रिटिशांच्या काळामध्ये मोठ्या जमिनी दळी नायकाला दिल्या गेल्या. प्रत्यक्ष कसणारे आदिवासी वहिवाटदार छोट्या जमिनी करणारे आहेत. परंतु, दळीत जमीन ही एकाच्याच नावाची आहे, याची फोड करण्याची आवश्यकता आहे. जो कसतो त्याच्या नावावर जमीन करायची, हा साधा प्रश्न आहे. सदर प्रलंबित प्रश्नाबाबत आदिवासी कित्येक वर्षे झगडत आहे. आपण या प्रश्नाला न्याय देण्यासंदर्भात निश्चितपणे काही भूमिका घ्यावी.

अध्यक्ष महोदय, मी आता वन विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. मला एवढेच सांगायचे आहे की, शासनाने वनाधिकार देण्याचा कायदा अदिवासींसाठी केलेला आहे. परंतु, त्यामध्ये समन्वयाचा अजूनही अभाव आहे. मध्यंतरी ज्यावेळी मोर्चा काढण्यात आला होता त्यावेळी माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील, माननीय वन मंत्री, माननीय मुख्यमंत्री हे त्या ठिकाणी आले होते. त्यावेळी शासनाने हे मान्य केले आहे की, जे १ लाख ८० हजार दावे फेटाळले गेले आहेत, त्या दाव्यांचे पुनर्विलोकन करू. मी निश्चितपणे निर्णयाचे स्वागत करतो. परंतु, माझी अशी विनंती आहे की, शासनाने जी मुदत दिली आहे, त्या मुदतीमध्ये पुनर्विलोकनाचे काम पूर्ण करावे. विशेषत: आदिवासींचे क्षेत्र कमी करण्याचा प्रयत्न आपले अधिकारी करीत आहेत. तसे न करता लागवडीखाली आणि लागवडीयोग्य असे जे क्षेत्र त्यांच्या वहिवाटीखाली आहे, ते धरण्यात यावे, अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागामार्फत नियंत्रण करीत असताना या जमिनी एकेकाळी वन जमिनी होत्या, पण नंतर त्या उत्पादनाखाली, कृषी खाली आल्या आहेत, याचे भान ठेऊन त्या ठिकाणी वनोपज कशी होईल, फलोत्पादनाची वाढ कशी होईल, वनांचा ऱ्हास होणार नाही, जंगल टिकेल आणि आदिवासींच्या जीवनाचा स्तर उंचावला जाईल, याकडे शासनाने लक्ष द्यावे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाबद्दल एक बाब मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, पुणे जिल्ह्यामध्ये मावळ तालुक्यातील राजमाची येथे गेल्या १० वर्षांपासून ग्रामपंचायतीची निवडणूक झालेली नाही. त्या गावात १०० टक्के आदिवासी लोक राहतात. परंतु, एकाही

[ श्री. विवेक पंडित ]

आदिवासी माणसाला आदिवासीचे जात प्रमाणपत्र दिलेले नाही. ज्यावेळी निवडणुका लागतात त्यावेळी त्या गावातील कोणीही माणूस निवडणुकीचा अर्ज भरू शकत नाही. हा एक प्रकारे लोकशाहीचा संकोच आहे. पुणे जिल्ह्यातील कातकरी आणि ठाकर ज्या भागामध्ये आहेत, त्या भागामध्ये हा प्रश्न आहे. त्यामुळे राजमाची येथील आदिवासी लोकांना जातीची प्रमाणपत्रे देणे आणि ग्रामपंचायतीची निवडणूक लावण्याची कार्यवाही तातडीने होणे अत्यावश्यक आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, वसई तालुक्यामध्ये १४ गावे आहेत. महापालिकेच्या नोटिफिकेशनमध्ये या गावांचा समावेश नाही. परंतु, त्यांना वगळलेलेही नाही. त्या ठिकाणी असलेल्या ग्रामपंचायती बरखास्त केल्याचे नोटिफिकेशन मात्र आहे. त्यामुळे या ग्रामपंचायती क्षेत्रात गेल्या दीड वर्षापासून अराजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. माझी अशी मागणी आहे की, वसईचा जो प्रश्न रेंगाळलेला आहे, त्यासोबत या १४ गावांचा प्रश्न आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेने तत्काळ त्या ठिकाणी ग्राम सेवक पाठवून या १४ गावांची सेवा पूर्ववत करावी.

अध्यक्ष महोदय, एक गोष्ट फार महत्त्वाची आहे. आता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू झाली आहे. आपल्याकडे पूर्वी ग्रामपंचायत स्तरावर सुवर्णजयंती रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार हमी योजना होत्या. त्या माध्यमातून ग्रामपंचायती मूलभूत सेवा उपलब्ध करून देऊ शकत होत्या. रस्ते, गटारे या सुविधा निर्माण करू शकत होत्या. परंतु, या योजना बंद झाल्यामुळे व त्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समाविष्ट झाल्यामुळे ग्रामपंचायत क्षेत्रावरील मूलभूत सुविधांमध्ये खंड पडला आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये ५० टक्के निधी ग्रामपंचायतींना देण्याचे धोरण असले तरी माझा माननीय ग्राम विकास मंत्र्यांना असा सवाल आहे की, ग्रामपंचायतीला आतापर्यंत आपण कोणता कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिलेला आहे, जो या योजनांची अंमलबजावणी करू शकणार आहे ? आज आपण पाहिले तर रोजगार हमी योजनेची ग्रामपंचायत स्तरावरील अंमलबजावणी फार नगण्य दिसून येते. ग्रामपंचायतीमध्ये ज्या प्रमाणात तज्ज्ञ अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आवश्यक आहे, तो दिलेला नसल्यामुळे ग्रामपंचायतींच्या कामावर फार मोठा परिणाम झाला आहे. गावांच्या विकासावर फार मोठा परिणाम झाला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य स्तरावरील एक विषय मांडतो आणि त्यानंतर मी माझे भाषण संपविणार आहे. सन २००४ मध्ये महसूल विभागामार्फत एक परिपत्रक काढण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे हे परिपत्रक काढण्यात आले आहे. परंतु, या परिपत्रकाचा चुकीचा अर्थ जिल्हास्तरावरील प्रशासनाकडून लावण्यात येत आहे. पूर्वी एक काळ असा होता की, दुष्काळाच्या परिस्थितीत लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रस्ते बांधण्यात आले होते. परंतु, एक शेतकरी न्यायालयामध्ये गेला आणि सर्वोच्च न्यायालयाने असा निवाडा दिला की, दुष्काळाच्या परिस्थितीत लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी हे रस्ते बांधले गेले असले तरी या रस्त्यांसाठी घेतलेल्या जमिनीची नुकसान भरपाई त्यावेळी शेतकऱ्यांनी मागितली नसल्यामुळे २० वर्षांनंतर त्यांना ती मागता येणार नाही. शासन आता बीओटी तत्त्वावर रस्ते बांधत आहे. रोजगार निर्मिती किंवा दुष्काळ निवारणासाठी ते बांधण्यात येत नाहीत. एक प्रकारची व्यवस्था म्हणून हे रस्ते बांधण्यात येत आहेत. त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या गेल्यात. उदाहरणार्थ, वाडा ते मनोर व भिवंडी ते मनोर या रस्त्यांचे काम चालू आहे. या रस्त्याच्या कामासाठी लॅन्ड रेकॉर्ड प्रमाणे कोणतीही जमीन संपादन केल्याची प्रक्रिया झाल्याचे दिसून येत नाही. येथे सहा क्रमांकाचा फेर

[ श्री. विवेक पंडित ]

बदल, हक्क बदल झालेला नाही. तरी सुद्धा जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. आमच्याकडे लॅन्ड रेकॉर्ड आहे म्हणून जमिनी संपादित केल्या आहेत, असे सांगण्यात आले. जमीन संपादित केली असेल तर त्या प्रमाणे हक्क बदल फेरफार व्हावयास पाहिजेत. ७/१२ च्या उताऱ्यावर नोंदी यावयास पाहिजेत. परंतु अशा प्रकारच्या नोंदी कोठेही आढळून आल्या नाहीत. अशा प्रकारे शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, असा प्रकार संपूर्ण महाराष्ट्रभर आहे, अशी माझी माहिती आहे. सन २००४ च्या आदेशाची फेर तपासणी करण्याची आवश्यकता आहे. आता बीओटी तत्त्वावर रस्ते बांधण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचे धोरण शासनाचे असले पाहिजे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळता आले पाहिजे. या दृष्टीकोनातून महसूल मंत्री महोदय योग्य ती पावले उचलतील असा विश्वास व्यक्त करतो, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. बच्चू कडू** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग हा अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे, मुख्यमंत्री महोदयांच्या विभागानंतर महसूल विभागाचा क्रमांक लागतो. उत्पन्नाचा दाखला तहसीलदार यांच्याकडून देण्यात येतो. तो दाखला देण्याचे अधिकार मंडळ अधिकाऱ्यांना देण्यात आले पाहिजेत. जातीचे दाखले तहसील कार्यालयातून वाटप करण्यात येतात. ते शाळेतून देण्याची कार्यवाही केली पाहिजे. मी माझ्या मतदारसंघात चार हजार जातीचे दाखले शाळेत जाऊन वाटप केले आहेत. एका नायब तहसीलदारांना चार महिने हे काम दिले होते. तसा कायदा नसला तरी आमच्या अधिकारात आम्ही ते करून घेतले आहे. चार हजार जातीचे दाखले शाळेत जाऊन वाटप करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, बजेटचे पुस्तक पाहिले तेव्हा असे आढळून आले की, एकट्या सांगली जिल्ह्यात तलाठ्यांची ७६ कार्यालये आहेत. आमच्या विदर्भात तहसील कार्यालये नाहीत. मंडळ कार्यालये नाहीत. आमच्या भागातील तलाठी उन्हात बसतात. परंतु सांगली जिल्हयात मात्र तलाठ्यासाठी ७६ कार्यालये आहेत. विदर्भात तहसील व मंडळ कार्यालये नाहीत, त्यामुळे त्या भागात तलाठी कार्यालये करण्यात आली पाहिजेत. विदर्भाचा माणूस का तळपतो, तुमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन का बदलतो, याचा विचार शासनाने केला पाहिजे. एकाच विभागाचा विकास केल्यामुळे, विदर्भातील माणूस तळपतो आहे. डॉ. पतंगराव कदम हे महसूल मंत्री असताना ही कामे त्यांनी करून घेतली आहेत. आमच्या जिल्ह्यात कमीत कमी तहसील कार्यालये तरी दिली पाहिजेत. यासंदर्भात सर्व्हे करण्याची आवश्यकता आहे. टिनाच्या पत्र्याच्या रुममध्ये तहसील कार्यालयाची कामे केली जातात. पाऊस आला तर तहसील कार्यालयात पाऊस पडतो व सर्व कार्यालयात पाणीच पाणी होऊन जाते. पुढील बजेटमध्ये इतर जिल्ह्यात तलाठी कार्यालयांसाठी निधी दिला व आमच्या जिल्ह्यात तहसील कार्यालयांसाठी निधी दिला नाही तर याबाबत दुसऱ्या उपाययोजना कराव्या लागतील, शासनाने याची नोंद घेण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सन १९९० च्या आतील अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. एकाही तहसील कार्यालयाने ही अतिक्रमणे नियमित केली नाहीत. यासंदर्भातील प्रस्ताव तयार करून पाठविण्यात आले नाहीत. १९९० च्या आतील अतिक्रमणे नियमित करण्यामध्ये ग्रामपंचायतीला अडचण नसेल

[ श्री. बच्चू कडू ]

तर ती का करण्यात येत नाहीत, ते लोक तसेच तळपत आहेत. माझ्या मतदारसंघात २००० कुटुंबे टेकडीवर राहत आहेत, त्यांना आपण इतर सुविधा देऊ शकत नाही. त्यांना झोपडपट्टीची सुविधा मिळू शकत नाही. इंदिरा आवास योजनेतून घर मिळू शकत नाही. यासंदर्भात झालेला निर्णय फाईलच्या बाहेर येत नाही. यावर तातडीने उपाययोजना केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एका बाजुला ही अतिक्रमणे नियमित करीत असताना दुसरीकडे माझ्या जिल्ह्यात निळ्या पट्ट्याच्या आतील किमान ८० गावे आहेत. ८० गावांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. या गावांचे पुनर्वसन करण्यात येत नाही. दुसऱ्या सुविधा त्यांना देण्यात येत नाहीत. त्या गावांमध्ये आमदार निधी खर्च करण्यास परवानगी देण्यात येत नाही. या गावांना कोणत्याच सुविधा मिळू देण्यात येत नाहीत. याबाबत शासनाला ठोस निर्णय घ्यावा लागेल. कमी खर्चाचे धोरण स्वीकारावे लागेल. काही ठिकाणी निळा पट्टा चुकीचा मारला गेला आहे त्याचा विचार करावा लागेल. ही सर्व कार्यवाही करीत असताना महसूल विभागाच्या संदर्भात जे जमिनीचे फेरफार करण्यात येते त्याबाबत कधी एका मिनिटात तर कधी सहा महिन्यांत ७/१२ चा उतारा बदलविण्यात येतो. माझ्या मतदारसंघात श्री. विठ्ठलराव नामदेवराव थोरात नावाची व्यक्ती आहे. त्यांनी कूळ कायद्यानुसार ही जमीन माझी आहे यासाठी अर्ज केला, तहसील कार्यालयावर केस टाकली त्यानंतर श्री. तायडे यांचा ७/१२ चा उतारा श्री. थोरात यांचे नावे करण्यात आला. पैसे दिल्यानंतर फेरफार नोंदीमध्ये बदल केला जातो. त्या तहसीलदारावर कोणतीही कारवाई होत नाही. अशा प्रकारचे जे निर्णय होतात ते तपासून घेतले पाहिजेत. ते कोणत्या मेरिटवर निर्णय देतात आणि मेरिटवर निर्णय देत नसतील, कायदेशीर निर्णय देत नसतील तर त्याला निलंबित केले पाहिजे. परंतु असे होत नाही. पैसे दिल्यानंतर फेरफार बदलतो, पैसे दिल्यानंतर ७ (अ) मध्ये बदल केला जातो. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ७/१२ च्या उताऱ्यांच्या संदर्भात मोठा गोंधळ होत आहे. माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात, आमची तुमच्याकडून अपेक्षा आहे. तुमच्यामध्ये सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्याची क्षमता आहे. तुमचे वैभव, तुमची ताकद महसूल मंत्री म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला दिसली पाहिजे. मग आग लागली तरी महसूल विभाग, दंगा झाला तरी महसूल विभाग आणि आमच्या सारख्या सदस्याने आंदोलन केले तरी महसूल विभागच म्हणून आपण या सर्व गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहेत.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये फिन्ले मील आहे. माननीय महसूल राज्यमंत्री श्री. प्रकाश सोळंके साहेबांना मी पत्र दिले होते. त्यांनी लगेच बैठक आयोजित केली. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आमच्या फिन्ले मिलची ४४ एकर जमीन रेल्वे विभागाला दिलेली आहे. फिन्ले मिलला त्या जमिनीतील फक्त ८ एकर जमीन पाहिजे आहे. परंतु त्या ८ एकर जमिनीसाठी तेथे बॉयलर होत नाही. त्यातून ३ हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कलम ७१ मधील ८ नुसार आदेश काढले आणि सर्व जमीन शासनाकडे जमा करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची प्रत माझ्याकडे आहे. हे सर्व आदेश तुमच्याकडे आले आणि ते आदेश येथील सचिवांनी बदलून टाकले. त्यांनी सांगितले की, ही जमीन रेल्वेची आहे. ही जमीन निक्सन कंपनीला देण्यात आली होती. ही जमीन रेल्वेने सन २००६ मध्ये ताब्यात घेतलेली आहे. आता पर्यंत नॅरो गेज मार्गावरुन शकुंतला एक्सप्रेस सुरू होती. आता ती जमीन सन २००६ मध्ये भारत सरकारच्या ताब्यात दिलेली आहे. ८ एकर जमिनीसाठी ३ हजार लोकांना रोजगार मिळू शकलेला नाही.

**[ श्री. बच्चू कडू ]**

विदर्भामध्ये उद्योग द्यावयाचे नाहीत, पाणी द्यावयाचे नाही, तलाठी कार्यालय द्यावयाचे नाहीत आणि आता आमची जमीन सुद्धा आम्हाला दिली जात नाही. मग आम्ही काय अपेक्षा करणार आहोत ? म्हणून आम्हाला आंदोलन करावे लागते. आम्हाला सांगितले जाते की, तुम्ही विधानसभेमध्ये प्रश्न उपस्थित करा. विधानसभेमध्ये प्रश्न उपस्थित करून रिझल्ट कोठे आहे ? आम्ही जे मुद्दे मांडतो त्यासंदर्भात संबंधित विभागाकडून आम्हाला साधी नोट सुद्धा पाठविली जात नाही, पत्र सुद्धा पाठविले जात नाही. सन्माननीय सदस्यांनी विधानसभेमध्ये मुद्दा मांडला होता आणि त्यावर शासनाने अमुक कार्यवाही केली असे साधे पत्र सुद्धा संबंधित विभागाकडून येत नाही. माननीय महसूल मंत्र्यांकडून आमच्या खूप अपेक्षा आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय वनमंत्री डॉ.पतंगराव कदम साहेब, सभागृहामध्ये उपस्थित आहेत. सापाने दंश केल्यामुळे महाराष्ट्रामध्ये किती लोकांचा मृत्यू होतो ? वाघाने किंवा हत्तीने हल्ला केल्यामुळे जर माणसाला मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये मदत दिली जाते. अशी परिस्थिती आहे की, श्रीमंताचे पोट्ट मेल तर त्यासाठी किंमत आहे. परंतु सापाने दंश केल्यामुळे जर एखाद्या माणसाचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली जात नाही. त्याच्या कुटुंबीयांना २० हजार, ३० हजार, ५० हजार रुपये काही तरी आर्थिक मदत दिली पाहिजे. सापाने दंश केल्यामुळे ज्या माणसाचा मृत्यू होतो तो मंत्री किंवा आमदार नसतो. तो शेतामध्ये काबाडकष्ट करणार आमचा शेतमजूर असतो. त्या माणसाचा सापाने दंश केल्यामुळे मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयांना एक खडकू सुद्धा दिला जात नाही. असे हे शासन आहे ? डॉ.पतंगराव कदमसाहेब, वन मंत्री म्हणून आपण यासंदर्भात निर्णय घेणे गरजेचे आहे. आपल्या राज्यामध्ये मागील एक-दोन वर्षामध्ये सापाने दंश केल्यामुळे किमान २ हजार लोकांचा मृत्यू झालेला आहे. ज्यांचा मृत्यू झालेला आहे ते शेतामध्ये काबाडकष्ट करणारे लोक आहेत. तो माणूस अपघात विमा योजनेच्या निकषामध्ये बसत नाही. तो माणूस दारिद्र्य रेषेखालील नसेल तर तो राष्ट्रीय अर्थसहाय्य योजनेत सुद्धा बसत नाही. वाघाने किंवा हत्तीने हल्ला केला आणि मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली जाते. परंतु सापाने दंश केल्यामुळे मृत्यू झाला तर त्या माणसाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली जात नाही. (...अडथळा...) ग्रामीण भागामध्ये लस सुद्धा मिळत नाही. माननीय आरोग्य मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

अध्यक्ष महोदय, माननीय ग्राम विकास मंत्री श्री.जयंत पाटीलसाहेब आणि राज्यमंत्री श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील साहेब सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आपण बघतो की, नगरपालिकेमध्ये २ इंजिनिअर, १ सीईओ आणि इतर कर्मचारी असतात. परंतु ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २० हजार आहे ती ग्रामपंचायत फक्त एकच ग्रामसेवक सांभाळत असतो. म्हणजे शहरामध्ये १० लोक काम करणार आहे आणि २० हजार लोकसंख्या असेलेल्या गावामध्ये फक्त १ माणूस काम करणार ? ज्या गावांची लोकसंख्या २० हजार आहे त्या गावासाठी शासनाला वेगळे धोरण ठरवावे लागेल. नगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर कर्मचारी वर्ग असतो. नगरपालिकेमध्ये १ सीईओ, २ इंजिनिअर, शिक्षणाधिकारी असतात. मग २० हजार लोकसंख्येचे गाव एकाच माणसाने कसे काय सांभाळावयाचे ? आता ग्रामीण आणि शहरी अशी तफावत निर्माण होत आहे. शहरामध्ये २०-३० हजार लोकसंख्या असेल आणि नगरपालिका असले तर तेथे सीईओ, इंजिनिअर, शिक्षणाधिकारी आणि इतर कर्मचारी असतात. परंतु २० हजार लोकसंख्येच्या गावामध्ये फक्त एकच ग्रामसेवक असतो. ग्रामपंचायतीमध्ये जो कर्मचारी काम करतो त्याला सुद्धा वेळेवर पगार मिळत नाही. तो कर्मचारी दहावा वर्ग पास असला पाहिजे असा निकष आहे. यासाठी शासनाने २०,००० ची लोकसंख्या

[ श्री. बच्चू कडू ]

असलेल्या गावांसाठी वेगळे धोरण स्वीकारले पाहिजे. ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी थ्री टायर सिस्टीममधून जावे लागते. या संदर्भात शासनाकडून जिल्हा परिषदांकडे निधी पाठविला जातो. जिल्हा परिषदा सदरचा निधी पंचायत समितीकडे पाठवितात. त्यानंतर पंचायत समितीकडून ग्रामपंचायतीकडे निधी वर्ग केला जातो. अशा परिस्थितीत, ग्राम विकास विभागाअतंर्गत येत असलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्या बंद कराव्यात व ग्रामपंचायतींना मजबूत करावे. अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, आपण पुण्याचे असला तरी, आपण विदर्भाच्या मातीवर प्रेम करता. आपण मला या ठिकाणी लवकर बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. आनंदराव गेडाम** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर, महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण विभागावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी महसूल व वन विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, महसूल विभागाने गडचिरोली जिल्ह्यात राजस्व व निरीक्षक मंडळ कार्यालयाच्या बांधकामांसाठी आणि निवासस्थानांच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला, त्याबद्दल मी माननीय महसूल मंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने वन विभागात राहणाऱ्या आदिवासी आणि गैर आदिवासी लोकांना वनहक्क कायद्यातंर्गत जमिनीचे पट्टे देण्यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेतला. सध्या राज्यात वैयक्तिक स्वरूपाचे ३,३४,५४२ दावे दाखल झाले होते. त्यापैकी १,०८,०७३ दावे मान्य करण्यात आले. अशा प्रकारे राज्यात मान्य केलेल्या दाव्यांपैकी दाखल केलेल्या दाव्यांची संख्या जास्त आहे. दाव्यांच्या संदर्भात समित्या कार्यरत आहेत. त्यात नोडल एजन्सी आदिवासी विकास विभाग असला तरी दावे मान्य करणाऱ्या समितीचे प्रमुख हे महसूल विभागाचे अधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी आहेत. प्रलंबित असलेले दावे तत्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीकोनातून महसूल विभागाने आढावा घेऊन कार्यवाही करणे गरजेचे आहे. १,०८,०७३ दावे धारकांना वन जमिनीचे पट्टे दिलेले आहेत, त्यांची नावे ७/१२ उताऱ्यावर चढविण्यासाठी तसेच त्यांना नकाशे देण्यासाठी महसूल विभागाने तत्काळ कार्यवाही करावी.

अध्यक्ष महोदय, आदिवासी जमीन हस्तांतरण कायद्यासंबंधी माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) व इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केले आहेत. या कायद्याची मुदत ३० वर्षांची होती. ती मुदत वाढवून दिलेली आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, राज्यात आदिवासी जमीन हस्तांतरण कायद्यातंर्गत किंवा मध्यंतरीच्या काळात मुदतवाढ दिल्यानंतर जेवढी प्रकरणे दाखल झालेली आहेत, त्या सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन, त्यांचा निपटारा करून आदिवासी लोकांना जमीन हस्तांतर करण्याच्या दृष्टीने तत्काळ कार्यवाही करावी आणि वारंवार उपस्थित होणारा हा प्रश्न शासनाने निकाली काढावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

[ श्री. आनंदराव गेडाम ]

अध्यक्ष महोदय, राज्यात ठाणे व रायगड जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोक राहतात. या आदिवासी लोकांनी इतरांच्या जमिनी कूळ म्हणून कसल्या. त्या कुळांवर त्यांचे नाव आहे, तो त्यांचा हक्क आहे. परंतु अनेकदा कुळांवर असलेल्या जमिनी, शेती करण्यासाठी कूळ वहिवाटीखाली असलेल्या जमिनीसंबंधी कुळांची संमती न घेता त्या जमिनींची मोठ्या प्रमाणावर विक्री झाली आहे. ज्या उद्देशासाठी त्या जमिनी होत्या, त्या उद्देशासाठी जमिनींचा वापर न करता वेगळ्याच कारणांसाठी वापर केला जात आहे. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना नम्र विनंती आहे की, कुळ वहिवाटीच्या ज्या जमिनी आहेत, त्या जमिनींवर आदिवासींचे कूळ असे नाव आहे, अशा प्रकारच्या सर्व प्रकरणांचा अभ्यास करून, त्याचा आढावा घेऊन, सर्व कुळ धारकांना तत्काळ मदत करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने निर्णय घेऊन कुळांची प्रकरणे निकाली काढणे आवश्यक आहे. जेणकरून आदिवासी माणसाला दिलासा मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी तलावांची कामे करणे, तलावांचे खोलीकरण करण्याची कामे केली जातात. अशा प्रकारची कामे करीत असताना त्यांच्या अंदाजपत्रकात रॉयल्टीचा समावेश केला जातो. त्या तलावाच्या पोटातली माती तलावाच्या बाजूला टाकत असताना रॉयल्टीसाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद केली जाते. म्हणून महसूल विभागाने रॉयल्टी रद्द करण्याचा निर्णय घेणे अत्यावश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, १५ लाख रुपयांच्या एस्टीमेटवर ५ लाख रुपये रॉयल्टीपोटी आकारले जातात. प्रत्यक्ष लोकांवर मात्र १० लाख रुपयेच खर्च केले जातात म्हणून अशा प्रकारच्या रॉयल्टीची अट रद्द करणे अत्यंत आवश्यक आहे. आदिवासी विभागामध्ये अनेक तहसील आहेत. त्या ठिकाणी रेतीचे लिलाव होत नाही. त्यामुळे बांधकाम प्रलंबित राहते. माझ्या मतदारसंघातील कोर्ची तालुक्यातील काही ठेकेदारांनी रॉयल्टीच्या संदर्भातील अडचण मला सांगितली होती. म्हणून ग्रामीण भागात रॉयल्टीचे पासबुक देण्याची कार्यवाही करावी अशी प्रकारची विनंती मी माननीय मंत्री महोदयांना करीत आहे. ज्या ठिकाणी लिलाव झाले नसतील. पण त्या ठिकाणी नदी आहे. अशा नदीतील रेती उपसून त्या ठिकाणच्या कामांसाठी वापरण्याबाबत निर्णय घेण्याची गरज आहे. तरच त्या भागतील कामे होऊ शकतील. अशा प्रकारचा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्यात महसूल विभागातील अनेक अधिकाऱ्याची पदे रिक्त आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्याची दोन पदे मंजूर असून, ती दोन्ही पदे रिक्त आहेत. गडचिरोली जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. त्यापैकी तीन तालुक्यांतील तीन तहसीलदारांची पदे रिक्त आहेत. संजय गांधी निराधार योजना समितीमधील एका तहसीलदाराचे पद रिक्त आहे. तरी ही चारही पदे तत्काळ भरण्याची कार्यवाही लवकरात लवकर केली पाहिजे. अनेक तालुक्यात नायब तहसीलदारांची पदे रिक्त आहेत. जनतेला जलद सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून ती पदे तत्काळ भरण्याची कार्यवाही केली पाहिजे. नायब तहसीलदाराच्या पदाबरोबर टीएलआरची देखील अनेक पदे रिक्त आहेत. टीएलआर हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जमिनीच्या प्रत्येक मोजणीसाठी त्यांची गरज लागते. परंतु टीएलआरची पदे सुद्धा भरलेली नाहीत. महसूल विभागने ही सर्व रिक्त पदे तत्काळ भरण्याच्या दृष्टीकोनातून लवकरात लवकर कार्यवाही करावी अशी प्रकारची विनंती करीत आहे. ग्रामीण आणि आदिवासी विभागांमध्ये तलाठी

[ श्री. आनंदराव गेडाम ]

राहत नाही. त्याचे कारण म्हणजे त्यांना त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची निवासाची सोय नसते. आवश्यक ती कार्यालये सुद्धा नाहीत. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील सर्वच तहसीलदारांची निवासस्थाने बांधण्याची कार्यवाही महसूल विभागाने लवकरात लवकर केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या संदर्भात आता बोलणार आहे. माननीय डॉ. पतंगराव कदम यांनी तेंदू पत्याचे रेट १०५ रुपयांवरून १५७ रुपयांपर्यंत वाढूवन दिल्याबद्दल त्यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. माननीय डॉ. पतंगराव कदम हे अत्यंत दिलदार मंत्री आहेत. त्यांच्या दिलदारपणाचा प्रत्यय गडचिरोली जिल्ह्याला आलेला आहे. म्हणून त्यांचे पुनश्च एकदा हार्दिक अभिनंदन करतो. गेल्या नोव्हेंबर महिन्यात अवेळी पडलेल्या पावसामुळे गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्याचा निर्णय माननीय डॉ. पतंगराव कदम यांनी घेतलेला आहे. त्याबद्दल मी पुनश्च एकदा त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. जनसामान्यांसाठी योग्य तो निर्णय घेण्याऱ्या माननीय डॉ. पतंगराव कदम यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी मी शुभेच्छा देतो. आमच्या आलापल्ली, भामरागड आणि सिरोंचा भागातील मधल्या पाच ते सहा महिन्यांपूर्वी सहाय्यक वनक्षेत्रपालांच्या मुलाखती घेतल्या होत्या. यामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला होता. यासंदर्भातील चौकशी झाल्यानंतर संबंधित डीएफओला निलंबित करण्यात आले होते. पण त्या ठिकाणची आवश्यक ती पदे भरण्याची कार्यवाही अजूनपर्यंत करण्यात आलेली नाही. याकरिता सदर भरती प्रक्रिया नव्याने करण्यासाठी गरज आहे. त्या ठिकाणी आवश्यक असणारी अधिकारी आणि कर्मचारी यांचे पदे तत्काळ भरण्याची कार्यवाही करण्याची गरज आहे.

**तालिका सभाध्यक्ष** (श्री. गिरीश बापट) : सभागृहाची वेळ सायंकाळी ५ वाजेपर्यंत होती. ती वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

**श्री. आनंदाराव गेडाम** : अध्यक्ष महोदय, जंगल हे आदिवासी लोकांनी अबाधित ठेवलेले आहे. त्या भागात अनेक छोटी-मोठी धरणे आहेत. माझ्या भागात बामणी आणि सोनेरंगीचा एक तलाव असून त्यांचे काम १९८२ मध्ये सुरू करण्यात आले होते. पण ते काम वनसंरक्षण कायद्यामुळे आजसुद्धा प्रलंबित आहे. सिंचन तलावांना मान्यता देण्याच्या दृष्टीकोनातून माननीय वन मंत्री महोदयांनी पुढाकार घ्यावा व सिंचनासाठी सहकार्य करावे, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, माझ्या भागामध्ये मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या वृक्षतोड होत झाले आहे. नरोडी, आरमोरी तालुक्यात जवळपास १०० एकर जमिनीवर अवैधरीत्या वृक्षतोड झालेली आहे. ही जमीन महसूल विभागाची असल्यामुळे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कसलीही कारवाई केली नाही. परंतु शासनाने कारवाई मात्र महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर केली आहे. महसूल विभागाचे त्या जमिनीवर अतिक्रमण असल्यामुळे अवैधरीत्या वृक्षतोड झाल्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली, वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर मात्र कसलीही कारवाई केली नाही. नरोडी भागात तीन-चार लाख रुपयांचे जंगल तोडून जंगलाची अवैधरीत्या विल्हेवाट लावली, त्यांच्याविरुद्ध कारवाई होण्याची खरी आवश्यकता आहे. या अवैध वृक्षतोडीस जबाबदार असणाऱ्या वन विभागातील अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

[ श्री. आनंदराव गेडाम ]

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्हा हा पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा जिल्हा आहे. या जिल्ह्याला निसर्गाची देणगीच लाभली आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. चंद्रपूर जिल्हा हा देशामध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. माननीय पर्यावरण मंत्री हे चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. चंद्रपूर शहराला ५०० वर्ष होत आहेत. चंद्रपूर हे शहर गोंड राज्याने वसविलेले आहे म्हणून या शहराला गोंड राजाची राजधानी असेही म्हणतात. गोंड राजाची राजधानी म्हणून हे शहर ओळखले जाते. राज्य शासनाने २५० कोटी रुपये या शहराच्या विकासासाठी दिले आहेत. या पैशांचा चांगल्याप्रकारे उपयोग केला पाहिजे. या शहराच्या सौंदर्यकरणाकरिता, स्वच्छतेसाठी, निर्मळ बनविण्यासाठी, पर्यावरणयुक्त तसेच प्रदूषणमुक्त करण्याच्या दृष्टीकोनातून माननीय मंत्री महोदयांनी काळजी घ्यावी. त्या भागात ज्या प्रदूषण करणाऱ्या कंपन्या आहेत त्यांचा आढावा घेऊन प्रदूषण कसे कमी करता येईल त्यादृष्टीने प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील आरोग्य खात्याच्या कारभारासंबंधी काही बाबी मी निदर्शनास आणून देणार आहे. चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आरोग्य विभागामार्फत सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आरोग्य अधिकाऱ्याची पदे कार्यरत वर्ग-१ या एम.बी.बी.एस. च्या अधिकाऱ्यांना डावलून बी.ए.एम.एस. वर्ग-२ च्या, गट- ब च्या अधिकाऱ्यांना प्रभारी तालुका अधिकारी म्हणून कार्यभार दिलेला आहे. १२ तालुक्यांपैकी सहा ठिकाणी अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. एका मोठ्या व्यक्तिच्या वरदहस्ताने जिल्हास्तरावर बी.ए.एम.एस. च्या हाताखाली एम.बी.बी.एस. शिक्षण पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांना काम करावे लागत आहे. अशाप्रकारे नियमबाह्य नियुक्त्या या जिल्ह्यात करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारच्या तक्रारीचा अहवाल डी.एच.ओ. नी सी.ई.ओ. ला दिलेला आहे, परंतु त्यासंबंधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. तेथे दररोज भ्रष्टाचाराचे रकानेच्या रकाने छापून येत आहेत. अशा प्रकरणांवर शासनाने तत्काळ कारवाई केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, तेराव्या वित्त आयोगाचा निधी विहित मुदतीत खर्च करण्याच्या दृष्टीने शासनाने तशाप्रकारे सूचना द्याव्यात.

अध्यक्ष महोदय, जलसिंचनाचे जे मापदंड ठरविण्यात आले आहे ते अत्यंत कमी आहेत, त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. जलसंधारण विभागाने त्यामध्ये सुधारणा करावी. तलावाचे मोठ्या प्रमाणात खोलीकरण करण्याची आवश्यकता आहे. पीएमजेएसवाय संदर्भात अनेक कामे प्रलंबित आहेत, ती कामे तातडीने होण्याच्या दृष्टिकोनातून ग्रामविकास विभागाने प्रयत्न करावेत, अशी मी विनंती करतो. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या या महत्त्वाच्या विभागावर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. महाराष्ट्रातील ८० टक्क्यांपेक्षा जास्त जनतेच्या जीविताशी संबंध असणारा हा महसूल विभाग आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी कोतवालांना येत्या महिनाभरात चतुर्थश्रेणीचा दर्जा देण्यासंदर्भातील आश्वासन या सभागृहात दिले आहे. " रघुकुल रीत सदा चली आई, प्राण जाई पर वचन न जाई " मंत्री पद

[ श्री. सुधीर मुनगंटीवार ]

गेले तरी बेहत्तर मात्र चतुर्थ दर्जा दिल्या शिवाय मंत्री पदावर राहणार नाही, असा विश्वास त्यांनी दाखविल्या बद्दल मी त्यांचे प्रथम अभिनंदन करतो. मात्र त्याच वेळी मी त्यांना आठवण करून देऊ इच्छितो. महसूल विभागातील एखाद दुसरी गोष्ट सोडली तर भ्रष्टाचाराच्या संदर्भात या विभागाचा वरचा क्रमांक आहे. अशा विभागाचे नेतृत्व मंत्री महोदय आपण करीत आहात. एखाद्या दुसऱ्या विभागात पास झालेल्या व इतर सर्व विषयात नापास झालेल्या विद्यार्थ्यासारखी अवस्था आपल्या विभागाची झालेली आहे. अत्यंत कामचुकार, भ्रष्ट विभाग, सामान्य माणसाला कायद्याच्या आधारे न्याय न देणारा हा विभाग आहे. तसेच महसूल विभाग हा कोमात गेला आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

अध्यक्ष महोदय, यंदाचा अर्थसंकल्प व अंदाजपत्रक पाहिले तर त्यामध्ये कोठेही नाविन्य दिसत नाही, कल्पकता दिसत नाही. विभागाकडे दूरदृष्टीचा अभाव आहे. काम करण्याची चिकाटी नाही. लोकांना न्याय देण्याची भावना नाही, असे माझ्या लक्षात आले आहे. साधारणपणे महसूल विभागाच्या माध्यमातून महसुली कर्तव्ये, दंडाधिकाऱ्याची कर्तव्ये, महसूल कामा व्यतिरिक्त कर्तव्ये अशी ४८ पेक्षा जास्त कामे एका जिल्हाधिकाऱ्याच्या माध्यमातून केली गेली पाहिजेत, अशी आपली अपेक्षा आहे. राज्यामध्ये एखादे क्रांतीकारी पाऊल उचलले गेले नाही तरी देखील कमीत कमी स्वत:च्या जाहीरनाम्यामध्ये ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, तेवढी कामे तरी करा. निवडणुकीच्या वेळी आपल्याच पक्षाने आपल्या नेत्यांचे फोटो जाहीरनाम्यावर छापले होते. त्या जाहीरनाम्याप्रमाणे आपण कार्यक्रमाची आखणी कराल, अंदाजपत्रकात तरतूद कराल, अशी आमची अपेक्षा होती. मात्र त्याप्रमाणे काहीही केले नाही.

अध्यक्ष महोदय, विभागामध्ये मोठ्या प्रमाणात रिक्त पदे आहे. दर अधिवेशनामध्ये यासंदर्भात सांगितले जाते. मात्र ज्या प्रमाणे कापूस कोंडयाची गोष्ट संपत नाही त्याप्रमाणे रिक्त पदांच्या बाबत कार्यवाही होत नाही. विदर्भातील रिक्त पदे असोत किंवा राज्यातील रिक्त पदे असोत, त्या बाबत लवकरात लवकर कार्यवाही होणे गरजेचे आहे. महसूल विभागाच्या माध्यमातून ४८ कामे करावयाची आहे. अशा वेळी ही रिक्त पदे भरण्याकरिता कोणी आपले पाय बांधून ठेवले ? मग ही पदे का भरली जात नाहीत ? मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये यासंदर्भात भूमिका जाहीर करावी, अशी मी त्यांना विनंती करतो. मंत्री महोदयांना या निमित्ताने आपले कर्तृत्व दाखविण्याची संधी मिळाली आहे. येत्या ३ महिन्यांत नायब तहसीलदार, तहसीलदार यांची पदे भरल्या शिवाय राहणार नाही अशी धमक असणारी मानसिकता घेऊन महसूल खात्याचे नेतृत्व आपण करावे, अशी आपल्या मित्राची अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, राजीव गांधी गतिमान पुरस्कार दिला जातो. मात्र आपण राज्यात राजीव गांधी गलथान पुरस्कार जर द्यावयाचा झाला तर तो महसूल विभागाला मिळाल्याशिवाय राहणार नाही. अंदाज पत्रक तयार केले आहे. त्यामध्ये अनेक विभाग आहेत. आपल्या पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये असे म्हटले आहे की, रोटी, कपडा, मकान देण्यात येईल. लोकांना १० लाख घरे दिली पाहिजेत, असे आपल्या जाहीरनाम्यात नमूद केले आहे. मात्र ज्या वेळी आम्ही ग्रामीण भागात जातो, तेथे अनेकदा जागा नसल्यामुळे योजना पूर्ण होत नाहीत. मला आठवते मी एका गावात गेलो होतो. आपण भारतमाता माझी आई असे म्हणण्यास शिकवता. "भारतमाता माझी आई, आणि डोके ठेवायला जागा नाही" अशी तेथील शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे.

**[ श्री. सुधीर मुनगंटीवार ]**

अध्यक्ष महोदय, गावठाण विस्तार योजना का बंद करण्यात आली ? ८ ते १० वर्षे झाली ग्रामीण भागात शेतकरी, बिगर शेतकरी, मजूर, मच्छीमार, मागासवर्गीय यांच्यासाठी गावठाण विस्तार योजना निर्माण करण्यात आली होती. ग्रामीण भागामध्ये हातावर पोट घेऊन जगणारा माणूस आहे. म्हणून माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गावठाण विस्तार योजना ही या महाराष्ट्रामध्ये गेल्या ८-९ वर्षांपासून बंद झालेली आहे. ती योजना आपण सुरू करणार आहात की नाही ?

शहरांमध्ये उदाहरणार्थ चंद्रपूर येथे झोपडपट्टया आहेत. या झोपडपट्ट्या काही २-५ किंवा ५-१० वर्षांच्या नाहीत. तर गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून आहेत. तेथून एक पिढी जाते तर दुसरी येते. त्यांनी घर बांधले परंतु, त्यांच्याकडे घराचे मालकीपत्र नाही. अनेक दिवसांपासून त्यांना पट्टे दिली पाहिजे ही मागणी महाराष्ट्राच्या शहरांतून होत आहे. तुमच्या जाहीरनाम्यामध्ये तुम्ही त्यांना हक्काचे पट्टे देण्याबाबत लिहिता, मग हे पट्टे देण्याबाबत माननीय महसूल मंत्री कालबद्ध कार्यक्रम करणार आहेत की नाही ? याबाबत कालबद्ध कार्यक्रम केला पाहिजे. त्या गरिब माणसाने जेथे ३० वर्षांपूर्वी अतिक्रमण केले, त्याच्या मालकीच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यात काय अडचण आहे ? त्याला त्याचा पट्टा द्या. तो पैसेही द्यायला तयार आहे. पण तुमचा विभाग पट्ट्याच्या संदर्भात व्याजासाहित पैसे मागतो. आपण एकीकडे सर्वांना कर्जमुक्ती देतो, पण या संदर्भातील निर्णय आपण घोषित करणार आहात काय की, पट्ट्याच्या संदर्भात महाराष्ट्रात जेवढ्या लाखो केसेस प्रलंबित आहेत, यांच्यावर व्याज न आकारता बाजारमूल्याने जे मुद्दल आहे तेवढ्याच मुद्दलामध्ये या ३ महिन्यांत मागेल त्याला पट्टा दिला जाईल. ज्याच्या केस परिपूर्ण आहेत, ज्यांच्या केसमध्ये निकाल झाले आहेत, त्यांना आपण पट्टे देणार आहात की नाही ?

महसूल विभागाच्या जवळ जमीन आहे. काही ठिकाणी गरिबांना नियमानुकूल केले जात नाही. काही मोठी, श्रीमंत माणसे ज्यांच्या खिशात स्वत:च्या पैशाने जमीन विकत घेण्याची ताकद आहे त्यांनी मोक्याच्या जागा अडवून ठेवलेल्या दिसतात. महसूल विभागाचा नियम आहे की, ३ वर्षात जर जागेचा वापर केला नाही, तर त्या जमिनी सरकार दरबारी परत केल्या पाहिजेत. गावाच्या मध्यभागी असणाऱ्या व कोणत्याही वापराविना पडून असणाऱ्या ज्या १०-१५ एकर जमिनी आहेत, त्यांची महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेतली पाहिजे. या जमिनी व्यक्तिच्या, संस्थेच्या मालकीच्या नावाने महसूल विभागाने अत्यंत अल्प दरात दिलेल्या आहेत. या जमिनी ज्या रिक्त आहेत, त्या परत घेण्याबाबत महसूल विभाग काही ठोस भूमिका घेणार आहे की नाही ? माननीय महसूल राज्यमंत्री आमचे मित्रही आहेत, ते भारतीय जनता पक्षाचेच आमदार होते. परंतु, मंत्री व्हावे या तीव्र आंतरिक इच्छेपोटी ते त्या पक्षात गेले.

( सभागृहात अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार आपण पुढच्या विषयावर बोला.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महाराज, मी माननीय श्री. प्रकाश सोळंके यांना विनंती करणार आहे की, बल्लारशा पेपर मिलच्या जागेविषयी मी अनेकदा आपल्याला पत्र दिले. आपण या संदर्भात एक बैठकही घेतली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. या जागेबाबत या विधानसभेत आश्वासन देण्यात आले. माझा असा समज झाला की, मी याबाबत १,२,३,४ ५, ६ अशी स्मरणपत्रे पाठवित आहे. तर कदाचित स्मरणपत्रे वाचली जात नसतील, कारण डोळे बंद करता येतात. परंतु, ईश्वराने एक मात्र वैशिष्ट्य दिले आहे की,

[ श्री. सुधीर मुनगंटीवार ]

डोळे बंद करता येतात. परंतु, कान मात्र बंद करता येत नाहीत, म्हणून तुमच्या कानावर हा विषय घालण्याचा मी निर्णय घेतला. पेपर मिलच्या संदर्भात हे आश्वासन महसूल राज्यमंत्र्यांनी दिनांक ११ एप्रिल २००८ रोजी दिले. पेपर मिल हा एक मोठा उद्योग आहे. हमारे हाथ बहुत लंबे हैं, असे म्हणणाऱ्यांचा उद्योग आहे. थापरचा उद्योग आहे. या ठिकाणी १६ हेक्टर जमीन परत घेण्याबाबत माननीय राज्यमंत्री महोदयांनी दिनांक ११ एप्रिल २००८ रोजी याच सभागृहात आश्वासन दिले की, ही १६ हेक्टर जमीन शर्तीचा भंग झाला म्हणून पेपर मिलकडून दंड आकारुन ताबडतोब परत घेतली जाईल आणि यावर स्टेडियम, नाट्यगृह, दवाखाने अशी सरकारी विभागाची कार्यालये उभारण्यात येतील.

अध्यक्ष महाराज, याबाबत मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे, पत्रही देत आहे, आपण याबाबत बैठक देखील घेतली. अध्यक्ष महाराज, आश्चर्याची गोष्ट म्हणजे महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात मी वाचले की, ९७ टक्के वाईन ही महाराष्ट्रात निर्माण केली जाते. याचा अर्थ यांचा विभाग नशेत असतो काय. ९७ टक्के वायनरी उद्योग महाराष्ट्रात असल्यामुळे आपला विभाग नशेत असतो काय ? या मुळे महसूल विभागाला नशा येते असे पत्रव्यवहार पाहिल्यावरून आपल्याला कळून येईल. मी सातत्याने पत्रव्यवहार करत होतो. दिनांक १ एप्रिल २०१० रोजी जिल्हाधिकारी आदेश देतात की, ही जमीन नियमानुकूल केली आणि श्री. प्रकाशभाऊ आपण मला दिनांक २२ जून २०१० च्या पत्रान्वये लिहितात की, आता मी जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल मागवत आहे. त्यानंतर आयुक्त लिहून पाठवतात. म्हणून माझा आरोप आहे की, यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. विधानसभेपेक्षा एखादा जिल्हाधिकारी हा कधीही मोठा असू शकत नाही. जिल्हाधिकाऱ्याने सन २००८ च्या आश्वासनाची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे माझ्याकडची सगळी कागदपत्रे मी आपणास देतो. आता आपण कानाने ऐकले ते एकदा डोळ्यांनी पाहून घ्यावे. यासंबंधी आपण २४ तासाच्या आत जिल्हाधिकाऱ्याची चौकशी करावी. सदर जागा परत घेऊन सरकार दरबारी जमा करावी. तेथे शासनाची विविध कार्यालये तयार होतील, यादृष्टीने आपण प्रयत्न करावा.

महसूल विभाग नशेत राहतो काय, असे म्हणण्याचे कारण सांगतो. दिनांक ७ जानेवारी २०१० रोजी आपल्या विभागाकडून कार्यासन अधिकारी श्रीमती उषा दाते यांचे मला बैठकीसंबंधातील पत्र आले. यात नमूद केले आहे की, कोठारी या गावात नायब तहसीलदाराच्या कार्यालयासंबंधी आम्ही बैठक घेत आहोत. दिनांक ६ डिसेंबर २०१० रोजी श्री. प्रकाशभाऊ मला असे सांगतात की, अशी कोणतीही मागणी आमच्याकडे नाही. ७ जानेवारी २०१० रोजी कोठारी या गावात नायब तहसीलदाराच्या कार्यालयासंबंधी बैठक घेतो असे पत्र देतात आणि एक वर्षानी ते विसरून जातात की, आपण असे पत्र दिले होते. एक वर्षाने पत्र पाठवतात की, लोकप्रतिनिधींची अशी कोणतीही मागणी नव्हती. त्यामुळे कमीतकमी याचे प्रायश्चित घेण्यासाठी उत्तरात एवढे तरी सांगा की कोठारी गावात नायब तहसीलदाराचे कार्यालय मी महिन्याभरात सुरू करतो. एवढीच मला आपल्याला सूचना आहे.

वर्ग-२ च्या जमीन वर्ग-१मध्ये करणे हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१मध्ये घेण्यासाठी एक-एक केस का घेत आहात. मध्यप्रदेशमध्ये कायदा केला. त्या कायद्यानुसार वर्ग-२ च्या जमिनी, ज्यामध्ये अडचणी नाहीत त्या एका झटक्यात वर्ग-१मध्ये केल्या. एसडीओ कार्यालयात अगोदर जास्तीचे काम आहे. आपण या जुलै, २०११ अधिवेशनामध्ये एक कायदा आणावा. भोगवटदार वर्ग-२ चे

**[ श्री. सुधीर मुनगंटीवार ]**

भोगवटदार वर्ग-१ मध्ये रूपांतर करावे. मध्य प्रदेशमध्ये भाजपाचे सरकार आहे म्हणून टीका करावी. पण त्यातील चांगले गुण व संस्कार देखील घ्यावे. एका झटक्यात वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१मध्ये रूपांतरित केल्या पाहिजेत.

अध्यक्ष महाराज, मी वन मंत्र्यांसमोर काही विषय मांडणार आहे. हे ग्लोबल वॉर्मिंगचे युग आहे. त्यामुळे वन विभागाला महत्त्व जास्त आहे. आपण मला विचाराल तर मी सांगेन की, मुख्यमंत्री पदा एवढेच जास्त महत्त्व वन मंत्र्यांना आहे. कारण लोकांच्या जीवनाचा संबंध आता पर्यावरणाशी येत आहे. वडाच्या एका झाडाची किंमत ८०० रुपये असते. वडाचे झाड जास्त ऑक्सिजन सोडते. आपल्या बद्दल आमची अशी प्रतिमा होती की, लाथ मारीन तेथे पाणी काढीन. असे आपण नेते आहात. त्यामुळे हात लावीन तेथे झाड काढीन अशी योजना आपण केली पाहिजे. दुर्दैवाने गेल्या वर्षभरामध्ये वन विभागाचा झाडे लावण्याचा कार्यक्रम अत्यंत कमी झालेला आहे. राज्याचे अर्थमंत्री अत्यंत कमी तरतूद आपल्या विभागासाठी करतात त्याचा हा परिणाम आहे. आपले मागच्या वर्षीचे ३४२.७८ कोटी एवढे वनोत्पादन मूल्य होते. दुसरीकडे झाडे लावण्याच्या कार्यक्रमासाठी फक्त ४५ कोटी रुपये खर्च करीत आहात. शासन नेट प्रेझेन्ट व्हॅल्यूमध्ये देखील धोका देत आहे. सिंचनासाठी जे जंगल कापले जाते त्या बदल्यात दुसरीकडे जंगल करता आले पाहिजे म्हणून आपण नेट प्रेझेन्ट व्हॅल्यू भरून घेतो. केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्याला अर्धे पैसे देखील पाठविले नाहीत. जे पैसे पाठविले ते वन विभागाने अधिकाऱ्यांच्या गाड्या आणि घरांसाठी खर्च केले. हा एकप्रकारे ४२० चा गुन्हा आहे. नेट प्रेझेन्ट व्हॅल्यूचे पैसे झाडे लावण्यासाठीच खर्च झाले पाहिजेत. माझी आपणास विनंती आहे की, आपण या संदर्भात एक चांगल्या प्रकारे कल्पकतेने योजना आखावी. नगरपरिषदेच्या जेवढ्या मोकळ्या जागा आहेत त्याठिकाणी वन विभागाने झाडे लावावीत. डीसीएमला काही काम नाही त्याच्याकडे हे काम द्यावे.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रामध्ये डिग्रेडेड फॉरेस्ट लॅन्ड किती आहे याची मला माहिती नाही. परंतु माझ्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये १ लाख ९० हजार हेक्टर डिग्रेडेड फॉरेस्ट लॅन्ड आहे. त्याठिकाणी झाडे लावण्याची वन विभागाची ताकद नसेल तर काही सामाजिक संस्था किंवा उद्योग यांना सात वर्षांसाठी झाडे लावण्याची परवानगी देऊन त्यातील अर्धी झाडे तोडण्याची त्यांना परवानगी द्यावी. अशाप्रकारे आपण वड, पिंपळ, कडूलिंब अशा ट्रेडीशनल झाडे लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या संदर्भातील फाईल मूव्ह झाली ती १० टेबलवर फिरली. त्यामुळे फाईलची जाडी वाढली पण निर्णय काही झाला नाही. एक झाड कापून जेवढे कागद तयार होतात ते या विषयाच्या फाईलवर खर्च झाले, परंतु झाडे वाढविण्याच्या संदर्भातील निर्णय काही झाला नाही हे मी दुर्दैवाने मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

अध्यक्ष महाराज, शासनाने लाकूड चोरी संदर्भात स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. आपल्या विभागाने एक परिपत्रक काढले आहे. एसडीओंच्या कार्यालयात वन जमीनपट्टया संदर्भातील अपिलाबाबत प्रतिकूल निर्णय लागला तर ती जागा वन विभागाच्या ताब्यात द्यावी. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे सुद्धा अपील करता येते हे आपल्या विभागाला माहीत नाही काय ? जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता येत असतानाही विभाग असा जी.आर. कसा काढते ? तेव्हा जी.आर. दुरुस्त केला पाहिजे.

**[ श्री. सुधीर मुनगंटीवार ]**

अध्यक्ष महाराज, ताडोबा जंगलाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी एक बैठक घ्यावी अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, मी आपल्या माध्यमातून माननीय पर्यावरण मंत्री श्री.संजय देवतळे यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या पक्षाचा जाहीरनामा वाचावा. आपल्या पक्षाचा जाहीरनामा एक असतो आणि कृती वेगळी असते. आपल्या जाहीरनाम्यामध्ये उल्लेख आहे की, "राज्यातील नदी व नाले उद्योगामुळे निर्माण होणाऱ्या टाकावू वस्तूंमुळे तुंबलेले आहेत. गंगा, यमुना व मिठी नदीच्या स्वच्छता अभियानाप्रमाणे पुढील पाच वर्षात राज्यातील सर्व नदी-नाले प्रदूषण विरहित होण्याकरिता कार्यवाही करून त्यापूर्वी प्रमाणेच वाहतील अशी कार्यवाही करू." या जाहीरनाम्यावर श्रीमती सोनिया गांधी यांचा फोटो आहे. माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचा फोटो आहे. दुसरे असे सांगितले की, राज्यात झपाट्याने औद्योगिकीकरण होत आहे. पर्यावरणाच्या तत्वात काहीही तडजोड करणार नाही. दुर्दैवाने या विभागाची गती सुद्धा मंद आहे. आपल्याकडील दूषित नद्या साफ करण्यासाठी केंद्र सरकारने ४०८५ कोटी रुपये दिले. परंतु पर्यावरण विभाग इतका अकार्यक्षम आहे की त्या विभागाने तसे प्रस्ताव पाठविले नाहीत. आपल्याला फक्त १०६.९४ कोटी रुपये मंजूर होऊन त्यापैकी फक्त ५२ कोटी रुपये प्राप्त झाले. वेळ अपुरा असल्यामुळे मी जास्त बोलत नाही या संदर्भात मी माननीय मंत्रीमहोदयांना लेखी पत्र देतो. आपण या संदर्भात एक बैठक लावावी. सरकार महाराष्ट्रातील नदी नाले प्रदूषण मुक्त करेल तेव्हा करेल, परंतु आपल्या जिल्ह्यातील इरई आणि झरपड या दोन नद्या दोन वर्षात स्वच्छ करण्यात येतील असे मंत्री महोदयांनी उत्तरात सांगावे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. प्रवीण दरेकर** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन, पर्यावरण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मला माननीय वन मंत्र्यांच्या निदर्शनास २-४ गोष्टी आणून द्यायच्या आहेत. नागपूरला झालेल्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून वन जमिनी व त्यावर राहणाऱ्या नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा देण्यासंदर्भातील मुद्दा मांडला होता. त्यावेळी माननीय वन मंत्री नामदार डॉ. पतंगराव कदम साहेबांनी आश्वासन दिले होते की, "मालाड, गोरेगाव, दिंडोशी, बोरिवली, दहिसर आणि कांदिवली-पूर्व येथील व ठाणे जिल्ह्यातील वन जमिनीची बाऊंड्री निश्चित करण्यात येईल." महोदय, तेथे वन जमिनींवर कुटुंबे वसलेली आहेत. वन जमिनीची बाऊंड्री निश्चित करण्याची आवश्यकता आहे असे सांगण्यात आले होते. अध्यक्ष महोदय, ३ महिन्यांच्या आत वन जमिनीची मोजणी केली जाईल, अशाप्रकारचे आश्वासन देखील याच विधानसभेच्या सभागृहात माननीय वन मंत्र्यांनी दिले होते. आता ३ महिने होऊन गेले आहेत. राज्याच्या माननीय मंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिले आणि ते आश्वासन शासनाकडून पूर्ण होणार नसेल तर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आम्ही कितीही भाषणे केली, न्याय मागण्याचा प्रयत्न केला, विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याचा प्रयत्न केला तर त्यातून काही निष्पन्न होईल असे मला वाटत नाही.

**[ श्री. प्रवीण दरेकर ]**

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील रावळपाडा विभाग असेल, कांदिवली पूर्वचा परिसर असेल, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर साहेबांच्या मतदारसंघातील विभाग असेल, आमच्या श्री. सिंग साहेबांचा गोरेगावचा विभाग असेल, हजारो-लाखो कुटुंबे वन जमिनीवर विसावलेली आहेत, राहत आहेत. परंतु, आज त्यांना अनधिकृत ठरविले जाते. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. आम्ही गेल्या ४ अधिवेशनापासून वारंवार वेगवेगळया माध्यमातून हा विषय सभागृहात मांडत आहोत. त्या लोकांना मुलभूत सुविधा नाहीत, आजही पिण्याचे पाणी मिळू शकत नाही, अशी स्थिती आहे. वन जमिनीवरील लोकांना वीज हवी असेल तर मिटर लावून दिले जात नाही. नॅशनल पार्क मध्ये असलेल्या वन जमिनीवरील आदिवासी पाड्यांवर देखील तीच परिस्थिती आली आहे. आजही त्यांना पाणी नाही, वीज नाही. आमदार निधीतून काम करायचे म्हटले तरी महानगरपालिका परवानगी देत नाही, अशा विचित्र अवस्थेत या ठिकाणी हे लोक राहत आहेत. माझी माननीय वन मंत्र्यांना विनंती आहे की, आपण आपल्या उत्तरामध्ये हा विषय प्राधान्याने घ्यावा. शासन म्हणून आपण कोणतीही वन जमीन ठरविले नाही. कुठलीही निश्चित बाऊंड्री केलेली नाही. सदर बाबतीत काय झाले, हे देखील सांगावे. वन जमीन कोणती आहे, हे निश्चित केले पाहिजे. शासन ते अजून निश्चित करू शकलेले नाही.

अध्यक्ष महोदय, गरीब लोक राहत आहेत. त्यांना तुम्ही वन जमिनी असल्याचे सांगून अनधिकृत ठरविता आणि त्याच वेळी दोन्ही खात्याच्या जमिनीच्या बाऊंड्रीवर इमारती उभ्या राहत आहेत. त्या इमारतींना सर्व परवानग्या मिळत आहे. ७-८ मजल्यांचे टॉवर्स उभे राहत आहेत. संबंधित तशा प्रकारच्या परवानग्या आणत आहेत. त्यांना पाणी कसे मिळते ? ऑक्युपेशन सर्टिफिकेट कसे मिळते ? ते मोठे, श्रीमंत लोक आपले काम व्यवस्थित करून घेतात. सर्वसामान्य चाळीमध्ये, झोपडपट्टीमध्ये राहणारा वन जमिनीवर राहणारा गरीब माणूस आजही मूलभूत सुविधांसाठी भीक मागत आहे. आपण आदिवासींच्या भल्यासाठी फक्त बोलणारच आहोत का ?

अध्यक्ष महोदय, नॅशनल पार्कमध्ये आदिवासी पाडे आहेत, त्याचे काय करणार आहात ? आपण बेरोजगारांच्या हाताला काम देऊ असे म्हणता. परंतु, तसे होत नाही. पण आपण बेरोजगारांच्या हाताला काम देत नाही. निवडणुकीमध्ये मोठ्या घोषणा करण्यात येतात. पण आमच्या सारखा कार्यकर्ता जेव्हा एखादी योजना घेऊन येतो, त्यावेळी त्याला सहकार्य केले जात नाही. मी माननीय आदिवासी राज्यमंत्र्यांना नॅशनल पार्कमध्ये घेऊन गेलो होतो. त्या ठिकाणी व्हिलचेअरवर असलेले ५० स्टॉल्स मी त्यांना दाखविले. आम्ही आणखी स्टॉल्स देण्यास तयार आहोत. परंतु, ते ठेवायचे कोठे ? असा प्रश्न आहे. नॅशनल पार्कमध्ये आदिवासी लोक छोट्या पाट्या घेऊन पर्यटकांना फळे विकतात, इतर वस्तू विकतात. त्यांना चांगल्या प्रकारचे, सुसाध्य, असे व्हिलचेअरवरील स्टॉल्स आम्ही देऊ इच्छितो. त्यासाठी वन विभागाकडे ना-हरकत मागत आहोत. परंतु, वन विभागाकडून ना-हरकत मिळत नाही. स्वत: काही करायचे नाही, दुसरा एखादा चांगली योजना, चांगली गोष्ट करीत असेल तर त्यालाही साथ द्यायची नाही, अशी शासनाची भूमिका आहे. अशा प्रकारे शासन दुटप्पी भूमिका घेत आहे. माझी माननीय वन मंत्र्यांना विनंती आहे की, आपण प्राधान्याने वन खात्याच्या जमिनीवर मूलभूत सुविधा देण्यासाठी धडाकेबाज निर्णय घ्यावा. आपण धडाकेबाज निर्णय घेणारे मंत्री आहात, असे संपूर्ण सभागृहाचे मत आहे. त्यामुळे आपण याबाबतचा निर्णय निश्चितपणे घ्याल, अशी मी अपेक्षा करतो.

[ श्री. प्रवीण दरेकर ]

अध्यक्ष महोदय, महसूल विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर लिकेजेस आहेत. त्यामुळे पाहिजे तेवढा महसूल राज्याला मिळत नाही. रॉयल्टी, मुद्रांक शुल्क, इतर महसुली कर या माध्यमातून राज्याला मोठ्या प्रमाणावर निधी मिळू शकतो. परंतु, चांगल्या पद्धतीचे नियोजन नसल्यामुळे आपल्या राज्याला कोट्यवधी रुपयांच्या महसुलाला मुकावे लागत आहे.

अध्यक्ष महोदय, वाळू उपसा करण्याचे ठेके राज्य शासनाकडून दिले जातात. आज राज्यात वाळू माफिया कशा पद्धतीने निर्माण झाले आहेत, याची पूर्ण कल्पना आपल्याला आहे. वाळू उत्खननासाठी लिलाव काढले जातात. हे वाळू माफिया एका दिवसात ३००० कोटी रुपये कसे भरतात ? असा प्रश्न आमच्यासमोर आहे. हे लोक इन्कम टॅक्स भरतात की नाही, याचीही माहिती नाही. परंतु, लेटरहेड छापायचे, कोणी तरी यायचे, निविदा भरायची आणि ठेका घेऊन करोडो रुपये कमवायचे, असा हा उद्योग आहे. या माध्यमातून चांगल्या प्रकारची रॉयल्टी मिळेल, याबाबतची काळजी सरकारकडून घेतली जात नाही.

(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

अध्यक्ष महोदय, मुंबई, ठाणे शहरामध्ये अनेक खाणी, खदाने आहेत. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उत्खननाचे ठेके दिले जातात. या राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. वसंतदादा पाटील असताांना त्यांनी वडार समाजाला प्राधान्याने उत्खननासाठी खाणी उपलब्ध करून दिल्या होत्या. मुंबई, ठाणे येथील अनेक खाणी या समाजाला उत्खननासाठी दिल्या होत्या. त्या पद्धतीने शासनाने वडार समाजाला खाणी उपलब्ध करून द्याव्यात, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यावरणाचा प्रश्न आज गंभीर होत चालला आहे. दूषित पर्यावरणाचे अतिशय वाईट परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. आज राज्य सरकारकडून केवळ पर्यावरणाबाबतची जागृती निर्माण केली जात आहे. ठोस असे कोणतेही काम केले जात नाही. रायगड जिल्ह्यातील महाड या गावातून सावित्री नदी जाते. महाडला मोठी एमआयडीसी असून तो केमिकल झोन आहे. येथील कारखान्यांमधून सावित्री नदीमध्ये दूषित पाणी सोडले जात असल्यामुळे या नदीतील मासे वेळोवेळी मरतात, लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळत नाही. यासंदर्भात वेळोवेळी तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. या सभागृहात देखील प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. परंतु, कारखान्यांवर कोणतीही कारवाई होत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय ग्राम विकास राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माझ्या गावचा रस्ता करण्याबाबतची मागणी मी केली होती. कोतवाल-दाबाड मार्गे पळसुले-क्षेत्रफळ-कुडपन असा महाबळेश्वरला जोडणारा एक रस्ता तयार झाला तर कोकणातील खेड तालुका आणि महाबळेश्वर एकमेकांना वाहतुकीच्या दृष्टीकोनातून जोडले जातील. दळणवळणाचे साधन निर्माण होऊन दोन्हीकडील लोकांना त्याचा फायदा होऊ शकतो. माननीय ग्राम विकास राज्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, हा रस्ता तातडीने तयार करण्याबाबत आपण लक्ष घालावे. अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

**श्री. ग. आ. देशमुख** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या महसूल व ग्रामविकास विभागांवर आज सभागृहात चर्चा होत आहे. या दोन विभागांवर मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजना अनेक राज्यात व अनेक जिल्ह्यात राबविण्यात आली आहे. ५०० लोकसंख्येपर्यंतच्या सर्व गावांमध्ये तसेच वाड्या, वस्त्यांवर ही योजना राबवावयाची आहे. हा कार्यक्रम गेल्या दोन वर्षाच्या काळात सोलापूर जिल्ह्यात तसेच राज्यातील कोणत्याही नवीन जिल्ह्यात कार्यक्रम राबविण्यात आला नाही. या योजनेचा आठवा टप्पा चालू आहे. नववा टप्पा गडचिरोली जिल्ह्यासाठी घेतला आहे. त्याबाबत तक्रार असण्याचे कारण नाही. राज्यात ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षापासून ही योजना राबविण्यात येत होती. पहिल्यांदा ही योजना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविण्यात येत होती. ही योजना राबविण्यासाठी राज्याकडे स्वतंत्र यंत्रणा नाही, या कारणास्तव केंद्र सरकारने या राज्याला निधी देताना हात आखडता घेतला आहे. या कामासाठी २६७ कार्यकारी अभियंत्यांच्या जागा निर्माण करण्यात आल्या होत्या. त्याला सभागृहाने मान्यता दिली. त्या जागा भरल्या किंवा नाहीत, याची मला माहिती नाही. केंद्र सरकारकडून दरवर्षी ग्रामीण रस्त्यांसाठी १,००० ते १,५०० कोटी रुपये येण्याची शक्यता असताना ही योजना का राबविण्यात येत नाही, याचा खुलास मंत्री महोदयांनी करावा.

अध्यक्ष महोदय, त्याचप्रमाणे यशवंत ग्रामसमृद्धी योजना दोन वर्षापासून बंद ठेवण्यात आली आहे. यावर्षी ही योजना सुरू केली आहे. योजनेसाठी प्रकरणे मागविण्यासाठी दोन दिवसांची मुदत देण्यात आली, हा प्रकार योग्य नाही असे मला वाटते. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, या योजनेचे दोन दिवसांत ५८ कोटी रुपये भरण्यात आले आहेत, अशी माहिती देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे पक्षपात न करता या योजनेत जनतेच्या सहभागाची रक्कम १५ टक्क्यांवरुन २५ टक्के केली जाऊ शकते. या योजनेत जनतेचा हिस्सा २५ टक्के करून सर्व गावांमध्ये ती कशी राबविता येईल याबाबत विचार करण्यात यावा. राज्य शासनाच्या अंदाजपत्रकातील २५:१५ या हेडबाबत सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. एक-दोन हजार लोकसंख्या असलेल्या गावांच्या बाहेर डांबरी रस्ते केलेले आहेत आणि गावातील अंतर्गत रस्त्यांवरून पावसाळ्यामध्ये अगर रात्रीच्या वेळी चालता सुद्धा येत नाही, अशी परिस्थिती आहे. म्हणून गावातील अंतर्गत रस्ते चांगले करण्याचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. परंतु स्थानिक स्वराज्य संस्था असताना २५१५ या हेडचा वापर मंत्रालयातून केला जातो. ही योजना विस्तृत करून प्रत्येक गावात लोकसंख्येच्या प्रमाणात अंतर्गत रस्त्यांची कामे केली पाहिजेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शेत रस्त्यांची आणि पांदन रस्त्यांची कामे महाराष्ट्र रोजगार हमी योजना आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून करण्याची घोषणा शासनाने सभागृहात केली आहे. हा विषय ग्रामविकास विभागाकडे नाही, याची मला जाणीव आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना आणि ग्रामीण रोजगार हमी योजनेतील ५० टक्के हिस्सा पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीकडे देऊन त्यांच्यामार्फत ही योजना राबविण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. रोजगार हमी योजना विभाग आणि ग्रामविकास विभाग यांचा समन्वय

[ श्री. ग. आ. देशमुख ]

करून केंद्र शासनाकडून अधिकाधिक पैसे आणून मोठ्या प्रमाणावर शेत रस्त्यांची आणि पांदन रस्त्यांची कामे करण्याची आवश्यकता आहे. सभागृहामध्ये काल रोजगार हमी योजना विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला रोजगार हमी योजना मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. यामध्ये ग्रामविकास विभागाने भागीदारी केली पाहिजे, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, मी पर्यावरण विभागाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील अनेक नद्यांचे गटारे झालेली आहेत. उजनी धरणातून पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी, सांगोला, सोलापूर, उस्मानाबाद अशा अनेक शहरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. अभिमानाने सांगितले जाते की, आम्ही ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या योजना करताना प्रत्येक व्यक्तीसाठी ४० लिटर पाणी देतो. पुण्यामध्ये मात्र २०० लिटरपेक्षा जास्त पाणी दिले जाते. जास्त पाणी देण्यासाठी आमची हरकत नाही. परंतु प्रत्येक वर्षी पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील १० टीएमसी मळ सांडपाणी मिश्रीत पाणी उजनी धरणामध्ये मिसळले जाते. त्यामुळे उजनी धरणातील पाणी पिण्यास व आरोग्यास अयोग्य झालेले आहे आणि तेच पाणी ग्रामीण भागातील नळ पाणीपुरवठा योजनांसाठी दिले जाते. या संदर्भात शासन काय करणार आहे ? सभागृहामध्ये सांगितले जाते की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ही देशातील श्रीमंत महानगरपालिका आहे. परंतु या श्रीमंत महानगरपालिका क्षेत्रातील घाण पाणी उजनी धरणामध्ये कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जाते. ते पाणी स्वच्छ करण्याकरिता पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगरपालिकेकडे पैसे नाहीत काय ? पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगरपालिकेने पाणी शुद्ध करून उजनी धरणामध्ये सोडावे किंवा ते पाणी शेतीच्या उपयोगासाठी वापरण्यात यावे. पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगरपालिका क्षेत्रातील घाण पाणी उजनी धरणामध्ये सोडण्यात येऊ नये. त्यामुळे रोगराई पसरते. ग्रामीण भागात माणसे राहात नाहीत का ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

अध्यक्ष महोदय, राज्यात गेल्या ४-५ वर्षांपासून वाळू काढण्याचे ठेके घेतले जातात. वाळू हे राज्याच्या उत्पन्नाचे साधन आहे, याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. समुद्रापासून मिळणाऱ्या वाळूपासून दरवर्षी ९० कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळतो. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील नद्या व ओढ्यांमधील वाळू उपसा करून, तिचा लिलाव करून जवळपास तेवढीच रक्कम मिळते. ग्रामीण भागात अलीकडच्या काळात वाळू माफिया निर्माण झाले आहेत. एखाद्या गावात माफियांना अडथळा आणल्यास मोठ्या प्रमाणावर मारामाऱ्या होतात. पंढरपूरसारख्या तालुक्यांमध्ये व इतर अनेक ठिकाणी अशा प्रकारे अनेक घटना घडलेल्या आहेत. यातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात संघटित गुन्हेगारी निर्माण होत आहे. यापूर्वी ग्रामीण भागात पोलीस खात्याला मटके व दारूचे हफ्ते मिळत होते. परंतु गेल्या दोन वर्षांच्या काळात त्यांना व महसूल विभागातील अधिकाऱ्यांना वाळूचे हफ्ते मिळण्यास सुरूवात झाली आहे. नद्यांतून मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा होत असल्यामुळे, नद्या कोरड्या पडू लागल्या आहेत. महसूल विभागाने यासंबंधी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. मानसिंगराव नाईक** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण विभागांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागासंबंधी मी सांगू इच्छितो की, ग्रामीण भागातील शेतातील रस्ते, ग्रामीण भागातील पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधील रस्ते तयार होत असताना मोठ्या प्रमाणावर विलंब होतो. ग्रामीण भागातील खेडी जोडण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने पंतप्रधान ग्रामसडक योजना सुरू केली. परंतु दुर्देवाने त्या योजनेच्या ठिकाणी जे अधिकारी कामे करीत असतात, तेच अधिकारी कामांचे ठेके घेतात. त्यामुळे ती कामे वेळेवर पूर्ण होत नाहीत. अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील गेल्या ३ वर्षांपासून ५ रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत. या प्रकरणी वारंवार कारवाईची मागणी करून सुद्धा कोणावरही कारवाई केली जात नाही. यासाठी शासनाने धोरण ठरवून पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधील सर्व रस्ते वेळेत पूर्ण करण्यासाठी कार्यप्रणाली निश्चित करावी व रस्त्यांची कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा. या योजनेअंतर्गत ५०० ते १,००० लोकसंख्या असलेल्या गावांची निवड केली जाते. परंतु एका ठराविक भागातीलच गावे निवडली जातात. राज्यातल्या अशा प्रकारच्या सर्व गावांचा त्या योजनेत समावेश होण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मी वन विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, वन विभागाच्या अंतर्गत जलसंपदा व वनसंपदा चांगल्या प्रकारे आकाराला येत आहे. मात्र वनाच्या आजूबाजूला असलेल्या क्षेत्राचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. त्यासाठी शासनाने भरीव मदत देणे गरजेचे आहे. वनातील जनावरांनी बाहेर येऊ नये याकरिता चर खोदणे किंवा इतर काही प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. महसूल विभागात संजय गांधी योजनेच्या संदर्भातील प्रकरणे किंवा वेगवेगळ्या पद्धतीचे दाखले किंवा जमिनींच्या नोंदणीची कामे करताना काहीतरी फिक्स कालावधी करण्याची गरज आहे. एखाद्या शेतकऱ्याने अर्ज दिला तर त्याची नोंद घ्यायला सहा-सहा महिने लागल्यामुळे, ती प्रकरणे प्रलंबित राहतात. काही ठिकाणी तडजोडीने कामे केली जातात. सकाळी अर्ज दिल्यानंतर दुपारपर्यंत त्या प्रकरणाची नोंद घेतली जाते. त्यामुळे अशा ठिकाणी ऑनलाईन प्रणालीचा उपयोग करता येईल काय, याचा देखील विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये जंगल संपदा मोठ्या प्रमाणात आहे. झाडे लावा, झाडे जगवा असा प्रकल्प पर्यावरण विभाग आपल्या परीने राबवित आहे. त्याची चांगल्या दिशेने वाटचाल झाल्याचे आपल्याला पहायला मिळत आहे. पर्यावरण समतोल राखण्यास मदत होत आहे. याकरिता आणखी भरीव निधी देण्याची आवश्यकता आहे. डोंगरी भागामध्ये जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात करण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील डोंगरी विभागामध्ये विकास करण्यासाठी शासनाकडून निधी दिला जातो. त्याचप्रमाणे जलसंधारण खात्याच्या अंतर्गत डोंगरी तालुक्यांना जास्तीतजास्त निधी उपलब्ध करून दिला, तर जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. अध्यक्ष महोदयांनी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण या ठिकाणी संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग आणि ग्रामविकास विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग आणि ग्रामविकास विभाग यांची एकत्रित चर्चा करण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाल्याचे सुदैवाने म्हणावे लागेल. कारण ते विषय एकमेकांशी निगडित आहेत. ग्रामविकास मंत्री पर्यावरण संतुलीत ग्रामविकास योजना राबवित आहेत आणि जलसंधारण खात्याकडे सामाजिक वनीकरणाचे काम आहे. सर्व मंत्री आज एकत्रितपणे सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे आजच्या चर्चेतून राज्याला निश्चित अशी एक चांगली दिशा मिळण्यास मदत होणार आहे असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम मी ग्रामविकास विभागावर बोलणार आहे. राज्याच्या ग्रामविकास मंत्री महोदयांनी राज्यभर फिरुन पर्यावरणाच्या संदर्भात जागृती निर्माण करण्याचे काम केल्याबद्दल मी सर्वप्रथम त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. त्यांनी या पर्यावरणाच्या संदर्भात अधिक माहिती आम्हाला दिलेली असल्यामुळे, आमची देखील पर्यावरणाच्या संदर्भात काम करण्याची इच्छा निर्माण झालेली आहे. एका माणसाला दिवसभर काम करण्यासाठी किती ऑक्सीजनची गरज आहे आणि ते ऑक्सीजन मिळण्यासाठी किती झाडांची गरज आहे याचे महत्त्व त्यांनी आम्हाला पटवून दिलेले आहे. आज ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सिमेंटचे रस्ते होत आहेत. मागच्या २००० वर्षांच्या काळात जेवढी सिमेंटची घरे झाली नाहीत, तेवढे रस्ते गेल्या ५० वर्षांच्या काळात झालेले आहेत. मागच्या कालखंडामध्ये ग्रामविकास विभागामार्फत काही महत्त्वाचे आणि चांगले निर्णय घेण्यात आले. तेराव्या वित्त आयोगाने ७० टक्के निधी ग्रामपंचायतीला देण्याचा निर्णय घेतलेला आहे.  ग्रामविकास विभाग हा खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून उपेक्षित असलेला विभाग आहे. स्वातंत्र्याच्या ६० वर्षांनंतरही ग्रामीण भागामध्ये सन्माननीय सदस्य, श्री. ग. आ. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे गावा-गावात रस्त्याची कोणतीही योजना राज्य सरकारने राबविली नाही, हे दुर्दैवच म्हणावे लागेल. म्हणूनच मोठ्या प्रमाणवर लोक हे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर करीत आहेत, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

अध्यक्ष महोदय, मी माझ्या सूचना थोडक्यात मांडणार आहे. केवळ दोन-तीन महत्त्वाच्या विषयावर माझे विचार व्यक्त करणार आहे. शहरी भागापेक्षाही ग्रामीण भागात अतिक्रमणाचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. एखाद्याचा प्लॉट २० × ४० असेल तर तो आपले बांधकाम २२ × ४५ असे करतो. जी ग्रामपंचायत काटेकोरपणे अतिक्रमण होऊ देणार नाही, त्या ग्रामपंचायतीलाच परफॉर्मन्स ग्रॅण्ट दिली पाहिजे, अशी माझी सूचना आहे. तसेच अतिक्रमण करणे आणि अनधिकृत बांधकाम करणे या दोन्ही बाबींसंदर्भात दखलपात्र गुन्हा म्हणून कायद्यात तरतूद करावी. जेव्हा अनधिकृत बांधकाम केले जाते, तेव्हाच त्यासंबंधी कारवाई होण्याची आवश्यकता आहे. अन्यथा २० ते २५ वर्षे बांधकामाला होऊन जातात. मग जेव्हा कारवाई करण्याची वेळ येते तेव्हा त्यांचे असे म्हणणे असते की, मी अमुक इतक्या वर्षापूर्वी हे बांधकाम केले आहे, तेव्हा आपण का कारवाई केली नाही.

**[ ॲड. आशिष जयस्वाल ]**

अध्यक्ष महोदय, सन १९७२ मध्ये सिटी सर्व्हे झाला आहे. त्यावेळी एखाद्या गावात ३,००० लोक राहत असतील, तर त्यांचे भूखंड कोणते आहेत याची माहिती होती. आता तर सॅटेलाईट यंत्रणा उपलब्ध झालेली आहे, यावरुन अशा प्रकारे ही सर्व माहिती उपलब्ध करून घेण्याची आवश्यकता आहे. ग्रामपंचायतीमध्ये पूर्वीचे रेकॉर्ड बघायला गेले तर त्याबाबतची कोठेही नोंद तुम्हाला मिळणार नाही. संबंधित व्यक्तीने ग्रामपंचायतीकडे बांधकामाची परवानगी मागितली होती किंवा नाही, त्याची जागा किती होती, त्याने किती अतिक्रमण केले, याबाबतची कसलीही माहिती मिळणार नाही. फक्त नमुना ८ ची नोंद मिळते.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाने दिनांक २ मार्च २००८ रोजी एक निर्णय घेतला होता, परंतु त्या निर्णयाची अजूनही अंमलबजावणी झाली नाही. त्यावेळी अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस पथक निर्माण केले होते. कोणत्याही नगरात अतिक्रमण झाल्यास, त्या पोलीस पथकाने तेथे जाऊन ते अतिक्रमण काढावयाचे होते. त्या कालखंडात मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केली होती की, ग्रामीण भागासाठीही अशा प्रकारची पोलीस पथके निर्माण करावी. ग्रामीण भागातील अतिक्रमण, सचिव तोडू शकत नाही. लोकप्रतिनिधींची इच्छा नसते. काहींची इच्छा असली तरी त्यांना अतिक्रमणे तोडण्यासाठीची साधने आणि पोलीस संरक्षण न मिळाल्यामुळे, तो ती अतिक्रमणे तोडू शकत नाही, खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधींचे हे दुर्दैव आहे.

अध्यक्ष महोदय, एखाद्या गावात एखाद्याने दहा लाख रुपये, वीस लाख, ५० लाख रुपये खर्च करून इमारत बांधली असेल, तर त्याच्या बांधकामाच्या स्वरूपात चार्ज लावण्याची आवश्यकता आहे. परंतु या बाबींकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नाही. ग्रामपंचायतीच्या सरपंचाची इच्छा होती की, मानधन वाढले पाहिजे, शासनाने त्यांच्यासाठी अत्यंत कमी मानधन सुरू केले. अनेक ग्रामपंचायती अशा आहेत की, त्यांची लोकसंख्या ही नगरपरिषदांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. ग्रामपंचायतीने सुद्धा आपले उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे, यासाठी शासनाने स्वत:हून पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा ग्रामपंचायतीने नागरी सुविधा कशा उपलब्ध करून द्यावयाच्या, अशाही अनेक समस्या अनेक ग्रामपंचायतींसमोर आ वासून उभ्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण भागाचे उत्पन्न वाढवायचे असेल, तर ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर गौण खनिज आहे, त्यातील रॉयल्टीच्या माध्यमातून येणारा पैसा हा त्या ग्रामपंचायतीला अनुदान म्हणून दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, २५ तारखेला शासनाने वाळू धोरण जाहीर केले होते. त्यावर २० ऑक्टोबर रोजी कॅबिनेटच्या बैठकीमध्ये निर्णय झाला. २६ ऑक्टोबर २०१० रोजी हायकोर्टने निर्णय दिला होता. या निर्णयाची प्रत माझ्याकडे आहे. शासनाने सन २००१ मध्ये कायदा तयार केला होता. विधेयक क्रमांक १९ प्रमाणे हा कायदा तयार करण्यात आला. एकूण खनिज उत्पन्नातील १० टक्के रक्कम जमा केली. २६ ऑगस्ट २००२ रोजी शासनाने जीआर काढला. त्यावेळी १० टक्के रकमेपैकी १/३ रक्कम महाराष्ट्र खनिकर्म विकास महामंडळाला देण्याचे ठरले. उर्वरित २/३ रक्कम बाधित गावांच्या २५ कि.मी. परिसरातील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र २५ कि.मी.पर्यंत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाचा गैरफायदा घेण्यात आला. जे काम ५ कि.मी.मध्ये होणे अपेक्षित होते, ते काम २५ कि.मी.मध्ये केले गेले. तसेच जी गावे बाधित होती, त्या ठिकाणी कामे हाती घेतली गेली नाहीत. राज्य शासनाने हायकोर्टमध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले होते की, २/३ पैकी बहुतांश रक्कम ग्रामपंचायतीला दिली

[ ॲड. आशिष जयस्वाल ]

जाईल. मात्र दुर्दैव असे आहे की, अद्याप ही रक्कम त्यांना दिली गेली नाही. जिल्ह्याचे पालक मंत्री खनिज विकास निधीचे अध्यक्ष होते. त्या संदर्भात हायकोर्टने निर्णय दिला होता. विठ्ठल तुकाराम विरुद्ध महाराष्ट्र सरकार या प्रकरणामध्ये दिनांक १५ जानेवारी २०१० रोजी हायकोर्टने निर्णय दिला होता. मतदारसंघामध्ये पालक मंत्र्यांच्या अधिकारांचा राजकीय दृष्टिकोन ठेवून वापर केला जातो असे निदर्शनास आले. म्हणून त्यांचे अधिकार काढून टाकण्यात आले. आता हे अधिकार माननीय मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. खनिज उत्खननामुळे बाधित असलेल्या गावांमध्ये प्रदूषण झाले आहे, तेथील पर्यावरणाची हानी झाली आहे. मात्र अशा बाधित गावांना निधी दिला जात नाही.

अध्यक्ष महोदय, १५ जानेवारी १९८५ रोजीच्या शासनाच्या जीआर प्रमाणे खनिज उत्खननामुळे बाधीत गावांना नुकसानभरपाई दिली जाते. मात्र त्यामध्ये अद्याप कोणतीही सुधारणा केलेली नाही. ग्रामपंचयतींना २ हजार रुपये अनुदान दिले जाते. नुकसानभरपाई कोणत्या नियमानुसार दिली जाते, हे शोधण्याकरिता मी मंत्रालयात गेलो होतो. तेथील कर्मचाऱ्यांना याबाबत माहितीच नव्हती. सदर जीआर शोधण्याकरिता ६ तास लागले. हा जीआर महसूल विभागाचा आहे व वित्त विभागामार्फत निधी दिला जातो. वित्त सचिवांना मी विनंती केली होती. ग्रामपंचायतींकडून कोट्यवधी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. मात्र त्यांना १९८५ च्या जीआरनुसार केवळ २ हजार, ५ हजार रुपये अनुदान दिले जाते. या अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. अनेकदा स्मरणपत्रे पाठवून देखील शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. खनिकर्म उत्खननामुळे बाधीत झालेल्या गावांमधील पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. माझी विनंती आहे की, त्या संदर्भात शासनाने निर्णय घ्यावा.

अध्यक्ष महोदय, २६ ऑगस्ट २००२ च्या जीआरप्रमाणे बाधित गावांमध्ये ४ मुख्य कामे हाती घेणे आवश्यक होते. रस्ते तयार करणे, पाणीपुरवठा, आरोग्यविषयक सुविधा देणे व पर्यावरणाचा संतुलन राखणे इत्यादी कामे केली पाहिजेत. यापैकी ३ कामांवर रक्कम खर्च करण्यात आली. मात्र चौथ्या कामावर रक्कम खर्च केली गेली नाही. याचे कारण काय आहे, हे शोधण्याचा मी प्रयत्न केला. त्यावेळी मला असे दिसून आले की, लोकप्रतिनिधीकडून कामे सुचवली जातात. रस्त्याच्या कामांचे अंदाजपत्रक तयार करीत असताना, एखाद्या इंजिनिअरला सांगितले तर तो लगेच कामाचे एस्टिमेट काढून देतो. मात्र पर्यावरणाचे काम हाती घ्यावयाचे असेल, झाडे लावायची असतील तर त्याकरिता एस्टीमेट तयार करण्यासाठी कोणाकडे जावे, हेच कोणाला माहीत नाही. ५ लाख, १० लाख झाडे लावण्याचा प्लान तयार करण्यासाठी किती निधी लागेल हे कोणाला माहीत नाही. सामाजिक वनीकरण विभागाने मोठ्या झाडांच्या एस्टिमेटना मंजुरी दिली. दिनांक ९ डिसेंबर २०१० रोजी त्यांनी परिपत्रक काढले की, २६५ रुपये, २३५ रुपये अशा पद्धतीने जी मोठी मोठी झाडे आहेत, त्यांच्या दराला मंजुरी दिलेली आहे. याचा एक टाईपप्लान करून, प्रत्येक ग्रामपंचायतीला तो इम्प्लिमेंट केला तर, खनिज विकास निधीतून पर्यावरण संतुलन करण्याचे जे काम मागच्या १० वर्षांत होऊ शकले नाही, ते काम करता येईल. विशेषत: जी गावे खनिकर्माने बाधित आहेत, जेथील पर्यावरण जास्त बिघडलेले आहे, तेथील काम करता येतील.

**[ ॲड. आशिष जयस्वाल ]**

अध्यक्ष महाराज, पंतप्रधान ग्रामसडक योजनेबाबत मला असे सांगावयाचे आहे की, गावाचे एस्टिमेट करताना गावाच्या शेवटच्या टोकापर्यंत केले गेले पाहिजे. त्याच एस्टिमेटमधून गावाच्या आतील लांबी जर डांबरीकरणाची न घेता, सिमेंटची घेतली तर गावाची तेवढी लांबी कव्हर होईल आणि केंद्र सरकारच्या पैशाच्या माध्यमातून आपल्याला दीर्घकाळपर्यंत तो रस्ता टिकवता येईल.

दुसरी महत्त्वाची विनंती अशी आहे, की २५ / १५ हेड राज्य सरकारचे केलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी त्यासाठी ६५ कोटी रुपये वितरित केलेले आहेत. त्यांच्याकडे लोकनिधींकडून किमान २ हजार कोटी रुपयांच्यावर प्रस्ताव प्राप्त झाले असतील. दिनांक १८ सप्टेंबर रोजी मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधेसाठी अनुदान आणि दहन व दफन भूमी याबाबत दोन शासन निर्णय काढले. मी त्या कालखंडात त्यांना विनंती केली होती की, D.P.C. मध्ये गावांतर्गत रस्त्यांच्या योजनेची तरतूद करा. तसे जर आपण केले असते, तर इतका लोड वाढला नसता. लोकप्रतिनिधींनी एक कोटी रुपये मागितले असता, कोणाला १० लाख तर कोणाला २० लाख रुपयांचा प्रसाद दिला गेला. त्यामुळे आपल्या तसेच विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य नाराज झाले.

माझी विनंती आहे की, आपण D.P.C. मध्ये जरी तरतूद केली तर जिल्हा नियोजन समितीमध्ये आपण निधी फार वाढवून दिला आहे. त्यामुळे त्या त्या जिल्ह्यामध्ये तेथील लोकप्रतिनिधींच्या मागण्यानुसार त्यांना व जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांनाही संतुष्ट करता येईल. त्यादृष्टीने आपण विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, गावांमध्ये अनेक गोष्टींची आवश्यकता आहे. आज कोणत्याही तालुक्यामध्ये फायर बिग्रेड विभाग नाही, मच्छर दूर करण्याकरिता फॉगिंग मशिन नाही, गावागावांमध्ये व्यकुमएम्पीअर मशिन नाही. आज शौचालये बांधण्यास सांगितली जातात, परंतु, ती स्वच्छ कशी करावयाची, हा मोठा प्रश्न आहे याबाबतही विचार केला पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, नगर विकास विभागाच्या माध्यमातून आपण रोड ग्रांट देतो. परंतु, ज्या मोठमोठ्या ग्रामपंचायती आहेत, तेथे नागरी सुविधा देणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. आज आमदार विकास निधीतून छोट्या छोट्या गावांना पैसे दिले जातात. परंतु, मोठ्या मोठ्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीमध्ये या सर्व गावांमध्ये सरकारची कोणतीच योजना नाही. मी आपल्याला अशी विनंती केली होती की, १० हजारपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावाला २५/१५ चा पैसा देणार नाही, अशी अट टाकली पाहिजे. किमान अशी अट आपण टाकली, तर मोठ्या ग्रामपंचायतींना आपल्याला नागरी सुविधा देता येतील.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे बोलण्यासारखे असंख्य विषय आहेत. परंतु, त्या सर्वांवर येथे बोलणे शक्य होणार नाही. परंतु, एक विनंती आहे की, नैसर्गिक आपत्तीमध्ये इंदिरा आवास योजनेचा लाभ लोकांना दिला जात नाही. त्यासाठी केंद्र सरकारकडे आपल्याला प्रस्ताव पाठवावा लागतो. मी माननीय मंत्र्यांना एक पत्र दिले होते, त्यांना कदाचित आठवत नसेल, राज्य सरकारने प्रत्येक कलेक्टरकडे २०-२५ घरकुलांसाठी निधी ठेवावा. एखाद्या जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये एखाद्याचे संपूर्ण घर नष्ट झाले तर, त्याला प्रती

**[ ॲड. आशिष जयस्वाल ]**

व्यक्तीप्रमाणे हजार रुपये अशी मदत केली जाते. त्याला जर घर बांधून द्यावयाचे असेल, तर त्याचे नाव बीपीएलमध्ये नाही म्हणून त्याला घर बांधून देता येत नाही. त्याबाबत केंद्र सरकारकडे केव्हा प्रस्ताव पाठवणार व केव्हा तो मंजूर होणार, अशी परिस्थिती आहे. यासाठी एखाद्या जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे जर घरांचे संपूर्ण नुकसान झाले असेल किंवा एखाद्या ठिकाणी रस्त्यावर घर असेल किंवा काही पुनर्वसन करावयाचे असेल, तर अशा किमान २०-२५ घरांना मदत देण्याचे अधिकार प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना दिले, तर ते निश्चितपणे उपुयक्त होईल, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देणार आहे. कुणालाही थांबवणार नाही. परंतु, प्रत्येक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी १५-१५ मिनिटे इतका वेळ घेत आहेत. सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा पाळून कृपया मला सहकार्य केले पाहिजे.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महाराज, एखाद्या ग्रामपंचायतीच्या सरपंचाची त्यांच्या गावाचा डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्याची खूप इच्छा असेल, तर त्यांनी त्याबाबत कोणाशी संपर्क करावा याचे त्यांना मार्गदर्शन मिळाले पाहिजे. हे प्रबोधन आपण कोणाकडे केले आहे. डेव्हलपमेंट प्लॅन करण्यासाठी जिल्ह्यामध्ये कोणती यंत्रणा आहे. आपल्या मागणीसाठी लोकप्रतिनिधी जिल्ह्यामध्ये फिरत असतो. पण डेव्हलपमेंट प्लॅन होत नाही.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी भाषणाचा शेवट करावा. आपण १७ मिनिटे बोलत आहात.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महाराज, अजून मला महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलावयाचे आहे. महानगरपालिकेला लागून ज्या ग्रामपचांयती आहेत, त्या ग्रामपंचायतींमध्ये महानगरपालिकेचा कचरा आजूबाजूला पसरलेला असतो.

**उपाध्यक्ष** : श्रीमती यशोमती ठाकूर यांना मी आता बोलण्यास अनुमती देत आहे.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महाराज, माझ्या पक्षाच्या प्रतोदांशिवाय मला कोणीही थांबवू शकत नाही. आपण सातत्याने माझा आवाज दाबत असल्याने, मी यांनतर भाषण करणार नाही.

**उपाध्यक्ष** : मी आपल्याला १७ मिनिटे भाषण करण्यासाठी दिलेली आहेत.

**ॲड. आशिष जयस्वाल** : किती वेळ भाषण करायचे, हे आमचा पक्ष ठरविणार.

**उपाध्यक्ष** : मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांना मी पुरेसा वेळ दिलेला आहे. मी आपल्याला १७ मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांना किती वेळ दिला आहे ?.

**उपाध्यक्ष** : मी श्री. विवेक पंडित यांना दहा मिनिटांचा वेळ दिलेला होता.

**ॲड. आशिष जयस्वाल** : आपण सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांना दहा मिनिटांपेक्षा जास्त वेळ दिला ...

**उपाध्यक्ष** : मी आपल्या पक्षातील इतर सन्माननीय सदस्यांची नावे कमी करू काय ? आपल्या पक्षातर्फे १६ सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आली आहेत.

**ॲड. आशिष जयस्वाल** : त्यापैकी कोणीही सन्माननीय सदस्य येथे उपस्थित नाहीत. ते घरी गेले आहेत.

**उपाध्यक्ष** : आपण असे कसे म्हणता ? असे असेल, तर मी सर्वांची नावे रद्द करतो.

**श्री. बबनराव घोलप** : अध्यक्ष महाराज, आपण सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्यासाठी वेळ द्यावा.

**उपाध्यक्ष** : श्री. बबनराव घोलपसाहेब, मी त्यांना वेळ द्यायला तयार आहे. पण त्यांनी आपल्या भाषणाचा दोन मिनिटांमध्ये शेवट केला पाहिजे.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महाराज, आपण माझ्यावर सातत्याने अन्याय करीत आहात.

**उपाध्यक्ष** : श्री.आशिषजी माझे आपल्याशी काही पूर्ववैमनस्य नाही.

**ॲड. आशिष जयस्वाल** : पण मला तसे वाटू लागले आहे.

**उपाध्यक्ष** : १७ मिनिटे मी आपल्याला बोलण्यासाठी दिली आहेत.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महाराज, यशवंत ग्राम समृद्धी योजनेमध्ये १० टक्के लोकवर्गणीची अट आहे, ती आपण वाढवत आहात असे मला वाटते.

**उपाध्यक्ष** : आता सन्माननीय सदस्या श्रीमती यशोमती ठाकूर यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी. सगळ्यांना बोलण्यासाठी संधी मिळावी या मताचा मी आहे. आपण संध्याकाळी ४.५३ वाजता आपल्या भाषणास सुरुवात केली. आता ५.१२ वाजले आहेत. म्हणजे आपल्याला १६ ते १७ मिनिटे मिळाली आहेत.

**श्रीमती यशोमती ठाकूर** : अध्यक्ष महोदय, महसूल, वन, ग्रामविकास विभागांच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

मी एकमेव महिला या विषयावर बोलणार असल्यामुळे, कृपाकरून शांतपणाने माझे विचार ऐकून घ्यावे. मी लांबलचक भाषण करणार नाही. मी मुद्देसूद बोलणार आहे. सभागृहात बसल्यानंतर विदर्भ आणि बॅकलॉग सिनॉनिमस आहे काय असे वाटायला लागले आहे. विदर्भाच्या बॅकलॉगवर आपण सभागृहात नेहमी चर्चा करतो. पण त्यासंबंधात काही अंमलबजावणी होत नाही. पाटबंधारेचा बॅकलॉग जशाच्यातसा राहतो. इंडस्ट्रीजचा बॅकलॉग देखील तसाच राहतो. आता नवीन बॅकलॉग समोर येत आहे. याचा उल्लेख आमचे सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. विदर्भामध्ये अधिकाऱ्यांचा बॅकलॉग खूप मोठ्या प्रमाणावर आहे. यासंबंधी आम्ही मंत्री व अधिकारी यांच्याकडे विचारणा करतो तेव्हा आम्हाला उत्तर मिळते की, विदर्भामध्ये जायला अधिकारी तयार नाहीत. असे का ? तयार नाही म्हणून पाठवायचे नाही, हे बरोबर नाही. ३० टक्क्यांच्यावर अधिकाऱ्यांची पदे रिक्त ठेवायची हे बरोबर नाही. अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे विदर्भाचा विकास मागे रहात आहे. त्यामुळे अनुशेष आहे तसाच रहात आहे. येथे भूसंपादनाचा मुद्दा काढला होता. अधिकारी नसल्यामुळे विदर्भामध्ये भूसंपादन होत नाही. नॅशनल हायवेचे मोठे काम सुरू आहे. मोठ मोठे प्रकल्प होत आहेत. रेल्वेची कामे विदर्भामध्ये सुरू आहेत. अधिकारी नसतील तर कामे कशी होतील ? अधिकारी नसल्यामुळे वर्षानुवर्षे कामे रेंगाळत पडलेली आहेत.

[ श्रीमती यशोमती ठाकूर ]

अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी सांगू इच्छिते की, माझ्या मतदारसंघातील वीरगवन गावात स्मशान-भूमीसाठी मी गेली एक वर्षे प्रयत्न करीत आहे. परंतु मला अजूनही त्याबाबत अधिकाऱ्यांकडून काहीही सहकार्य मिळालेले नाही. ही खरोखर दुर्दैवाची बाब आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या गोष्टीकडे लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, विदर्भामध्ये लवकरात लवकर चांगले व अनुभवी अधिकारी पाठविले पाहिजेत. आमच्या भागात जे अधिकारी पाठविले जातात ते नवखे असतात, त्यांना योजनांची काहीच माहिती नसते. चांगले आणि अनुभवी अधिकारी फक्त पश्चिम महाराष्ट्रात न पाठविता विदर्भात देखील पाठविले पाहिजेत. माझ्या भागात जो बी.डी.ओ. व तहसीलदार अधिकारी पाठविला होता, त्यांना कोणत्याच योजनांची माहिती नव्हती. त्यांना काहीही समजत नव्हते. उलट मलाच त्यांना काही गोष्टी सांगाव्या लागल्या. ते देखील नवीन आणि मी देखील नवीन आहे. तेव्हा आमच्या विभागात अनुभवी अधिकारी पाठवावेत, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, विदर्भात अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे त्या पदांचा कार्यभार दुसऱ्या अधिकाऱ्यांवर सोपवावा लागतो. त्यामुळे त्यांना कामाकडे नीट लक्ष देता येत नाही. त्यांच्यावर कामाचा मोठा ताण पडतो. एकेका तलाठ्याकडे किंवा ग्रामसेवकाकडे तीन-चार गावांचा कार्यभार असतो. आपला भारत हा कृषीप्रधान देश आहे. संपूर्ण भारत हा ग्रामीण भागात वसलेला आहे. त्यामुळे तेथील तलाठी अधिकारी खूप महत्त्वाचा आहे. आपण प्रत्येक गावासाठी एक तलाठी दिला पाहिजे, अशी आमची कित्येक वर्षांपासूनची मागणी आहे. परंतु ती अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही. तेव्हा या संदभातील स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, आपण मोठ्या प्रमाणावर महसूल गोळा करतो. माझ्या माहितीप्रमाणे यावर्षी आपण ३,२९५ कोटी रुपये महसुलापोटी जमा केलेले आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर महसूल जमा केल्यानंतर सुद्धा जिल्हाधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय, तलाठी कार्यालय इत्यादी कार्यालयांमध्ये विजेची देयके भरण्यासाठी सुद्धा पैसे नसतात. कार्यालयात वीज नसेल, तर संगणक कसे सुरू होतील ? वीज नसल्यामुळे तेथील झेरॉक्स मशीन्स बंद असतात. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे. वास्तविक प्लॅन बजेट आहे. परंतु नॉन-प्लॅन बजेटसाठी काही योजना महसूल विभागाने करण्याची गरज आहे. रोजगार हमी योजना कार्यालयात वीज नसेल, तर मग कशाचा रोजगार आणि कशाची हमी असा प्रश्न उभा राहतो.

अध्यक्ष महाराज, आपण महसूल विभाग म्हटला की, आपल्या डोळ्यासमोर भरपूर फाईल्स, भरपूर कागदपत्रे असे चित्र उभे राहते. आपण आता हाय-टेक टेक्नॉलॉजीचा वापर केला पाहिजे. तेव्हा जिल्हाधिकारी, तलाठी कार्यालये, बी.डी.ओ. कार्यालये, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ही सर्व कार्यालये हाय-टेक टेक्नॉलॉजीने जोडली गेली पाहिजेत. आपल्यातील अनेक सन्माननीय सदस्य ब्लॅकबेरी मोबाईल वापरतात. तहसीलदारांना, बी.डी.ओ. यांना ब्लॅकबेरी मोबाईल वापरण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यांच्या ब्लॅकबेरी मोबाईलवर आपण आपले ई-मेल्स पाठविले पाहिजेत. आज संपूर्ण जगात हाय-टेक टेक्नॉलॉजीचा प्रसार सुरू आहे. तेव्हा आपण देखील ग्रामीण भागातील कार्यालयांमध्ये हाय-टेक टेक्नॉलॉजीचा वापर करण्यासंदर्भात विचार केला पाहिजे.

[ श्रीमती यशोमती ठाकूर ]

अध्यक्ष महाराज, ई-सेतू केंद्रांबाबत खूप चर्चा झाली. काही ठिकाणी ई-सेतू केंद्रांची अंमलबजावणी झाली. परंतु ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे होती, ती त्याप्रमाणे झाली नाही. अनेक जिल्हाधिकाऱ्यांना ई-सेतू केंद्र काय आहे याची माहिती नव्हती, ही दुर्दैवी बाब आहे. ई-सेतू केंद्रांमार्फत ग्रामीण भागातील लोकांना जी कागदपत्रे लागतात, ती मिळू शकतील. परंतु ई-सेतू केंद्रांकडे दुर्लक्ष केले जात आहे. तेव्हा या बाबीकडे मंत्री महोदयांनी लक्ष केंद्रित करावे.

अध्यक्ष महाराज, महसूल आणि वाळू यांचे एक मोठे साटेलोटे असते. ज्या गावातून वाळूचा उपसा केला जातो त्या गावांकडे आपण सातत्याने दुर्लक्ष करीत आहोत. या ठिकाणी पर्यावरण मंत्री उपस्थित आहेत. मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा होत असल्यामुळे त्याचा पर्यावरणावर देखील परिणाम होत आहे. माननीय ग्रामविकास मंत्री सभागृहात आहेत. मी सांगू इच्छिते की, माननीय महसूल मंत्री, माननीय ग्रामविकास मंत्री व माननीय पर्यावरण मंत्री यांनी संयुक्तपणे एखादी योजना तयार केली पाहिजे. नद्यांतून वाळू काढली जात आहे, परिणामी पर्यावरण डॅमेज होत आहे. तेथे निदान सौंदर्यीकरणाचे काम केले पाहिजे. पूर आला तर प्रोटेक्शनसाठी काहीतरी नियोजन केले पाहिजे. परंतु, आपण या गोष्टीकडे दुर्लक्ष करता, असे मला माननीय मत्र्यांना सांगायचे आहे.

अध्यक्ष महोदय, लग्नाची नोंद म्हटली की पुन्हा अधिकाऱ्यांचा मुद्दा येतो. विभागात लग्नाच्या नोंदणीसाठी अधिकारी नसतात. मग नोंदणी कशी व्हायची ? ग्रामीण भागातील लोकांना लग्नाचे सर्टिफिकेट कसे मिळायचे ? अध्यक्ष महोदय, अजून एक महत्त्वाचा विषय आहे आणि तो म्हणजे तालुक्यांची पुनर्रचना. तालुक्यांचे फॉर्मेशन होऊन भरपूर वर्षे झाली आहेत. ग्रामपंचायतीतील बरीच मंडळी शहरांकडे वळली आहे. तालुके झाले त्यावेळी महसूल विभागाचा अभ्यास थोडासा कमी होता, असे मला वाटते. तालुक्यांच्या फॉर्मेशनमध्ये जीओपॉलिटिक सिच्युएशनचा अजिबात अभ्यास केलेला नाही. कोणता तालुका आहे, त्याचे नाव कोणते आहे, त्याचे फॉर्मेशन कसे करायचे, आकार कोणता ठेवायचा, यामध्ये काहीच समानता नव्हती आणि नाही. नाव एक आणि तालुका एक अशी स्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात भातकुली तालुका आहे, त्याचे रिफॉर्मेशन फार जरुरी आहे, रिकॉन्स्टिट्यूशन जरुरी आहे. मी माननीय महसूल मंत्र्यांना विनंती करते की, भातकुली तालुका वगळून वलगा तालुका करावा. आपण असे केले तर ग्रामीण भागांतील लोकांची सोय होईल. अध्यक्ष महोदय, हा खूप मोठा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, मागील वर्षी विदर्भामध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या, त्यावेळी उमेदवारांकडून फॉर्म भरून घेण्यापूर्वी जातीचे व्हॅलिडिटी सर्टिफिकेट मागितले. खूप मोठा घोळ झाला. बऱ्याच लोकांना जातीचे व्हॅलिडिटी सर्टिफिकेट मिळाले नाही. माननीय मंत्र्यांकडून याचे सुद्धा काहीतरी नियोजन झाले पाहिजे. विदर्भावर सातत्याने अन्याय होत आहे. ग्रामपंचायत निवडणुकांच्या वेळी व्हॅलिडिटीचा विषय निघाला. अध्यक्ष महोदय, पश्चिम महाराष्ट्रात ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या, त्यावेळी ती अट शिथिल करण्यात येऊन निवडणुका घेण्यात आल्या. अध्यक्ष महोदय, असे होता कामा नये. विदर्भावर सातत्याने प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत अन्याय होत आहे, याकडे मी माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधते.

[ श्रीमती यशोमती ठाकूर ]

अध्यक्ष महोदय, बऱ्याच जागांवर एसटीचे रिझर्व्हेशन दिले जाते. जनगणना चुकीची झाल्यामुळे आपण रिझर्व्हेशन देता. बऱ्याच ग्रामपंचायतींमध्ये असे प्रकार झाले आहेत. माझ्या मतदारसंघात जवळजवळ २० ग्रामपंचायती अशा आहेत की, तेथे एसटीचे रिझर्व्हेशन आहे. परंतु, एसटीचा एकही माणूस सापडत नाही. जनगणनेमध्ये एसटीची मंडळी राहतात असे दाखविण्यात आले म्हणून तेथे रिझर्व्हेशन दिले आहे. अध्यक्ष महोदय, सरपंच, उपसरपंचांवर काम भागवावे लागते. लोकशाहीमध्ये कोणत्याही प्रकारे न्याय दिला जात नाही. त्यामुळे मी माननीय महसूल मंत्र्यांना विनंती करते की, आताची जनगणना व्यवस्थित झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय ग्रामविकास मंत्र्याना सांगू इच्छिते की, संपूर्ण हिंदुस्थान ग्रामीण भागात राहतो. ग्रामविकासामध्ये पांदण रस्ता हा फार महत्त्वाचा भाग आहे. आपण पांदण रस्त्यांसाठी काहीतरी उपाययोजना केली पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद !

**श्री. अबु आझमी** : अध्यक्ष महोदय, मी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मैं महसूल और पर्यावरण विभाग पर अपने विचार व्यक्त करना चाहता हूं. ऑफिसर और कर्मचारियों में बहुत सारी शिकायतें है. हमने देखा कि वह शिकायत जायज है. डेप्युटी कलेक्टर, तहसीलदार, नायब तहसीलदार इनका जो कॅडर मॅनेजमेंट है, वह ठीक नहीं चल रहा है. इनको टाईम बाऊण्ड प्रमोशन नहीं मिल रहा है. कई सालों से वे एक ही पद पर काम कर रहे है. इसके कारण उनके अंदर एक मायुसी निर्माण हो रही है, निराशा निर्माण हो रही है. कलेक्टर और तहसीलदार को रेकगनाईज्ड किया गया है. वे शासन के प्रमुख है. लेकिन हकिकत यह है कि सारे लोगों को तहसीलदार से ज्यादा पगार मिल रहा है. उनकी अॅथॉरिटी को लोग मान नहीं रहे है. उनका और कर्मचारियों का आपस में, सही तरीके से को-ऑर्डीनेशन नहीं हो रहा है. वहां पर को-ऑर्डीनेशन का अभाव है. इसलिए जरूरी है कि समय पर इनका प्रमोशन किया जाना चाहिए. इनकी गरिमा को बढ़ाया जाना चाहिए.

कलेक्टर के पास शहर को छोड़कर रिजनल प्लान नहीं है. ग्राम पंचायतों के इलाकों में जो शहरों से लगे हुए है, उनको प्लानिंग अॅथॉरिटी है. जैसे कि शहरों में अनअथॉराईज्ड कन्स्ट्रक्शन को म्युनिसिपालिटी कंट्रोल करती है. शहरों से लगे हुए पंचायतों में टेक्निकल सेल नहीं है. वहां कोई मॅन पॉवर नहीं है. वहां बड़ी तादाद में इल्लीगल कन्स्ट्रक्शन चल रहा है. कलेक्टर के पास और ज्यादा मशीनरी होती तो इल्लीगल कन्स्ट्रक्शन को रोक करके उस पर फाईन लगाया जाता, उसको रोका जाता. सरकार कलेक्टर के नेतृत्व में टेक्निकल सेल पर यदि खर्च करती है तो उससे सरकार को दो फायदे होते. सरकार को उससे दस गुना ज्यादा आमदनी होगी और इल्लीगल कन्स्ट्रक्शन पर काबू पाया जा सकता है. फाईन लगाकर इल्लीगल कन्स्ट्रक्शन को लीगल किया जा सकता है.

अध्यक्ष महोदय, तलाठी का ऑफिस या सर्कल ऑफिस जनता के लिए बहुत ही आवश्यक है. इसके लिए एक मुहिम चलाकर, ज्यादा से ज्यादा ऑफिस शुरु होने चाहिए. सारे अॅडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिस एक जगह पर होने चाहिए. यह काम जिलों में तो हो रहा है. लेकिन तहसील इलाकों में यह काम बिल्कुल नहीं

**[ श्री. अबु आझमी ]**

हो रहा है. एक कोने में पुलिस स्टेशन है, दूसरे कोने में पंचायत का ऑफिस है, तीसरे कोने में पंचायत समिति का ऑफिस है तो चौथे कोने में तहसील का ऑफिस है. इस कारण से गांव से आने वाले किसानों को, गरीब लोगों को बहुत ज्यादा तकलीफें हो रही है. मेरी सरकार से मांग है कि तमाम ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसेस को एक ही जगह पर लाया जाए ताकि लोगों को सुविधा हो सके.

लॅण्ड एक्वीजिशन का जो मामला है, प्रॉपर प्रोजेक्ट के लिए आम तौर से जितनी जमीन की जरूरत है, उससे ज्यादा जमीन एक्वायर की जा रही है. मिसाल के तौर पर, इरिगेशन प्रोजेक्टर के लिए २०० एकड़ जमीन की जरूरत है, परंतु ४०० एकड़ जमीन एक्वायर की जा रही है. अब इसमें जो २०० एकड़ जमीन बचती है, उस पर भ्रष्टाचार और लूटमार शुरु हो जाती है. जो २०० एकड़ जमीन बची हुई है, या तो उस २०० एकड़ जमीन को वापस कर दिया जाए, नहीं तो फिर एक्वायर की गई, जो जमीन बची है, उसके ऊपर पेड़ लगाए जाए ताकि फॉरेस्ट को बढ़ावा मिल सके. फॉरेस्ट दिनों दिन कम होते जा रहा है. न्युक्लिअर पॉवर प्रोजेक्ट, इरिगेशन प्रोजेक्ट एसईझेड के कारण फॉरेस्ट की बहुत कमी हो रही है. इस तरह बहुत ज्यादा ध्यान देने की आवश्यकता है.

ट्राईबल को फॉरेस्ट में खेती करने का अधिकार दे दिया गया है. ट्राईबल के लोग खेती करने जा रहे है. फॉरेस्ट के अधिकारी उनको पहले वहां से हटा देते थे, अब हटा नहीं सकते. लेकिन अब उनको खेती का हक मिल गया है. फॉरेस्ट में खेती ठीक ढंग से नहीं होती है. वहां अच्छी पैदावार नहीं होती है. वहां पर पशू, जानवर, पक्षी खेती को खराब कर देते है. खेती करने का जो कानूनी हक दिया गया है, उससे कोई फायदा होते नज़र नहीं आता है. वहां खेती नहीं होती है. होना तो यह चाहिए कि वन विभाग के बीच में जिन लोगों की जमीन है, उन तमाम चीजों का सर्वे कर के, उनको गांव के पास जमीन दी जानी चाहिए ताकि वे अच्छी तरह से खेती कर सके. बहुत सारे लोगों की खेती की जमीन, शेतसारा या टॅक्स न भरने के कारण उस जमीन पर सरकार का नाम ७/१२ पर लग गया है. यदि किसान की मौत हो गई और उसके सभी बच्चे जो उसके वारिस है, वह मायनर है तो उसकी जमीन बिना नोटिस दिए सरकार ने वह जमीन अपने नाम कर ली है. पिछले ५० सालों से इनका कब्जा है. वे खेती करते है. लेकिन मालिक की जगह पर सरकार का नाम लिख दिया गया है. जब वे लोग अपना नाम चढ़ाने के लिए जाते है तो उनसे कहा जाता है कि बकाया टॅक्स जमा कर दो. टॅक्स भरने के बाद यह जवाब दिया जाता है कि तीन साल के अंदर यदि आपने मांग की होती तो जरूर तुम्हारी बात सुन ली जाती. इस तरह से किसान अपनी जगह पर खेती तो करता है लेकिन उसका मालिकाना वहां से खत्म हो चुका है.

अध्यक्ष महोदय, जब वे लोग पैसा भरने के लिए तैयार है, बच्चे मायनर थे, उनको मालूम नहीं था तो मेरी मांग है कि कानून में अमेंडमेंट किया जाना चाहिए. मालिक का कब्जा साबित होता है तो बकाया टॅक्स वसूल होने के बाद, उसकी खेती की जमीन उसको वापस दी जानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं आपका ध्यान पोलूशन विभाग की ओर दिलाना चाहता हूं. मुंबई शहर में मानखुर्द-शिवाजीनगर जो इलाका है, यह पूरा इलाका बहुत ज्यादा गंदा है. सारे मुंबई का कचरा, मुंबई को साफ कर के, वह कचरा मानखुर्द-शिवाजीनगर में ले जाकर डाल दिया गया है. इस कारण से पूरा एरिया प्रदुषण से भरा हुआ है. सारी दुनिया की बीमारी उस एरिया में है. गटर भरे हुए है. आप वहां पर खड़े

**[ श्री. अबु आझमी ]**

नहीं हो सकते. मुंबई से वहां पर कचरा आ रहा है तो उस तरफ कोई ध्यान नहीं दे रहा है.

मैं पर्यावरण मंत्री जी से निवेदन करुंगा कि वे खुद वहां पर चले. एक बार वहां का दौरा करे और देखें कि वहां हालत क्या है ? पोलूशन कंट्रोल बोर्ड का गठन २००४ से आज तक नहीं हुआ. सात साल हो गए है. पोलूशन कंट्रोल बोर्ड के चेअरमन की पोस्ट भरी नहीं गई. अब तक वह पोस्ट एन्वायरनमेंट विभाग के सचिव, इसके चेअरमन हो गए. उनके पास यह सब देखने के लिए समय नहीं है. वे उस विभाग के सचिव और बोर्ड का चेअरमन, ये दोनों पद का काम वे देख नहीं सकते इसलिए सारा काम ठप्प हो गया है. कुछ काम नहीं हो पा रहा है. हाईकोर्ट ने महाराष्ट्र सरकार से कहा था कि बोर्ड के टेक्निकल मेंबर की नियुक्ति जल्द से जल्द करो. तीन महीने का समय दिया गया. लेकिन आज तक मेंबर की नियुक्ति नहीं हुई. ३१ मार्च तक इस पद को भरना था, यह कोर्ट की अवमानना है. मेरा कहना है कि जल्द से जल्द बोर्ड का गठन होना चाहिए.

पोलूशन की बहुत बड़ी समस्या है. मानखुर्द-शिवाजीनगर में बहुत गंदा पानी आ रहा है. इस बारे में हम लोग कई बार बोल चुके है. लेकिन इस बात की ओर कोई ध्यान हीं नहीं देते है. इससे बहुत ज्यादा प्रॉब्लम हो रही है. वहां अस्पताल तो है ही नहीं. बीमारियाँ बढ़ते रहती है. इस तरह जल्द से जल्द ध्यान दिया जाना चाहिए. आपने मुझे बोलने का अवसर प्रदान किया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

**श्री. विष्णू सावरा** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना आताच भारताच्या लोकसंख्येची आकडेवारी आपण पाहिली आहे. महाराष्ट्राची व ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या वर्तमानपत्रात आल्याचे आपण पाहिले आहे. ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या १ कोटी १० लाख ५४ हजार इतकी झालेली आहे. लोकसंख्येच्या बाबतीत देशातील ठाणे जिल्हा पहिल्या क्रमांकावर आलेला आहे. ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या पाहून अनेकांना अभिमान वाटला असेल. परंतु त्या लोकसंख्येचा अभिमान आम्हाला वाटला नाही. त्याचे कारण असे की, या जिल्ह्याची परिस्थिती सर्वांना माहिती आहे. या जिल्ह्यात सात महानगरपालिका आहेत, पाच नगरपालिका आहेत, १५ तालुके आहेत, ९६० ग्रामपंचायती आहेत. १७४४ गावे आहेत. एवढ्या मोठ्या अवाढव्य जिल्ह्याचे विभाजन व्हावे, अशा प्रकारची मागणी गेल्या २५ वर्षांपासून करण्यात आलेली आहे. माननीय श्री. शरद पवारसाहेब शहापूर येथे आले, त्यावेळी त्यांनी ही मागणी मान्य केली होती. असे असताना या जिल्ह्याचे विभाजन का होत नाही, हे न उलगडणारे कोडे आहे. या जिल्ह्याचे नागरी, सागरी व डोंगरी असे तीन विभाग पडतात. जिल्ह्याचे विभाजन होत नसल्यामुळे सर्वात जास्त फटका ग्रामीण भागातील जनतेला बसत आहे. त्या भागात विकास होत नाही, विकासापासून हे लोक वंचित राहिले आहेत. आज सुद्धा हजारो कुटुंबांना ८-९ महिने पोट भरण्यासाठी बाहेरगावी जावे लागते. ते लोक त्याला जगायला जातो, असे म्हणतात. कारण त्यांना त्या ठिकाणी राहून रोजगार मिळत नाही. त्यांच्या हाताला काम मिळत नाही. त्यामुळे जगायला गेल्याशिवाय त्यांना दुसरा पर्याय राहत नाही. या तिन्ही विभागाचे प्रश्न सोडविण्यासाठी एक जिल्हाधिकारी, एक सीईओ, एक एसपी या संपूर्ण जिल्ह्याला न्याय देऊ शकत नाहीत, अशी परिस्थिती

[ श्री. विष्णू सावरा ]

आहे. म्हणून ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले पाहिजे आणि ही मागणी अनेक वर्षांपासूनची आहे. यासाठी आंदोलने झाली, उपोषणे सुद्धा झाली. सन्माननीय सदस्य श्री. चिंतामण वनगा ज्यावेळी खासदार होते त्यावेळी त्यांनी उपोषण केले होते. ठाणे जिल्ह्यातील लोकांना रोजगारासाठी बाहेरगावी जावे लागते. ठाणे जिल्ह्यातील आरोग्याची परिस्थिती सुद्धा चांगली राहिलेली नाही. खेड्यामध्ये डॉक्टर नाहीत. अनेक खेड्यांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र नाहीत आणि जेथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत तेथे डॉक्टर नाहीत, औषधे नाहीत, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याची सुद्धा टंचाई आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये भातसा, तानसा, वैतरणा आणि सूर्या असे मोठे प्रकल्प आहेत. आमच्या डोळ्यांना पाणी दिसते. परंतु ठाणे जिल्ह्यातील लोकांना पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी मिळत नाही. त्या प्रकल्पातील पाणी मुंबई किंवा इतर शहरांसाठी पुरविले जाते.

अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्ह्यातील दळणवळणाची सुद्धा तीच परस्थिती आहे. खेड्यामध्ये रस्ते नाहीत. गावामध्ये रस्ते आहेत, तर पाड्यांवर जाण्यासाठी रस्ते नाहीत. विजेची सुद्धा तीच परिस्थिती आहे. म्हणून ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले पाहिजे. ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या १ कोटी १० लाख इतकी आहे. एवढी लोकसंख्या असताना, ठाणे जिल्ह्याचे विभाजन का होत नाही ? मी माननीय महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आतापर्यंत अनेक महसूल मंत्री होऊन गेले. परंतु आता माननीय श्री. बाळासाहेब थोरातसाहेब, महसूल मंत्री झालेले आहेत. आमची आपल्याकडून अपेक्षा आहे की, ठाणे जिल्ह्याचे विभाजन लवकरात लवकर करावे. हाताला काम नाही, खाण्यास अन्न नाही, पिण्यास पाणी नाही, दळणवळणाची सोय नाही, अशी परिस्थिती आहे आणि या समस्या सोडवावयाच्या असतील, तर त्यावर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे ठाणे जिल्ह्याचे विभाजन लवकर झाले पाहिजे. ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. गणेश नाईकसाहेबांनी सांगितले होते की, ठाणे जिल्ह्याचे त्रिभाजन केले पाहिजे. आमचे असे म्हणणे आहे की, ठाणे जिल्ह्याचे विभाजन करा किंवा त्रिभाजन करा. परंतु ते लवकरात लवकर करून आमच्या ग्रामीण भागाला न्याय द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वनमंत्री डॉ. पतंगराव कदमसाहेब सभागृहामध्ये उपस्थित आहेत. केंद्र शासनाने एक ऐतिहासिक कायदा केलेला आहे. वनाचे पट्टे वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या कसत असलेल्या आदिवासींच्या नावावर करण्यात यावेत. हा अतिशय चांगला कायदा आहे. दिनांक ३१ डिसेंबर २००७ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. परंतु या कायद्याची अंमलबजावणी अतिशय संथ गतीने होत आहे. तीन लोकांची समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. परंतु त्यांच्यामध्ये समन्वय नाही. यामध्ये वन विभागाचा अडथळा आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांना असे वाटते की, आम्ही स्वत:चीच जमीन या आदिवासी लोकांना देत आहोत. तो आदिवासी माणूस वर्षानुवर्षे जमीन कसत आहे, त्याने ती जमीन स्वत:च्या अंगमेहनतीने तयार केलेली आहे. ही अनेक वर्षांपासूनची मागणी होती. ही मागणी पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने कायदा केला आणि राज्य शासनाला त्याची अंमलबजावणी करण्यास सांगितले. उपविभागीय समितीमध्ये ५८ टक्के दावे फेटाळले गेलेले आहेत. जे दावे फेटाळण्यात आलेले आहेत, त्या दाव्यांची फेरतपासणी करण्याची आवश्कता आहे. त्या दाव्यांची फेरतपासणी केली, तर त्या आदिवासी लोकांना न्याय मिळेल. म्हणून शासनाने या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

[ श्री. विष्णू सावरा ]

अध्यक्ष महोदय, माझा भिवंडी ग्रामीण मतदारसंघ आहे. माझ्या मतदारसंघामध्ये गोडाऊनची बांधकामे सुरू झालेली आहेत. हे गोडाऊन्स् जरी खाजगी जमिनीवर होत असले, तरी सुद्धा शासनाची जी गुरे चरणाची जमीन आहे ती जमीन हडप करण्याचे काम ते लोक करीत आहेत. ही जमीन ढापण्याचे काम सर्व लोक करू लागले आहेत. याची चौकशी केली पाहिजे अशी माझी आग्रहाची मागणी आहे. आदिवासींची जमीन बिगर आदिवासीला देता येत नाही. अशा प्रकारचा कायदा आहे. वाडा, वसई, पालघर या तालुक्यांमध्ये आदिवासींच्या जमिनी अत्यल्प किमतीमध्ये विकत घेतल्या जात आहे. या भागात ज्या ज्या लोकांनी आदिवासींच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्यांची सखोल चौकशी केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. शिरीष कोतवाल** ( चांदवड ) : अध्यक्ष महोदय, २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण विभागांच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात १९९७-१९९८ मध्ये चंद्रेश्वर विकास योजना मंजूर झाली होती. सदर योजना राबविण्याकरिता २००६-२००७ मध्ये पैसे मिळाले. परंतु रस्त्यासाठी अनुदान मिळत नाही. रस्त्यासाठी अनुदान मिळाले पाहिजे, अशी आमच्या विभागातील जनतेची मागणी आहे. सदर कामासाठी १ कोटी २५ लाख रुपये लागणार आहेत. ते लवकरात लवकर देण्याची कार्यवाही करावी अशा प्रकारची विनंती मी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांसमोर अनेक आव्हाने आहेत. ग्रामीण भागात तलाठी कार्यालयाची वाईट अवस्था आहे. ग्रामीण भागातील तलाठी कार्यालय म्हणजे हातात पिशवी घेऊन काम करण्यासारखे आहे. त्यांना बसण्यासाठी कोणतीही व्यवस्थित जागा नसते. एक तलाठ्याकडे चार ते पाच गावांचा कारभार असतो. कामानिमित्त दूरध्वनी केला असता तलाठी मी या गावात आहे, त्या गावात आहे असे उत्तर देत असतो. परंतु तो लोकांना ८ ते १० दिवस भेटत नाही, ही खरी वस्तुस्थिती असते. विविध कार्यकारी सोसायट्यांकडून कर्ज घ्यावयाचे असल्यास, खरेदी-विक्रीच्या नोंदी टाकावयाच्या असल्यास तेथेही पैसे लागतात. सर्वसामान्य शेतकऱ्यांनी काय करावे.

अध्यक्ष महोदय, आपण लक्ष घालावे व शेतकऱ्यांची अडचण दूर करावी. तलाठी पैसे घेतल्याशिवाय नोंद घेत नाही. पुढील काम करत नाही, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, गौण खनिजाच्या संदर्भात अमुक इतका दंड शासनाच्या तिजोरीत जमा झाला पाहिजे अशा प्रकारचे टारगेट तहसीलदारांना देण्यात आलेले आहे. यासंदर्भात मी आमच्या विभागातील तहसीलदाराकडे विचारणा केली असता त्याने १ कोटी २५ लाख रुपयांचा दंड वसूल केला पाहिजे अशा प्रकारचे टारगेट आम्हाला शासनाने दिलेले आहे असे सांगितले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाळूच्या गाड्या पकडल्या जातात. त्यांच्याकडून दंड वसूल केला जातो. वाळूचा ठेका घेणारे वेगळे, वाहतूक करणारे ट्रकचालक-मालक यांच्यामध्ये दंडामुळे प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. गोर गरीब ट्रकवाले भरडले जात आहेत. त्यामुळे हे माफिया उदयाला आले, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. याकडे देखील शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

[ श्री. शिरीष कोतवाल ]

अध्यक्ष महोदय, इंदिरा आवास योजनेंतर्गत अनेक घरकुले गोरगरिबांना मंजूर केलेली आहेत. परंतु, इंदिरा आवास योजनेंतर्गत गोरगरिबांना घरे बांधण्यासाठी वाळू मिळत नाही, ही दुर्देवाची गोष्ट आहे. याकडे देखील लक्ष देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वात मोठे वाद हे बांध किंवा शेतात जाणाऱ्या रस्त्यावरुन होत असतात. महसूल विभागाने बांधबंधिस्तीच्या कामाकडे लक्ष दिलेले नाही. जर बांधबंधिस्तांची किंवा शेतात जाणाऱ्या रस्त्यांची व्यवस्था करून दिली तर पोलिसांचा आणि कोर्टाचा निम्मा भार कमी झाल्याशिवाय राहणार नाही. शासनाने या कामासाठी महसूल विभागाला आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. महसूल विभागाकडून ही कामे करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात चांदवड आणि देवळा असे दोन तालुके आहेत. देवळा तालुक्याची निर्मिती १९९७-१९९८ मध्ये झाली होती. अजूनपर्यंत कार्यालयांसाठी स्वतंत्र जागा त्या ठिकाणी नाही. पंचायत समितीमध्ये काम करणारे इंजिनिअर हे बाहेरून येत असतात. अशा प्रकारे पंचायत समितीचा कारभार चालत असतो. संबंधित इंजिनिअर आणि इतर कर्मचारी यांना बसण्यासाठी जागा नाही. याकरिता त्या ठिकाणी पंचायत समितीची इमारत बांधणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, माझा तालुका एका बाजूने पूर्णपणे डोंगरी तालुका आहे. त्या ठिकाणी संपूर्ण सह्याद्रीचा पट्टा आहे. परंतु, माझ्या तालुक्याचा समावेश डोंगरी विकासामध्ये केला जात नाही. चांदवड तालुक्याचा समावेश डोंगरी विकासामध्ये झाला पाहिजे, अशी माझी आग्रहाची मागणी आहे. त्या निधीचा उपयोग विकास कामांसाठी केला पाहिजे, अशी माझी मागणी आहे. निफाड, सिन्नर तालुक्यातील पंचायत समित्यांसाठी शासनाने जशी तरतूद केली आहे त्याप्रमाणेच देवळा तालुक्यासाठी केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, खऱ्या अर्थाने मी माननीय ग्रामविकास मंत्री महोदयांचे अभिनंदन करीन की, त्यांच्या एकंदरीत कामकाजामुळे वाघांची संख्या राज्यात वाढली आहे, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, दुसरीकडे मात्र जंगलात झाड हे औषधीला सुद्धा राहिलेले नाही. एवढे मोठ मोठे डोंगर होते परंतु, तेथे कसल्याही झाडांची लागवड केली नाही. भविष्यात परिस्थिती अशी येईल की, प्राथमिक शाळांमध्ये माननीय शिक्षण मंत्री महोदयांना झाडाचे चित्र लावावे लागेल व सांगावे लागेल की, झाड हे असे असते, अशी स्थिती आज जंगलांची झाली आहे. वन खात्याने आतापर्यंत किती  झाडे लावली, त्यापैकी किती झाडे जगली, किती  झाडे जागेवर उभी आहेत, याचे ऑडिट करण्याची वेळ आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंधारण विभागासंबधी मी काही सूचना करणार आहे. माझ्या मतदारसंघात मागील काळामध्ये चांदवड तालुक्यात मंगरुळ लपा, धोंडबालपा या कामांसाठी जलसंपदा विभागाने पाणी उपलब्धता दाखला दिला. दहा वर्षे झाली आहेत तरी या कामासाठी एका रुपयाची तरतूद केली नाही. चांदवड तालुका हा ऐतिहासिक तालुका आहे. या तालुक्यात भोकर तलावाची निर्मिती झाली. या तलावाच्या अनुषंगाने एखादी योजना करता आली असती. त्या तलावाची अतिशय दुरावस्था झाली आहे. त्या तलावाच्या अश्वपटलासाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. जिल्हा परिषदेची इतकी वाईट अवस्था आहे की, पंचायत समितीच्या कामकाजासाठी निधी मंजूर होत असतो. सुरुवातीला काम सुचवायचे असते. त्यानंतर त्या कामाचा

[ श्री. शिरीष कोतवाल ]

कनिष्ठ अभियंत्याकडून आराखडा तयार करण्यात येतो. त्यानंतर ती नस्ती उप अभियंत्याकडे जाते. मग ती कार्यकारी अभियंता संबंधित खात्याकडे पाठवित असतात. संबंधित खाते कॅफोकडे पाठवितात आणि कॅफो मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ती नस्ती पाठवितात. मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवितात. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडे निधी घेण्यासाठी जावे लागते. अशा प्रकारे ही नस्ती फिरत फिरत जाते. त्यानंतर ती नस्ती पुन्हा परत येते तेव्हा त्या कामाची वर्कऑर्डर मिळते. जिल्हा परिषदेचा वर्षानुवर्षे निधी मिळत नाही म्हणून त्या कामांना चालना मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. या कामामध्ये सुधारणा करण्यासाठी ग्रामविकास मंत्री महोदयांनी प्रयत्न करावेत, अशी माझी मागणी आहे. माननीय जलसंधारण मंत्री महोदयांनी तीन चार एम.आय. साठी पाणी उपलब्धतेचा दाखला दिला आहे, त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी अपेक्षा करतो. वाळूच्या बाबतीत तसेच तलाठ्यांच्या कामकाजाच्या बाबतीत शासन सुधारणा करणार आहे काय, याबाबत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या वेळी खुलासा करावा. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. रमेश वांजळे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. ग्रामपंचायतीमध्ये सध्या अशी परिस्थिती आहे की, चार ते पाच गावे मिळून एक तलाठी काम करीत असतो, परंतु, याऐवजी प्रत्येक गावाला एक स्वतंत्र तलाठी दिला पाहिजे. तसेच प्रत्येक गावाला एक स्वतंत्र ग्रामसेवक देण्याची आवश्यकता आहे. परंतु, सध्या एकेका ग्रामसेवकाकडे तीन-चार ग्रामपंचायती आहेत.

**तालिका सभाध्यक्ष ( ॲड. दिलीप सोपल )** : माझ्याकडे पक्षनिहाय ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत, ती नावे मी वाचून दाखवतो. काँग्रेस पक्षातर्फे सन्माननीय सदस्य सर्वश्री. बाबा सिद्दीकी, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. गोपाळदास अग्रवाल, ओमप्रकाश पोकर्णा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे ॲड. अशोक पवार, सर्वश्री. चंद्रशेखर घुले, पंकज भुजबळ, संजय वाघचौरे, जितेंद्र आव्हाड, दीपक केसरकर, संजय सावकारे, के. पी. पाटील, गणपत गायकवाड. भारतीय जनता पक्षातर्फे श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री. अतुल देशकर, प्रमोद जठार, दादाराव केचे, राजकुमार बडोले, प्रा. राम शिंदे, सर्वश्री. चंद्रशेखर बावनकुळे, सुधाकर भालेराव, गिरीश बापट, जयकुमार रावल. शिवसेना पक्षातर्फे ॲड. आशिष जयस्वाल, सर्वश्री. चंद्रदीप नरके, संजय गावडे, सदानंद चव्हाण, डॉ. सुचीत मिणचेकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. विजय शिवतारे, रवींद्र वायकर, दौलत दरोडा, नरेंद्र भोंडेकर, कॅ. अभिजीत अडसूळ, ओमराजे निंबाळकर, सुभाष देसाई, विवेक पंडित यांची नावे आलेली आहेत.

**प्रा. शरद पाटील** : अध्यक्ष महोदय, माझेही नाव दिलेले आहे.

**श्री. गिरीश बापट** : सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी नाव दिले होते परंतु, ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले होते की, मला आधी बोलू द्यावे.

**तालिका सभाध्यक्ष** : आता सन्माननीय सदस्य श्री. रमेश वांजळे यांनी भाषण सुरू करावे.

मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी शांत बसावे. सन्माननीय सदस्य, श्री. रमेश वांजळे आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे. आपला वेळ संपलेला आहे.

**श्री. रमेश वांजळे** : अध्यक्ष महाराज, प्रत्येक गावाला एक तलाठी दिला पाहिजे, एक ग्रामसेवक दिला पाहिजे. माननीय महसूल मंत्री येथे बसलेले आहेत, आपल्या मार्फत माझी त्यांना विनंती आहे की, तलाठ्यांना इतर कामे दिल्यामुळे महसुलाची कामे तशीच राहतात. भोळीभाबडी माणसे तलाठी कार्यालयात केवळ चकरा मारत राहातात. त्यांची कामे होत नाहीत. त्यामुळे जनगणना व इतर कामांसाठी सक्षम यंत्रणा तयार केली पाहिजे. तसेच, ही सर्व कामे संगणकीकृत झाली पाहिजेत. तलाठ्यांना तालुक्यातील सर्व अंतर्गत माहिती असते व मोठ्या गावांमध्ये राहण्याची त्यांची प्रवृत्ती असते याकरिता तलाठ्यांची बदली तालुक्यांतर्गत न ठेवता ती जिल्ह्यांतर्गत केली पाहिजे.

कोंढणपूर ते कल्याण या रस्त्याबाबत पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत सर्व्हे होऊन ४-५ वर्षे झाली तरीही हा रस्ता होत नाही, या रस्त्याचे काम व्हायला पाहिजे. माझ्या मतदारसंघातील किरकटवाडी ते नांदुशी येथे दगडांच्या खाणी आहेत. तेथे गौण खनिजांमधून काम होईल असे ५-६ वर्षे सांगितले गेले, ते काम अद्याप झालेले नाही ते काम व्हायला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, सरकारचे असे धोरण आहे की, प्रत्येक गावामध्ये सुरुवातीला आत जाताना स्वागत कमान झाली पाहिजे की, ज्याचा प्रत्येक गावाला अभिमान वाटेल. ही स्वागत कमान टाकण्याचे कामही सरकारने केले पाहिजे, अशी मी विनंती करतो. येथे मोठ-मोठे माननीय मंत्री बसले आहेत.

( सभागृहामध्ये काही सन्माननीय सदस्य बोलत असतात. )

**तालिका सभाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सभागृहात शांतता राखावी. आता माननीय मंत्री महोदय प्रा. लक्ष्मणराव ढोबळे काही सांगत आहेत आपण कृपया ते ऐकावे, अशी मी आपणांस विनंती करतो.

**प्रा. लक्ष्मणराव ढोबळे** : अध्यक्ष महाराज, माझा एक हरकतीचा मुद्दा आहे की, सन्माननीय सदस्य अतिशय मोकळ्या मनाचे आहेत, निधड्या, दिलदार छातीचे आहेत. परंतु, सभागृहात येत असताना या सभागृहाचा एक शिरस्ता आहे की, शर्ट ३ गुंड्याचे असो की, ५ गुंड्याचे असो पण शर्टाची बटने लावलेली असावीत, अशा प्रकारचा केशवराव धोंडगे साहेबांच्या काळातील निर्णय आहे. एवढ्या मोकळ्या मनाचा व निधड्या छातीचा एक दिलदार मित्र बोलत असताना, ही मर्दाची छाती गुंड्यांनी झाकलेली असावी, एवढीच माझी हरकत आहे.

**श्री. रमेश वांजळे** : अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री साहित्यिक आहेत, त्यामुळे त्यांचे म्हणणे मानले जाईल. त्यांच्याबद्दल मला तुकाराम महाराजांच्या भाषेतच सांगावे लागेल की,

नलगे चंदना सांगावा परिमळ,
वनस्पती मेळा हाकारुनी
अंतराचे धावे स्वभावी बाहेरी,
धरिताही परि आवरेना,
सूर्य नाही जागे करित या जना,
प्रकाश किरणा करहून,
तुका म्हणे मेघ नाचवी मयुरे
लपविता खरे येत नाही

**तालिका सभाध्यक्ष** : आता याचे निरुपण करा.

**श्री. रमेश वांजळे** : नलगे चंदना सांगावा परिमळ, म्हणजे चंदनाला आपला सुवास सांगावा लागत नाही. कडुनिंबाच्या वखारीत जरी चंदन ठेवले तरी, त्याचा सुगंध लपत नाही आणि ढग आल्यानंतर मोराला नाच असे सांगावे लागत नाही. असे माननीय मंत्र्याचे काम आहे. परंतु, त्यांना माझे शेवटचे एक सांगणे आहे की, समाजाची सेवा करीत असताना, माझ्या सोन्यावर जाऊ नका. सोने हा जरी पवित्र धातू असला व तो दिसायला पिवळा असला तरी, या सोन्यावर जाऊ नका. मी हे घालतो कारण ते माझा ट्रेड मार्क आहे आणि मी त्याचा कायदेशीर करही भरलेला आहे. मी अंगावर सोने घालत असलो तरी सर्वसामान्यांच्या डोक्यावर पाय देत नाही. त्यांच्या पायावर माझे डोके असते. जरी मी सोने घालत असलो, ते दिसायला पिवळे असले तरी ह्या सोन्याला मी जास्त किंमत देत नाही. परंतु, येथे जमलेले सरकारातील मंत्री आणि सर्व आमदार महोदय यांच्या जीवनाचे, यांच्या आयुष्याचे सोने झाले पाहिजे, अशा मताचा मी सामान्य कार्यकर्ता आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. रमेश वांजळे आपण विषय सोडून बोलत आहात.

**श्री. रमेश वांजळे** : आपल्याशिवाय कोणीही संधी देत नाही. आपले काही तरी जुळतय.

**तालिका सभाध्यक्ष** : आता मी तरी किती वेळ सहन करणार ...

**श्री. रमेश वांजळे** : मी जाता जाता श्री. ढोबळे साहेबांना सांगतो. सर्वसामान्यांची सेवा करीत असताना माझ्या सारख्याकडे जास्त लक्ष देऊ नका. जाता जाता तुकाराम महाराजांच्या भाषेत सांगतो

आता तरी पुढे हाचि उपदेश
नका करू नाश आयुष्याचा
सकळांच्या पायी माझे दंडवत
आपलाचे चित्त शुद्ध करा
हित ते करावे देवाचे चिंतन
करूनिया मन एक चित्त
तुका म्हणे लाभ होये तो अपार
करा काय फार शिकवावे.

जय महाराष्ट्र.

**श्री. बाबा सिद्दिकी** : अध्यक्ष महोदय, मैं महसूल विभाग की अनुदान मांगों पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं. अध्यक्ष महोदय, जब श्री. नारायण राणे जी महसूल मंत्री थे तब मैंने इस हाऊस में मुंबई के संबंध में एन.ए. टैक्स का मसला उठाया था. मैं श्री. नारायण राणे जी का आभारी हूं कि, उन्होंने इस मसले को समझा, उन्होंने मुंबई के सिटीजंस ग्रुप के साथ मीटिंग की और इस सदन में घोषणा की. जो एन.ए. टैक्स होता है वह एक ही बार लिया जाता है. चूंकि स्टैम्प ड्यूटी भी ली जाती है और एन.ए. टैक्स भी लिया जाता है तो यह एक ही बार लिया जाना चाहिए और इस बात के लिए मैंने उनसे अनुरोध किया तो उन्होंने इस मसले पर स्थगिति दी. इस बात को आज एक साल हो गया है.

[ श्री. बाबा सिद्दिकी ]

मैं महसूल मंत्री जी से कहना चाहूंगा कि, यह पूरे मुंबई शहर के लोगों की मांग थी कि, एन.ए. टैक्स खत्म किया जाय. इस मामले को एक साल हो गया है परन्तु इस पर अभी तक कोई फैसला नहीं हुआ है. मेरी मंत्री महोदय से मांग है कि, सरकार ने यह जो गैर वाजिब टैक्स लगाया है, उसको रद्द किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, हमें आजाद हुए ६४ साल हो गये हैं. शासन किस तरह से चलता है उसका मैं एक नमूना बताना चाहूंगा. १९७४ में एक एफएसआई स्कैन्डल हुआ था और उसके बाद में यह धोरण बनाया गया था कि, अगर किसी को डेवलपमेंट करना होगा तो पीआरसी कार्ड का वर्ड्स में होना जरूरी है. प्रशासन इस बारे में लोगों को परेशान करता आया है. हमारे इलाके में काफी सीनियर सिटीजंस रहते हैं और काफी लोग बंगलों में रहते हैं और वे लोग अपने बंगले विकासक को नहीं देना चाहते हैं. जब ये लोग पीआरसी कार्ड लेने के लिए जाते हैं तो वह उनको आज भी न्युमेरिकल ऑर्डर में दिया जाता है और उनसे कहा जाता है कि, जब आप विकासक को चुनोगे तब उसके बाद ही यह आपको वर्ड्स में दिया जायेगा. इस तरह से छोटी-छोटी बातों के लिए लोगों को परेशान किया जाता है. बैंक का जो चैक होता है उसमें न्युमेरिकल ऑर्डर में भी लिखा जाता है और वर्ड्स में भी लिखा जाता है तो फिर पीआरसी कार्ड को इस तरह से क्यों नहीं बनाया जाता है. मेरा मंत्री महोदय से अनुरोध है कि पीआरसी कार्ड को भी इसी तरह से बनाया जाय जिससे लोगों को परेशानी न हो.

अध्यक्ष महोदय, एक-डेढ़ साल पहले मुंबई में स्टैम्प ड्यूटी की एमनेस्टी स्कीम आयी थी. उस स्कीम का विज्ञापन ठीक प्रकार से नहीं हुआ था. २५-३० साल पहले लोग स्टैम्प ड्यूटी के बारे में नहीं जानते थे. मैं मंत्री महोदय से अनुरोध करता हूं कि, एक बार फिर स्टैम्प ड्यूटी की एमनेस्टी स्कीम लागू की जाय तो जो लोग इससे वंचित रह गये हैं, उनको इसका फायदा मिल सकेगा और राज्य सरकार के फंड में भी कुछ पैसा आयेगा.

अध्यक्ष महोदय, मैं बताना चाहूंगा कि, नगर विकास विभाग ने एक कानून बनाया है कि, अगर बिल्डर फ्लैट को कारपेट एरिया के हिसाब से नहीं बेचेगा तो उसको जेल की सजा होगी. वहीं दूसरी तरफ स्टैम्प ड्यूटी बिल्ट-अप एरिया पर ली जाती है. ये दोनों डिपार्टमेंट एक ही शासन के हैं. एक डिपार्टमेंट एक गलती के लिए जेल भेजने का कानून बनाता है वहीं दूसरा डिपार्टमेंट कारपेट की जगह पर बिल्ट-अप एरिया पर स्टैम्प ड्यूटी लेता है. मैं चाहूंगा कि, मंत्री महोदय इसका खुलासा करें और इसमें दुरुस्ती करें.

अध्यक्ष महोदय, मैं डीम्ड कन्वेयंस की बात करना चाहूंगा. डीम्ड कन्वेयंस के बारे में मुंबई का हर आदमी चिंतित है. मैंने इस सदन में पिछले बजट अधिवेशन में डीम्ड कन्वेयंस करने की बात उठाई थी. डीम्ड कन्वेयंस का कानून तो पास हो गया है परन्तु मैं बड़े दुर्भाग्य के साथ कहना चाहता हूं कि, आज तक एक भी सोसायटी का डीम्ड कन्वेयंस नहीं हुआ है. हम लोग हाथ पर हाथ धरे हुए बैठे हैं. हमें आज यह सोचने की जरूरत है कि, हमारे कानून में क्या त्रुटि है. कानून तो बन जाता है परन्तु उसका सही प्रकार से इम्प्लीमेंटेशन नहीं होता है. मैं मंत्री महोदय से अनुरोध करता हूं कि, इस कानून का प्रभावी तरीके से इम्प्लीमेंटेशन किया जाय. अध्यक्ष महोदय, डीम्ड कन्वेयंस के बारे में बोलते हुए मैं कहना चाहूंगा कि, जिसने ३० साल पहले फ्लैट खरीदा है और उससे आज के हिसाब से स्टैम्प ड्यूटी भरने के लिए कहा

**[ श्री. बाबा सिद्दिकी ]**

जाय तो यह उचित नहीं होगा. अध्यक्ष महोदय, इस बारे में सरकार को पहल करनी होगी क्योंकि जिस आदमी ने ३० साल पहले जिस बिल्डर या डेवलपर से फ्लैट खरीदा, वह डेवलपर भाग चुका है और सरकार की यह जिम्मेदारी है कि, फ्लैट वालों की जमीन की डीम्ड कन्वेयंस की जायेगी. मेरा कहना है कि, जिस दिन उस बिल्डिंग का या फ्लैट का ऑक्यूपेशन सर्टिफिकेट लिया गया है उस दिन स्टैम्प ड्यूटी का जो रेट था वही लेकर डीम्ड कन्वेयंस की जानी चाहिए और आज की रेट से स्टैम्प ड्यूटी नहीं लगायी जानी चाहिए. जो बिल्डर ऑक्यूपेशन सर्टिफिकेट लेने के बाद भी डीम्ड कन्वेयंस नहीं करते हैं या कानून का उल्लंघन करते हैं तो उनको सरकार द्वारा ब्लैक लिस्ट किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, सरकार को १०-१२ हजार करोड़ रुपये स्टैम्प ड्यूटी के रुप में मिलते हैं. मैं कहना चाहूंगा कि, आज भी हम १९४७ में जी रहे हैं. Sir, it is a mockery of the system. लोग ३१ दिसम्बर को नये साल का जश्न मना रहे थे तब मैं स्टैम्प ड्यूटी के कमिश्नर श्री. चोकलिंगम साहब के साथ मीटिंग में बैठा था. यह एक नियम सा हो गया है कि, चाहे जब १५ प्रतिशत या २० प्रतिशत स्टैम्प ड्यूटी बढ़ा दो. मैं यहां कहना चाहूंगा कि, The zoning system is defunct. मैं यहां एक उदाहरण देना चाहूंगा कि, मेरे बांद्रा क्षेत्र में जो कार्टर रोड है और जो शर्लीराजन विलेज है, इन दोनों को एक रुप में देखा जाता है, जो गलत है. श्री. चोकलिंगम साहब ने भी इस बात को माना कि स्टैम्प ड्यूटी का झॉनिंग सिस्टम स्मॉल होना चाहिए और उसका एक आधार होना चाहिए. हर साल स्टैम्प ड्यूटी के संबंध में नवम्बर और दिसम्बर में जो मीटिंग होती है उसमें खानापूरी करने के लिए एक लोक प्रतिनिधि को बुलाया जाता है कि, भई आप आईए, चाय बिस्कुट लीजिए और अपना मत रखिए. यह एक चर्चा का विषय है. स्टैम्प ड्यूटी के संबंध में जून या जुलाई में मीटिंग होनी चाहिए और जब कोई लोक प्रतिनिधि इस बारे में कोई सवाल पूछे तो उसको सही जबाब मिलना चाहिए. अगर ३१ दिसम्बर को ऐसी मीटिंग लगायेंगे तो उसमें सही जबाब भी नहीं मिलेगा.

अध्यक्ष महोदय, मैंने यहां पर मुंबई शहर से संबंधित ५-६ मुद्दे रखे हैं. मुंबई शहर देश की आर्थिक राजधानी है मगर मुंबई शहर को कुछ दिया तो जाता नहीं है बल्कि मुंबई शहर से सब कुछ लिया जाता है. मैं मंत्री महोदय से कहना चाहता हूं कि, मुंबई से सब कुछ लेने में भी आप कुछ बेंचमार्क रखिए. अध्यक्ष महोदय, लोक प्रतिनिधि को लोग चुनकर भेजते हैं और लोक प्रतिनिधि को भी अपने मतदाताओं को जवाब देना पड़ता है.

जन आंदोलन करने के लिए हम ही लोगों को मजबूर करते है. मैंने जो मुद्दे यहां पर उठाए है, वे बहुत बड़े मुद्दे नहीं है. महसूल मंत्री जी, मैं चाहूंगा कि, आप आज ही इन सब के बारे में खुलासा कीजिए. इसमें कोई एक्सचेकर की बात नहीं है. इसमें वह बातें है जो टेक्निकल है. आप इस पर खुलासा करेंगे तो मुंबई की जनता को राहत मिलेगी. यह मेरी बड़ी खुशकिस्मती है कि, आपने मुझे बोलने का मौका दिया. हमारे मंत्री जी के लिए एक शेर कहना चाहता हूं.

"मिले उरुज तो इन्सानियत की हद में रहो,
यही तो वक्त है कुदरत की अजमाईश का."

[ श्री. बाबा सिद्दिकी ]

अध्यक्ष महोदय, जब सत्ता मिलती है तो मुझे लगता है कि, जनता के लिए काम करना चाहिए. काँग्रेस की राष्ट्रीय अध्यक्षा सम्माननीय श्रीमती सोनिया गांधी जी ने कहा है कि, "ये सरकार आम आदमी की सरकार है यहा आम आदमी के सब सवाल हल होने चाहिए ". आम आदमी के सवालों को हल करने के लिए हम सत्ता में आते है. काँग्रेस की राष्ट्रीय अध्यक्षा सम्माननीय सोनिया गांधी जी आम आदमी की बात करती है तो सरकार को आम आदमी के काम करने चाहिए. माननीय श्री. नारायण राणे जी ने उस समय टॅक्स के संबंध में स्थगिती दी थी और कहा था कि, हम एन.ए. टैक्स अबॉलिश करेंगे. मैं समझता हूं कि सम्माननीय मंत्री श्री. थोरात साहब इसका इम्पलीमेंटेशन आपके द्वारा हो जाएगा. आप ऐसा करेंगे तो मैं आपका बहुत शुक्रगुजार रहूंगा. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र.

(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

**श्री. चंद्रशेखर घुले** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सदनाचा फार वेळ घेणार नाही. प्रथमत: मी माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात साहेबांचे अभिनंदन करतो की, अहमदनगर जिल्ह्यातील महसूल विभागाचा मंत्री म्हणून मान आपल्याला मिळाला आहे. आपल्याला कल्पना आहे की, पाथर्डीमध्ये सन १९७७ मध्ये एरडा प्रकल्प मंजूर झाला आणि काही कारणाने तो रद्द देखील झाला. शेवगाव तालुक्यातील वडुले, मलकापूर, गरुडवाडी, ढोरजळगाव, आपेगाव, आव्हाणे, मळगाव या गावांतील जवळजवळ ३४०१ हेक्टरवर आजही बागायती जमिनीच्या खरेदी विक्रीचे व्यवहार होत आहेत. आज तेथील शेतकऱ्यांना बागायती जमीन म्हणूनच स्टॅम्प ड्यूटी भरावी लागते. अध्यक्ष महोदय, १९७७ साली मंजूर झालेला हा प्रकल्प १९८७ साली रद्द होतो आणि तरीही शेतकऱ्यांना महसूल खात्याकडे बागायतीची स्टॅम्प ड्यूटी भरावी लागते, हे बरोबर नाही. आपण ती स्टॅम्प ड्यूटी रद्द कराल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

प्रत्येक तालुक्यात प्रशासकीय इमारत बांधण्याचे धोरण शासनाने ठरविले आहे. आपण हे धोरण संपूर्ण राज्यात राबविले तर सगळ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. तसेच, तेथील तहसील कार्यालय, रजिस्ट्रार कार्यालय किंवा इतर ट्रेझरीची कार्यालये अंडर वन रुफ होतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो. अहमदनगर जिल्ह्यामध्ये संगमनेरला वेगळे प्रांत कार्यालय आहे. श्रीरामपूरला वेगळे प्रांत कार्यालय आहे. शेवगाव असेल, पाथर्डी असेल, नगर तालुका असेल, कर्जत असेल, जामखेड असेल, श्रीगोंदा असेल येथील सगळ्या लोकांना कामानिमित्त प्रांत कार्यालय व कलेक्टर कचेरीकरिता अहमदनगरला यावे लागते. त्यामुळे शेवगाव तालुक्याकरिता वेगळे तीन तालुक्यांचे एक उपविभागीय कार्यालय दिले तर सगळ्या शेतकऱ्यांची निश्चितपणे कामाची व्यवस्था होईल. आपण त्याप्रमाणे व्यवस्था कराल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. मला जलसंधारण विभागाच्या संदर्भात देखील जरूर सांगितले पाहिजे. आपल्या माध्यमातून, आमच्या येथील लघुपाटबंधारे किंवा इतर जे प्रलंबित प्रकल्प, बंधारे आहेत, त्यांचे प्रश्न सुद्धा निश्चितच सुटतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो. मी माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे आभार मानतो की, त्यांनी पर्यावरण ग्रामसमृद्धी योजनेच्या निमित्ताने

[ श्री. चंद्रशेखर घुले ]

संपूर्ण राज्यामध्ये दौरे आयोजित केले. त्यांचे जवळजवळ ९८ दौरे पूर्ण झाले आहेत. उर्वरित दोन दौरे लवकरच माननीय मंत्री महोदयांनी पूर्ण करावेत म्हणजे आपली दौऱ्यांची सेंच्युरी होईल, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. भारत सरकारने महाराष्ट्र शासनाला पंचायत राजच्या बळकटीकरणाकरिता १ कोटी रुपये दिले आहेत.

अध्यक्ष महोदय, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून महिला बचत गटांकडून जे प्रॉडक्टस् तयार होतात, ते विकण्याकरिता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी केंद्र इमारत मध्यवर्ती उभाराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. माननीय वन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना मी एक विनंती करतो. मी मागे देखील ४-५ वेळा त्यांना भेटून या संदर्भात सांगितले होते. ग्रामीण कारागिर आहेत. आपल्याकडे असणाऱ्या सुतार समाजाचा संसार, त्यांच्या कारागिरीवर चालत असतो. आपले वन कायदे फारच कठीण झाले आहेत, त्यांना सुतारकामावर रोजीरोटी मिळते. आपण त्यांना ११ आरएचचे मशीन चालविण्यास परवानगी दिली तर त्याला कोणतीही अडचण येणार नाही. पर्यावरणालाही बाधा पोहचणार नाही. मी विनंती करतो की, आपण सुतार कारागिरांना ११ आरएचच्या खाली गिनी असेल तर चालवायला परवानगी द्यावी. एवढे बोलून, सर्वांचे आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

**प्रा. शरद पाटील** : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पामधील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल, वने, पर्यावरण, ग्रामविकास आणि जलसंधारण या विभागांची चर्चा करीत असताना काही मूलभूत प्रश्न मी या ठिकाणी मांडणार आहे.

अध्यक्ष महोदय, धुळे जिल्ह्यातील वाळू उपशाला जिल्हा बंदी करावी, अशा आशयाचे पत्र मी माननीय मुख्यमंत्र्यांना वाळूचा लिलाव होण्यापूर्वी दिले होते. दररोज मुंबई, नाशिककडे धुळे जिल्ह्यातून ३५० ट्रक वाळूची वाहतूक होते. नदी, नाल्यांमधील वाळूचा उपसा झाल्यामुळे नद्या कोरड्या होतात. गावागावांमध्ये असणाऱ्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद पडण्याच्या मार्गावर आलेल्या आहेत. ग्रामीण भागामध्ये सरकारच्या माध्यमातून राबविली जाणारी इंदिरा आवास योजनेची किंमत ६७ हजार रुपये आहे. या योजनेचे बांधकाम करीत असताना एससी व एसटीच्या माणसांना १५-२० हजार रुपयांची वाळू लागणार असेल तर त्याचे घर कसे उभे राहील ? हे सगळे प्रश्न घेऊन आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते.

अध्यक्ष महोदय, माझ्या जिल्ह्यामध्ये दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर निर्माण होत आहे. यामुळे जवळपास २२०० उद्योगांचे जाळे या भागात येणार आहे. या उद्योगधंद्यांसाठी ज्यावेळी इमारती बांधण्याचे काम सुरू होईल त्यावेळी त्या उद्योजकांनी गंगा, नर्मदेमधून वाळू आणायची का ? अशा प्रकारचा मूलभूत प्रश्न माझ्या जिल्ह्यामध्ये निर्माण होणार आहे. यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आणि धुळे जिल्ह्यात वाळू उपशाला बंदी घालावी, अशी विनंती केली आहे. अध्यक्ष महोदय, माझ्या जिल्ह्यात जो वाळू उपसा होत आहे, तो बेलगाम स्वरूपाचा आहे. १०० मीटर वाळू उपशाची परवानगी असताना ५००-५०० मिटर वाळू उपसली जात आहे. या ठिकाणी ज्यांच्याकडे वाळू उपशाचे नियंत्रण आहे, ते तहसीलदार आणि मंडळ अधिकारी हे अत्यंत कमकुवत ठरतात. त्यांच्याऐवजी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे अधिकारी आणि अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना हे अधिकार देण्यात यावेत, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

**[ प्रा. शरद पाटील ]**

अध्यक्ष महोदय, या वाळूची विक्री कशी होते ? धुळ्याच्या नदी, नाल्यांवरुन निघणारी वाळू मुंबईमध्ये २ रुपये ४० पैसे किलो दराने विकली जाते. ४० किलोची बॅग याप्रमाणे, ४० टनाचा १ लाख २० हजार रुपयांचा एक ट्रक मुंबईमध्ये येतो. अशा प्रकारे वाळूला सोन्याचा भाव आल्यामुळे वाळू माफिया संपूर्ण राज्यभर निर्माण झाले आहेत.

अध्यक्ष महोदय, माझ्या जिल्ह्यात ज्या लोकांनी वाळूचे लिलाव घेतले आहेत, ते लोक पूर्वी रॉकेल माफिया होते, कुणी सट्टयाच्या पेढ्या चालवित आहेत, तर कोणी पोलीस खात्यामध्ये नोकरीला आहेत. अशा लोकांनी वाळूचे लिलाव घेतले आणि या माध्यमातून शासकीय संपत्तीची सर्रास लूट या ठिकाणी सुरू आहे. महसूल खात्याने वाळू उपशाची परवानगी दिली नसती तर महाराष्ट्रात वाळू माफिया निर्माण झाले नसते.

अध्यक्ष महोदय, ज्या लोकांनी वाळू लिलाव घेतले आहेत त्यांची एक मोठी यादी माझ्याकडे आहे. एकेका रात्रीमध्ये ५-६ कोटी रुपयांच्या सॉलव्हन्सी काढून त्यांनी हे लिलाव घेतले आहेत. एवढा अमाप पैसा यांच्याकडे कोठे आला, याबाबतची चौकशी इन्कम टॅक्स विभागाकडून केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाने दिनांक २५ ऑक्टोबर २०१० रोजी एक आदेश काढला व त्या माध्यमातून वाळू निर्गती धोरण निश्चित करण्यात आले आहे. या आदेशानुसार वाळू उपसा करावयाचा की, नाही, याबाबतचे अधिकार ग्रामसभेला देऊन टाकले आहेत. ग्रामसभेमध्ये ठराव करीत असताना वाळू लिलाव घेणाऱ्या लोकांनी ग्रामसेवक, सरपंच, ग्रामसभेतील लोक यांना पैसे दिले, दारू पाजली आणि ग्रामसभेचा ठराव आपल्या बाजूने करून घेतला. त्यामुळे शासनाने काढलेला दिनांक २५ ऑक्टोबर २०१० चा आदेश रद्द करून धुळे जिल्ह्यामध्ये वाळू उपशावर बंदी आणण्यासाठी नवीन शासन निर्णय निर्गमित करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, धुळे जिल्ह्यामध्ये धुळे ग्रामीण मतदारसंघात ३.५० लाख मतदार आणि ६ लाख लोकसंख्या आहे. तर धुळे शहर मतदारसंघामध्ये २.५० लाख मतदार आणि ५ लाख लोकसंख्या आहे. धुळे शहर आणि तालुक्यातील ११ लाख लोकसंख्येसाठी एकच तहसीलदार त्या ठिकाणी दिलेला आहे. त्यामुळे तहसीलदाराला काम करणे कठीण झाले आहे. या दोन्ही भागांचे विभाजन करून धुळे शहराला आणि ग्रामीण भागाला दोन स्वतंत्र तहसीलदार देण्यात यावेत, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, धान्य वितरण प्रणालीमध्ये फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आहे. आज सकाळी औचित्याच्या मुद्याव्दारे दूषित पाम तेलाचे कसे वितरण केले जाते, हे आपण बघितले आहे. त्यामुळे धान्य वितरणासाठी मालेगाव पॅटर्नप्रमाणे आमच्या तालुक्याला स्वतंत्र तहसीलदार दिला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, नवीन तहसीलसाठी दीड कोटी रुपयांचा प्रस्ताव पुरवणी मागणीसाठी पाठविण्यात आला आहे. हा प्रस्ताव देखील महसूल मंत्र्यांनी मंजूर करावा, अशी माझी विनंती आहे.

**[ प्रा. शरद पाटील ]**

अध्यक्ष महोदय, १९८९ मध्ये धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन धुळे आणि नंदुरबार असे दोन स्वतंत्र जिल्हे तयार करण्यात आले आहेत. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये ५-५ तालुके आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी कोणीही आयएएस दर्जाचा जिल्हाधिकारी किंवा आयपीएस दर्जाचा पोलीस अधीक्षक येण्यास तयार होत नाही. कारण, हे छोटे जिल्हे आहेत, छोटे कलेक्शन आहे, त्यामुळे कोणीही अधिकारी येण्यास तयार नाही. नंदुरबार जिल्ह्यामध्ये नवीन तालुके निर्माण करण्याची आवश्यकता आहे. पिंपळनेर आणि साक्री असे दोन नवीन तालुके निर्माण केले पाहिजेत. सन्माननीय सदस्य कृषिभूषण श्री. साहेबराव पाटील यांचा अमळनेर तालुका नंदुरबार जिल्ह्याला जोडण्याचा एक प्रस्ताव आहे. चोपडा तालुकाही जोडण्याचा प्रस्ताव आहे. नवीन तालुके जोडण्याच्या प्रस्तावाला माननीय महसूल मंत्र्यांनी मान्यता दिली तर मोठ्या प्रमाणावर उत्पन्न देणारा जिल्हा म्हणून आमच्या नंदुरबार जिल्ह्याकडे पाहिले जाईल.

अध्यक्ष महोदय, केंद्रीय वन जमीन कायद्यामध्ये नव्याने काही सुधारणा झाली. सन २००५ पूर्वी ज्या आदिवासींनी अतिक्रमण केले होते त्यांच्या नावाने वन जमिनी करण्यात येतील, अशी या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली होती. परंतु, या कायद्याचा दुरुपयोग असा झाला की, वन कायद्याबद्दल अज्ञान असल्यामुळे आदिवासींनी सर्रास जंगलतोड सुरू केली. मी माननीय वन मंत्र्यांना पत्रही पाठविले होते. मोठ्या प्रमाणात आदिवासी नव्याने अतिक्रमण करीत आहेत आणि जंगलतोड करीत आहेत. यावर कोठे तरी बंधन आले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, भाषण पूर्ण करण्याची सूचना आपण घंटी वाजवून मला करीत आहात. मला अतिशय कमी वेळ मिळाला आहे. आमच्या पक्षाचा वेळ अजून शिल्लक असल्यामुळे मला आणखी १० मिनिटांचा वेळ आपण द्यावा. तुमचे आणि माझे जमत नाही, याचे कारण असे आहे की, निलंबन करायलाही तुम्हीच होता आणि घंटी वाजवायलाही तुम्हीच आहात. कृपा करून माझ्या भाषणाच्या वेळी तुम्ही पीठासीन अधिकारी म्हणून तालिकेवर येत जाऊ नका.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी स्त्री दाक्षिण्य दाखवावे आणि खाली बसावे.

**श्रीमती पंकजा मुंडे-पालवे** (परळी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यावरण व ग्रामविकास विभागावर मी बोलणार आहे. या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी यांनी एक शेर सांगितला आहे. त्या निमित्ताने एक शेर मला आठवला आहे.“ जर्रा-जर्रा मिलकर बनता है दरिया, असली जर्रा वही है जिसमें दरिया दिखाई दे.” अध्यक्ष महोदय, भारताच्या व महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अतिशय सूचक असा हा शेर आहे. प्रत्येक जर्रा म्हणजे एक ग्रामीण भागाचा एक भाग आहे. गावाचे प्रतिक म्हणून ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र दाखविले जात आहे. म्हणून मी ग्रामीण विकास खात्यावर आज बोलणार आहे. २०१२ या सुवर्णमहोत्सवी वर्षात राज्य निर्मल करण्याचा संकल्प ग्रामविकास मंत्री महोदयांनी केलेला आहे. ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधीच्या उदासिनतेमुळे या योजनेचा बोजवारा उडालेला आहे. या विभागांच्या मागण्यांमध्ये १ हजार लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीला ५० हजार व २ हजार लोकसंख्येपर्यंतच्या ग्रामपंचायतीला १ लाख रुपये आणि २ ते ४ हजार लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचातींना ४ लाख रुपयांचे बक्षीस निर्मल ग्राम योजनेच्या माध्यमातून

[ श्रीमती पंकजा मुंडे-पालवे ]

देण्याचे जाहीर केले आहे. या बक्षिसांची रक्कम अनेक ग्रामपंचायतींना मिळत नसल्यामुळे या योजनेत ग्रामपंचायती समाविष्ट होण्यास उदासिन दिसत आहेत. राज्यामध्ये २७,९९३ ग्रामपंचायती आहेत. ग्रामीण भागात यशस्वी पाणीपुरवठा होत असलेल्या ग्रामपंचायती २४३ आहेत. हागणदारी मुक्त ग्रामपंचायती फक्त ९२ आहेत. हे चित्र अतिशय वाईट आहे, असे मला वाटते. ग्रामविकास विभागात २५:१५ जे बजेट आहे. हे बजेट विरोधी पक्षाच्या आमदारांना मिळाले तर हागणदारी मुक्त महाराष्ट्र करण्यात विरोधी पक्षाचे ४० टक्के आमदार सहभागी होऊ शकतील. २५:१५ च्या बजेट अंतर्गत गावांत रस्ते व शौचालये करण्याची मागणी जास्तीत जास्त होत असते. ग्रामविकास मंत्रालयातून ग्रामपंचायतींना खूप मोठा फायदा होऊ शकतो. ग्रामपंचायतीत हे बजेट आल्यानंतर गावाचे स्वरूप बदलण्यास त्याचा उपयोग होतो. ५० टक्के गावे हागणदारी मुक्त आहेत व ५० टक्के गावे हागणदारी युक्त आहेत, कारण ही गावे विरोधी पक्षाच्या मतदार संघातील आहेत. अशा प्रकारचे चित्र भविष्यात निर्माण होऊ नये याची काळजी मंत्री महोदय घेतील, अशी मला आशा आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची ९६८ लाख इतकी लोकसंख्या होती. आता २०११ मध्ये ११.५० कोटी एवढी लोकसंख्या झालेली आहे. परंतु, महाराष्ट्राची टक्केवारी बघितली तर महाराष्ट्रातील ७९ टक्के लोकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो किंवा नाही, हे देखील सांगता येत नाही. स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविण्यामध्ये बिहार राज्य आपल्या राज्यापेक्षा पुढे आहे. पंजाबमध्ये तर ९७.६ टक्के लोकांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जातो. दारिद्रय रेषेमध्ये महाराष्ट्र राज्य देशामध्ये इतर राज्यांच्या पुढे आहे. परंतु, पिण्याच्या पाण्याच्या योजना राबविण्यामध्ये महाराष्ट्र देशामध्ये सर्व राज्यांच्या मागे आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र आणि राज्य शासन ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी विविध योजना राबवित आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे खूप कौतूक झाले, खूप स्वागत झाले. पर्यावरण संतुलित ग्राम स्वच्छ अभियान राबविण्याचे शासनाने घोषित केलेले आहे. आम्ही त्या योजनेचे स्वागत करतो. वृक्ष लागवड, स्वच्छता गृहे उभारणे, वृक्ष संवर्धन मोहीम या योजनेमध्ये समाविष्ट आहे. यासाठी चांगला नियतव्यय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. रोप वाटीका शाळा आणि महाविद्यालयातून जर वाटप केल्या तर पर्यावरणाकडे बघण्याचा मुलांचा दृष्टिकोन लहानपणापासून वाढत जाईल आणि पर्यावरणाचे संवर्धन करण्याची एक सामाजिक जाणीव जनतेमध्ये निर्माण होईल. ती जाणीव आपल्या देशातील आणि राज्यातील जनतेमध्ये खूप कमी बघावयास मिळते. केवळ वृक्ष रोपण न करता वृक्ष संवर्धन करणे, वृक्ष वाढविणे आणि जंगल वाढविणे याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामपंचायती स्वयंपूर्ण व्हाव्यात यासाठी कर आकारणी व्यवस्थित झाली पाहिजे. विकास योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याची ग्रामपंचायतीची ऐपत नसते. मी उदाहरण म्हणून सांगते की, माझ्या मतदारसंघातील संगम आणि पूस येथे १३-१३ कोटी रुपये खर्च करून नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या होत्या. त्या योजना सन २००६ पासून बंद आहेत. कारण त्या योजनांचे विजेचे बिल थकीत आहे. वीज बिल भरण्याची त्या ग्रामपंचायतीची ऐपत नाही. या ग्रामपंचायतींकडे कोटयवधी रुपयांची वीज बिले थकीत आहेत. ग्रामपंचायतींना जर महसूल गोळा करावयाचा असेल तर याचे कोठे तरी व्यवस्थित नियोजन केले पाहिजे. त्यामुळे ७ टक्के कर वसुली, लोकसंख्येच्या ५० टक्के वृक्ष लागवड आणि ६० टक्के स्वच्छता गृह या तीन गोष्टी पर्यावरण संतुलित ग्राम स्वच्छ अभियानामध्ये व्यवस्थित राबविल्या तर ग्रामपंचायती स्वयंपूर्ण होतील.

**[ श्रीमती पंकजा मुंडे-पालवे ]**

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी रस्त्यांचा विषय मांडलेला आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजना आहे, गावातील पांदण रस्ते आहेत, गावाला जोडणारे छोटे जोड रस्ते आहेत. आपण डीपीडीसीच्या माध्यमातून जोड रस्त्यांची कामे करू शकतो. पांदण रस्त्यांची कामे रोजगार हमी योजनेतून केली जातात. पांदण रस्त्यांसाठी डायरेक्ट फंड देता येत नाही. पांदण रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर होत नाहीत. पांदण रस्त्यांवर अतिक्रमण केले जाते. शेतकरीच पांदण रस्त्यावर अतिक्रमण करतात त्यामुळे रस्त्याचा नामशेष गायब होतो. मग कारखान्यांमध्ये ऊस न्यावयाचा असेल, एका गावातून दुसऱ्या गावामध्ये जावयाचे असेल, शेतकऱ्यांना शेतातील माल बाहेर न्यावयाचा असेल तर शेतकऱ्यांचीच अडचण होते. म्हणून कालबद्ध कार्यक्रम तयार करून पांदण रस्त्यांची मोजणी झाली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पीएमजीएसवायचा प्रोग्राम अतिशय प्रभावीपणे राबवून केंद्र शासनाचे जास्तीत जास्त बजेट आपल्या राज्याला मिळाले पाहिजे. मला असे वाटते की, मागील तीन वर्षांचा रस्त्यांच्या बजेटचा सर्व्हे केला पाहिजे. एकाच रस्त्यावर तीन-चार वेळा वेगवेगळ्या माध्यमातून बजेट खर्च केले जाते. सर्व्हे केला तर डीपीडीसी, पीडब्ल्यूडी, जिल्हा परिषद, नाबार्ड अशा वेगवेगळ्या माध्यमातून एकाच रस्त्याच्या कामावर किती वेळा बजेट खर्च केलेले आहे हे आपल्या लक्षात येईल. त्या रस्त्यावर साधी खडी सुद्धा टाकलेली नसते. म्हणून शासनाने मागील तीन वर्षांचा रस्त्यांचा सर्व्हे करून जे ठेकेदार, लोकप्रतिनिधी गैरवापर करीत असतील तर त्यांना कडक शासन केले पाहिजे. आपल्या देशातील रस्ते रक्त वाहिन्यांप्रमाणे असले पाहिजेत. आपण बघितले तर आपल्या लक्षात येईल की, राज्यात मोठ्या प्रमाणावर अवैध रितीने वाळूचा उपसा होत आहेत. मोठ्या प्रमाणावर वाळू माफिया तयार झालेले आहेत. त्यामुळे या रस्त्यांवर परिणाम होत आहे. रस्त्याचे बजेट खर्च करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. याचा सर्व्हे करून कालबद्ध कार्यक्रम तयार करून रस्त्यांसाठी पुन्हा-पुन्हा बजेट खर्च न करता रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर आणि चांगल्या क्वॉलिटीची झाली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, राज्य रस्ते असतील किंवा जिल्हा रस्ते असतील अशा विविध रस्त्यांच्या कामासाठी अर्थसंकल्पामध्ये जवळपास ३,६८४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु, पावसाच्या पाण्यामध्ये कोट्यवधी रुपयांचे रस्ते वाहून जात आहेत अशा प्रतीचे रस्ते आपल्या राज्यामध्ये बनविले जात असल्यामुळे त्याचा योग्य विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, पर्यावरणाच्या संदर्भात मी आग्रहाची मागणी करणार आहे. माझ्या मतदारसंघात परळी औष्णिक विद्युत केंद्र असल्यामुळे राखेचे प्रदूषण खूप मोठ्या प्रमाणात आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्रामध्ये जवळपास ३० मेगावॅटची दोन, २०० मेगावॅटची तीन आणि जुनी पाच, अशी २५० मेगावॅट क्षमतेची एकूण ६ विद्युत केंद्रे आहेत. ७ वे विद्युत केंद्र लवकरच सुरू होणार आहे. त्यामुळे आमच्या भागात प्रदूषणाचा फार मोठा गहन प्रश्न आहे. महावितरण आणि शासनाने आमच्या भागात ४ लाख वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावून प्रदूषण कमी करण्याचे आश्वासन दिले होते. तसेच या परिसरातील लोकांना मोफत रुग्णसेवा देण्याबाबत ओपीडी स्थापन करण्यात येईल, अशा प्रकारचे आश्वासन महावितरण कंपनीने दिले होते. अध्यक्ष महोदय, आमच्या भागात झाडे लावण्याचा जो उपक्रम राबविला जाणार आहे त्यामध्ये काहीच तथ्य नाही. एकही झाड आमच्या परिसरात लावण्यात आलेले नाही. आमच्या भागात ४ लाख झाडे लावणे आणि ओपीडी निर्माण करणे, अशा प्रकारच्या दोन मागण्या करून मी माझे भाषण या ठिकाणी संपविते. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**ॲड. अशोक पवार** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, १३व्या वित्त आयोगाचा निधी हा ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीला मिळणार आहे. पुणे जिल्ह्याचा अभ्यास केला तर जास्त निधी हा ग्रामपंचायतींना मिळणार आहे. परिणामी जिल्हा परिषदेचे महत्त्व कमी होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकाचे शिक्षण काय आहे, याची तपासणी करण्याची गरज आहे. आपण शिक्षक मदतनिसाला दहावी पासची अट लागू करीत आहात. यामुळे ग्रामसेवक, तलाठी यांना कुठे तर चांगल्या शिक्षणाची अट टाकली पाहिजे. कारण आज कोट्यवधी रुपयांचा निधी ग्रामपंचायतींना मिळणार असल्यामुळे चांगल्या दर्जाचे लोक त्या ठिकाणी असणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागातील अनेक कायदे कालबाह्य झालेले आहेत. त्या ठिकाणी शिक्षणाची अट कमीत कमी पदवीधर अशी केली पाहिजे. एमपीएससीमार्फत परीक्षा घेऊन लेखी परीक्षेत जास्तीत जास्त मार्क मिळवून उत्तीर्ण झाल्यानंतर त्याची निवड केली पाहिजे. कालबाह्य कायदे रद्द केले पाहिजेत. महसूल खात्यामध्ये अनेक जमिनीचे वाद आहेत. महसूल खात्यामध्ये जमिनीच्या वादातील एकूण साडेतीन कोटी केसेस चालू आहेत. राज्यात जमिनीच्या वादाच्या एकूण ३७ लाख केसेस प्रलंबित आहे. कालबाह्य कायदे रद्द केले तर त्यात मोठा फरक पडू शकतो. कायदे सोपे आणि सुटसुटीत केले पाहिजेत.

माननीय श्री. जयंत पाटील यांनी इको व्हिलेजची एक चांगली योजना आणलेली आहे, याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आमच्या सारख्या तरुण कार्यकर्त्याला मंत्री महोदय कसे असावेत याचे उदाहरण नामदार श्री. जयंत पाटील साहेब आहेत. वेगळ्या कल्पना वेगळी भूमिका आणली पाहिजे, राज्य वेगळ्या पद्धतीवर न्यावयाचे असेल तर आपल्याला काही तरी वेगळे करून दाखवायला पाहिजे. आपल्या शेजारच्या राज्याचा कारभार चांगला चालतो म्हणून आपण त्यांचे नाव घेत असतो. तरी आज माननीय श्री. जयंत पाटील यांनी इको व्हिलेजची एक चांगली योजना आणलेली असल्यामुळे सर्वांनी त्यांचे स्वागत केले पाहिजे. या माध्यमातून ग्रामपंचायतीला चांगला कर मिळणार आहे. झाडे वाढल्यामुळे पर्यावरणाला त्याचा फायदा होण्यास मदत होणार आहे. तरी वृक्षाची लागवड सहा इंच करू नये अशी माझी आग्रहाची मागणी आहे. ती झाडे तीन ते चार फुटाची असावीत अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. सामाजिक वनीकरण खात्याचा काही उपयोग होत आहे, असे मला वाटत नाही. पूर्वी या खात्याचा उपयोग रोपटे तयार करण्यासाठी होत होता. आज शाळांमध्ये विद्यार्थ्यांना रोपटे तयार करण्याबाबत सांगण्यात येते. सामाजिक वनीकरण खाते काय करते, याबाबत विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. माननीय मंत्री महोदयांनी सामाजिक वनीकरण खात्याला रोपटे तयार करण्यासंबंधीच्या सूचना द्याव्यात. त्यांना पॉलिथिनच्या पिशव्या आणि बिया पुरवाव्यात, अशी माझी सूचना आहे. सन्माननीय मंत्री महोदय डॉ. नितीन राऊत या खात्याचे मंत्री आहेत. आपण या खात्यास रोपे तयार करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी माझी विनंती आहे. दहा वर्षांपूर्वी एका गरीब शेतकऱ्याने दहा हजार रोपे तयार केली होती, त्यावेळी फलोत्पादनाच्या पिशव्या तसेच बिया त्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्यावेळी त्यांना एक हजार रुपये देण्यात आले होते.

[ ॲड. अशोक पवार ]

अध्यक्ष महोदय, कमांड एरियासाठी कै. वसंतदादा पाटील यांनी एक कन्सेप्ट आणला होता "पाणी आडवा आणि पाणी जिरवा ". कमांड एरियामध्ये शेततळी निर्माण करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी माझी मागणी आहे. कॅनालच्या टोकाला पाणी पोहोचत नसेल तर अशा ठिकाणी शेततळी घेतली पाहिजेत. शासनाची जवाहर विहिरींची निर्मिती ही संकल्पना अतिशय चांगली आहे. या विहिरीतील गाळ काढण्यासाठी शासनाने गरीब शेतकऱ्यांना निधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. गाळ काढल्यामुळे निश्चितपणे त्या शेतकऱ्याचा फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, धरणग्रस्तांना जमिनीचे वाटप होते, त्यावर शेरे दिलेले असतात. तीन वर्षांनंतर ते शेरे काढले जावेत. सन १९६६ चा महसूल संहिता जमिनीचा जो कायदा आहे, त्यात नव्याने सुधारणा केली पाहिजे. तलाठ्याकडील बरेच रेकॉर्ड हे कालबाह्य झाले आहे. जमीन, शिक्षण, रोजगार हमी योजना अशा वेगवेगळ्या करांसाठी वेगवेगळ्या पावत्या दिल्या जातात त्याऐवजी एकच पावती देण्याबाबत विचार करावा. उसावर हेक्टरी ९० रुपये कर आकारणी केली जाते, ती १५० रुपये ते २०० रुपयांच्या आसपास करण्यात यावी. देवस्थानच्या जमिनी विकण्याचे प्रकार होत आहेत, याकडेही शासनाने लक्ष द्यावे. यासाठी कायदा करता आला तर जरूर करावा. एपीएल खाली राजीव गांधी निवारा क्रमांक २ ही योजना सध्या सुरू आहे. यामध्ये लाभार्थ्यांनी दहा टक्के रक्कम टाकावयाची आहे तर ९० टक्के बँकेने कर्ज द्यावयाचे आहे, परंतु, बँका ९० टक्के कर्ज देण्यास तयार नसतात, त्यामुळे यामध्येही शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. ग्रामीण भागात बीपीएल धारकांसाठी शासनाने घरकुलाची एक चांगली योजना आणली आहे, त्यामुळे खरोखरच जे गरीब लोक आहेत, त्यांना घरे उपलब्ध होत आहेत. माननीय मंत्री महोदय, श्री. जयंत पाटील यांनी तीर्थक्षेत्रासाठी चांगल्या प्रकारे निधी उपलब्ध करून दिला आहे, त्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. अध्यक्ष महाराज, आपणही मला बोलण्यास बराच वेळ दिला, त्याबद्दल मी आपणांस धन्यवाद देतो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

## पॉईंट ऑफ ऑर्डरबाबत

**श्री. रवींद्र वायकर** : अध्यक्ष महोदय, सकाळीच पुरवणी मागण्यांसाठीच्या भाषणाचा वेळ माननीय अध्यक्षांनी वाढवून दिलेला आहे. भारतीय जनता पक्षाला भाषण करण्यासाठी ७१ मिनिटे वेळ दिला होता, त्यांचा आता ७२ मिनिटे वेळ पूर्ण झाला आहे. शिवसेना पक्षाला २६ मिनिटे वेळ दिला होता आता त्यांचा ३४ मिनिटे वेळ झाला आहे. कॉंग्रेस पक्षाला ८५ मिनिटे वेळ दिला होता, आता त्यांचा ३५ मिनिटे वेळ पूर्ण झाला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ६४ मिनिटे वेळ दिला होता, त्यांचा ३० मिनिटे वेळ पूर्ण झाला आहे. मनसेला २० मिनिटे वेळ दिला होता, आता त्यांचा २५ मिनिटे वेळ झाला आहे. अशा पद्धतीने भाषणासाठी वेळ दिलेला होता. भाषणाला वेळ देताना भेदभाव होता कामा नये, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

**श्री. रवींद्र वायकर** : अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांना जास्त वेळ द्यावयाचा तर काही सन्माननीय सदस्यांना कमी वेळ द्यावयाचा, असे होता कामा नये, अशी माझी विनंती आहे.

**डॉ. संजय कुटे** : अध्यक्ष महोदय, वेळेच्या नियोजनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांचा दर्जा महत्त्वाचा आहे. त्यांच्याप्रमाणेच माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील ) यांचा दर्जा देखील महत्त्वाचा आहे. प्रत्येक विषयाच्या संदर्भात राज्य शासन संपूर्ण राज्याकरिता धोरण ठरवित असते. या धोरणावर टीका करण्याबाबत किंवा त्यामध्ये काही गोष्टी समाविष्ट करण्याबाबत सूचना करण्याचा विरोधी पक्ष नेत्यांना देखील तितकाच अधिकार आहे. विरोधी पक्ष नेते यांचा वेळ बीजेपीच्या वेळेमध्ये समाविष्ट केला तर राज्याच्या धोरणाच्या संदर्भात सांगोपांग चर्चा होऊ शकणार नाही. त्यामुळे विरोधी पक्ष नेत्यांचा वेळ बीजेपीच्या एकूण वेळेमध्ये मोजण्यात येऊ नये, अशी मी विनंती करतो. राज्याच्या धोरणावर बोलण्याचा त्यांना देखील तेवढाच अधिकार आहे. आपण प्रत्येक सदस्याला २ ते ५ मिनिटांचा वेळ देणार असाल तर शासनाच्या धोरणाच्या संदर्भात कशी काय चर्चा करता येईल ?

**उपाध्यक्ष** : या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करू.

**डॉ. संजय कुटे** : अध्यक्ष महोदय, आपण या संदर्भात सूचना केल्या पाहिजेत. आपण तशी सूचना केली नाही तर माननीय विरोधी पक्ष नेत्याचा अपमान होईल. ते एक तास किंवा सव्वा तास बोलल्यानंतर आपला वेळ संपला, असे जर त्यांना सांगितले तर राज्याचे धोरण कसे काय ठरवायचे ? माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील अमुक वेळ बोलले पाहिजे असे आम्ही ऑब्जेक्शन घ्यायचे काय ?

**उपाध्यक्ष** : माननीय मुख्यमंत्री यांच्या भाषणासाठी लागणारा वेळ गृहीत धरून सत्ताधारी पक्षाची वेळ ठरवलेली असते. आता सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदीप नरके यांनी भाषणास सुरुवात करावी.

**डॉ. संजय कुटे** : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री धोरणाच्या संदर्भात बोलतात. त्यामुळे ते १० मिनिटे अधिक बोलले तरी चालते. विरोधी पक्ष नेत्याचा ४५ मिनिटांचा वेळ बीजेपीच्या वेळेतून वगळण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदीप नरके यांनी भाषणास सुरुवात करावी.

---

## सन २०११-२०१२ च्या अनुदानाकरिता मागण्या

(१) महसूल व वन विभाग

(२) पर्यावरण विभाग

(३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग

(चर्चा—पुढे सुरू)

**श्री. चंद्रदीप नरके** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०११२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागातर्फे विविध योजना राबविल्या जातात. या विभागातर्फे योग्य पद्धतीने कामे हाती घेतली गेली तर राज्याचे महसुली उत्पन्न वाढू शकेल. मात्र या विभागाकडून चांगल्या योजना राबविल्याचे दिसून येत नाही. अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या मागण्यांवर चर्चा सुरू असताना या विभागाचे कॅबिनेट व राज्य मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी विभागाचे कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्री यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

**उपाध्यक्ष** : आपल्या सूचनांची नोंद घेणारे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

( सभागृहाची बैठक स्थगित करण्याबाबत विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य मागणी करतात. )

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत सभागृहाच्या बाहेर जातात. )

**उपाध्यक्ष** : सभागृहामध्ये संबंधित विभागाचे माननीय मंत्री उपस्थित नसल्याने मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक संध्याकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी १० मिनिटांसाठी स्थगित झाली. )

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महाराज, मी सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आपल्याला सभागृहाचे कामकाज १० मिनिटांकरिता स्थगित करावे लागले. त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. सदर चर्चा दुपारी ३.०० वाजल्यापासून सुरू आहे. तेव्हापासून मी सभागृहात बसलो होतो. माननीय सदस्य भाषण करतात आणि निघून जातात. भाषण केल्यानंतर लगेच जाऊ नये हा संकेत आहे. तो सुद्धा अनेक वेळा पाळत नाही. भाषण केल्यानंतर उत्तर ऐकण्याकरिता उपस्थित राहिले पाहिजे, हा देखील संकेत आहे. शेवटी संकेत पाळण्याची जबाबदारी सर्वांवर आहे.

**श्री. चंद्रदीप नरके** : अध्यक्ष महाराज, महसूल खात्यासंबंधी मला सूचना करावयाची आहे. शेती महामंडळाकडे ७ जिल्ह्यातील १ लाख ५५ हजार एकर जमीन आहे. शेती महामंडळाकडे कायमचे कर्मचारी ५४० असून हंगामी ३९३९ कर्मचारी असून नैमित्तिक कर्मचारी ११०० आहेत. राज्यातील १३ साखर कारखान्यांनी शेती महामंडळाची ३६ हजार एकर जमीन खरेदी केलेली आहे आणि ४९ हजार एकर जमीन खंडकऱ्यांच्या मालकीची आहे. शासनाचा एक निर्णय झाला होता. मूळ जमिनी खंडकरी शेतकऱ्यांच्या मालकीच्या होत्या. त्यांच्याकडे कसायला कोणीच नसल्यामुळे त्या साखर कारखान्यांना दिल्या गेल्या. १९६७ साली लॅन्ड सिलिंग ॲक्ट आल्यानंतर सदरच्या जमिनी सहकारी साखर कारखान्यांकडे कसायला गेल्या होत्या. त्या जमिनी सरकारने स्वत:च्या नावावर करून घेतल्या. खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी सरकारने स्वत:च्या नावावर करून घेतल्या. खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी परत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. परंतु, या निर्णयाला शेती महामंडळ विरोध करीत आहे. म्हणून माझी महसूल मंत्र्यांना विनंती आहे. शेती महामंडळाकडे असणाऱ्या जमिनी कसण्यासाठी निविदा काढण्यात येते. या निविदा कोणत्या पेपरमध्ये येतात, त्या कधी प्रसिद्ध होतात याची सुद्धा कोणालाही कल्पना नसते. शेती महामंडळाकडे असणाऱ्या जमिनी आपण किती खंडकरी शेतकऱ्यांना कसायला दिल्या आहेत ? ती यादी आपण येथे सादर करावी. १ लाख ५५ हजार एकर जमीन शेती महामंडळाकडे आहे. शेती महामंडळाला आपला स्टाफ परवडत नसल्यामुळे या जमिनी निविदा काढून कसायला देते. हा चुकीचा पायंडा आहे, तो कायद्याला सोडून आहे. शेती महामंडळाचा एप्रिल पर्यंतचा करार आहे. शेती महामंडळाकडे कोल्हापूर

[ श्री. चंद्रदीप नरके ]

जिल्ह्यातील ७१० एकर जमीन आहे. करवीर, चिखली, नेरली, कसबा बावडा, निगवे आदी ७२ गावांतील कुटुंबाच्या जमिनी शेती महामंडळाकडे गेलेल्या आहेत. त्याचे खरे मालक खंडकरी शेतकरी आहेत. एकरी हजार या प्रमाणे निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी शेती महामंडळाकडे गेल्या. ज्यांनी निविदा प्रक्रियेमध्ये एक हजार रुपये एकरी घेतलेले आहे, तेच लोक आज १५ हजार रुपये एकरी सब कॉन्ट्रॅक्टरप्रमाणे दुसऱ्या शेतकऱ्यांना कसायला देत आहेत. यामुळे राज्याचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. बेकायदेशीररित्या या गोष्टी केल्या जातात. माझी महसूल मंत्र्यांना विनंती आहे की, एप्रिल पर्यंत असणारे हे करार थांबवावेत. राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी कोणत्याही प्रकारचा करार न करता, अंगठा न घेता शेती महांडळासाठी घेतल्या. राज्य सरकारच्या निर्णयानुसार त्या जमिनी मूळ मालकाला देणार काय, अशा स्वरूपाची अनेक निवेदने महसूल मंत्री महोदयांकडे आलेली आहेत. त्याबाबत त्यांनी उत्तर द्यावे, अशी मी विनंती करतो. त्यांचे करार एप्रिल महिन्यात थांबवावेत. राज्यव्यापी विषयावर चर्चा होत असताना या खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी शेती महामंडळाने लाटल्यानंतर धनिकांच्या ताब्यात त्या जमिनी कसायला देता, कायद्याच्या विरोधात जाऊन त्या जमिनी खंडकरी शेतकऱ्यांना देत नाही. आपण आमच्या भावना दाबत असाल तर ती निषेधाची बाब आहे. आमच्या पक्षाकडे वेळ असताना मला फक्त पाच मिनिटे बोलायला देता ...

**उपाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण एकूण नऊ मिनिटे भाषण केलेले आहे. आपल्या पक्षाचे अजून सहा-सात सदस्य बोलावयाचे आहेत.

**श्री. चंद्रदीप नरके** : अध्यक्ष महाराज, माझ्या मतदारसंघातील वेसर्डे, तालुका गगनबावडा येथील पाझर तलाव फुटल्यामुळे त्याठिकाणी जवळपास ४७ लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे. तेव्हा याबाबत मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे, अशी विनंती करून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. पंकज भुजबळ** : अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी आणि या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, मी महसूल विभागावर बोलणार आहे. वेळ कमी असल्यामुळे फक्त दोन-तीन सूचना मांडणार आहे. मी प्रथमत: माननीय महसूल मंत्री महोदयांचे आभार मानतो. कारण आपला महसूल वाढलेला आहे.

अध्यक्ष महाराज, माझा नांदगाव तालुका हा मागासलेला आहे. या तालुक्यामध्ये जवळपास २५ ग्रामपंचायतींना कार्यालये नाहीत. या ग्रामपंचायतींना कार्यालये द्यावीत, अशी मी ग्रामविकास मंत्री महोदयांना विनंती करतो. ही कार्यालये उपलब्ध करून देण्यासाठी काही उपाययोजना आखाव्यात.

अध्यक्ष महाराज, माझ्या मतदारसंघातील २७ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची एकही योजना नाही. त्या गावांसाठी पिण्याच्या पाण्याच्या योजना राबवाव्यात, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. माझ्या मतदारसंघाप्रमाणेच राज्यातील इतर गांवामध्ये देखील पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. त्याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे. ग्रामपंचायतीची उत्पन्नाची क्षमता कमी असल्यामुळे तेथील योजना सफल होत नाहीत. आपण त्याठिकाणी योजना केली तरी ती योजना चालविण्यासाठी त्यांच्याकडे निधी नसतो. तेव्हा अशा ग्रामपंचायतीच्या योजना शासनाने स्वत: चालविल्या तर त्या गावातील लोकांना मदत केल्यासारखे होईल.

**[ श्री. पंकज भुजबळ ]**

अध्यक्ष महाराज, वन जमिनी आदिवासींना देण्याचा निर्णय झालेला आहे. तेव्हा या वन जमिनी लवकरात लवकर आदिवासींच्या नावे कराव्यात जेणेकरून त्यांचा त्यांना लाभ होईल, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, काही रस्ते वन जमिनीवरून जातात. माझ्या मतदारसंघातील जातेगाव ते पिनाकेश्वर हा ५ कि.मी.चा रस्ता आहे. त्यामध्ये एक कि.मी. रस्ता हा वन जमिनीमधून जातो. त्यामुळे हा रस्ता पूर्ण होऊ शकलेला नाही. कपिलनाका हा चार कि.मी. चा रस्ता असून दोन कि.मी. चा रस्ता फॉरेस्टमधून जातो, त्यामुळे तो रस्ता पूर्ण होऊ शकलेला नाही. आपण या गोष्टी निकाली काढल्या तर लोकांची गैरसोय होणार नाही. मी माननीय ग्रामविकास मंत्र्यांना सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघामध्ये पीएमजेएसवाय अंतर्गत काहीही काम करण्यात आलेले नाही, निधी देखील उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. मी त्यांना विनंती करीन की, त्यांनी यावर्षी तरी यामध्ये स्वत: लक्ष घालून आम्हाला पीएमजेएसवाय योजनेचा निधी उपलब्ध करून हे रस्ते पूर्ण करून द्यावेत.

अध्यक्ष महोदय, दुसरे म्हणजे, आमच्याकडे वन क्षेत्र आहे, परंतु, जमिनीवर झाडे नाहीत. त्यामुळे मी माननीय वन मंत्र्यांना विनंती करीन की, आम्हाला झाडे लावण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. झाडे लावली तर पर्यावरणामध्ये नक्की बदल होईल आणि वेढलेला दुष्काळग्रस्त भाग सुद्धा कमी होईल. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद ! जय हिंद !

**श्री. जयकुमार गोरे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग व ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक विषय मांडले आहेत. मी माननीय महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, माझ्या तालुक्यात महसूल विभागाची अनेक पदे रिक्त आहेत. अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी शपथ घेतल्यापासून माझ्या तालुक्यातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात मी त्यांच्या पाठीमागे तगादा लावला आहे. अध्यक्ष महोदय, तालुक्यामध्ये नायब तहसीलदाराची सर्व पदे रिक्त आहेत. त्यामुळे तहसील कचेरीची कामे थांबलेली आहेत. बऱ्याच दिवसांपासून मागणी करूनसुद्धा त्यामध्ये अजून सुधारणा झाल्याचे दिसत नाही. मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, मी ग्रामीण भागातील आमदार आहे. अध्यक्ष महोदय, तलाठी अनेक वर्षे एकाच गावामध्ये काम करीत आहेत, तालुक्यातील तलाठी तालुक्यामध्येच काम करतात. तालुक्यातील तलाठी तालुक्यात काम करायला हरकत नाही. परंतु, ज्या गावातील जन्म आहे, त्याच गावात तलाठी काम करतात. आपण यामध्ये लक्ष घालणे गरजेचे आहे. तलाठी ५-१० वर्षांपासून एकाच गावात कार्यरत आहेत, त्यांना तालुक्याच्या बाहेर पाठविण्याची आता वेळ आली आहे. राजकारणामध्येच नव्हे तर सगळ्याच बाबतीत तलाठ्यांचा हस्तक्षेप होऊ लागलेला आहे. कोणाचे काम करायचे, कोणाचे करायचे नाही, हे तलाठी ठरवू लागले आहेत. सामान्य माणसांना तलाठ्यांचा त्रास होऊ लागला आहे.

[ श्री. जयकुमार गोरे ]

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागात वाळूचा प्रश्न फार गंभीर व्हायला लागला आहे. गावांमध्ये वाळूचे लिलाव होतात. मोठ मोठे वाळू माफिया निर्माण झाले आहेत, ते कोणी निर्माण केले ? आपणच ते वाळू माफिया निर्माण करीत आहात. अध्यक्ष महोदय, वाळूचा लिलाव ९०० ब्रासचा निघतो, तो २१ किंवा २५ लाखांना घेतला जातो. ९०० ब्रास वाळू काढल्यावर तो कॉन्ट्रॅक्टर २१ लाख रुपये कसा देऊ शकतो ? या सगळ्या दृष्टीने हा खूप मोठा प्रश्न आहे. लिलाव झाल्यानंतर ९०० ब्रास वाळू काढण्याऐवजी ९ हजार ब्रास, ९० हजार ब्रास वाळू काढली जाते, याकडे कोणाचे लक्ष नसते. वाळूचे दर खूप भडकलेले आहेत. नदीकाठी असलेल्या भागातील शेतकऱ्यांच्या, गोरगरिबांच्या घरकुलाला सुद्धा वाळू मिळत नाही, एवढ्या मोठ्या प्रमाणात वाळूचे दर वाढलेले आहेत. आपण त्यामध्ये लक्ष घातले पाहिजे. भूमि अभिलेख कार्यालयाचा कारभार तर न सांगण्यासारखाच आहे. वर्षानुवर्षे भूमि अभिलेखासाठी पैसे भरलेले आहेत. परंतु, तरीही लोकांना मोजणी मिळत नाही. लोक तातडीच्या मोजणीसाठी पैसे भरतात. परंतु, तातडीची मोजणी देखील ९-१० महिने मिळत नाही. आपण त्यामध्ये लक्ष घालावे. त्या अनुषंगाने स्टाफ वाढविण्याची देखील गरज आहे. कारण, मोजणीसाठी लोक पैसे मोजतात. मोजणी वेळेवर होत नसल्यामुळे राज्यात सर्व ठिकाणी असंतोष निर्माण होण्यास कारण मिळत आहे. माननीय श्री. बाळासाहेब थोरात यांनी महसूल विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून या विभागामध्ये सुसूत्रता आली आहे. आणखी ज्या गोष्टींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, त्या त्यांनी कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंधारणाच्या माध्यमातून दुष्काळी तालुक्यांमध्ये जलसंधारणाची कामे झाली पाहिजेत, अशी माझी मागणी आहे. परंतु, आज अशी परिस्थिती आहे की, जलसंधारणाची कामे कोणत्या भागात घ्यायची, हे अधिकारी आणि कंत्राटदार ठरवितात. मी आमदार झाल्यापासून एक वेगळे चित्र मला बघावयास मिळाले आहे. कंत्राटदार आमच्याकडे येतात आणि आम्ही कामे मंजूर करून आणतो, असे सांगतात. आमदारांची शिफारस मिळविण्यासाठी कंत्राटदारांना अधिकारी आमच्याकडे पाठवितात. अशा पद्धतीने जलसंधारणाची कामे सुरू आहेत. यामध्ये माननीय जलसंधारण मंत्र्यांनी लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे. ज्या ठिकाणी जलसंधारणाच्या कामांची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी ही कामे झाली पाहिजेत, अशी आमची अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, आज पाणी उपलब्धता दाखला पैसे दिल्याशिवाय मिळत नाही. कंत्राटदारांना मात्र पाणी उपलब्धता दाखला लगेच मिळतो, आमदारांना मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. डीपीडीसीमध्ये अनेक तलावांची कामे मंजूर झाली आहेत. निधी उपलब्ध आहे. परंतु, पाणी उपलब्धता दाखला न मिळाल्यामुळे ही कामे रखडलेली आहेत. त्यामुळे पाणी उपलब्धता दाखला देण्याबाबतच्या अटी व शर्तीचे पुनर्विलोकन करण्याची वेळ आलेली आहे. याकडे माननीय मंत्र्यांनी लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी दुष्काळी तालुक्यातील आमदार आहे. गेल्या चार वर्षांपासून पंचायत समितीमध्ये लक्ष घातल्यापासून १० गट विकास अधिकारी बदलून गेले आहेत. आमच्या तालुक्यामध्ये सगळेच अधिकारी प्रोबेशनवर आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, आपण भाषण थांबविण्याचे सूचित करीत आहात. अपक्षांचा वेळ संपलेला नाही.

**उपाध्यक्ष** : अपक्षांना ६ मिनिटे आणि २४ सेकंद एवढा वेळ दिलेला आहे.

**श्री. जयकुमार गोरे** : अध्यक्ष महोदय, आम्ही २८ अपक्ष सदस्य आहोत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सदस्यांची संख्या कमी असताना त्यांना जास्त वेळ दिला जातो आणि आमच्या भाषणाच्या वेळी घंटी वाजविली जाते.

**उपाध्यक्ष** : नेमून दिलेल्या वेळेपेक्षा मी सन्माननीय सदस्यांना नेहमीच अधिकचा वेळ देत असतो. मी सगळ्यांना संधी दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार गोरे यांना मी ५ मिनिटांच्यावर वेळ दिला आहे. कोणत्याही सदस्यावर अन्याय करण्याची माझी भूमिका नाही.

आता सन्माननीय सदस्य, श्री. वैजनाथ शिंदे यांनी आपले भाषण सुरू करावे.

(अपक्ष सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**श्री. वैजनाथ शिंदे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागाच्या विकासाचे नियोजन करीत असताना गावातील रस्ते, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये यांच्या समस्या सोडविण्याचे काम या शासनाला करावे लागणार आहे. गावातील सर्व शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम ग्राम विकास विभाग करीत आहे.

(अपक्ष सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपाध्यक्ष** : अपक्षांना वेळ वाटपात फार कमी वेळ येत असला तरी मी प्रत्येक अपक्ष सदस्यांना ५-६ मिनिटांचा वेळ बोलण्यासाठी दिला आहे.

**श्री. प्रशांत बंब** : अध्यक्ष महोदय, शेतकरी कामगार पक्षाचे फक्त ४ सदस्य आहेत. परंतु, त्यांना आपण किती वेळ देता ? आम्हाला देखील आमच्या संख्येप्रमाणे वेळ मिळाला पाहिजे.

**उपाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देतो की, अपक्ष सन्माननीय सदस्यांची नावे दिलेली नसताना मी त्यांच्या नावांचा समावेश केला आहे.

सन्माननीय सदस्य श्री. वैजनाथ शिंदे यांनी आपले भाषण पुढे सुरू करावे.

**श्री. वैजनाथ शिंदे** : अध्यक्ष महोदय, तथापि, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीचा कारभार सुधारणे आवश्यक आहे.

(अपक्ष सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपाध्यक्ष** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य, श्री.जयकुमार गोरे यांनी भाषण करावे. आता मी कोणत्याही सन्माननीय सदस्याला भाषण करताना थांबविणार नाही, घंटी वाजविणार नाही.

**श्री. वैजनाथ शिंदे** : जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचा कारभार सुधारण्याची आवश्यकता आहे. त्यांच्यासाठी कार्यालयाची आवश्यकता आहे. पंचायत समिती कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. या कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी जागा नाहीत. ग्रामीण भागात, महसूल विभागातील आष्टा आणि लातूर येथील ८० पदे रिक्त आहेत ती पदे ताबडतोब भरावीत अशी महसूल मंत्री महोदयांना मी विनंती करतो. सन १९९५ मध्ये जलसंधारणाच्या योजनांना मंजुरी देण्यात आली होती. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याच्या पाण्याच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. या योजनांमध्ये ज्या त्रुटी

[ श्री. वैजनाथ शिंदे ]

आढळून आल्या आहेत, त्या दूर करण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, ग्रामीण भागातील रस्ते चांगले करणे आवश्यक आहे. ज्या गावांना तालुक्यांचा दर्जा देण्यात आलेला आहे, त्या गावातील रस्त्यांची सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे यशवंत ग्रामसमृद्धी योजनेची पैसे भरण्याची मुदत फक्त एक दिवस देण्यात आलेली आहे. ही मुदत दोन तीन दिवसांनी वाढवून द्यावयास पाहिजे. ग्रामीण भागात यशवंत ग्रामसमृद्धी योजनेच्या माध्यमातून विकास होऊ शकतो, या योजनेच्या माध्यमातून रस्ते करण्यात येतात, त्यातून गावाचा विकास होतो. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात नाल्या, रस्ते, करण्याची आवश्यकता आहे. या योजनेमध्ये पैसे भरण्यासाठी शासनाच्या सोईप्रमाणे आणखी दोन-तीन तारखा निश्चित करण्यात येऊन मुदत वाढवून देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान ही योजना सुरू आहे. त्याचप्रमाणे कुटुंब कल्याण, पिण्याचे पाणी, सांडपाण्याचे व्यवस्थापन, सामाजिक एकता या विषयावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर जे बक्षीस दिले जाते या साठी २२.५० लाख रुपयांचा निधी दिला जातो. यामध्ये वाढ करण्यात यावी. कमी लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीना या संधीचा कसा लाभ मिळेल, याचा विचार केला पाहिजे, अशी विनंती मी ग्रामविकास मंत्री महोदयांना करतो.

अध्यक्ष महोदय, सन १९९५-९६ पासून राज्यामध्ये तीर्थक्षेत्र विकास योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करताना तेथील अंतर्गत रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय व सार्वजनिक स्वच्छतागृहाची सोय करणे या ग्रामीण भागाच्या हिताच्या योजना आहेत. तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी या योजना राबविणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या बजेटमध्ये तीर्थक्षेत्र विकासासाठी तीन कोटी रुपयांचा नियतव्यय देण्यात आलेला आहे. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी एवढा निधी कमी पडतो असे प्रत्यक्षदर्शनी आढळून आले आहे. यासाठी निधी वाढवून दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, ग्रामसडक योजना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सुवर्ण जयंती ग्रामीण विकास योजना, यशवंत ग्रामसमृद्धी योजना, इंदिरा आवास योजना, पिण्याच्या पाण्याच्या योजना, लघु पाटबंधारे योजना, कोल्हापूर बंधारे, भूमिगत बंधारे, साठवण बंधारे, पाझर तलाव, उपसा जलसिंचन योजना, अशा सर्व योजनांना निधी देण्याची व्यवस्था करावी अशी विनंती करतो, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांना वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ करण्यासाठी तहसीलदार आणि एसडीओ यांच्याकडे हजारो हेलपाटे मारावा लागत आहेत. हा प्रश्न फक्त विदर्भामध्येच आहे. पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना यासाठी प्रचंड अडचणी येत आहेत. त्यामुळे पूर्व विदर्भातील वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ करण्यासाठी विशेष योजना तयार करून हा प्रश्न निकाली काढावा, अशी माझी विनंती आहे.

**[ श्री. चंद्रशेखर बावनकुळे ]**

अध्यक्ष महोदय, विभागीय आयुक्त, नागपूर विभागातील नायब तहसीलदार आणि तहसीलदारांची शेकडो पदे रिक्त आहेत. यासंदर्भातील फाईल सामान्य प्रशासन विभाग आणि महसूल विभागामध्ये इकडून तिकडे फिरत असते. नागपूर विभागातील नायब तहसीलदार आणि तहसीलदारांची रिक्त पदे भरण्यात यावीत, अशी माझी विनंती आहे. माननीय श्री. बाळासाहेब थोरात नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्यांनी नायब तहसीलदार आणि तहसीलदार यांची रिक्त पदे भरण्यासाठी फॉलोअप केला होता. आपण आता महसूल मंत्री आहात. नागपूर विभागातील नायब तहसीलदार आणि तहसीलदारांची रिक्त पदे भरण्यात यावीत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल आणि नझुलच्या जागेवर सन १९९५ पूर्वीची अतिक्रमणे आहेत. परंतु सन १९९५ पूर्वीची सर्व अतिक्रमणे नियमित करण्यामध्ये कोणालाही रस नाही. आपण कायदा केलेला आहे, परिपत्रक काढलेले आहे. त्या कायद्याची अंमलबजावणी करून ही प्रकरणे निकाली काढावीत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. त्या जागा भरण्यात याव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आता विधानसभा मतदारसंघांचे परिसीमन झालेले आहे. विधानसभेच्या परिसिमनामध्ये इकडचा तालुका तिकडच्या उपविभागीय प्रांत अधिकाऱ्याकडे आणि तिकडचा तालुका इकडच्या उपविभागीय प्रांत अधिकाऱ्याकडे आलेला आहे. उप विभागीय प्रांत यांचे परिसीमन करून एका मतदारसंघासाठी एक उप विभागीय प्रांत अधिकारी अशी रचना करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडत आहे. मी मंत्री महोदयांना एक प्रकरण सांगतो. नागपूर जिल्ह्यात जेवढ्या मुरूम खाणी आहेत, दगड खाणी आहेत त्यांच्या ठेकेदारांनी राज्य सरकारला रॉयल्टी भरली पाहिजे. डिफेन्स मिनिस्ट्रीने त्यांची एक खाण ऑक्शनमध्ये काढली. तेथे कोणत्याही प्रकारचा मुरूम नाही. नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. त्यासाठी वापरण्यात येणारा दगड व मुरुमाची रॉयल्टी डिफेन्स विभागाला मिळत आहे. डिफेन्सकडे त्या वाहिनीमध्ये मुरूम नाही. त्या ठिकाणी अनधिकृत मायनिंग सुरू आहे. परंतु ही रॉयल्टी डिफेन्स विभागाला मिळत आहे. त्यामुळे महसूल विभागाचे महिन्याला जवळपास ५ कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. आपल्या राज्यात मायनिंग होत असेल, मुरूम आणि दगड उचलला जात असेल तर निश्चितपणे राज्य शासनाला रॉयल्टी मिळाली पाहिजे. त्या ठिकाणी जो मुरूम आणि दगड उचलला जात आहे त्यामुळे राज्य शासनाचे महिन्याला ५ कोटी रुपयांचे नुकसान होत आहे, जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देऊन ते थांबविण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेबांना माझी विनंती आहे की, आपण पुनर्वसन प्राधिकरण तयार केलेले आहे. पुनर्वसन प्राधिकरणामध्ये आपण निर्णय घेतले की, जोपर्यंत पुनर्वसन प्राधिकरणाचा करारनामा होत नाही तोपर्यंत प्रकल्पाचे काम सुरू करणार नाही. माझी पुनर्वसन मंत्र्यांना विनंती आहे की, नागपूर येथील एनटीपीसी प्रकल्प, मिहान प्रकल्प, कोराडी येथील ६६० मेगावॅटचा प्रकल्प अशा ५-५ प्रकल्पांचे काम नागपूर जिल्ह्यात सुरू आहे. एकाही प्रकल्पासाठी पुनर्वसन प्राधिकरणाची परवानगी घेतलेली नाही. एनटीपीसीला दिलेला स्टे राज्य शासनाने उठविला होता. त्यांनी महिन्याच्या आत

[ श्री. चंद्रशेखर बावनकुळे ]

प्राधिकरणाकडे येऊ अशा प्रकारचे आश्वासन शासनाला दिले होते. तीनही प्रकल्पाचे अधिकारी प्राधिकरणाकडे आलेले नाहीत. तरी, एनटीपीसी, कोराडी प्रकल्प, मिहान प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना प्राधिकरणाकडे बोलाविण्याची गरज आहे. अशा प्रकारची विनंती मी शासनाला करीत आहे. जोपर्यंत ते लोक प्राधिकरणाची कामे सुरू करीत नाहीत, तोपर्यंत त्यांना काम करण्याची परवानगी देऊ नका अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, डॉ. नितीन राऊत आमच्या जिल्ह्याचे मंत्री आहेत. जोपर्यंत जलसंधारण खात्याचे मापदंड बदलत नाहीत, तोपर्यंत आपण विदर्भात काम करू शकत नाही. १०० हेक्टरचा बंधारा बांधावयाचा असेल आणि तो मापदंडात बसत नसेल तर तो कॅन्सल होतो. त्या भागातील भौगालिक परिस्थिती अशी आहे की, शासनाचे मापदंड लायकीचे नाहीत. वर्धा, नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात हीच परिस्थिती आहे. जलसंधारण खात्याचे मापदंड बदलल्याशिवाय शासन एकही बंधारा बांधू शकत नाही. एकाही पाझर तलावाचे काम करू शकत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. अध्यक्ष महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

**श्री. दीपक केसरकर** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, बराच उशीर झालेला असल्यामुळे मी फक्त आमच्या जिल्ह्यातील काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. आघाडी शासनाने क्लास टूच्या ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र दिलेले नाहीत. या गोष्टीकडे मी माननीय महसूल मंत्री महोदयांचे लक्ष वेधणार आहे. ज्या ज्या ठिकाणी संस्थाने होती त्या ठिकाणच्या जागा या क्लास टू ऑक्युपेन्सी म्हणून दिलेल्या आहेत. ज्या ठिकाणी लोक अतिक्रमण करून राहतात ती जागा ॲथोराईज करण्यासाठी शासन निर्णय काढले जातात. परंतु पिढ्यानुपिढ्या ज्या लोकांच्या मालकीच्या जागा आहेत, त्या मात्र क्लास टू ऑक्युपेन्सी आहेत म्हणून त्या ट्रान्सफर करीत असताना ५० टक्के निवासी आणि ८० टक्के व्यापारी वापरासाठी ज्या प्रमाणे खंडणी वसूल करतो त्याप्रमाणे ती वसूल केली जाते. हे कितपत योग्य आहे, याचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करण्याची गरज आहे. यासंदर्भात राज्य शासनाने आपले धोरण सभागृहाला सांगितले पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडीची संस्थाने होती. त्या ठिकाणी कबुलायतदारसारखी सिस्टिम होती. यामध्ये गावातील प्रमुख लोकांना टॅक्स गोळा करण्याचे अधिकार दिलेले होते. सर्वसामान्य शेतकऱ्याला जमीन वाटपाच्या नावाखाली सर्व ठिकाणी "महाराष्ट्र शासन" असे लावण्यात आले. यासंदर्भात ज्यावेळी कोर्टाने विचारणा केली त्यावेळी सांगण्यात आले की, लोकांना जमिनी वाटायच्या आहेत म्हणून आम्ही "महाराष्ट्र शासन" असे केले आहे. आजपर्यंत एकाही शेतकऱ्याला जमीन वाटण्यात आलेली नाही. चौको, बिहे आणि आंबिवली गावातील लोक भूमिहीन झालेले आहेत. भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन दिली जाते आणि या ठिकाणी आपण शेतकऱ्यांना भूमिहीन केलेले आहे. यासंदर्भातील पॉलिसी आम्हाला सांगण्याची गरज आहे, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीत आहे. जमिनीचे वाटप योग्य प्रकारे केले जाईल अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र कोर्टात दिलेले आहे. याकरिता आवश्यक ती स्पेशल पॉलिसी काढण्याची गरज आहे. करन्ट पॉलिसीने या जमिनी आपल्याला वाटता येणार नाहीत. अनेक ठिकाणी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नाही. मिहानमध्ये प्रकल्पग्रस्तांना एक ठराविक सानुग्रह अनुदान देण्याचे मान्य केले होते. अशा तऱ्हेची पॉलिसी आमच्या विभागातील प्रकल्पग्रस्तांसाठी करण्याबाबत माननीय महसूल मंत्री महोदयांनी पुढाकार घ्यावा, अशी मी त्यांच्याकडे विनंती करीत आहे.

**[ श्री. दीपक केसरकर ]**

अध्यक्ष महोदय, सभागृहात माननीय वनमंत्री महोदय बसलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आलेले हत्ती हे मायग्रेटेड हत्ती आहेत अशा प्रकारे शासनाने जाहीर केले होते. त्यांना पकडून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचे मान्य केले होते. अशा प्रकारची मोहीम राबवित असताना अनेक हत्ती मरण पावले होते. अशा प्रकारची मोहीम थांबविण्याची गरज नाही. हत्तीने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान केलेले असल्यामुळे त्यांना दुसऱ्या ठिकाणी नेण्याची मोहीम राबविली पाहिजे. माकडांनी केलेल्या फलोद्यानाच्या नुकसानीच्या संदर्भात वन खात्याकडून सानुग्रह अनुदान दिले जाईल अशा प्रकारचे आश्वासन वन राज्यमंत्र्यांनी दिले होते. परंतु त्याची आजपर्यंत पूर्तता केलेली नाही. या गोष्टीकडे देखील मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी वन पर्यटन वाढविणार आहोत असे सांगितले आहे. यामध्ये एक वर्किंग प्लॅन असतो. तो प्लॅन राज्य शासनाने केंद्र शासनाला सादर करावयाचा असतो. वन पर्यटनाला केंद्र शासनाने मान्यता देऊन सुद्धा अनेक ठिकाणी वन पर्यटन अस्तित्वात आलेली नाहीत. कारण यासंदर्भातील आवश्यक ती पॉलिसी महाराष्ट्र शासनाने फॉर्म्युलेट केलेली नाही. यासंदर्भात कर्नाटक सरकाने जी पॉलिसी ॲडॉप्ट केलेली आहे, ती पॉलिसी राज्य शासनाने स्वीकारली पाहिजे अशा प्रकारची विनंती मी माननीय वन मंत्री महोदयांकडे करीत आहे. सीआरझेड संदर्भात नवीन नियम झालेला आहे. नवीन सीआरझेड नुसार गोवा राज्याला स्पेशल रिलॅक्ससेशन मिळाले आहे. केरळ राज्याला बॅक वॉटरसाठी स्पेशल रिलॅक्सेशन दिलेले आहे. महाराष्ट्रात पर्यटन वाढले पाहिजे म्हणून सीआरझेडचा समावेश व्हावा म्हणून फक्त मुंबई पुरताच विचार झालेला आहे. महाराष्ट्रातील समुद्र किनारपट्टीला या नियमाचा कसलाही फायदा झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. मी माननीय पर्यावरण मंत्री महोदयांना विनंती करीन की, यासंदर्भात धोरण जाहीर करावे. भारत देशात सीआरझेड मध्ये समुद्र किनारी १०० मीटरचा नियम आहे, परंतु आपल्या राज्यात १५० मीटरचा नियम आहे. याकरिता वेगळे रिलॅक्ससेशन नाही. महाराष्ट्राच्या कायद्यामध्ये दुरुस्ती झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

मी माननीय ग्रामविकास मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो की, संपूर्ण महाराष्ट्र हरित करण्याचा त्यांनी निर्धार केलेला आहे. पंचायत राज समितीच्या निर्देशप्रमाणे आमसभा घेतल्या जातात. आज आमसभेचे स्वरूप पाहिले तर त्या सभेमध्ये सन्माननीय आमदारांनी केलेल्या कामाची चिरफाड केली जाते, याबाबतही माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा. तेराव्या वित्त आयोगानुसार ग्रामपंचायती आणि पंचायत समित्यांना मोठ्या प्रमाणावर निधी दिला जातो. तेथे आमदारांच्या को-ऑडिनेशनसाठी आपण कोणता विचार करणार आहात, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. ग्रामसडक योजनेसंदर्भात तसेच जिल्हा परिषदेसंदर्भात सन्माननीय आमदारांचे काय मत आहे ते माननीय मंत्री महोदयांनी जाणून घ्यावे. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. संजय गावंडे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अकोला जिल्ह्यातील आकोट तालुक्यातील फक्त दोनच विषय मी माझ्या मतदारसंघापुरते मांडणार आहे. अकोट तालुक्याचे तहसीलदार, श्री. ढवळे यांनी दिनांक ३ डिसेंबर २००७ व दिनांक ४ डिसेंबर २००७ रोजी गौण खनिजाची तपासणी केली आणि दहा प्रकरणी रॉयल्टी व दंडाची रक्कम म्हणून ३ कोटी ६१ लाख ७७ हजार ६०० रुपये दंड लावला. त्यानंतर प्रकरण उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रस्तावित केले. महाराष्ट्र महसूल संहिता अधिनियम, १९६६ च्या कलम ४८ (७) अन्वये जिल्हाधिकाऱ्यांचे दंड करण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही न होता व काहीही कारण नसताना उपविभागीय अधिकाऱ्यांनी फेर मोजणीचे आदेश दिले. वास्तविक या प्रकरणात शासन परिपत्रकानुसार फौजदारी कारवाई करणे आवश्यक होते, परंतु फौजदारी कारवाई करणे तर दूरच परंतु फेरतपासणीचे आदेश देऊन, या प्रकरणात विनाकारण टाळाटाळ करण्यात आली आहे. हा आदेश जवळपास ऑक्टाबेर २००० पर्यंत रेंगाळत ठेवला. ऑक्टोबर २०१० नंतर उप विभागीय अधिकाऱ्यांनी वसुलीचे आदेश दिले. ३ कोटी ६१ लाख ७७ हजार ६०० रुपयांच्या वसुलीस ऑक्टोबर महिन्यात अप्पर जिल्हाधिकारी श्री. ठाकरे यांनी तातडीने स्थगिती आदेश दिले. त्यानंतर या प्रकरणात आतापर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही. महसूल विभाग तसेच शासनाकडे असलेली आर्थिक सुबत्ता बघता शासनाला या पैशांची आवश्यकता नसावी, अशी मला खात्री आहे. परंतु आमच्या ग्रामीण भागात गरीब शेतकरी लोक जास्त प्रमाणात राहतात. त्यांच्या शेतातील रस्त्यांची अतिशय दुरावस्था झालेली आहे. या पैशांची वसुली करून स्थानिक स्तरावर खर्च केले तर आमच्या भागातील गोरगरीब जनता शासनास आशीर्वाद देईल.

दिनांक ४ जुलै २००० रोजीचे ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे आदेश आहेत. जिल्हा परिषदेची कोणती मालमत्ता लीजवर देणे, विकणे या करिता संबंधित विभागाची परवानगी घेणे आवश्यक असते. परंतु अकोला जिल्हापरिषदेने शासनाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. नरसिंग महाराज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेला तेल्लारा शहरातील एक शाळा लीजवर देण्यात आली. जागेची कोट्यवधी रुपयांची किंमत असलेली शाळा केवळ ५ हजार रुपये या किमतीने वार्षिक भाडेपट्ट्याने ९० वर्षाकरिता लीजवर देण्यात आली. या संदर्भात शासनाचा सन २००० मधील आदेश आहे. असे असून देखील सन २००८ साली ही शाळा लीजवर देण्यात आली. त्यावेळी कार्यरत असणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अश्विनी जोशी यांनी हा करारनामा रद्द करून जागा परत करण्याचे आदेश दिले होते. मात्र अद्याप हा निर्णय लागू केला गेला नाही. शाळेची जागा देखील ताब्यात घेण्यात आली नाही. दिनांक २७ मार्च २००८ रोजी जिल्हा परिषदेने असा ठराव पास केला होता की, रिक्त असलेली इमारत भाड्याने देण्यात यावी. त्या नंतर ४ महिन्यांने झालेल्या ठरावामध्ये असे ठरविण्यात आले होते की, विद्यार्थ्यांची कमी उपस्थिती असल्यास शाळा भाड्याने देण्यात यावी. ४ महिन्यांपूर्वी इमारत रिक्त असते व त्यानंतर ४ महिन्यांने विद्यार्थ्यांची संख्या कमी होते, हे काय गौडबंगाल आहे, ते आम्हाला कळत नाही. अध्यक्ष महोदय, शासन विरोधी करारनामा असल्यामुळे तेथील कार्यकारी अभियंते यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. मात्र शाळेची जागा अद्याप संबंधित संस्थेच्या ताब्यात आहे. तेल्हारा नगरपालिकेला ही जागा न्यायालयाच्या आदेशानुसार देणे आवश्यक होते. सदर नगरपालिकेने वारंवार मागणी देखील केली होती. त्याकरिता ते न्यायालयात देखील गेले होते. मात्र जिल्हापरिषदेचे अधिकारी कोणाच्या दबावाखाली ही शाळा परत करण्यास कुचराई करीत आहेत याची देखील चौकशी झाली पाहिजे.

[ श्री. संजय गावंडे ]

अध्यक्ष महोदय, एकाच नावाच्या अनेक व्यक्ती असतात हे मला माहीत आहे. मात्र हे गौडबंगाल महाविद्यालयाचे श्री. आर. आर. पाटील यांचे आहे. हे नामसाधर्म्य सारखे आहे की काय, ते आम्हाला माहीत नाही. या बाबत चौकशी करण्यात यावी. माननीय मंत्री श्री. आर. आर. पाटील हे अतिशय सज्जन व्यक्ती असल्याचे मानले जाते. त्यामुळे त्यांचा या प्रकरणाशी संबंध नसेल तरी देखील त्यांनी खुलासा करावा, तसेच त्यांचा संबंध असेल तर शासनाने त्या बाबत योग्य कारवाई करून ही शाळा नगरपालिकेला सुपूर्द करावी व तेथील विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवतो.

**प्रा. वीरेंद्र जगताप** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाने अतिशय महत्त्वाकांक्षी अशी घरकुल योजना तयार केली आहे. २ लाख ४५ हजार घरे बांधून देण्याची ही योजना आहे. ही योजना आदिवासी विकास, ग्राम विकास, सामाजिक न्याय, गृह निर्माण या विभागांकडून राबविली जाणार आहे. घरकुल योजनेसाठी जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महसूल विभागाची आहे. मात्र महसूल विभाग हे काम प्रामाणिकपणे करीत नाही. त्यामुळे शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचे काम रखडलेले आहे. माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या अधिपत्याखालील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देऊन इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांना मोफत भूखंड देण्यात यावेत. ज्या गावात शासनाकडे शिल्लक प्लॉटस आहेत, किंवा जागा आहेत, ती जागा लाभार्थ्यांना देण्याचे आपण आदेश द्यावेत. जेणेकरून या योजनेला बळ मिळू शकेल. दिनांक ९ जून २००९ रोजी माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली धामणगाव रेल्वे नगरपरिषदेच्या हद्दवाढीचा प्रस्ताव मंजूर झाला होता. आयुक्तांनी त्या संदर्भात पाठपुरावा करावयाचा होता. परंतु, त्याला आज दीड-पावणे दोन वर्षाचा कालावधी होऊनही, त्यावर कारवाई केली गेली नाही. धामणगाव नगरपरिषदेचा हद्दवाढ प्रस्ताव आपण तातडीने आयुक्तांकडून मागवून मंजूर करावा, अशी विनंती या निमित्ताने मी करतो.

माझ्या मतदारसंघातील वर्धा नदी अंतर्गत ज्या १२ गावांनी रेतीच्या लिलावाला विरोध केला होता. ग्रामसभा एसडीओंच्या अध्यक्षतेखाली झाल्या होत्या, त्या ग्रामसभांचा निर्णय डावलून माननीय आयुक्तांनी तेथील रेती ऱ्हास करण्याचा प्रस्ताव मंजूर करून दिला, ही अतिशय निषेधार्ह बाब आहे. एका एका गावात एसडीओंच्या अध्यक्षतेखाली २-२ वेळा सभा होऊनही, त्या ग्रामसभांनी ते नाकारून सुद्धा, पुन्हा आयुक्तांनी त्याला मंजुरी देणे ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे, म्हणून माझी विनंती आहे की, आपण आपल्या स्तरावर हा प्रस्ताव रद्द केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, ग्राम विकास खात्याच्या बाबतीत मी सांगेन की, ग्राम पंचायतींना १० लाख रुपयांपर्यंत कामे करण्याची मुभा एका शासन निर्णयानुसार देण्यात आली होती. परंतु, ग्रामपंचायतीं जरी स्वत: काम करीत असल्या तरीही, ५० हजार रुपयांवरील कामे ही निविदा प्रक्रिया राबवून केली पाहिजेत असा सुद्धा शासन निर्णय दिनांक २ मार्च २००९ आणि दिनांक ९ फेब्रुवारी २००९ चा असतानाही अमरावती जिल्ह्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीमध्ये १०-१०, १५-१५ लाख रुपयांची कामे साधे कोटेशन मागवून केली

[ प्रा. वीरेंद्र जगताप ]

जातात. त्या कामांची क्वॉलिटी अत्यंत वाईट असते. मग ती दलित वस्ती सुधार योजनेची कामे असोत, १२ व्या वित्त आयोगाची कामे असोत, बीआरजेएम अंतर्गतची कामे असोत ही कामे ग्रामपंचायतीमार्फत अत्यंत वाईट दर्जाची केली जात आहेत. ही कामे पुन्हा दुरुस्त करून मागण्याबाबत कोणतीही यंत्रणा ग्रामपंचायत स्तरावर नाही. याकरिता माझी विनंती आहे की, ५० हजार रुपयांवरील कामे ही जाहीर निविदा मागवून करण्यात यावीत, आणि ग्रामपंचायतींना निकृष्ट कामे करण्यापासून रोखण्यात यावे.

अध्यक्ष महाराज, परवा जलसंधारण विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती आणि अमरावती विभागातील लघु पाटबंधारे योजनांबाबत मापदंड सुधारित करण्याबाबतचा विषय सभागृहात चर्चेला आला होता. अमरावती विभाग हा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक अनुशेष असलेला विभाग आहे. या विभागामध्ये मोठी धरणे आता होत नाहीत म्हणून लहान पाझर तलाव, गाव तलाव, कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे होण्यासाठी हे मापदंड अडीचशे टक्क्यांनी वाढविण्याची गरज आहे. कोकणातील मापदंड जसे अडीचशे टक्क्यांनी वाढविले तसे आता विदर्भातल्या अमरावती विभागाला मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासोबत मापदंड वाढवून देण्याची गोष्ट केली जात आहे ही अत्यंत चुकीची बाब आहे. विदर्भातल्या अति मागासलेल्या आणि सिंचनाचा अनुशेष असणाऱ्या पंतप्रधान पॅकेजचा फायदा होत असणाऱ्या अमरावती विभागामध्ये लघु पाटबंधाऱ्याचे मापदंड अडीचशे पटींनी वाढविण्याची गरज आहे. तो सुद्धा वाढविण्याबाबत मी आदरणीय जलसंधारण मंत्र्यांना विनंती करतो.

त्याशिवाय आदरणीय पर्यावरण मंत्र्याना मी विनंती करतो की, माझ्या मतदारसंघामध्ये भास्कर फ्रूट प्रायव्हेट लिमिटेड म्हणून बोटी या गावामध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यामध्ये कारखाना आहे. त्या कारखान्याचे वेस्टेज वॉटर हे नाल्यात सोडले जाते. त्यामुळे आजुबाजूच्या ६-७ गावातील लोकांच्या प्रचंड तक्रारी आहेत. त्यांचा सकाळचा चहाही या पाण्यामुळे प्रदूषित होतो. माझी विनंती आहे की, या कारखान्यावर कारवाई करून त्या कारखान्यातील प्रदूषित पाणी तेथील नाल्यामध्ये सोडले जाणार नाही, याबाबत दक्षता घेतली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, वन विभागाकडे वन पर्यटनाअंतर्गत माझ्या अमरावती जिल्ह्यातील ७३ लाख रुपयांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. माझी माननीय वन मंत्र्यांना विनंती आहे की, हे वन पर्यटनाचे प्रस्ताव तातडीने मंजूर करून त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. जेणेकरून आमच्या चिखलदरा, धारणी भागाबरोबरच इतरही भागांकडे पर्यटक वळतील आणि अमरावती जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागेल एवढेच सांगतो व माझ्या मागण्यांवरील भाषण थांबवतो.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य, श्री. प्रकाश शेंडगे आपण आपल्या सूचना २-३ मिनिटांमध्ये मांडाव्यात अशी माझी विनंती आहे.

**श्री. प्रकाश शेंडगे** : अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

[ श्री. प्रकाश शेंडगे ]

मी महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. यापूर्वी या महाराष्ट्रामध्ये जे जिल्हे आकाराने मोठे होते त्यांचे विभाजन करण्यात आले होते. डोंगरी भाग असेल, दुष्काळी भाग असेल अशा काही तालुक्यांचे देखील यापूर्वी विभाजन करण्यात आले आहे. मी जत तालुक्याचे प्रतिनिधित्त्व करतो. जत तालुका १२५ कि.मी.लांब असून ६५ मीटर रुंद आहे. हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ आणि माझ्या तालुक्याचे क्षेत्रफळ सारखेच आहे. गेल्या ३० वर्षापासून या तालुक्याचे त्रिभाजन करावे अशी येथील जनतेची मागणी आहे. सांगली जिल्ह्यामध्ये यापूर्वी खानापूर तालुक्याचे विभाजन झाले. पलूस, कडेगाव यांचे देखील विभाजन झाले. २० कि.मी. अंतरावर तालुक्यांचे विभाजन झाले आहे. आमचे पालकमंत्री श्री. पतंगराव कदम येथे आहेत. त्यांना याची संपूर्ण कल्पना आहे. मानवविकास निर्देशांकामध्ये हा तालुका सर्वात मागासलेला आहे. महाराष्ट्रातील जत तालुक्यामध्ये ऊस तोड कामगार सर्वात जास्त आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त भटक्या विमुक्त जातीची संख्या कुठे असेल तर ती जत तालुक्यामध्ये आहे. इतका हा तालुका मागासलेला आहे. असे असताना याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. या तालुक्याचे कमीतकमी तीन तालुक्यामध्ये विभाजन झाले पाहिजे. जे निकष पलूस, कडेगावला लावले तेच निकष येथे लावावेत अशी साधी व सोपी आमची मागणी आहे. पालक मंत्र्यांनी निदेश दिले आहेत की, दोन तालुके करण्यात यावेत. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. दोन तालुके केल्याने काही होणार नाही. म्हणून कमीतकमी तीन तालुके करावेत अशी माझी विनंती आहे.

यानंतर मी वन खात्यावर बोलणार आहे. केंद्र शासनाने स्पेसिफिक गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. जंगल तीन प्रकारचे असते. अ, ब, क अशी वर्गवारी करण्यात आली आहे. अ वर्ग जंगल म्हणजे प्रोटेक्टेड फॉरेस्ट असते. ब म्हणजे अभयारण्य असते म्हणजे थिक फॉरेस्ट असते. आणि क म्हणजे चराऊ जंगल. या जंगलांचा कसा उपयोग करायचा यासंबंधी केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनाला गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. या जमिनीचा वापर खेड्या-पाड्यातील जनतेला व्हायला पाहिजे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. अशा प्रकारची मार्गदर्शक तत्त्वे केंद्राने घालून दिलेली आहेत. क वर्गातील जंगल आहेत, कुरणे आहेत, ती दुभती जनावरांना चराऊसाठी किती जमीन ठेवावी, भाकड जनावरांना किती चराऊ जमीन ठेवावयची, शेळ्या-मेंढ्यांसाठी किती जमीन ठेवायची यासंबंधी देखील केंद्राने गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. मी विधान परिषदेचा सदस्य असताना ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. २१ वन क्षेत्रामध्ये साडेसात लाख एकर जमीन मेंढपाळांसाठी चराऊ कुरण म्हणून ठेवलेली आहे. श्री. पतंगराव कदम साहेब वन मंत्री झाल्यापासून त्यांनी उर्वरित १९ वन क्षेत्रामध्ये एक इंच देखील जागा आपण गुरांसाठी, बैलांसाठी, मेंढपाळांसाठी चराऊ कुरणासाठी ठेवलेली नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, या उर्वरित १९ वन क्षेत्रामध्ये मेंढपाळांसाठी चराऊ कुरणासाठी जागा ठेवावी, अशी मी मागणी करतो. धुळे-नंदुरबार येथील आदिवासींना वन हक्क प्रस्थापित करून दिला आहे. आदिवासींच्या नावावर जमिनी करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. मेंढपाळांचा चराऊ कुरणांवर पिढ्यानपिढ्या हक्क आहे. तो देखील अबाधित राहिला पाहिजे. मध्यंतरी धुळ्यातील जवळ जवळ ८०० मेंढपाळ श्री. पतंगराव कदम यांना सकाळीच भेटले. त्यांनी आपल्या व्यथा श्री.पतंगराव कदम यांच्यापुढे मांडल्या. त्यांनी एक महिन्याच्या आत निकाल लावला जाईल अशा प्रकरचे आश्वासन मेंढपाळांना दिले आहे. त्याबाबतीत देखील त्यांनी कार्यवाही करावी. मेंढपाळांचे हक्क अबाधित ठेवून आदिवासींचे हक्क अबाधित ठेवून त्यांना जमीन उपलब्ध करून द्यावी अशी मी मागणी करीत आहे.

[ श्री. प्रकाश शेंडगे ]

यानंतर मी जलसंधारण विभागावर बोलणार आहे. जत तालुक्यामध्ये १ हजार के.टी. वेअरच्या साईटस उपलब्ध आहेत, तर १२८ साईटस् मंजूर आहेत. निधी नसल्यामुळे काम करता येत नाही. जत तालुका हा दुष्काळी आहे. म्हणून माझी विनंती आहे १२८ साईटस मंजूर झालेल्या आहेत, त्यांच्यासाठी तरी आपण निधी द्यावा. सदर कामामुळे शेतकऱ्यांना थोडा तरी फायदा मिळेल. आमच्या जत तालुक्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जाते. कुठल्याही गावात रस्ता नाही, पाणी नाही, वीज नाही. आमच्या तालुक्याची अक्षरश: वाताहात लागली आहे. तेव्हा माझी मागणी आहे की, गाव अंतर्गत रस्त्यांसाठी निधीची सोय करून या तालुक्याला न्याय द्यावा अशी मागणी करतो. आपण मला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद.

**श्री. प्रशांत बंब** : अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. वेळ कमी असल्यामुळे मी फक्त सूचना करणार आहे.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील वाळूचे टेंडर उद्यापासून त्वरित बंद करून ज्या ठिकाणाहून वाळू निघते त्याठिकाणी सरकारने स्वत: टोल नाक्यासारख्या कमानी उभाराव्यात. आपण वाळूचे टेंडर देतो ज्याला आपण वाळू माफिया म्हणतो तेच रॉयल्टी वसूल करतात. खरे म्हणजे शासनाने रॉयल्टी वसूल केली पाहिजे. त्यासाठी स्वत:च्या कमानी उभाराव्यात. मग असा प्रश्न उभा राहतो की, त्याठिकाणी जे अधिकारी असतील ते भ्रष्टाचार करतील. आपण टोलनाक्याच्या ठिकाणी इन कॅमेरा बसवावा त्याद्वारे आपणास नियंत्रण ठेवता येईल. आपण असे केल्यामुळे भ्रष्टाचारास आळा बसेल आणि शासनाच्या तिजोरीमध्ये १०० टक्के महसूल गोळा होऊन राज्याचे उत्पन्न देखील वाढेल.

अध्यक्ष महाराज, गावात १२ ग्रामसभा घेण्याचा जी.आर. शासनाने काढलेला आहे. यामध्ये महिलांच्या ग्रामसभा आणि इतर ग्रामसभा अशा एकूण १२ ग्रामसभा घ्यावयाच्या आहेत. परंतु कोणतीही ग्रामसभा होत नाही आणि ग्रामसभा झाली तरी त्या ग्रामसभेला काहीही अर्थ राहत नाही. कोणत्याही गोष्टीचे नियोजन करण्याकरिता ग्रामसभेकडे निधी नसतो. ज्याठिकाणी एक हजार लोकसंख्या आहे त्या ठिकाणाहून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या वर्षाला जवळपास ४ कोटी रुपये टॅक्स शासनाकडे जमा होतो. यापैकी ५० टक्के रक्कम त्या ग्रामपंचायतीच्या खात्यामध्ये जमा केल्यास त्या ग्रामसभांना काही तरी अर्थ प्राप्त होईल. त्यांना गावातील नियोजन करणे सोपे जाईल. आपण असे केल्यानंतर त्यांना घरकुल देऊ नका, गावातील रस्ते, लाईट, पाण्याची व्यवस्था देऊ नका. ही सर्व व्यवस्था ते स्वत: पाहतील. एक हजार लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये वर्षाला त्यांना दीड-दोन कोटी रुपये मिळाले तर तेथे खऱ्या अर्थाने विकास होईल आणि खऱ्या अर्थाने पंचायतराज येईल. ग्रामपंचायतीने स्वत: गावातील टॅक्स गोळा करून गावातील योजना चालवावयाच्या आहेत. हे सांकेतिक आहे, परंतु असे होत नाही. तेव्हा या संदर्भात सरकारने पॉलिसी डिसिजन घ्यावा.

अध्यक्ष महाराज, जिल्हापरिषदेमध्ये एखादे छोटे काम असेल तर त्या कामासाठी एक फाईल १२ टेबल्सवर फिरून नंतर कॅफोकडे जाते. त्यामध्ये थोडी देखील त्रुटी निघाली तर फाईल परत येते. तेव्हा यापुढे एक फाईल १२ टेबलवर न फिरता फक्त २-३ टेबलावरच फिरून काम पूर्ण झाले पाहिजे.

**[ श्री. प्रशांत बंब ]**

अध्यक्ष महाराज, जलसंधारण विभागामार्फत के.टी. वेअर्सची कामे घेतली जातात. जर दीड-दोन कोटी रुपयांची कामे असतील तर त्यामध्ये सरळ सरळ कामांचे ब्रेकेजेस करून १५-१५ लाखांची कामे केली जातात. मजूर फेडरेशन आणि बेकार अभियंत्यांना काम देण्याच्या दृष्टीने कामाचे तुकडे केले जातात. अशाप्रकारे कामाचे तुकडे केल्यामुळे कामाची क्वालिटी खराब होते. तेव्हा ही सर्व कामे ओपन टेंडर काढून करावीत अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये दोन वर्षांपूर्वी १५ कोटी रुपयांच्या कामाचे अशाप्रकारे तुकडे पाडले गेले. त्यामुळे कामाची क्वालिटी खराब झाली. तेव्हा माझ्या मागणीचा विचार करावा अशी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. सदानंद चव्हाण** : अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, चिपळूण तालुक्यातील गांग्रई हे माझे स्वत:चे गाव आहे. दाभोळ खाडीच्या काठावर हे गाव वसले आहे. त्या गावामध्ये एक जहाज बांधणी कारखाना येऊ घातला होता. या प्रकल्पासाठी २० ते ३० हेक्टर जमीन ग्रामस्थ देण्यास तयार होते. परंतु त्यातील ८ ते १० हेक्टर जमीन खाडी काठची जमीन होती व ती शासनाची होती. परंतु नंतर ते खाजण क्षेत्र केल्यामुळे ती वन विभागाच्या नावे लागली. परंतु त्याठिकाणी १९८३ साली खार बंधारा झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, खार बंधारा झाल्यामुळे आतील क्षेत्रातील खाजन, तिवर झाडे संपून, ते क्षेत्र शेत लागवडी योग्य झालेले आहे. वन खात्याने ते काम अडविल्यामुळे येणाऱ्या कंपनीने ती जागा वन खात्याकडून ताब्यात मिळत नाही म्हणून प्रकल्प अन्य ठिकाणी नेण्याचा विचार केलेला आहे. माझी माननीय वन मंत्री व माननीय महसूल मंत्री यांना या संदर्भात विनंती आहे. पूर्वीच्या त्या ठिकाणच्या परिक्षेत्र वनाधिकारी यांनी असे लिहून दिले होते की, या जागी पाणी भरत असल्यामुळे ही जागा वनझाडे लागवडीयोग्य नाही. त्यामुळे ही जागा सरकारी म्हणून परत घ्यावी. सध्या असणाऱ्या परिक्षेत्र वनाधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी विरोध केला, ती जागा आमची वन खात्याची आहे, असे नमूद केले. माझी शासनाला विनंती आहे की, आपण आम्हाला ही जागा मिळवून दिली तर शेतकरी, आमचे ग्रामस्थसुद्धा स्वत:ची जमीन देऊन त्या ठिकाणी प्रकल्प उभा राहिला, त्या ठिकाणी जहाज बांधणी कारखाना आला तर लोकांना रोजगार मिळेल. जागा योग्य आहे. यामुळे बेरोजगारांना रोजीरोटी मिळून खेडे भागाला वैभव प्राप्त होऊ शकेल. माझी शासनाला विनंती आहे की, आपण त्यामध्ये जातीने लक्ष घालून मार्ग काढला तर बरे होईल.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा महत्त्वाचा विषय महसूल विभागा संबंधी आहे. माझ्या मतदारसंघामध्ये करंबवणे नावाचे गाव आहे, त्या गावात ५०-६० वर्षांपूर्वी शंभर एकर जमीन टाटा मिल नावाची एक कंपनी यावी म्हणून होती. त्या ठिकाणी कोणतीही एमआयडीसी वगैरे नाही. त्यासाठी त्या ठिकाणी ती संपादित केली होती. अध्यक्ष महोदय, २ रुपये गुंठ्यांनी ती जमीन ताब्यात घेतली होती, लागणारी हापूस कलमे सुद्धा दिली होती. त्या ठिकाणच्या बिचाऱ्या शेतकऱ्यांना असे वाटले की, एक प्रकल्प येणार आहे, आपल्या मुलांना मुंबईला जायला लागणार नाही गावातच रोजीरोटी मिळेल. त्यामुळे त्यांनी ती जमीन दिली. परंतु, ती जमीन अद्याप तशीच पडून आहे. ती जमीन परत घेऊन शेतकऱ्यांना ज्या काही भावाने किंवा बाजारभावाने जरी परत दिली तर बरे होईल.

[ श्री. सदानंद चव्हाण ]

अध्यक्ष महोदय, मी आता ग्रामविकास विभागासंदर्भात बोलतो. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना गेल्या २ वर्षांपासून सुरू आहे, फेज १० चे काम मंजुरीला गेलेले आहे. परंतु, अद्याप मंजूर झालेले नाही. सध्या केंद्रामधील ग्रामविकास मंत्री हे देखील आपल्याच राज्याचे आहेत. महाराष्ट्रासाठी तेथून काही तरी मिळेल अशी अपेक्षा आहे. अध्यक्ष महोदय, तो फेज लवकरात लवकर मंजूर होऊन ती कामे मार्गी लागावीत, अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, आता मी जलसंधारण विभागाबाबत बोलतो. पहिली गोष्ट म्हणजे विभागाकडून कामांना निधी मिळत नाही. जो निधी मिळतो, तो आमच्या कोकणातील काही भागातील योजनांवर समप्रमाणात वापरला जात नाही. माझी विनंती आहे की, आपण अधिकारी वर्ग कशा पद्धतीने निधी वितरित करतात, यामध्ये जातीने लक्ष द्यावे. आमच्याकडील मापदंड बदलले आहेत. जलसंधारण असो वा जलसंपदा असो, त्यांच्या अंदाजपत्रकामध्ये २५-३० टक्के रॉयल्टी पकडली जाते आणि तशीच उचलून महसूल खात्याकडे दिली जाते. आपलेच पैसे इकडचे तिकडे केले जातात. प्रकल्पाची किंमत वाढते, भूसंपादनाची रक्कम दिली जात नाही. प्रकल्प पूर्ण करायचे असतील तर भूसंपादनाच्या बाबतीतील निधी दिला जात नाही. कामावर मात्र निधी दिला जातो. ठेकेदार आपली बिले बनवून घेतात. रॉयल्टी चार्जेस पडतात. जलसंधारण प्रकल्पासाठी शासनाने संपादित केलेल्या क्षेत्रामध्ये उत्खनन केलेले माती, दगड यांची रॉयल्टी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात धरण्यात येऊ नये. परिणामी, योजना मापदंडात बसू शकेल. भूसंपादनासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. एवढे बोलतो आणि बोलण्यास संधी दिल्याबद्दल आभार मानून थांबतो. धन्यवाद !

**श्री. गोपालदास अग्रवाल** : अध्यक्ष महोदय, नागपुर को "टायगर कॅपिटल" बनाने की जो घोषणा की गई है, उसके लिए मैं माननीय वन मंत्री जी का अभिनंदन करना चाहता हूं. ग्रामसभा के माध्यम से वन जमीन को मुक्त करने का प्रावधान है, उसी प्रकार नागरी क्षेत्र में जो वन जमीन है, उसके बारे में भी सरकार ने अपनी भूमिका स्पष्ट करनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, आज अवैध वृक्ष तोड़ी पर अंकुश लगाने की जरूरत है. उसके लिए किसी पथक का निर्माण किया जाना चाहिए. गोंदिया, भंडारा, गडचिरोली जिलों में हम लोगों ने जल संपदा का संरक्षण किया है, उसका दुष्परिणाम वहां के सिंचन प्रकल्पों पर पड़ रहा है. विशेषकर गोंदिया जिले के सालेकसा और देवरी जैसे अति नक्सलग्रस्त तालुकाओं में जो जल संपदा के प्रकल्प रुके हुए है, उन प्रकल्पों को पूरा करने के लिए वन मंत्री ने आवश्यक कदम उठाने चाहिए.

अध्यक्ष महोदय, वन मंत्री महोदय से मेरी विनती है कि वे हमारे गंभीर विषयों को सुनने का कष्ट करें. गोंदिया जिले के गोरेगांव तालुका के नागझिरा के प्रकल्प को पर्यटन के रुप में विकसित करने के लिए अधिक से अधिक निधि देने का काम उन्होंने करना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मदद एवं पुनर्वसन मंत्री श्री पतंगराव कदम जी से मैं निवेदन करना चाहता हूं कि वड़ेगांव का जो प्रकल्प है, उसका पुनर्वसन दो साल में करने वाले थे, अभी पांच साल हो गए. लेकिन उसकी मूलभूत आवश्यकताओं को पूरा नहीं किया गया. वहां के प्रकल्पों को पूरा किया जाना चाहिए.

[ श्री. गोपालदास अग्रवाल ]

अध्यक्ष महोदय, मदद एवं पुनर्वसन मंत्री महोदय से मेरा निवेदन है कि बेमौसम बरसात में जो नुकसान हुआ है और उसके लिए राज्य सरकार की ओर से जो १ हजार करोड़ रुपये की मदद जाहिर की गई है उसमें सबसे ज्यादा अन्याय और सबसे ज्यादा अत्याचार अगर किसी जिले पर हुआ है तो वह गोंदिया जिले पर हुआ है. मात्र १२०० रुपये हेक्टर के हिसाब से धान उत्पादक किसानों को मदद देने का काम हुआ है. मैं मंत्री महोदय से निवेदन करना चाहूंगा कि गोंदिया जिले में २७ फरवरी को माननीय मुख्यमंत्री जी ने सबको एक समान मदद देने का आश्वासन दिया है और मैं समझता हूं कि वह इस बारे में जरूर कोई निर्णय लेंगे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया जिला तालाबों का जिला है. वहां पर बंधारों के माध्यम से और तालाबों के पुनर्जीवन के माध्यम से वहां की सिंचन क्षमता बढ़ाने की जरूरत है और उसके लिए अधिक से अधिक निधि देने की जरूरत है. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

**प्रा. अतुल देशकर** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गोसीखुर्द प्रकल्पाचे सगळ्यात जास्त काम ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रात आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित करण्यात आली आहे. परंतु, अद्यापपर्यन्त त्याचा मोबदला देण्यात आलेला नाही. लवकरात लवकर शेत जमिनीची विक्री झाली तर शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. भूसंपादनाचा मोबदला लवकरात लवकर देण्याबाबत माननीय महसूल मंत्री, श्री. बाळासाहेब थोरात यांनी कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, दोन दिवसांपूर्वी याच सभागृहात माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी जातीचा दाखला देण्यासाठी पंधरवडा निश्चित करण्यात येईल, अशी घोषणा केली आहे. या १५ दिवसांच्या कालावधीत राज्यात जातीचे दाखले दिले जाणार आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणावर उपजिल्हाधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. उपजिल्हाधिकाऱ्यांना जिल्ह्यातील इतर कामांचा देखील ताण आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर जातीचे दाखले देणे त्यांना शक्य होणार नाही. जिल्ह्याच्या ठिकाणी आणखी एक उपजिल्हाधिकाऱ्याचे पद निर्माण करून ते भरले तर निश्चितपणे शासनाने ठरविलेला कार्यक्रम पूर्ण होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, तलाठी कार्यालयांमध्ये पुरेशी वीज उपलब्ध नाही. त्यामुळे तलाठी कार्यालयांना जर स्वतंत्र मीटर दिले गेले तर तलाठी कार्यालयातील कामे अधिक वेगवान पद्धतीने होतील. त्यामुळे शासनाने याचा विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सावली तालुक्यातील आंतरगांव येथील तलाठ्याने संपूर्ण सूत्रे आपल्या हातामध्ये घेऊन मध्यंतरी आलेल्या अतिवृष्टीच्या नुकसानग्रस्तांच्या तयार केलेल्या यादीत मोठ्या प्रमाणावर खाडाखोड केली आहे. परंतु, ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या लक्षात आलेली नाही. आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी एसडीओ यांना चौकशी करण्यास सांगितले. परंतु, एसडीओने थातुरमातूर चौकशी केली आहे. जेवढी जमीन नाही, त्यापेक्षा अधिक जमीन दाखविली आहे, जेवढ्या प्रमाणात अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईचा लाभ मिळावयास पाहिजे होता, त्यापेक्षा अधिकचा लाभ मिळाला आहे, अशा प्रकारचा घोळ तलाठ्याने केलेल्या खाडाखोडीमुळे झाला आहे. त्यामुळे संबंधित तहसीलदार यांच्यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

[ प्रा. अतुल देशकर ]

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. दोन दिवसांपूर्वी ३ लोकांचा यामुळे मृत्यू झाला आहे. नुकसान भरपाई म्हणून मृतांच्या कुटुंबियांना आपण २ लक्ष रुपये देतो. यामध्ये वाढ करून ही नुकसान भरपाईची रक्कम ५ लाख रुपये करावी, अशी माझी मागणी आहे. त्याचबरोबर पाळीव जनावरांना वाघाने जखमी केले तर त्यांना देखील अतिशय कमी रक्कम दिली जाते. त्या रकमेमध्ये वाढ केली पाहिजे. सावली तालुक्यात मुंढाळा नावाचे गाव आहे, तेथील आनंद नावाचा माणूस आपल्या पत्नीसोबत मोटरसायकलने जात असताना रान डुक्कराने त्याला धडक दिली. पोलीस रिपोर्टमध्ये डुक्कराने धडक दिली म्हणून मृत्यू झाला असा उल्लेख करण्यात आला आहे. पोलिसांचा व डॉक्टरचा रिपोर्ट आहे. परंतु वन विभागाचे अधिकारी सांगतात की, रान डुक्कराने धडक दिली त्याबाबत काही पुरावा आहे काय ? अशा प्रकारचा पुरावा कसा काय मिळणार ? हे न कळण्यासारखे आहे, याबाबत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालावे. एका गरीब कुटुंबाला वन विभागाच्या माध्यमातून मदत दिली गेली पाहिजे. पूर्व विदर्भात विडी कामगार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांना नियमाप्रमाणे १५०० रुपये दिले जावेत. त्यांना कच्च्या मालाचा पुरवठा व्यवस्थित झाला पाहिजे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जे रस्ते तयार करण्यात आले आहेत. त्यांचे पैसे दिले नाहीत. २००३-२००४ मध्ये ब्रम्हपुरी तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सोनेगांव-सावरगांव-बोरगाव हा रस्ता तयार झाला आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत. त्यांचे अजूनही पैसे मिळाले नाहीत. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये रस्ते घेण्यात आले आहेत.

अध्यक्ष महोदय, कारखान्यातील पाणी वैनगंगेत सोडण्यात येते, वैनगंगेच्या पाण्याचा पुरवठा हा सिरोंचापर्यंत होतो. त्याच प्रमाणे नाग नदीचे पाणी घाणेरडे असल्यामुळे लोकांना खरूज होत आहे, अंगाला खाज सुटत आहे. जनावरे देखील ते पाणी पित नाहीत. पर्यावरण मंत्री महोदय आमचे मित्र आहेत, ते आमच्या जिल्ह्याचे आहेत. त्यामध्ये त्यांनी लक्ष घालावे. मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व भाषण संपवितो.

**कृषिभूषण साहेबराव पाटील** : अध्यक्ष महोदय सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागावर, मी बोलत असताना, दिनांक २२ जुलै २०१० तारांकित प्रश्न क्रमांक १६३१० आणि दिनांक २१ मार्च २०११ तारांकित प्रश्न क्रमांक ३७७४६ अन्वये सभागृहात चर्चा करताना, महाराष्ट्र शासनाने वाळू/रेती निर्गतीबाबत नवीन धोरण करण्याचे मान्य केले आहे. दिनांक २५ ऑक्टोबर २०१० रोजी शासकीय अधिकाऱ्यांकडून वाळू/रेती उत्खनन व वाहनासाठी होलोग्रामसारख्या चिन्हाचा वापर करावा. लिलाव परवानाधारकाने वाळू उत्खननासाठी ताबा मिळाल्यानंतर ज्या वाहनातून वाहतूक करणार आहे त्या वाहनांचे नोंदणीकृत क्रमांक संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत. महाराष्ट्रात कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत पाठपुरावा केला नसल्यामुळे वाळू माफिया तयार झाले आहेत. त्याकरिता अध्यक्ष महोदयांनी २१ मार्च, २०११ रोजी निदेश दिले आहेत की, या विषयासंदर्भात विधानसभेमध्ये स्वतंत्र चर्चा घडवून आणावी. त्याबाबत कार्यवाही व्हावी अशी माझी विनंती आहे.

[ श्री. कृषिभूषण साहेबराव पाटील ]

अध्यक्ष महोदय, जागतिक वन दिन हा दिनांक २१ मार्च रोजी असतो. वन मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, ग्लोबल वार्मिंगच्या संदर्भात महाराष्ट्रात सगळीकडे चर्चा असताना, पर्यावरण संतुलनाच्या संदर्भात संयुक्त वन व्यवस्थापन समितीद्वारा ग्रामीण भागात चांगले कार्य होत असताना, गेल्या दोन वर्षापासून संत तुकाराम वन ग्राम पुरस्काराचे वाटप केले जात नाही. त्याबाबत वन मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे, अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो, जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गजानन महाराज.

**डॉ. सुजित मिणचेकर** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल व वन खात्याबाबत मी बोलणार आहे. चांदोली अभयारण्य व चांदोली धरणग्रस्त येथील लोकांचे पुनर्वसन झाले. पुनर्वसन झाल्यानंतर पुनर्वसनाच्या जागेच्या कब्जा हक्काचे पैसे सरकारने भरलेले नाही. पैसे भरलेले नसल्यामुळे बँक त्यांना कर्ज देत नाही. जागेवर त्यांचे नाव लागत नाही. त्यांना तेथे व्यवसाय करण्यासाठी परवाना घ्यावयाचा असेल तर त्यांना परवाना मिळत नाही. शासनाने यामध्ये हस्तक्षेप करून लवकरात लवकर त्यांच्या कब्जा हक्काचे पैसे भरावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, खेडे गावामध्ये पांदण रस्ते असतात. आमदार फंडातून पांदण रस्त्याचे काम करावयाचे असेल तर या रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या मुरूमाच्या एका ट्रॉलीसाठी ४५० रुपये दिले जातात. त्या ४५० रुपयांमध्ये २०० रुपये शासनाची रॉयल्टी आहे. मुरूम आणणे, मुरूमाची वाहतूक करणे, तो रस्त्यावर पसरविणे हा सर्व खर्च २५० रुपयांमध्ये होत नाही. महसूल विभागाला माझी विनंती आहे की, त्यांनी ४५० रुपयांऐवजी हा खर्च वाढवून द्यावा किंवा पांदण रस्त्यासाठी वेगळा फंड उपलब्ध करून द्यावा किंवा रॉयल्टी माफ करावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये एका शैक्षणिक संस्थेने जमीन विकत घेतलेली आहे. त्या जमिनीतून जो पूर्वापार रस्ता जात होता तो रस्ता अडविण्याचे काम श्री. संजय घोडावत यांच्या घोडावत इन्स्टिट्यूटने केलेले आहे. माझ्याकडे यासंदर्भातील पुरावे आहेत. शासनाने यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी वनमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, प्रादेशिक उद्यानामध्ये जर कोणी इमारत बांधत असेल, कंपाउंड बांधत असेल तर तो गुन्ह्यास पात्र असतो. या उद्योगपतीने प्रादेशिक उद्यानामध्ये इमारत बांधून गुन्हा गेलेला आहे. त्यांच्या शैक्षणिक संस्थेस परवानगी कोणी दिली ? ती परवानगी काढून घेण्यात यावी आणि प्रादेशिक उद्यानामध्ये जी इमारत बांधलेली आहे ती तोडण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाच्या संदर्भात मुद्दा मांडून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. काही गावांमध्ये घरकुल योजनेतून घरकुले देण्यात आलेली आहेत. परंतु ज्या लोकांना घरकुले मंजुर झालेली आहेत त्यांच्याकडे जागा नसल्यामुळे ग्रामपंचायतीने त्यांना गायरान जमिनीवर घरकुल बांधण्यास परवानगी दिलेली आहे. माझ्या मतदारसंघातील टोप या गावी ग्रामपंचायतीने त्या लोकांना गायरान जमिनीवर घरकुल बांधण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु शासनाच्या माध्यामातून ती परवानगी रद्द करण्यात आलेली आहे. यामुळे गरीब लोकांवर अन्याय होत आहे. मंत्री महोदयांनी त्या लोकांना गायरान जमिनीवर घरकुल बांधण्यास परवानगी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी वेळे अभावी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. दादाराव केचे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग हा राज्याच्या दृष्टीने आणि गरीब जनतेच्या हिताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. परंतु शोकांतिका अशी आहे की, महसूल विभागातील बरीच पदे रिक्त आहेत. आर्वी येथील उप विभागीय अधिकाऱ्यांचे पद रिक्त असल्यामुळे गरीब लोकांना रोज हेलपाटे मारावे लागत आहेत. आष्टी येथील नायब तहसीलदार आर्वी येथे तहसीलदार म्हणून काम करीत आहेत. आर्वी येथील तहसीलदाराचे पद अजून भरण्यात आलेले नाही. गरीब लोक रोज तहसील कार्यालयामध्ये येत असतात. परंतु तहसीलदाराचे पद रिक्त असल्यामुळे लोकांची कामे होत नाहीत. त्यामुळे गरीब लोकांच्या पैशांचा अपव्यय होत आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. महसूल विभाग गरीब लोकांच्या हिताचा असला तरी जोपर्यंत महसूल विभागातील रिक्त पदे भरली जात नाहीत तोपर्यंत आपण महसूल विभाग सक्षम करू शकणार नाही.

अध्यक्ष महोदय, वर्धा जिल्ह्यामध्ये जिल्हा पुनर्वसन अधिकारी आहे. अप्पर वर्धा, लोअर वर्धा प्रकल्प माझ्या मतदारसंघामध्ये आहे. आज वर्धा जिल्ह्यामध्ये अशी बिकट अवस्था झालेली आहे की, जिल्हा पुनर्वसन अधिकारी पैसे घेऊन प्लॉटचे वाटप करीत आहे. जिल्हा उप विभागीय अधिकारी यांच्याकडे वर्धा जिल्ह्याचा कार्यभार असून जिल्हा पुनर्वसन अधिकारी पदाचा कार्यभार सुद्धा त्यांच्याकडेच आहे. जिल्हा उप विभागीय अधिकारी पुनर्वसन विभागातील सर्व कागदपत्रे तेथे बोलावून घेतात आणि पैसे घेतल्याशिवाय ते लोकांना प्लॉटचे वाटप करीत नाहीत, अशी परिस्थिती आहे. वर्धा जिल्ह्यातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी आझाद आहेत. त्यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माझी पुनर्वसन मंत्र्यांना विनंती आहे की, लोअर वर्धा प्रकल्पातील दोन गावांचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही. वाठोळे गावात चार ते पाच फुट पाणी आहे. त्या ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालेले आहे. शेतीला येण्याजाण्याकरिता रस्ता नाही. वाठोळे गावात पुनर्वसनाचे अनुदान मिळाले नाही. मिणवली हे वर्धा नदीच्या किनाऱ्यावरील एक गाव आहे. त्या गावातील लोकांना घरकुलासाठी एक रुपयासुद्धा मिळालेला नाही. त्या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. तरी त्या लोकांना तत्काळ अनुदान देण्याची गरज आहे. परंतु, आज त्या लोकांना अनुदान न मिळाल्यामुळे तेथील लोक मरणाअवस्थेत आलेली आहेत. शासनाने त्यांना तत्काळ पुनर्वसन अनुदान दिले पाहिजे.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. दादाराव केचे यांनी आपल्या भाषणाचा समारोप करावा ही विनंती आहे.

**श्री. दादाराव केचे** : अध्यक्ष महोदय, अप्पर वर्धा धरणाला किती वर्षे झालेली आहेत याचा शासनाने विचार करण्याची गरज आहे.

**उपाध्यक्ष** : पुनर्वसनाचा महत्त्वाचा प्रश्न आहे, याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

**श्री. दादाराव केचे** : अध्यक्ष महोदय, ज्या लोकांच्या जमिनी गेलेल्या आहेत, अशा लोकांनी जमिनीचा मोबदला भरलेला आहे. त्या क्षेत्रातील जमिनी मिळण्यासाठी ७५ टक्के रक्कम भरलेली आहे. परंतु अजूनसुद्धा त्यांच्या नावाने जमिनी झालेल्या नाहीत. पूर्वीचा जो मालक आहे...अडथळा ...

अध्यक्ष महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**श्री. विजय शिवतारे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या काही महत्त्वाच्या मुद्याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात हिलटॉप आणि हिलस्लोपमध्ये अतिक्रमणे होत आहेत. जानेवारी आणि फेब्रुवारीच्या सुमारास हा विषय ऐरणीवर आलेला होता. माझ्या विभागात जे काम होत होते, त्याच्याविरुद्ध ॲक्शन घेण्यात आली होती. परंतु दोन महिन्यानंतर पुन्हा अनेक ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत. मला माननीय मंत्री महोदयांना सांगावायचे आहे की, त्या ठिकाणी संबंधित लोकांच्या विरुद्ध मोठ्या प्रमाणात दंड आकारण्याची गरज आहे. क्षेत्रीय रिजनल प्लॅनमध्ये प्लॅनिंग ॲथोरिटी जिल्हाधिकारी आहे. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या परमिशनमध्ये पुढे व्हायलेशन होत आहे. त्या व्हायलेशनवर अटकाव करण्यासाठी महाराष्ट्रात कोणत्याही प्रकारची यंत्रणा नाही. उदा. पुणे जिल्हाधिकारी यांनी एक उपजिल्हाधिकारी आणि काही अत्यावश्यक कर्मचारी वृंदाची मागणी शासनाकडे केली होती. परंतु गेल्या सात ते आठ महिन्यापासून सदर प्रस्ताव शासनाकडे पडून आहे. परिणामी आवश्यक तो कर्मचारी वर्ग नसल्यामुळे आंबेगाव व इतर ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत.

अध्यक्ष महोदय, १९७६ मध्ये युएलसी ॲक्ट अंतर्गत सरप्लस लॅन्ड घेण्यात आली होती. ही स्कीम अतिशय चांगली होती. त्या माध्यमातून गोरगरीबांना जमिन वाटण्यात आली होती. परंतु धनदांडग्यांनी त्यांना ताबे दिलेले नाहीत. २० ते २५ वर्षानंतर (Next Generation) कडून कवडीमोल भावाने दादागिरी करून जमिनी घेतलेल्या आहेत. माझ्या मतदारसंघात अशा प्रकारची अनेक उदाहरणे घडलेली आहेत. तहसीलदारांना नोंदणी रद्द करण्यास सांगून जमिनी सरकार जमा करून घेण्याबाबत सांगितले होते. यासंदर्भात माननीय महसूल मंत्री महोदयांनी लक्ष देऊन योग्य ती चौकशी करण्याची गरज आहे. पुरंदर तालुक्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही केली पाहिजे.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. राजकुमार बडोले यांनी भाषण सुरू करावे.

**श्री. विजय शिवतारे** : अध्यक्ष महोदय, प्रशासकीय इमारत आणि क्रीडा संकुलासाठी जागा नाहीत म्हणून बोंबाबोंब होत होती. जिल्हाधिकारी महोदयांना सोबत घेऊन जागा दाखविण्यात आली होती.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. राजकुमार बडोले यांनी भाषण सुरू करावे.

**श्री. विजय शिवतारे** : अध्यक्ष महोदय, मी एकच मिनिट घेणार आहे.. प्रशासकीय इमारत आणि क्रीडा संकुलासाठी जागा दाखविल्यानंतर प्रस्ताव मंजूर होण्याकरिता एक वर्ष लागत आहे याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, वन खात्यासंबधी मी थोडक्यात माझे विचार मांडणार आहे. डुकरांनी आमच्या भागामध्ये बऱ्याच ठिकाणी हैदोस घातला आहे. त्यामुळे संरक्षित जनावरांच्या यादीमधून 'डुक्कर' हा प्राणी वगळण्यात यावा. तीन महिन्यापूर्वी एका डुकराने एका शेतकऱ्याचा जीव घेतला.

अध्यक्ष महोदय, पर्यावरणासंबंधी मला काही सूचना करावयाच्या आहेत. एमआयडीसी विभागात इंडियन सिमलेस आणि ज्युब्लियंट या दोन कंपन्या आहेत. यापैकी इंडियन सिमलेस कंपनी प्रदूषण मंडळाकडून खोटे प्रमाणपत्र मिळविते, याकडेही शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. माननीय पर्यावरण मंत्री महोदयांनी या दोन्ही कंपन्याच्या प्रदूषणासंबंधी विशेष लक्ष देऊन प्रदूषण होणार नाही, याबाबत काळजी घ्यावी. अध्यक्ष महाराज, मला अजून काही मुद्दे मांडावयाचे होते, परंतु वेळेअभावी ते मांडता आले नाही. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. राजकुमार बडोळे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. महाराष्ट्राच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांना अनन्य साधारण महत्त्व आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थेतील अभियंत्यांचा स्थानिक स्तरावर फार मोलाचा वाटा असतो. जिल्हा परिषदेच्या अभियंत्यांना श्रेणीवाढ मिळण्याबाबत वारंवार मागणी करूनही स्वतंत्र श्रेणीवाढ दिली गेली नाही. पाटबंधारे विभागाचे १६८ उपविभाग आहेत. जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे १२० उपविभाग आहेत. या उपविभागातील तसेच जिल्हा परिषदेतील शाखा अभियंत्यांना उप अभियंत्यांचा दर्जा दिला तर त्यांच्या अनुभवाचा फायदा जिल्हा परिषदेस निश्चितपणे होईल. शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता या पदांवर नियुक्त झाल्यापासून यातील काही अभियंते हे त्याच पदावर सेवानिवृत्त होतात. बऱ्याच जणांना कसलीही बढती मिळत नाही. त्यांना श्रेणीवाढ दिली तर खऱ्या अर्थाने न्याय मिळाल्यासारखे होईल. त्यांच्यासाठी स्वतंत्र श्रेणी लागू करावी, अशी मी पुन्हा एकदा मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, जलसंधारण विभागासंबधी मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मालगुजारी तलाव आहेत. या भागात बारमाही सिंचन दाखविले जाते त्यामुळे शेततळी, विहिरींची कामे त्या ठिकाणी घेता येत नाहीत, म्हणून बारमाही सिंचनाचा अनुशेष वगळण्यात यावा. तसेच या भागात जवाहर विहिरींचा, शेततळ्यांचा, मजगीचा फायदा तेथील शेतकऱ्यांना देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, वन विभागासंबंधी फक्त मी काही सूचना करणार आहे. नवेगाव बांध येथे सन १९७६ पासून राष्ट्रीय अभयारण्य झालेले आहे, परंतु तेथील सहा गावांचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही. त्या गावांचे पुनर्वसन करण्याच्या बाबतीत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी माझी मागणी आहे. वन हक्क समितीची २२ हजार प्रकरणे होती, त्यातील ६ हजार प्रकरणे निकाली काढण्यात आली. उर्वरित प्रकरणे निकाली काढण्यात यावी. सामूहिक वन हक्क समितीकडे जी प्रकरणे आहेत, ती जिल्हाधिकाऱ्यांनी निकाली काढली पाहिजे. अध्यक्ष महाराज, मला अजून काही मुद्दे मांडावयाचे होते, परंतु वेळेअभावी मांडता आले नाहीत. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. सुरेशकुमार जेथलिया** : अध्यक्ष महाराज, आपण सर्व पक्षांना भाषण करण्यासाठी जो वेळ दिलेला आहे, तो वेळ एकेका पक्षाचा पूर्ण होऊ द्यावा, त्यानंतर दुसऱ्या पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी देण्यात यावी. एकतर आम्हाला बोलण्यासाठी संधी मिळत नाही......(अडथळा)....

अध्यक्ष महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, गौण खनिजाच्या माध्यमातून शासनास मोठ्या प्रमाणावर रॉयल्टी मिळते. प्रत्येक मतदारसंघात ज्या खदाणी आहेत, त्यातून दगड, रेती उचलली जाते व त्याच्या रॉयल्टीपोटी शासनास चांगल्या प्रमाणात पैसे मिळतात. या रॉयल्टीच्या पैशातून तेथील रस्त्यांचा विकास केला पाहिजे. माझी दुसरी मागणी महसूल विभागातील रिक्त पदांबाबतची आहे. नायब तहसीलदार, तलाठी यांची बरीच पदे रिक्त आहेत. सभागृहात माननीय ग्रामविकास मंत्री महोदय उपस्थित आहेत, त्यांनी मी केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात. माझ्या मतदारसंघात सर्वात महत्त्वाचे कोणते काम झाले असेल तर ते पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून झालेले आहे. चालू वर्षाकरिता पंतप्रधान ग्रामसडक

**[ श्री. सुरेशकुमार जेथलिया ]**

योजनेमध्ये रस्त्याची नवीन कामे घ्यावयाची नाहीत, असे ठरविण्यात आले. त्या संदर्भात मी माननीय ग्राम विकास मंत्र्यांना विनंती करू इच्छितो. मी त्या संदर्भात राज्यातील सर्व २८८ आमदारांना पत्र पाठविले आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या मार्फत चांगले रस्ते निर्माण केले जातात.माननीय केंद्रीय ग्रामविकास मंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्याकडे या बाबत पाठपुरावा करून जास्तीत जास्त निधी महाराष्ट्र राज्याला उपलब्ध करून दिले तर राज्यातील सर्व रस्ते चांगले होतील. माझी माननीय ग्रामविकास मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण एक डेलिगेशन घेऊन दिल्लीला गेलो तर निश्चितपणे फायदा होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागामध्ये पांदन रस्ते तयार केले पाहिजेत, अशी मागणी अनेक सन्माननीय सदस्यांनी केली आहे. शेतावर जाण्यासाठी या रस्त्यांचा अतिशय चांगल्या प्रकारे उपयोग होत असतो. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेकडून आपण आता राष्ट्रीय पेय जल योजना सुरू केली आहे. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेमध्ये ग्रामपंचायतीला अधिकार होते. आता राष्ट्रीय पेय जल योजनेमध्ये अत्यंत चांगली सुधारणा करण्यात आली आहे. हे काम करण्याकरिता टेंडर काढले जाणार आहे. पूर्वी बऱ्याचशा ठिकाणी ग्रामपंचायती मार्फत योजना राबविण्यात येत होती. यामुळे अनेक योजना अयशस्वी ठरल्या होत्या. मात्र आता टेंडर काढल्यामुळे ही योजना अधिक चांगल्या प्रकारे राबवली जाईल, असे आम्हाला वाटते.

अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना माझी विनंती आहे. ०ते १०० हेक्टर जमिनीचे सिंचन करण्यासाठी राज्य शासनाकडून पैसे उपलब्ध होत होते. मात्र आता राज्य शासनाने हा निधी देण्याचे बंद केले आहे. हा निधी डीपीडीसीच्या माध्यमातून देण्याचे ठरविले होते. मात्र तरतूद न केल्यामुळे निधी उपलब्ध होत नाही. निधी अभावी योजना बंद पडत आहेत. माननीय जलसंधारण मंत्र्यांना माझी विनंती आहे की, ही कामे पूर्ण होण्यासाठी त्यांनी लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत बसले आहेत. मी त्यांना विनंती करू इच्छितो की, डीपीडीसीमध्ये निधी वाटपाच्या संदर्भात योग्य नियोजन केले जात नाही. ज्या योजना अर्धवट राहिलेल्या आहेत, त्या योजना शासनाच्या वतीने मंजूर कराव्यात. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. ओमप्रकाश राजे निंबाळकर** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी माननीय महसूल मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो. उस्मानाबाद तहसील येथे नायब तहसीलदाराच्या ५ जागा असून देखील तेथे केवळ १ पद भरलेले आहे. केवळ एकच व्यक्ती तेथे कार्यरत आहे. उर्वरित जागा रिक्त आहेत. तसेच कळम तालुक्यात देखील एक नायब तहसीलदार, ५ क्लार्कच्या जागा रिक्त आहेत. या जागा रिक्त असल्यामुळे तेथील तहसीलदार दुसऱ्या व्यक्तीकडून काम करून घेत आहेत. सर्वसामान्यांकडून पैशाची मागणी करून त्यांची आर्थिक लूट करतात. माझी महसूल मंत्र्यांना विनंती आहे की, या जागा ताबडतोब भरण्याबाबत शासनाने कारवाई करावी. तसेच ग्रामविकास विभागाच्या संदर्भात मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, सध्या ग्रामीण भागामध्ये ॲप्रोच रोड नाहीत. या रस्त्यांवर मोटारगाडी काय बैलगाडी देखील चालवता येत नाही. तेथील लोकांना रस्त्याच्या बाजूला बैलगाडी ठेवून, चालत जावे लागते. या संदर्भात वारंवार मागणी करून देखील त्या संदर्भात कोणतीही व्यवस्था निर्माण करण्यात आलेली नाही.

[ श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर ]

अध्यक्ष महाराज, जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत एक-एक, दीड-दीड कोटी रुपयांची कामे प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये त्या गावातल्या लोकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी केलेली आहेत. तेथे प्युरिफिकेशनची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे, अशी मी आपल्या माध्यमातून माननीय ग्रामविकास मंत्र्यांना विनंती करतो.

यशवंत ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत पैसे भरण्यासाठी फक्त एक दिवस मिळाला होता. फार कमी लोकांना त्याची माहिती होती, माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, हा वेळ वाढवून दिल्यास सर्व ग्रामपंचायतींना या योजनेचा लाभ होईल. आपण मला बोलण्याची संधी दिली याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद !

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण फक्त सूचना कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

**प्रा. राम शिंदे** : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन २०११-२०१२ च्या महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, आता ९ वाजून ३० मिनिटे झालेली आहेत आणि माझे अनेक मुद्दे असले तरी, मी आपल्याला बेल वाजविण्याची संधी न देता त्याबाबत थोडक्यात सूचना करणार आहे. ग्रामीण भागामध्ये ४-४, ५-५ गावांना एक ग्रामसेवक असतो, तो प्रत्येक गावाला एक ग्रामसेवक देण्यात यावा. त्रिस्तरीय पंचायत राज्य पद्धती आपण स्वीकारलेली आहे. परंतु, पंचायत समितीचे महत्त्व कमी होत आहे, त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे.

पीएमजीएसवायचे रस्ते दोन वर्षांपासून आपल्या महाराष्ट्रात होत नाहीत. आता महाराष्ट्राचे सुपुत्र केंद्राचे ग्रामविकास मंत्री झाल्याने आमच्या आशा पल्लवित झालेल्या आहेत. या योजनेंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी निधी देण्यात आला पाहिजे. २५/१५ च्या हेडखाली समान वाटप करावे त्याच बरोबर नरेगा आणि एमआरइजीएसच्या धर्तीवर विहिरी खोदण्याचा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. तो जवाहर रोजगार योजनेच्या धर्तीवर राबविण्यात आल्याखेरिज त्या विहिरी पूर्ण होणार नाहीत. यासाठी जवाहर रोजगार योजनेच्या धर्तीवर विहिरी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा. जसे की, आपण आता कृषी विभागाला गतीमान पाणलोट म्हणून कार्यान्वित करतो, त्याचप्रमाणे या विहिरींचा कार्यक्रम करण्यात यावा. पंचायती राजमध्ये वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या केल्या जातात, त्या विभागांतर्गत करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्यास चांगले काम होणार आहे.

त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये ३८९ मोठ्या ग्रामपंचायती आहेत. 'क' वर्गाच्या नगरपालिकेप्रमाणे त्या सुद्धा गावांना सुखसुविधा देण्याबाबत ग्रामविकास विभागाने धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. राजीव गांधी निवारा क्रमांक २ ही स्कीम २००६ पासून कार्यान्वित झाली आहे. परंतु, महाराष्ट्रात कुठेही याला कर्ज उपलब्ध करून दिले जात नाही. या योजनेचा बोजवारा उडालेला आहे. त्याच्यामध्ये अमेंडमेंट करून या अटी बदलण्यात याव्यात. जेणेकरून त्या लाभार्थ्यांना घरे मिळतील. माझ्या मतदारसंघातील कर्जत व

**[ प्रा. राम शिंदे ]**

जामखेड येथील गटविकास अधिकाऱ्यांची पदे गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त आहेत ती भरण्याबाबत मी ग्रामविकास मंत्री यांना भेटून सांगितले आहे. तसेच, माझ्या मतदारसंघातील गॉर्ज फिलींगची कामे पूर्ण करण्यात यावीत. आमच्या येथील रेवपुरीच्या अभयारण्याबाबत सुप्रीम कोर्टात दावा आहे, त्यामुळे कोणतीही इंडस्ट्री कर्जत तालुक्यात होत नाही. माननीय वन मंत्र्यांचे मी याकडे लक्ष वेधतो की, या संदर्भात काय निर्णय आहे, तो आम्हाला समजला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, ४-४, ५-५ गावांसाठी एकच तलाठी आहेत. आळसुंदे, देशमुख वाडी, सटवायी वाडी आणि काळाची वाडी येथे अवकाळी पावसामुळे फळबागांचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली पाहिजे.

त्याच बरोबर दुसरी बाब अशी की, सन्माननीय सदस्य, श्री. सावरा यांनी सांगितले की, ठाण्याची लोकसंख्या अधिक आहे. या सभागृहात आमच्या जिल्ह्याचे महसूल मंत्री असल्याने मी त्यांना सांगू इच्छितो भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने नगर जिल्हा मोठा आहे, त्याचे जिल्हा विभाजन झाले पाहिजे.

पर्यावरण संतुलीत ग्रामसमृद्धी योजना आणली त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत, त्याबद्दल मी माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे खास करून अभिनंदन करतो. परंतु, वाहनांमुळे कार्बन मोनोक्साईड वायुचे प्रदूषण होते. त्याबाबत कुठलेही चेकिंग न करता ५० रुपये घेऊन पीयुसी सर्टिफिकेट दिले जाते. याबाबत खास करून धोरणात्मक निर्णय घेऊन, त्याची अंमलबजावणी करावी, एवढीच या निमित्ताने मागणी करतो व माझे दोन शब्द संपवतो धन्यवाद !

**श्री. संजय सावकारे** : अध्यक्ष महाराज, मी महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यावर माझ्या सूचना करणार आहे. दहा रुपये, वीस रुपयाचे स्टॅम्प उपलब्ध होत नाहीत अशा वारंवार तक्रारी आमच्याकडे येत आहेत. त्यामुळे गरीब जनतेला पन्नास रुपये, शंभर रुपयांचे स्टॅम्प घ्यावे लागतात. म्हणून याकडे आपण तातडीने लक्ष द्यावे अशी मी विनंती करीत आहे. सौदेचिठ्ठीवर खरेदी-विक्री करता येत नाही. काही अधिकारी पोलिसांच्या मदतीने गरीब लोकांकडून सौदेचिठ्ठी करून जमिनी नावावर करून घेत आहेत. त्यामुळे कित्येक शेतकऱ्यांनी आपले प्राण दिलेले आहेत. त्यामुळे सौदेचिठ्ठीचा शासकीय मसुदा तयार करावा. जेणेकरून पुढे अशा घटना घडणार नाहीत.

तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय, पंचायत समिती कार्यालय येथून आम्हा लोकप्रतिनिधींना वारंवार विनंती केली जाते की, आमदार फंडातून संगणक द्यावे, फॅक्स मशिन द्यावे, झेरॉक्स मशिन द्यावे. आजच्या युगात या आवश्यक गोष्टी असताना महसूल विभागाने या गोष्टीकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

यानंतर मी वन विभागावर बोलणार आहे. आमचा सातपुडा हा हिरवागार होता. पण आज हा डोंगर ओसाड झालेला आहे. सातपुडा बचाव समिती व "सकाळ" यांनी याबाबत मोठी मोहीम हाती घेतली होती. तेव्हा याकडे आपण तातडीने लक्ष द्यावे. तसेच, जंगली प्राण्यामुळे नुकसान होत आहे. त्यामुळे चाऱ्या खोदणे आवश्यक आहे. माझ्या भुसावळ तालुक्यामध्ये काही गांवामध्ये जंगली प्राण्यांमुळे नुकसान होत आहे. त्यामुळे तेथे चाऱ्या खोदणे आवश्यक आहे.

[ श्री संजय सावकारे ]

ग्रामसेवक व तलाठी यांच्याकडे चार ते पाच गावांचा चार्ज असतो. त्यामुळे ते एकाही गावाला न्याय देऊ शकत नाही.

यानंतर मी पर्यावरण विभागावर बोलणार आहे. नशिराबाद जळगाव येथील ओरिएंट सिमेंट फॅक्टरीबाबत बऱ्याच तक्रारी आहेत. या फॅक्टरीमुळे शेतीचे नुकसान होत आहे. मी देखील तक्रार केली आहे. पण त्याबाबत अजून कारवाई झालेली नाही. माझ्या येथे थर्मल पॉवर स्टेशन आहे. राख वाहून नेण्यासाठी पाईप टाकले आहेत. हे पाईप शेतामधून जातात. त्यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. यासंबंधी देखील मी वारंवार तक्रार दिलेली आहे. यासंबंधी पर्यावरण विभागाने कारवाई करावी ही विनंती.

अध्यक्ष महाराज, भुसावळ तालुक्याचे तापमान ४९ डिग्रीपर्यंत गेलेले आहे. जळगाव जिल्ह्याचे तापमान वाढत चालले आहे. त्याचा अभ्यास करून योग्य ती उपाययोजना करावी अशी मी विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण वेळे अभावी पूर्ण करतो.

**श्री. चिमणराव पाटील** : अध्यक्ष महोदय, मी जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. लघुपाटबंधारे योजना, लोणी सिम, ता. पारोळा, जिल्हा जळगाव या योजनेला १९८३ साली मंजुरी मिळाली. २५ लाखाची योजना आता जवळजवळ ६ कोटी ७७ लाख रुपयांची झाली आहे. कोणताही दोष नसताना या २५ लाख रुपयांच्या योजनेला तब्बल ३० वर्षे लागली. याला कोण जबाबदार या तपशीलात, बारकाव्यात जाण्याची ही वेळ नाही. कारण नसताना रेंगाळलेली ही योजना लघुपाटबंधारे मंडळातून लवकरात लवकर पैसे उपलब्ध करून पूर्ण करावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करणार आहे.

यानंतर मी वन विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. १९७२-१९७४ पासून पाझर तलावांची कामे रेंगाळलेली आहेत. फॉरेस्टच्या जमिनीत काम करता येत नसल्यामुळे सदर कामे रेंगाळलेली आहेत. यात मोबदल्याचे देखील काही प्रश्न आहेत. मूळ ६ लाखाचा पाझर तलाव असताना वन विभाग एक ते दीड कोटी रुपयांची अपेक्षा करीत आहे.

माननीय वन मंत्री हे कार्यक्षम मंत्री आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, वन जमिनींमुळे जे प्रकल्प थांबले आहेत त्यासाठी संबंधित सर्व विभागांची बैठक घेऊन प्रकल्प कसे पूर्ण होतील यादृष्टीने प्रयत्न करावेत ... (अडथळा)... मागील ५० वर्षात आपण काही केले नाही म्हणून आमच्यावर असे बोलण्याची वेळ आलेली आहे. अनेक वर्षापासूनचे काही पाझर तलावांची कामे वन विभागाच्या मान्यते अभावी रखडलेली आहेत. तेव्हा पाझर तलावांची कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने पूर्ण प्रयत्न करावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या मतदारसंघात पद्मालय नावाचे स्वयंभू गणपतीचे मंदिर आहे. हे क्षेत्र पर्यटन स्थळ होण्याच्या दृष्टीने तो भाग चांगला विकसित करावा अशी विनंती आहे. आम्ही ११ कोटी रुपयांचा प्रोजेक्ट शासनास सादर केलेला आहे.

अध्यक्ष महाराज, वाळू वाहतुकीमुळे रस्ते खराब होतात आणि हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग दुरुस्त करीत नाहीत. ज्या रस्त्यांवरुन वाळू वाहतूक होते त्याठिकाणाहून शासनास महसूल मिळतो. तेव्हा महसूल विभागाने अशा रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मी विनंती करून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. सुधाकर भालेराव** : अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, ग्रामीण भागातील गोरगरीब जनता गायरान जमीन कसत असते. जे अशी जमीन, जे कसत असतील त्यांच्या नावावर जमिनीचे पट्टे करावेत या मागणीसाठी आम्ही अनेक मार्गाने प्रयत्न करून आणि उपोषण करूनही आमची मागणी मान्य झालेली नाही. तेव्हा आपण पर्यायी व्यवस्था करून त्या गोरगरीब जनतेच्या नावावर जमिनीचे पट्टे करावेत अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र जमीन अधिनियम कलम ३६ प्रमाणे भोगवटा वर्ग-२ केले आहे. परंतु कुळाची जमीन, महार वतन, माजी सैनिक, गायरान अतिक्रमण वाटपाच्या जमिनी या भोगवटा वर्ग-२ मध्ये कशाला ठेवता. या राज्यामध्ये एखादा साखर कारखाना आजारी पडला तर त्यासाठी एका रात्रीत नियमात बदल करण्यात येतात आणि तो विक्रीस काढला जातो. मग गोरगरीब जनतेच्या ताब्यात अशा काही जमिनी असतील तर त्याची विल्हेवाट लावण्याची व विक्री करण्याचे अधिकार त्यांना मिळाले पाहिजेत. कारण या गायरान जमिनी काळ्या कसदार जमिनी नाहीत. त्या निकृष्ट दर्जाच्या, माळरान, अत्यंत खडकाळ अशा स्वरूपाच्या जमिनी असतात आणि त्या गोरगरीब जनतेच्या ताब्यात आहेत. माझी विनंती आहे की, त्या जमिनी भोगवटा वर्ग -२ मधून भोगवटा वर्ग-१ मध्ये वर्ग करण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच लाभार्थ्यांना या जमिनींची विक्री करण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगीची आवश्यकता नसावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, राज्याचे तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे सध्या केंद्रामध्ये ग्राम विकास मंत्री आहेत. मी त्यांना लातूर येथे भेटलो होतो. मी त्यांना सांगितले की, आपण माझ्या जिल्ह्यातील आहात. आपण केंद्रात ग्रामविकास मंत्री आहात, परंतु आज आमच्या गावातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. आम्ही गावात प्रवास करू शकत नाही. रस्ते खराब का, याची लोकांना उत्तरे देऊ शकत नाही. त्यावेळी माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी सांगितले की, राज्याने एमडीआरला ओडीआर करण्यासंदर्भात निर्णय घेऊन केंद्र सरकारला तसा प्रस्ताव सादर केला तर निश्चितपणे या राज्यातील रस्ते चांगले होतील. आपल्या राज्याचे या कामासाठीचे बजेट अपुरे आहे. एमडीआर आणि ओडीआरसाठीचे बजेट अत्यंत अपुरे आहे. तेव्हा ग्रामीण भागातील रस्ते पीएमजीएसवाय योजनेमध्ये आणावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, मराठ्यांची पानिपतची लढाई सर्वश्रुत आहे. उदगीर ते दिल्ली असा मराठ्यांनी प्रवास केला होता. आपण अनेकदा हे टिव्हीवर पाहिले असेल. हे ऐतिहासिक शहर आहे. त्या ठिकाणी आजही ६० वर्षांच्या निजामकालीन इमारतीमध्ये तहसील कार्यालय आहे. काय दुर्दैव असेल ? अद्यापही त्या ठिकाणी तहसील कार्यालयाची निर्मिती होत नाही. डेप्युटी कलेक्टर त्या ठिकाणी असणाऱ्या उप विभागीय कार्यालयात ४-५ तालुक्यांचा कारभार सांभाळतात. परंतु, इमारत नसल्यामुळे अडचण होत आहे. माननीय महसूल मंत्र्यांना मी विनंती करीन की, त्या ठिकाणी लवकरात लवकर तहसील कार्यालय निर्माण व्हावे. अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

**श्री. रवींद्र वायकर** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम पर्यावरणाबद्दल बोलणार आहे. शासनाने पर्यावरणाच्या बाबतीत ठोस निर्णय घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. नदीमध्ये कारखान्यांतील द्रव्ये सोडली जातात. शासनाने या संदर्भात बंधन आणणे महत्त्वाचे आहे. मुंबईतील नद्यांचे, नाले झालेले आहेत. दहिसर नदी, मिठी नदी, बोईसर नदी यांचे नाले झाले आहेत. आपण या संदर्भात विचार करून योग्य व उचित कार्यवाही करणे गरजेचे आहे, अशी मी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये या संदर्भातील उत्तराची अपेक्षा करतो. अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये मेडिमिक्स प्लँट लावले आहेत, त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. मुंबईसारख्या गजबजलेल्या वस्तीमध्ये हे प्लँट आहेत, ते बंद करणे किंवा त्यावर निर्बंध आणणे गरजेचे आहे. आज मोठमोठे डोंगर खोदले जात आहेत. मुंबई शहर उपनगरांमध्ये डोंगर खोदण्याचे प्रमाण वाढले आहे. महाकाली गुंफा, कान्हेरी गुंफा यांच्या आजुबाजूचे डोंगर खोदले आहेत. डोंगर खोदकामाला कोण परवानगी देते ? महसूल विभागाने या संदर्भात लक्ष घातले पाहिजे. बिल्डर ५० मजल्यांच्या इमारती बांधत आहेत. जमीन खोदून बेसमेंटमध्ये जाऊन पुन्हा तेवढ्या उंचीच्या इमारती बांधत आहेत. शासनाने त्याकडे लक्ष दिले पाहिजे. डोंगरांमधील चढ उतार नष्ट होऊ नयेत. पर्यावरणाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. आपण याचा देखील विचार करणे महत्त्वाचे आहे. बिल्डरांचे ते उद्दिष्ट साध्य होऊ देऊ नये.

अध्यक्ष महोदय, उत्पन्नाचे मुख्य साधन स्टॅम्प ड्युटी आहे, रजिस्ट्रेशन ड्युटी आहे. मुंबई शहरात रजिस्ट्रेशन ऑफिसच्या ठिकाणी कोणत्याही सोयीसुविधा नाहीत, त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अध्यक्ष महोदय, डीम्ड कन्व्हेयन्स डीड देण्यासंदर्भातील पुनर्विचार केला गेला आहे. शासनाने ते चांगले उद्दिष्ट आणले आहे. मुंबई शहरामध्ये फक्त २ सोसायट्यांचे डीम्ड कन्व्हेयन्स झाले आहे. ज्या पद्धतीचे प्रबोधन व्हायला पाहिजे, त्याप्रमाणे झालेले नाही. कलेक्टरच्या माध्यमातून आपण प्रचार केला पाहिजे. हे सोयीचे, योग्य कसे होईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, आरे कॉलनी या ठिकाणी ७ पाड्यांना विजेच्या संदर्भातील एनओसी दिली जात नाही. फाईल इकडून तिकडे फिरत आहे. पासिंग ऑफ द फाईल असा प्रकार आहे. आरेच्या सीईओंकडून कमिशनरकडे, कमिशनरकडून डिपार्टमेंटकडे फाईल जात आहे. महसूल विभागाच्या माध्यमातून माननीय मंत्र्याशी संपर्क साधला आहे, सचिवांना भेटलो आहे. सन १८६० पासून तेथे राहत असलेल्या लोकांना अजूनही एनओसी मिळत नाही. मी या संदर्भातील उत्तराची अपेक्षा करीत आहे. अध्यक्ष महोदय, महसूल विभागामध्ये ३-३ महिने फाईल राहिली आहे आपण त्या लोकांना विजेचे कनेक्शन देणार की नाही, याचे देखील माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे. मला माननीय मंत्र्यांकडून या सर्व मुद्द्यांसंदर्भातील उत्तराची अपेक्षा आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. संजय भेगडे** : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन, पर्यावरण, ग्रामविकास व जलसंधारण या विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेसाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागातील मंत्री हे माझ्या मावळ मतदारसंघातील रामभाऊ परुळेकर विद्या निकेतनचे विद्यार्थी आहेत. पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजना चांगल्या पद्धतीने संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्याचा संकल्प केला आहे, त्याबद्दल मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो. ग्रामपंचायतींना पर्यावरणाच्या माध्यमातून स्वच्छ सुंदर करण्याचा संकल्प केला गेला आहे. त्यापद्धतीने, ग्रामपंचायत प्रवेशाच्या ठिकाणी स्वागत कमानी उभारण्याचा निर्णय घेतला तर संपूर्ण राज्यामध्ये ग्रामपंचायत आदर्श होण्याबाबतचा हा नवीन कार्यक्रम होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागामार्फत सायकल, सौर कंदील अशा प्रकारचे साहित्य वाटप केले जाते. परंतु, हे सर्व साहित्य निकृष्ट दर्जाचे दिले जाते. पुढील काळात आयएसआय प्रमाणित शासनाच्या रेट कॉन्ट्रॅक्टवरील कंपन्यांकडूनच निविदा मागविण्यात याव्यात व दर्जेदार साहित्याचे वाटप करावे, अशा प्रकारची माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, मावळ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी वसाहतीकरिता जमीन संपादन करण्यासाठी ९४ लाख ५७ हजार रुपये खर्चाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. हा प्रस्ताव मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ब्रिटिश सरकारने सन १९३० मध्ये देशातील संपूर्ण जमिनींचा गावनिहाय सर्व्हे केला होता. परंतु, सन १९३० पासून आजपर्यन्त सर्व्हे झालेला नाही. आज परिस्थिती अशी आहे की, एका जमिनीचे ५-१० तुकडे झाले आहेत. परंतु, पुन्हा सर्व्हे न झाल्यामुळे गावातील जमिनींचे वाद मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले आहेत. गावातील रस्ते, जमिनी, जंगल रस्ते या सर्वांचा पुन्हा एकदा सर्व्हे झाला तर महाराष्ट्राला चांगला फायदा होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण येथे पूर्ण करतो. धन्यवाद.

**श्री. जयकुमार रावल** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ हा मागासलेल्या भागात मोडतो. या भागाला बीआरजीएस अंतर्गत ग्रँट देण्यात आली. परंतु, कोणताही विकास होत नाही. कारण, प्रत्येक गावाला २ लाख रुपये देण्यात येतात. त्याऐवजी या निधीतून साठवण बंधारे, जलसंधारण अशा प्रकारची कामे केली तर योग्य होईल, असे वाटते.

अध्यक्ष महोदय, आमच्या भागात उन्हाळ्यामध्ये प्रत्येक गावात आग लागते आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे १० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना अग्निशमन बंब उपलब्ध करून देण्याचा विचार माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील शिंदखेडा या गावची लोकसंख्या २५ हजार आहे. त्या ठिकाणी नगरपंचायत स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे. शासनाची ना-हरकत मागविण्यात आली असून या प्रस्तावाला शासनाने मान्यता द्यावी, अशी माझी विनंती आहे.

**[ श्री. जयकुमार रावल ]**

अध्यक्ष महोदय, मागील काळात केंद्रामध्ये आपल्या राज्याचे मंत्री नसताना विशिष्ट राज्यांना पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून बराच निधी दिला गेला. पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून महाराष्ट्र राज्याला मोठ्या प्रमाणावर न्याय मिळण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पंचायती राज प्रणाली बळकट करीत असतांना जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या कामामध्ये अधिकारी आणि कर्मचारीवृंदाची असमानता आहे. पंचायत समिती सदस्यांची अशी आग्रही मागणी आहे की, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीमध्ये सगळ्या अधिकाऱ्यांचे समान वाटप करावे. त्यांची ही मागणी शासनाने मान्य करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय ग्रामविकास मंत्री यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. मागील ४ महिन्यांपासून त्यांनी पूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला आहे. माझ्याही मतदारसंघात ते आले होते. त्यांनी पंचायत समितीच्या ४० वर्षे जुन्या प्रशासकीय इमारतीची पुर्नबांधणी करण्याबाबतचे आश्वासन दिले आहे. हे आश्वासन त्यांनी पूर्ण करावे, अशा प्रकारची विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, बाभुळदे आणि दुसाने येथे जो भ्रष्टाचार झाला त्यासंदर्भातील पत्र मी मंत्री महोदयांना देणार आहे. त्याबाबत कारवाई करण्यात यावी. टाऊन प्लॅनिग ग्रामीण भागात लावण्यात यावा अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग भ्रष्टाचारात एक नंबरवर आहे. त्यांचा प्रमुख कलेक्टर असतो. कलेक्शनपासून त्यांचे काम सुरू होते. मागील काळात मी अमेरिका येथे गेलो असताना नासाने तेथे प्रत्येक शेताला मॅपिंग करण्यास सांगितले आहे. महसूल विभागाने तलाठ्यांना लॅपटॉप देऊन हे सर्व मॅपिंग करण्याचे काम केले पाहिजे. असे मंत्री महोदयांना करता आले तर ते योग्य होईल. महसूल विभागातील भ्रष्टाचार कसा कमी होईल, यासाठी मंत्री महोदयांनी प्रयत्न करावयास पाहिजेत. ७/१२ चा उतारा किती दिवसांत देणार, कोणत्या कागदांना किती वेळ लागणार याचे नियम तयार करावयास पाहिजे. रेती माफिया, वाळू माफिया माझ्या टाकरखेड भागात आहेत. याबाबत मंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी अशी विनंती करतो व वेळे अभावी भाषण संपवितो.

**श्री. सुरेश धस** : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास मंत्री महोदयांचे मी आभार मानतो. त्याचप्रमाणे रोजगार हमी योजना मंत्री महोदयांचे मी आभार मानतो. त्यांनी गावातील मंदिरे, शाळा, स्मशानभूमी इतर ठिकाणी जी मोकळी जागा आहे, त्या जागेवर अधिक वयाचे वृक्ष लावण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही मंत्री महोदयांचे मी मनापासून आभार मानतो. मच्छिंद्रनाथ गडाला एक कोटी रुपये तीर्थक्षेत्र विकासाच्या माध्यमातून देण्यात आले आहेत. त्यामुळे या दोन्ही मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो. महसूल मंत्री महोदयांना मी एक विनंती करतो की, महसूल विभागात खातेफोड कशी होते हे आम्हाला समजून सांगा. स्वत:च्या नावावरील जमीन मुलांच्या व मुलींच्या नावावर करताना ती १०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर करण्याचा शासन निर्णय आहे. देशमुख नावाची एक व्यक्ती नागपूरच्या कोर्टात गेली व कोर्टाकडून असा आदेश घेतला. त्यावेळेपासून १०० रुपयाच्या

**[ श्री. सुरेश धस ]**

स्टॅम्पपेपरवर खातेफोड होत होती ती पुन्हा बंद झाली आहे. स्वत:च्या बहिणीला दुसरी पार्टी व स्वत:ला एक पार्टी करून कोर्टात जावे लागते, २०० रुपयांचा स्टॅम्पपेपर त्यासाठी लागतो. दोन्ही वकिलांना पाच पाच हजार रुपये द्यावे लागतात. तेव्हा खातेफोड होते. १०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर खातेफोड होईल असा जो जीआर होता तो पुन्हा शेतकऱ्यांच्या बाबतीत लागू करावा.

अध्यक्ष महोदय, वाय.एस.आर.राजशेखर रेड्डी यांच्या सरकारच्या निर्णयाच्या विरोधात हा शेतकरी हैद्राबादच्या न्यायालयात गेला. तेथून तो सुप्रीम कोर्टात गेला. याबाबत सुप्रीम कोर्टाने नागप्पा इशप्पा गुंडप्पा यांच्या विरोधात निर्णय दिला आहे. तो निर्णय दिल्याबरोबर विधी व न्याय विभागाला कळविले आहे. २००५ सालापासून विधी व न्याय विभागाने महसूल विभागाला कळविले आहे. मदत व पुनर्वसन खात्याने लगेच जीआर काढला, शेतकऱ्यांची जमीन ताब्यात घेत असताना भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्याला जमिनीचे पैसे वेगळे मिळत होते. जमिनीतील झाडांचे पैसे वेगळे मिळत होते. नागप्पा इशप्पा गुंडप्पाच्या केसमध्ये शासनाने जीआर काढला आहे. जमिनीचे किंवा फळझाडांचे पैसे यापैकी जी अधिकची रक्कम होईल तेवढीच रक्कम देण्यात येईल. हा निर्णय महाराष्ट्र राज्यात लागू केलेला आहे. श्री. नारायण राणे महसूल मंत्री असताना त्यांना विनंती केली त्यावेळी ते म्हणाले की, विधी व न्याय विभागाकडे पाठवून ते परत सुप्रीम कोर्टापुढे मांडावे लागणार आहे. आता ते उद्योग मंत्री आहेत. आता सर्वात सहिष्णू, शांत आणि अत्यंत चांगले मंत्री या खात्याला लाभले आहेत. माझी महसूल मंत्र्यांना विनंती आहे की, शासन शेतकऱ्यांची जमीन संपादित करते. जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत १० लाख रुपये देऊ, २० लाख रुपयांचे अमुक करू असे सांगण्यात आले. (...अडथळा...) नागप्पा गोंडप्पा विशप्पाचे जे भूत आमच्या डोक्यावर बसलेले आहे ते सुप्रीम कोर्टात गेल्याशिवाय उतरणार नाही. सन १९९० चा शासन निर्णय आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी त्या शासन निर्णयामध्ये ताबडतोब बदल करावा, अशी माझी विनंती आहे. मागासवर्गीयांनी गायरान जमिनी अतिक्रमित केलेल्या आहेत. मुंबई शहरातील सन १९९५ पर्यंतच्या झोपड्या अधिकृत करण्यात येतात आणि सन २००० पर्यंतच्या झोपड्या अधिकृत करण्यासंदर्भात सुप्रीम कोर्टात ॲफिडेव्हीट दाखल केले जाते. ज्या दलित समाजाच्या लोकांनी गायरानाच्या जमिनी अतिक्रमित केलेल्या आहेत त्यासंदर्भात शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंधारण विभागासाठी स्वतंत्र आयुक्तालय असावे किंवा जलसंधारण विभागासाठी स्वतंत्र चीफ इंजिनिअर असावा, अशी माझी जलसंधारण मंत्र्यांना विनंती आहे. मोठ्या प्रमाणावर चांगले काम करीत असतांना सुद्धा त्यांना स्वतंत्र अधिकारी वर्ग नाही. अध्यक्ष महोदय, सन १९९७ सालापासून ० ते १०० हेक्टर आणि १०१ ते २५० हेक्टरसाठी कमी निधी दिला जात आहे. या विभागाला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दिला पाहिजे, अशी माझी विनंती आहे. आपण प्रत्येक वेळी म्हणतो की, जलसंपदा विभागाला ७ हजार कोटी, ८ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. ५ एमसीएफटीच्या आतील जे केटीवेअर आहेत, पाझर तलाव आहेत त्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून दिला जात नाही. त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी माझी विनंती आहे.

[ श्री. सुरेश धस ]

अध्यक्ष महोदय, जपानमध्ये त्सुनामी आली आणि ३.५ मिनिटांमध्ये संपूर्ण जपान हादरले. वन मंत्री, पर्यावरण मंत्री आणि सामाजिक वनीकरण मंत्र्यांना माझी विनंती आहे की, जपानची अवस्था काय झाली हे आपण बघितलेले आहे. वन मंत्री महोदय तुमच्या भारती विद्यापीठाचे काम अतिशय चांगले आहे. परंतु वन विभागाच्या बाबतीत तुमचे मॅनेजमेंट का चांगले होत नाही ? वन विभागामध्ये सर्व बिहारचेच अधिकारी आहेत काय ? वन विभागामध्ये बिहार राज्यातून आलेल्या अधिकाऱ्यांची संख्या जास्त आहे. वन विभागामध्ये महाराष्ट्र राज्यातील डीएफओ वगैरे अधिकारी नाहीत. वनमंत्री महोदय, राज्यातील वाघ आणि गेंडे यांची संख्या वाढलेली आहे. वन मंत्र्यांनी डोंगरातील झाडांची संख्या सुद्धा वाढविली पाहिजे. तुमच्या विभागाकडे पैसे नसतील तर एमआरईजीएस मधून ही योजना राबविण्यात यावी. संतुलित ग्रामसमृद्ध योजनेसाठी निधीची तरतूद केली जाते. मध्य प्रदेशमध्ये माननीय श्री. शिवराजसिंग चौहानसाहेबांनी रस्त्याच्या कडेला झाडे लावलेली आहेत आणि बिहारमध्ये माननीय श्री. नितीश कुमारसाहेबांनी वन विभागाच्या जागेवरील २०० झाडे एका व्यक्तीला सांभाळण्यासाठी दिली आणि त्याचे संपूर्ण कुटुंब एमआरईजीएसध्ये घेतले.

**उपाध्यक्ष** : आता माननीय महसूल मंत्र्यांनी आपले उत्तर सुरू करावे.

**श्री. सुरेश धस** : अध्यक्ष महोदय, ...

**उपाध्यक्ष** : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर मी आपल्याला प्रश्न विचारण्याची संधी देईन.

**श्री. सुरेश हाळवणकर** : अध्यक्ष महोदय, मी भाषण करण्यासाठी उभा नाही. मी माझे मुद्दे लेखी स्वरूपात मंत्री महोदयांकडे देतो. माननीय मंत्री महोदयांनी मला लेखी स्वरूपात उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष** : ठीक आहे. आता माननीय महसूल मंत्र्यांनी आपले उत्तर सुरू करावे.

**श्री. बाळासाहेब थोरात** ( महसूल मंत्री ) : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत मोठ्या हिरीरिने भाग घेऊन अनेक सूचना केलेल्या आहेत. अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेला दुपारी ३.०० वाजता सुरूवात झाली होती. आता त्या चर्चेला जवळजवळ ७ तास झालेले आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी महसूल खात्यावर मौलिक सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी जवळ जवळ २५० सूचना केलेल्या आहेत. त्या सर्वांना उत्तर देण्यास मला कोणतीही अडचण नाही. याला कमीत कमी दीड तासाचा वेळ लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यामध्ये व्यक्तिगत सूचनांची मी नोंद घेतलेली आहे. त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. पण ज्या सूचना सामूहिक स्वरूपात केलेल्या आहेत, त्यावर मी थोडक्यात चर्चा करणार आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग हा अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. महसूल खात्याचे महत्त्व खूप मोठे आहे. महसूल निर्माण करून देणे ही खात्याची महत्त्वाची जबादारी असते. राज्याचा विकास करण्याकरिता अधिकाअधिक महसूल निर्माण करण्याचे काम महसूल विभागाला करावे लागते. अधिकाधिक महसूल गोळा करून राज्याच्या तिजोरीत टाकण्याचे काम महसूल विभागाला करावे लागते. त्यामुळे तेथूनच राज्याच्या विकासाची वाटचाल निश्चित होत असते. सर्वसामान्य लोकांच्या जबाबदाऱ्या सुद्धा महसूल विभागाकडे आहेत.

**[ श्री. बाळासाहेब थोरात ]**

अध्यक्ष महोदय, तलाठी आणि कोतवाल हा शेवटचा घटक असतो. तो गावाच्या पातळीवर शेवटच्या घटकांपर्यंत काम करीत असतो. यामध्ये वरिष्ठांपासून कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांचा त्या त्या प्रमाणात संबंध येत असतो. महसूल विभाग रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग असल्यामुळे अनेक तक्रारी येणे हे स्वाभावीकच आहे. यामध्ये अधिकारी नाहीत, रिक्त जागा आहेत, नोंदी वेळेवर होत नाही, दाखले वेळेवर मिळत नाही, अशा अनेक तक्रारी महसूल खात्याच्या संदर्भात असतात. याकरिता महसूल खात्यामार्फत नावीन्यपूर्ण योजना राबविण्याचा प्रयत्न केला जात असतो. त्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरीब लोकांना दिलासा मिळणार आहे. मी गेल्या चार ते सहा महिन्यांपासून महसूल विभागात काम करीत आहे. मी अनेक लोकप्रतिनधी, अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केलेली आहे. लोकांना भेटूनसुद्धा अनेक गोष्टी मी जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी निरनिराळ्या अनेक चांगल्या योजना जिल्ह्यात राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. याकरिता त्यांचे अभिनंदन करणे अतिशय जरूरीचे आहे.

अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्हाधिकारी यांनी शाळेत दाखले देण्यासंदर्भातील एक चांगली योजना आणलेली आहे. दहावी झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना दाखल्यांची गरज असते. जर आपण नववीच्या विद्यार्थ्यांना शाळेत दाखले देऊ शकलो तर दाखले देण्याच्या संदर्भातील प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. तसेच शिबिरे आयोजित करून शाळेतील मुलांना दाखले देण्याची अभिनव योजना राबविलेली आहे.

अध्यक्ष महोदय, लातूरचे जिल्हाधिकारी यांनी शिवारातून रस्ते काढून देण्याची एक अभिनव योजना आणलेली आहे. परिणामी आज त्या ठिकाणी शेकडो कि.मी. चे रस्ते झालेले आहेत. सदर योजना सुरू करताना प्रथम त्रास झाला. पण त्यानंतर लोकांनी मोठ्या सहभागाने या योजनेला प्रचंड प्रतिसाद दिल्यामुळे पांदन रस्ते काढून देण्याचे काम खूप मोठ्या प्रमाणात झालेले आहे. त्या ठिकाणी तलावातील गाळ काढण्याचा कार्यक्रम यशस्वीरितीने पार पाडलेला आहे. त्या ठिकाणचा गाळ शेतात नेऊन टाकल्यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत झालेली आहे. हे आम्हाला लातुरमध्ये पहायला मिळालेले आहे.

अध्यक्ष महोदय, वर्धा जिल्ह्यात समाधान योजना चांगल्यारितीने राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अधिकाऱ्यांनी वर्धा जिल्ह्यातील सर्कलच्या पातळीवर जाऊन लोकांचे प्रश्न सोडविण्यास मदत केलेली आहे. त्या योजनेला समाधान योजना असे नाव ठेवलेले आहे.

अध्यक्ष महोदय, नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ई-शासन प्रणाली राबविलेली आहे. ऑनलाईन पद्धतीने संपूर्ण जिल्ह्यात ७/१२ देण्याचा अभिनव उपक्रम राबविलेला आहे.

अध्यक्ष महोदय, जळगाव जिल्ह्यामध्ये ई-लोकशाही प्रणाली राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. याचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात सुद्धा करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी बीड जिल्ह्यात घरपोच धान्य देण्याबाबतची योजना राबविली. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांनी कॉन्फरन्समध्ये या योजनेबाबत माहिती दिली. दिनांक १ मे पासून ही योजना संपूर्ण राज्यात लागू करण्याचा शासनाचा मानस आहे, त्या अनुषंगाने शासन निर्णयही काढण्यात येतील. ही सर्व सिस्टम १ मे पासून सर्व राज्यात होईल

**[ श्री. बाळासाहेब थोरात ]**

असेही समजण्याचे कारण नाही. त्यासाठी काही कालावधी जावा लागेल. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने आम्ही ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सध्याचे युग हे ऑनलाईन संगणकाचे युग आहे. सर्वसामान्य जनतेला निश्चितपणे या योजनेची मदत होईल, अशा प्रकारचा अभिनव उपक्रम हे शासन हाती घेत आहे, हे मी मुद्दाम आपणास सांगू इच्छितो. महसूल विभागाच्या मागण्यांवर बऱ्यांच सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. परंतु मी सर्वच मुद्यांवर न बोलता फक्त प्रमुख मुद्यांसंबंधी खुलासा करणार आहे.

सन्माननीय सदस्यांनी रेडीरेकनरच्या दरमध्ये वाढ केल्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, गेल्या तीन वर्षांपासून शासनाने रेडीरेकनरच्या दरामध्ये कोणतीही वाढ केली नव्हती. मध्यंतरीच्या काळामध्ये मंदीची लाट असल्यामुळे रेडीरेकनरचे रेट वाढविण्यात आले नव्हते. आता सन २०११ मध्ये रेडीरेकनरच्या दरामध्ये १५ ते २० टक्क्यांनी वाढ केली आहे. रेडीरेकनरचे खरेदी-विक्रीचे रेट पाहिले तर त्या मानाने ही वाढ अतिशय कमी आहे, ही वस्तुस्थिती आपणा सर्वांना मान्य करावी लागेल. रेडीरेकनरसंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, रेडीरेकनरच्या संदर्भात लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले जाते, परंतु त्यानंतरच लगेच दिनांक ३०, ३१ तारखेला रेडीरेकनरचे रेट वाढविण्याबाबात निर्णय घेतला जातो. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे रेडीरेकनरचे रेट पुढच्या काळात जेव्हा वाढविण्यात येतील तेव्हा त्यांचे म्हणणे चार महिने अगोदर ऐकून घेण्यात येईल, त्याबाबत आमची कसलीही हरकत राहणार नाही.

सन्माननीय सदस्यांनी मॉल्सच्याबाबतीत मुद्दा उपस्थित केला की, मुद्रांक शुल्काची वसुली करण्यात आली नाही. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ३३ मॉल्सकडून जवळजवळ १८ कोटी रुपये वसूल केले आहेत. मॉल्समध्ये गाळ्यांच्या खेरदी-विक्रीचे व्यवहार करतात, ते शोधून काढून त्यावर स्टॅम्प ड्युटी लावून ती वसूल केलेली आहे. काही मॉल्सची वसुली बाकी आहे, ती केली जाईल हे मी आपल्याला सांगू इच्छितो. फ्लॅट खरेदी-विक्री संदर्भातील स्टॅम्प ड्युटीसंदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. परंतु हा विषय गृहनिर्माण विभागाशी तसेच नगरविकास विभागाशी निगडित आहे. या सर्वांवर निर्णय घेण्यासाठी सर्व एकत्रित बसून यावर निश्चितपणे विचार करण्यात येईल.

अध्यक्ष महाराज, सर्व्हेअरची पदे मिळत नाही, याबाबत या सभागृहात चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार रावल यांनी एक गोष्ट सांगितली की, बदलत्या काळात सॅटेलाईटच्या सहाय्याने जागांचा सर्व्हे झाला पाहिजे. त्यांचे म्हणणे बरोबर आहे, त्याप्रमाणे करण्यात येईल. परंतु भूमापक मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शासन आऊट सोर्सींगच्या माध्यमातून निर्णय घेत आहे. सर्व्हेअरच्या त्रुटी सुद्धा कमी होतील, हे मी या निमित्ताने आपणास सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्यांनी भिवंडी येथील गोदामाचा मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबत निश्चितपणे कागदपत्रे पाहून त्यावर बोलणे योग्य होईल. तेथील प्रकरण कशा पद्धतीने घडले याबाबत निर्णय घेता येईल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुधागड येथील मुद्दा उपस्थित केला, त्याबाबतही विचार करण्यात येईल.

**[ श्री. बाळासाहेब थोरात ]**

सन्माननीय सदस्यांनी वाळू संदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता, याबाबतीत मी सांगू इच्छितो की, पुढील वाळूचा लिलाव 'इ' टेंडर पद्धतीने केला जाईल. वाळूच्या लिलावामध्ये कसलीही अडचण येणार नाही. वाळूचा लिलाव का केला जातो, असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला, या संदर्भात मी सांगू इच्छितो की, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार वाळूचा लिलाव करण्यात आलेला आहे, ही वस्तुस्थिती मी आपल्या निदर्शनास आणून देतो. यंदा वाळूच्या संदर्भात न्यायालयाने स्टे दिला होता. त्यानंतर एक समिती नेमण्यात आली. हा विषय मंत्रिमंडळापुढे मांडला गेला. पुन्हा हायकोर्टमध्ये हे प्रकरण गेले. यामुळे यंदाच्या वर्षी वाळूचा लिलाव करण्यास बराच उशीर झालेला आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. मात्र ते होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती देखील मी या ठिकाणी सांगू इच्छितो. वाळूच्या संदर्भात अनेक अडचणी येत आहेत. अनधिकृतपणे वाळू उचलली जाते. त्याला बंधन घालण्याचा प्रयत्न महसूल विभागातील अधिकारी करीत आहेत. त्याकरिता पोलिसांचे सहकार्य घेतले जात आहे. सन्माननीय सदस्यांनी वाळूच्या संदर्भात सूचना केली आहे, त्याची निश्चितपणे नोंद घेतली जाईल.

अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्य वाळूच्या प्रश्नाशी निगडित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, वाळूचा अनधिकृत उपसा होत असतो. वाळू उचलणारा एक तर आपला कार्यकर्ता असतो किंवा नंतर तो कार्यकर्ता होणार असतो. तुमच्या-आमच्या सर्वांची हीच स्थिती आहे. ज्याला संरक्षण मिळते, त्याचा तो कार्यकर्ता असू शकतो. वाळूची गाडी पकडल्यानंतर फोन करावयाचा नाही, अशी काळजी आपण घेतली तर जवळजवळ निम्म्या अडचणी कमी होऊ शकतील. यामुळे आम्हाला मदत मिळू शकेल. कार्यकर्ता अडचणीत आल्याचे सांगितले जाते. यामुळे प्रशासनामध्ये अडचणी निर्माण होतात, हे कोणालाच नाकारता येणार नाही. ही प्रॅक्टीकल परिस्थिती आहे. या संदर्भात आणखी शिस्त आणण्याची आवश्यकता आहे. मी कोणत्याच एका गोष्टीवर बोट ठेवत नाही. प्रत्येक मतदारसंघामध्ये या अडचणी आलेल्या आहेत, हे आपल्याला नाकारता येणार नाही. वाळूच्या संदर्भात महसूल कसा वाढवता येईल, सहजता कशी आणता येईल या संदर्भात आपल्या आणखी काही सूचना असतील, तर त्यांचा निश्चितपणे विचार केला जाईल. सतत परिवर्तन करून अधिक चांगल्या पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे मी आपल्याला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, रिक्त पदांच्या संदर्भात मोठा प्रश्न आहे, हे आपल्याला नाकारता येणार नाही. अपर जिल्हाधिकाऱ्यांची काही पदे रिक्त होती. त्यांचे आता प्रमोशन झालेले आहे. त्यामुळे त्या जागा आता भरलेल्या आहेत. ज्यावेळी प्रमोशन दिले जाते, त्यावेळी खालच्या पातळीवरील पदे रिक्त होतात. प्रमोशनमुळे ही अडचण निर्माण झालेली आहे. येत्या २ ते ३ वर्षांत सरळभरतीने जागा भरल्या गेलेल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. सरळभरती करणे, परीक्षा घेणे याचे शेड्युल लवकरात लवकर तयार करून, ही पदे भरली जातील. याकरिता एका महिन्यात शेड्युल करता येणार नाही. विभागात पदे रिक्त होत राहतात. ती आपल्याला भरावी लागतील. ही सतत चालणारी प्रोसेस आहे. येत्या ६ महिन्यांत रिक्त पदांच्या संदर्भात विभागामध्ये खूप चांगल्या प्रकारचा बदल झालेला आपल्याला दिसून येईल. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार व सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांनी रिक्त पदांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

[ श्री. बाळासाहेब थोरात ]

अध्यक्ष महोदय, जमिनींच्या प्लॉटच्या वाटपाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. काही स्पेसिफिक गोष्ट असेल तर आपण आम्हाला सांगावे. त्याबाबत निश्चितपणे मदत केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांनी भिवंडी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या संदर्भात एक तक्रार केली होती. या संदर्भात अहवाल तयार केला जात आहे. त्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू केलेली आहे. संबंधित अधिकाऱ्यांची पुन्हा बदली केली आहे. चौकशीमध्ये परिणाम होऊ नये, याकरिता निलंबनाची कारवाई केली जाते. त्यांची आता अकार्यकारी पदावर नेमणूक झाल्या शिवाय राहणार नाही, हे मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, काही विषय येथे उपस्थित करीत असताना, जिल्हा विभाजन व तालुका विभाजनाचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर आलेले आहेत. जिल्हा विभाजन व तालुका विभाजन हा छोटा भाग आहे, असे मी मानत नाही. ठाणे हा मोठा जिल्हा आहे, ही वस्तुस्थिती आहे आणि त्याला मॅनेज करणे हे आवाक्याच्या बाहेर आहे, हे देखील मी नाकारत नाही. तसेच, जत हा मोठा तालुका आहे. अशा अनेक जिल्हा व तालुक्यांचे प्रश्न आहेत, हे मी या निमित्ताने सांगतो. यामध्ये मंत्रीमंडळाच्या एका उपसमितीमध्ये काही बाबतीत चर्चा केलेली आहे व पुढेही यावर एकत्रित अहवाल तयार करण्याबाबत चर्चा सुरू आहे. या उपसमितीमध्ये पुढच्या काळामध्ये काही निर्णय होतील.

अध्यक्ष महोदय, वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत एक तर मान्य करावे लागेल की, जो वन हक्क कायदा आहे, त्या अंतर्गत ज्या आदिवासीचे अतिक्रमण आहे, ते नियमित करण्याचा निर्णय युपीए सरकारने आदरणीय सोनियाजींच्या नेतृत्वाखाली घेतला आणि तो एक ऐतिहासिक निर्णय आहे, हे नाकारता येत नाही. या निमित्ताने इतिहासातील आमची चूक आम्ही दुरुस्त करीत आहोत, हे सुद्धा मान्य केले आहे. हे सगळे जास्तीत जास्त परिणामकारक होण्यासाठी वन विभाग, आदिवासी विकास विभाग कार्यरत आहे. याचे इम्प्लिमेंटेशन आमच्या महसूल विभागाकडे असले, तरी ते जास्तीतजास्त चांगल्या पद्धतीने कसे होईल, यासाठी प्रयत्न करून जास्तीतजास्त आदिवासींना न्याय कसा मिळेल, हा आमचा विचार आहे.

सन्माननीय सदस्य, श्री. आनंदराव गेडाम यांचे जे प्रश्न होते, त्याबाबत निश्चितपणे प्रयत्न सुरू आहेत. सन्माननीय सदस्यांनी खरे म्हणजे भाषण केल्यानंतर उपस्थित राहिले पाहिजे. अन्यथा जे सन्माननीय सदस्य उपस्थित असतील, त्यांच्याच प्रश्नांना उत्तर दिले पाहिजे असा नियम पुढे आपल्याला करावा लागेल.

अध्यक्ष महाराज, अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक विषय येथे उपस्थित केले. त्यामध्ये सन्माननीय सदस्य, श्री. बच्चू कडू यांनी तलाठी कार्यालय, सांगली येथेच कसे, असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु, आपण आता यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहोत. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांनी वित्त विभागाद्वारे हे मान्य केलेले आहे. सगळी जिल्हाधिकारी कार्यालये व तहसील कार्यालये अद्ययावत करण्याच्या दृष्टीने त्यांचे सहकार्य राहणार आहे. या व्यतिरिक्त मंडल कार्यालयही अद्ययावत केले जाणार आहे. आपण पुढच्या काळामध्ये संपूर्णपणे ई-प्रणाली स्वीकारणार आहोत. त्या अंतर्गत दाखले लवकर मिळण्याबाबत प्रयत्न करीत आहोत. यादृष्टीने तलाठ्यांचा भार कमी होणार असला, तरी अद्ययावत ऑफिसेस असली पाहिजेत, हे सुद्धा मी सांगेन.

**[ श्री. बाळासाहेब थोरात ]**

सन्माननीय सदस्य, श्री. बाबा सिद्दिकी यांनी मुंबई व इतर शहरातील एनए टॅक्सच्या बाबतीत उल्लेख केला की, ''आपल्या शहरातील जमिनींवर एनए टॅक्स बसविला जात आहे.'' याबाबत आम्ही निश्चित प्रस्ताव तयार करून मंत्री मंडळापुढे ठेवणार आहोत.

सन्माननीय सदस्यांनी आणखी एक सांगितले की, प्रॉपर्टी कार्डवर अक्षरी नोंद असावी. बऱ्याच वेळा प्रॉपटी कार्डवर आकडे असतात, त्यामध्ये खाडाखोड असल्याने ते पुन्हा अक्षरी करावे लागतात. याबाबतीत निश्चित सूचना दिल्या जातील.

अध्यक्ष महोदय, स्टॅम्प ड्युटीची स्कीम झाली, सोसायटीच्या बाबतील डिम्ड् कन्व्हेयन्सचा निर्णय झाला, पण त्याचे इम्प्लिमेंटेशन चांगले झालेले नाही. आपण याबाबत येत्या १ मे पासून दोन महिन्यांमध्ये जास्तीत जास्त प्रसार करून ते घडवून आणण्याचा प्रयत्न करूया. डिम्ड् कन्व्हेयन्सच्या बाबतीतील निर्णय घेतलेला आहे. जो बिल्डर एफएसआय देणार आहे तो कुठेतरी निघून गेला, सोसायटी तयार झाल्यानंतर जर तो ते द्यायला तयार नसेल, तर त्याबाबतीत जास्तीतजास्त चांगला निर्णय घेण्याबाबत प्रयत्न केला जाईल. आपलेसुद्धा सहकार्य मिळाले तर ही योजना निश्चितपणे चांगल्या पद्धतीने राबविता येईल. स्टॅम्प ड्युटीच्या बाबतीत झोनिंगचा मुद्दा मांडण्यात आला, रेडीरेकनरच्या बाबतीत मी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर घुले यांनी शेवगाव पापडी तालुक्यात येळगाव पाटबंधारे प्रकल्पातील स्टॅम्प ड्युटीच्या आकारणीबाबत सांगितले आहे. त्याबाबत चौकशी करून तशी काही चूक होत असेल, तर ती दुरुस्त केली जाईल.

सन्माननीय सदस्य, श्री. शरद पाटील यांनी अत्यंत चांगल्या सूचना केल्या. सन्माननीय सदस्या, ॲड. यशोमती ठाकूर यांनी अत्यंत महत्त्वाच्या काही गोष्टी सांगितल्या की, बदलत्या काळाबरोबर ई-प्रणालीचा वापर करून जास्तीतजास्त सुविधा निर्माण केल्या पाहिजेत, ई-सेतू निर्माण केला पाहिजे. १ तारखेपासून घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमामध्ये या सर्वांचा समावेश झालेला असेल, असे मी आपल्याला सांगू इच्छितो.

श्री. शिरीष कोतवाल यांनी तलाठी कार्यालयाचा येथे उल्लेख केला आहे. बांधासंबंधीचा विषय पुन्हा एकदा घेऊन मिशन म्हणून कसे राबवता येईल हे आम्ही पुढच्या काळामध्ये आणत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. नरके यांनी शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या जमिनी देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्याला जमीन मिळाली पाहिजे यासाठी आम्ही पूर्णपणाने प्रयत्न करणार आहोत. सुप्रीम कोर्टामध्ये ॲड. अरविंद सावंत आहेत. आता आम्ही ॲड. वहानवटी यांना देखील एंगेज करीत आहोत. हा प्रश्न चांगल्या पद्धतीने सुटला पाहिजे. ह्या जमिनी शेतकऱ्यांना मिळाल्या पाहिजेत, यासाठी पूर्ण ताकदीने आम्ही सुप्रीम कोर्टामध्ये जात आहोत, हे मी या निमित्ताने आपल्याला सांगत आहे. बेदखल कुळांचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित आणि श्री. बाळा नांदगावकर यांनी मांडला आहे. हा प्रश्न रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. कालबद्ध कार्यक्रम आखून कशा पद्धतीने हा प्रश्न मार्गी लागेल हा प्रयत्न आम्ही निश्चितपणाने करू. पाझर तलावातील गाळ काढणे, स्वामीत्वधनाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव गेडाम यांनी मांडला आहे. यामध्ये जलसंपदा विभागाची मदत घेऊन पूर्वीच्या जी.आर. पेक्षा अधिक चांगला जी.आर.कसा काढता येईल, यासाठी आमचा प्रयत्न राहील.

**[ श्री. बाळासाहेब थोरात ]**

सन्माननीय सदस्या श्रीमती पंकजा मुंडे यांनी खूप चांगले भाषण केले. त्यांचे आज भाषण चांगले झाल्याबद्दल मी श्री. मुंडेसाहेबांना फोन करून सांगणार आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री. अशोक पवार, चंद्रदीप नरके, चंद्रशेखर बावनकुळे यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्याची आम्ही नोंद घेतली आहे. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी भोगवटा २ चे भोगवटा १ मध्ये रूपांतर करण्यासंबंधीचा मुद्दा मांडला आहे. तो विषय देखील आम्ही घेत आहोत. भोगवटा १ केल्यानंतर पुन्हा विक्री करण्याचे ठरविले, तर त्याला पुन्हा नजराणा भरावा लागतो. अशा काही गोष्टी आमच्या निदर्शनास आलेल्या आहेत. काम करण्यासंबंधीचे जे विषय आहेत त्यामध्ये आम्ही हा विषय घेत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. विरेंद्र जगताप यांनी काही प्रश्न मांडले आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री. केसरकर, देशकर, यांच्यासह अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. साहेबराव पाटील यांनी देखील वाळूच्या विषयावर काही प्रश्न मांडले आहेत. येथे प्रत्येक मुद्याला उत्तर देणे शक्य आहे. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्यासंबंधातील कार्यवाहीत प्रोसिडिंग पाहून करण्याचा प्रयत्न राहील. याची ग्वाही मी या निमित्ताने देतो आणि महसूल विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महाराज, आजपासून माझा माईक बंद करण्यास सुरुवात झालेली आहे. पूर्वी मी उभा राहिलो, तरी माझा माईक चालू असायचा. आता मा. अध्यक्षांची परवानगी घेऊन विरोधी पक्षनेत्याने बोलावे असे ठरले असेल, म्हणून आजपासून माझा लाईट हिरवा झाला. बोट दाखवा आणि बोला असे झालेले दिसते. कदाचित विरोधी पक्षनेता जास्त बोलत असल्यामुळे त्यांचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न असू शकेल. सभागृहात नेहमी मा.मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेत्यांचा माईक सतत चालू असतो, ही प्रथा आहे. आजपासून काय सुरू केले आहे, ते मला माहीत नाही. सरकारला कुठे दुखले आहे की खुपले आहे, माहीत नाही. स्टॅम्प ड्युटीसंबंधी माझे म्हणणे होते की, हाऊसिंग पॉलिसी घोषित केल्यानंतर कारपेट एरियावर स्टॅम्प ड्युटी लागेल असे नमूद केले आहे. यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्धिकी यांनी मुद्दा उपस्थित केला होता त्याचे मी समर्थन करतो. सुपर बिल्टअप आणि बिल्टअप एरिया धरून जागेची खरेदी केली जाते. त्यामुळे साधारण नागरिकाला ४० ते ५० हजाराचा भूर्दंड पडतो. हा जो निर्णय आपण घेतला आहे, त्याची अंमलबजावणी आपल्या रजिस्ट्रारने केली पाहिजे. जो करणार नाही त्याच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. हा लाखो लोकांचा प्रश्न आहे. हा काही एकट्याचा प्रश्न नाही.

दुसरा प्रंश्न म्हणजे या संदर्भात जी काही स्टॅम्प ड्युटी अधिक लागली किंवा कमी लागली तर न्यायालयात जाता येईल. मध्यंतरी शासनाने जाहीर केले होते की, या संदर्भात एक ट्रिब्युनल करण्यात येईल जेणेकरुन न्यायालयात जाण्यापेक्षा ट्रिब्युनलकडे जाऊन तडजोड करता येईल. परंतु अद्यापपर्यंत तसे ट्रिब्युनल झालेले नाही. स्टॅम्प ड्युटीच्या संदर्भात प्रत्येकाला न्यायालयात जाणे शक्य नाही. म्हणून अशा स्वरूपातील तडजोडी करण्यासाठी आपण जे ट्रिब्युनल नेमणार होता, त्याचे पुढे काय झाले ?

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदयांनी महत्त्वाचे विषय टाळले. एका मंत्र्याच्या खाजगी सचिवांनी जो स्टे दिलेला आहे, त्यावर आपण बोलू शकता की नाही हे मला माहीत नाही. ३३.५ लाख स्क्वेअर फूटाचे बांधकाम आहे. यामध्ये आपला काय संबंध आहे ? आपण इतके दिवस स्टे का ठेवत आहात, ती अनधिकृत गोदामे आहेत. जवळपास ८,१२५ अनधिकृत गोदामांची बांधकामे आहेत. जवळपास ३३.५ लाख स्क्वेअर फूटाचे हे बांधकाम आहे. त्या गोदामामध्ये राजरोसपणे केमिकल्स वगैरे ठेवली जातात. सन २००५ मध्ये विधानपरिषदेमध्ये माननीय उपसभापती यांनी निदेश होते की, " ही सर्व अनधिकृत गोदामे पाडून टाकावीत." यामध्ये किती पैसे घेण्यात आले ? किती हात ओले झाले आहेत, ते लोक रोज किती हप्ते देत आहेत, अनधिकृत बांधकाम करणारे सरकारकडे किती पैसा पोहोचवित आहेत, त्याशिवाय हे होणे शक्य नाही. सरकार स्टे का उठवीत नाही. सरकार ही अनधिकृत बांधकामे का पाडत नाही, ज्यांनी संरक्षण दिले त्यांच्यावर का कारवाई करीत नाही ? कोणत्या मंत्र्यांचा हा खाजगी सचिव आहे, ज्याच्यामुळे स्टे दिलेला आहे. मंत्री महोदयांचे पी.ए.सरकार चालवायला लागले, तर मग आपण या ठिकाणी कशाला उत्तरे देता ? मंत्र्यांच्या खाजगी सचिवानी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी जिल्हाधिकारी करीत असेल तर ते योग्य नाही. मंत्र्यांच्या सहीने पत्र आले तर आम्ही समजू शकतो. मंत्री, सचिवांना पत्र देईल आणि सचिव मग पत्र खालच्या अधिकाऱ्याकडे देईल. पण या ठिकाणी दुसरीच पद्धत सुरू आहे. यावर एक शब्दही मंत्री महोदय बोलायला तयार नाहीत. मी यापुढे बोलणार नाही कारण मला माहीत आहे की, यामध्ये मोठ्या प्रमाणावर हात ओले केल्याशिवाय हे शक्य नाही. हा माझा आरोप आहे. याशिवाय असे होऊ शकत नाही. कोट्यवधी रुपये वरपर्यंत पाठविण्यात आलेले आहेत. हे बांधकाम अनधिकृत आहे, त्यासंबंधी आदेश दिलेले आहेत, आम्ही या संदर्भातील स्थगिती उठवू यासंबंधी एकही शब्द मंत्री महोदयांकडून निघाला नाही. या ठिकाणी सांगितले जाते की, सरकारच्या कारभारात पारदर्शकता आहे.

अध्यक्ष महाराज, मौजे ताडगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील २०० एकर जमीन आहे. आपल्या पक्षाचा आमदार आहे, म्हणून आपण कारवाई करीत नाही काय ? ते काँग्रेस पक्षाचे आमदार आहेत. त्यांनी आदिवासींची जमीन हडप केलेली आहे. कागदोपत्री हे सिद्ध झालेले आहे मी त्यावेळी पक्षावर बोललो नाही. आदिवासींची २०० एकर जमीन बेकायदेशीरपणे हडप केलेली आहे, हे सर्व मी म्हणत नाही. माझ्याकडे ही सर्व कागदपत्रे आहेत. माझ्याकडे आदिवासी बांधव आठ दिवस चकरा मारत आहेत. ते सांगत आहेत की, आम्हाला याबाबत काही बोलू दिले जात नाही. आमची जमीन आम्हाला परत द्यावी. या दोन्ही प्रकरणांमध्ये काँग्रेस पक्षाचा हात असल्यामुळे, मंत्री महोदय या संदर्भात कठोर कारवाई करण्याची भूमिका घेणार आहे की नाही ? मी जो या संदर्भात आरोप करीत आहे तो सत्य आहे. मी असे समजतो की, यामध्ये मोठ्या प्रमाणावर डील झालेले आहे. फार मोठ्या प्रमाणावर पैसा दिला गेलेला आहे. म्हणूनच अशा प्रकारची अनधिकृतपणे बांधकामे सुरू आहेत. सरकार हतबल झालेले आहे. आपण त्यांना हात लावू शकणार नाही. आपला हात काढला की आपल्या हाताच्या मुठी भरल्या जातात. त्यामुळे आपण अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत आहात. या संदर्भात माननीय मंत्री महोदयांना उत्तर द्यायचे असेल, तर त्यांनी द्यावे. परंतु माझा आरोप कायम राहणार आहे. जर अनधिकृत बांधकामे पाडणार नसाल, अनधिकृतपणे आदिवासींच्या जमिनी हडप करणाऱ्यांवर कारवाई करणार नसाल तर मी आताही सांगतो की, कोट्यवधी रुपयांचा व्यवहार झाल्याशिवाय हे शक्य नाही. किती कोटींचा व्यवहार झाला हे मी सांगू शकत नाही. परंतु कोट्यवधी रुपयांचा व्यवहार झाला, वर पर्यंत तो पैसा गेला म्हणून या दोन्ही प्रकरणी कारवाई होत नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी रेडीरेकनर आणि कार्पेट एरियासंबंधी सांगितले, त्या संदर्भात तपासून कार्यवाही करण्यात येईल. मी या दोन प्रकरणांबाबत बोललो नाही असे नाही. आपण या संदर्भातील कागदपत्रे माझ्याकडे देतो, आपण ती तपासावीत आणि कारवाई करावी असे सांगितले होते. आपण दिलेली कागदपत्रे तपासली जातील.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महाराज, आपण अशा प्रकारची वर्तणूक आम्हाला देत असाल तर ते बरोबर नाही ...

**उपाध्यक्ष** : सुधारणा करण्यात येईल.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील )** : अध्यक्ष महोदय, इतके दिवस अधिवेशन सुरू आहे आणि तरी देखील मला माईकच्या संदर्भात तक्रार करायला लागते, हे ठीक नाही.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचा माईक कायमचा सुरू राहील.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील )** : अध्यक्ष महोदय, तुम्ही काय चालविले आहे ? मी वाभाडे काढतो, कपडे उतरवितो, म्हणून हे चालले आहे का ? मी शासनाचे रोज कपडे काढणार, वस्त्रहरण करणार, आम्ही पाहिजे ते बोलू. मी भाषणात असे सांगितले की, त्या संदर्भात कागदपत्रे लागली तर माझ्याकडून आपण घ्या. आपण या संदर्भात कार्यवाही करू, चौकशी करू असे सांगता ? मी ही कागदपत्रे माहितीच्या अधिकाराखाली घेतलेली आहेत, सही-शिक्यासहित आहेत. मी तुम्हाला एक कागदपत्र खोटा दिला, तरी या सभागृहातून राजीनामा देईन. माझ्याकडे पक्के पुरावे असल्याशिवाय मी सभागृहात बोलत नाही. कारवाई करू असा या संदर्भात किमान किमान शब्द तरी काढायला पाहिजे होता. आम्ही दोन्ही प्रकरणांत काय समजायचे ? दोन्ही प्रकरणात हजार कोटी रुपयांची दोनशे एकर जमीन आहे. मध्यवस्तीतील जमीन आहे. ती डेव्हलप झाली आहे, त्यावर ५-७ मजली इमारती उभ्या राहिल्या आहेत. आपण अशा ठिकाणी असलेली बेकायदेशीर कामे खपवून घेत असाल, तर योग्य नाही. तुम्ही या संदर्भात पारदर्शकता दाखविली पाहिजे, अशी अपेक्षा आहे. चौकशी करून कारवाई करा. दुसरे आम्ही यामध्ये काय म्हणणार ? आम्ही असे म्हणत नाही की, तुम्ही त्यांना सोडून द्या. दोषी असेल, तर कारवाई केली पाहिजे. आपण एवढे तरी सांगा की, चौकशी करून, तथ्य असेल तर कारवाई करू. एवढ्या मोठ्या प्रकरणांसंदर्भात आम्ही बोलल्या नंतर एकही शब्द न बोलणे, हे तुमच्या दृष्टीने बरोबर होणार नाही. तुम्ही तसे नाहीत हे मला माहीत आहे. हे काही तुमच्या काळातील नाही. तुम्ही अंगावर कशाला घेत आहात ? सगळे जुने आहे.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, आपण माझ्या भाषणाचे प्रोसिडिंग काढून पाहिले तर आपल्याला दिसेल की, मी असे म्हटले आहे की, त्या सगळ्या बाबी आम्ही तपासून पाहू आणि त्यामध्ये पुढील कार्यवाही करू.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील )** : अध्यक्ष महोदय, तुम्ही कारवाई करा.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, मी कार्यवाही करू असे म्हटले आहे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे ( पाटील )** : अध्यक्ष महोदय, दोषी असतील, तर कारवाई करा. यामध्ये सर्व कॉंग्रेसचे आहेत. (गोंधळ) ... सर्व कॉंग्रसचे असल्यामुळे तुम्ही कारवाई करायला घाबरत आहात ! तुम्ही दोषी असतील तर कारवाई करू, एवढे तरी स्पष्टपणे सांगावे. आपण एवढे तरी सांगितलेच पाहिजे. (गोंधळ) आपण तपासता काय ? आम्हीच तर तुमच्याकडे कागदपत्रे दिली आहेत.

**श्री. बाळासाहेब थोरात** : अध्यक्ष महोदय, यामध्ये पक्ष वगैरे गोष्टी काढण्याचे कारण नाही. मी भाषणात आणि आता देखील म्हटले की, कार्यवाही करू. मी आपल्याला कागदपत्रे देतो, असे आपले वाक्य होते. मी म्हटले की, ती कागदपत्रे तपासून आम्ही कार्यवाही करू.

**डॉ. पतंगराव कदम** ( वन मंत्री ) : अध्यक्ष महोदय, एकूण ३० सन्माननीय सदस्यांनी वन विभाग व पुनर्वसन विभागासंबंधी आपली मते व्यक्त केली आहेत. राज्यात एकंदर २० टक्के जंगल आहे, ते आपल्याला ३० टक्क्यांपर्यंत न्यायचे आहे. गेल्या हिवाळी अधिवेशनात मी निरनिराळ्या खात्याच्या माननीय मंत्र्यांना, सचिवांना बोलावून एक बैठक घेतली होती. शिक्षण विभाग, मेडिकल एज्युकेशन विभाग, ग्रामविकास विभाग त्यामध्ये होते. वन खात्याने राज्यामध्ये त्यावेळी ५ कोटी झाडे लावण्याचा निर्णय घेतला, त्याचे डिव्हिजन केले. राज्यामध्ये मास मूव्हमेंट घेऊन सर्वांनी काम करायचे आहे. माननीय ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील यांनी ते मनावर घेतले पाहिजे. शिक्षण विभाग, मेडिकल एज्युकेशन विभाग यांना देखील मी विनंती केली होती.

अध्यक्ष महोदय, मला सांगण्यास आनंद वाटतो की, गेल्या वर्षी १३ कोटी झाडे लावली गेली. मी आदेश दिला आहे की, १३ कोटी झाडांची रोपे कोणी कुठून आणली, झाडे किती व कुठे लावली, आज किती जीवंत आहेत, या सगळ्यांची चौकशी करण्यात यावी. आपण सातत्याने सांगत आहात की, एवढ्या मोठ्या महाराष्ट्रात २० टक्के जंगल शिल्लक राहिलेले नाही. आपली असे बोलण्याची सवय पॉप्युलर आहे. त्या संदर्भात सुद्धा जिल्हावाईज वृक्षतोड कोठे झाली, कधी झाली यासंबंधी त्रयस्थ एजन्सी नेमून चौकशी करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, कोकण विभागामध्ये वृक्षतोड बंदी केली आहे. मराठवाड्यामध्ये केवळ ४ टक्के वृक्ष आहेत. त्या ठिकाणीही वृक्षतोड बंदी केलेली आहे. तथापि, ज्या ठिकाणी वृक्षतोड झाली असेल, तेथील वन अधिकाऱ्यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल, अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, वन विभागामध्ये वन्यजीव आणि वृक्षसंवर्धन असे दोन भाग आहेत. या दोन्ही कामांसाठी वन विभागाकडून होणारा खर्च अतिशय कमी आहे. परंतु, त्यादृष्टीने प्रयत्न केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले आहेत. वन अधिकाऱ्यांना किती पिस्तूले देण्यात आलीत, हरणांमुळे होणारे नुकसान याबाबतची विचारणा त्यांनी केली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे त्यांच्या मतदारसंघामध्ये हरण आहेत, त्याप्रमाणे माझ्या मतदारसंघापासून माननीय कै. यशवंतरावजी चव्हाणांच्या गावापर्यंत असलेल्या १३ गावांमध्ये, ज्या गावांमधून मला ८० टक्के मतदान झालेले आहे, या गावांना सागरेश्वर अभयारण्याने खलास केले आहे. मी हे यासाठी सांगितले की, खरोखरच हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. ज्या ठिकाणी अभयारण्य आहे, त्या ठिकाणी बाहेरच्या बाजूला फेन्सिंग घालण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. हरणांना जंगलामध्ये सोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. वन्यप्राण्यांमुळे जे नुकसान होते, त्याबद्दल मिळणाऱ्या नुकसानभरपाईच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णयही घेतला आहे. ही रक्कम १५ हजार रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

**[ डॉ. पतंगराव कदम ]**

अध्यक्ष महोदय, ६३७ पिस्तुले आणि ४१८ रायफल्स वन कर्मचारी, अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. वनक्षेत्र आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेतली तर ही संख्या फार कमी आहे, या वस्तुस्थितीची मला जाणीव आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जैन नावाच्या व्यक्तिने आयकर वाचविण्यासाठी झाडांची खोटी नोंद केली आहे, या प्रकरणाचा उल्लेख त्यांच्या भाषणात केला आहे. याबाबत वनक्षेत्रपाल, जामनेर, श्री. एस. एस. पाटील, वनपाल, जामनेर, श्री. डी. डी. क्षीरसागर, वनरक्षक, जामनेर, श्री. जे. व्ही. सय्यद यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशी सुरू करण्यात येत आहे. आता चौकशी सुरू झाली आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांना निलंबित करण्याची कारवाई करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

अध्यक्ष महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई करू. त्याचप्रमाणे जैन नावाची जी व्यक्ती आहे त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई आय.टी. खात्याने केली आहे. त्यांच्याविरुद्ध फॉरेस्ट ॲक्ट अन्वये देखील कारवाई करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य, श्री. विवेक पंडित यांनी आदिवासी आणि वन हक्क कायद्याबाबतचा मुद्दा मांडला आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी स्वत: माझी भेट घेतली होती. वनहक्काच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडेही एक बैठक झाली होती. मुख्य सचिवांकडे हे काम दिलेले आहे. कारण, महसूल मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे महसूल, आदिवासी विकास आणि वन अशा तीन विभागांचा यामध्ये संबंध आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, गाव पातळीवर आमसभा असते त्या ठिकाणी पहिल्यांदा निर्णय होतो. त्यानंतर एसडीओ व जिल्हाधिकारी यांच्याकडे निर्णय होतात, तिथे स्टे मिळतो व नंतर सर्व घोटाळे होतात. म्हणून या तिन्ही विभागांमध्ये समन्वय होण्यासाठी मुख्य सचिवांची तीन महिन्यातून एक बैठक घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एसडीओ स्तरावर काही दावे फेटाळले आहेत. त्या सर्व दाव्यांची पुनर्तपासणी करण्याचे काम सुरू झाले आहे. यासंदर्भात त्यांना न्याय मिळेल. सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू, सन्माननीय सदस्य श्री. शंकरराव गडाख यांनी काही मुद्दे मांडले आहेत, त्यांचा विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार, आमचे मित्र आहेत, ते अत्यंत अभ्यासू आहेत, त्यांनी झाडांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. वन विभागात एकंदर जी झाडांची वाढ होते, ती योग्य रीतीने होत आहे. विदर्भातील चंद्रपूर जिल्हा व संपूर्ण विदर्भात जंगलाची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही वन संपत्ती आहे. पर्यावरण, ग्लोबलायझेशन हे विषय एकमेकांना संलग्न असल्यामुळे ज्या प्रश्नांच्या संदर्भात अडचणी येत आहेत, त्यासंदर्भात गांभीर्याने विचार करण्यात येत आहे. नागपूर विभागात कामाला अधिक वेळ मिळावा म्हणून एक कॅम्प ऑफिस मुंबई, ठाणे किंवा बोरिवली या भागात करण्याचा निर्णय तत्त्वत: घेतला आहे. झाडांच्या संदर्भात कोणतीही चिंता करण्याची आवश्यकता नाही.

[ डॉ. पतंगराव कदम ]

अध्यक्ष महोदय, वन्य जीवांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी अनेक वेळा प्रश्न मांडला आहे. त्यासंदर्भातील निर्णय तत्त्वत: घेतला आहे. त्यासाठी टोकन तरतूद बजेटमध्ये करण्यात आलेली आहे. विदर्भात गोरेवाडा येथे 'इंटरनॅशनल झू' करण्याचे ठरविले आहे. यासाठी शेजारची ७० एकर जमीन वन विभागाकडून घेण्यात येत आहे. यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर एक महिन्याच्या आत सादर करण्यात येणार आहे. यासाठी ७२० कोटी रुपयांची मान्यता घेण्यात येणार आहे. वर्षाला २०० कोटी रुपयांची तरतूद करून तो 'इंटरनॅशनल झू' गोरेवाडा येथे करण्यात येणार आहे. त्याच बरोबर मुंबई शहरात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाबाबत सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी विषय मांडला आहे. या उद्यानाच्या शेजारची २०० एकर जमीन घेण्याबाबत डेअरी खात्याकडून ती फाईल वन विभागाकडे आली आहे. डेअरी विभागाने त्याला मान्यता दिली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. त्या ठिकाणी कमर्शिअल व इतर बाबी केल्याशिवाय विकास होणार नाही. वन विभागाच्या हद्दीत काही गोष्टी करता येत नाहीत. येथे सुद्धा 'इंटरनॅशनल झू' तयार करण्यात येणार आहे, पूर्वी मुंबईत 'राणीची बाग' ही प्रसिद्ध होती.

अध्यक्ष महोदय, वाघाच्या संख्येबाबत अनेक सन्माननीय सदस्य बोलले आहेत, नागपूर येथे 'जागतिक टायगर प्रोजेक्ट' करण्यात येणार आहे. जगातील पर्यटक तेथे आले पाहिजेत. अशा पद्धतीची वेगळी दिशा देण्याचे शासनाने ठरविले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी, सन्माननीय सदस्य श्री. विष्णू सावरा, सन्माननीय सदस्य श्री. शिरीष कोतवाल, श्री. चंद्रशेखर घुले, या सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न मांडले आहेत, पुनर्वसनाच्या बाबतीत दोन तीन जनरल प्रश्न आहेत, यासंदर्भात आऱ्या गिरण्यांचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहेत. यासंदर्भात जे अपिल दाखल केले जातात, त्यांच्या सुनावण्या मी घेणार नाही, असा निर्णय घेतला असून त्यासाठी स्पेशल ऑफिसर नियुक्त केलेला आहे. त्यासंदर्भातील सुनावणी ते घेणार आहेत, लोकांना त्रास होणार नाही व कायदा गृहीत धरून सकारात्मक निर्णय देण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. (...अडथळा...) नाईकांची केस टोटली वेगळी होती. मी १८ वर्षांपासून मंत्री आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) साहेब, तुम्हाला माहिती आहे की, माझी कोणतीही कॉन्ट्राव्हर्सी नाही आणि कोणतीही भानगड नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. विरेंद्र जगताप सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. अध्यक्ष महोदय, जे सन्माननीय सदस्य भाषण केल्यानंतर मंत्री महोदयांच्या उत्तराच्या वेळी सभागृहामध्ये उपस्थित राहतील त्यांच्याच मुद्यांची उत्तरे देण्याची पद्धत सुरू करावयास पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांना सांगू इच्छितो की, आम्ही अनेक वनांमध्ये बकऱ्या चरण्यासाठी जागा आरक्षित ठेवलेली आहे. (...अडथळा...) आम्ही वनामध्ये जाण्यासाठी सुद्धा लोकांना ठराविक वेळेमध्येच परवानगी देत असतो. आम्ही बकऱ्या चरण्यासाठी फॉरेस्टमध्ये अनेक ठिकाणी जागा आरक्षित केलेली आहे. (...अडथळा...) माननीय विरोधी पक्षनेत्यांना वनाच्या संदर्भात सुद्धा बरीच माहिती आहे. मला असे वाटत होते की, त्यांना फक्त भानगडीच माहिती आहेत काय ?

[ डॉ. पतंगराव कदम ]

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. मी सांगू इच्छितो की, पुनर्वसनाच्या दृष्टीने तुमचे सर्व प्रकल्प ॲथॉरिटीकडे आले पाहिजेत. ते प्रकल्प ॲथॉरिटीकडे आलेले आहेत. परंतु ते अजून आमच्यापर्यंत आलेले नाहीत. त्याची छाननी केली जाईल. शासनाने पुनर्वसनाच्या संदर्भात कायदा केलेला आहे. आपण "आधी पुनर्वसन, मग धरण" असा महत्त्वाचा निर्णय घेतलेला आहे. परंतु त्याचे पालन होत नव्हते. परवा माननीय पाटबंधारे मंत्र्यांनी सभागृहामध्ये माहिती दिलेली आहे. आम्ही सर्व पैसे मागत नाही. खरे म्हणजे आमचे डिपार्टमेंट हे को-ऑर्डिनेशन डिपार्टमेंट आहे. शेवटी पुनर्वसनाची जबाबदारी त्याच विभागाने पार पाडावयाची आहे. आपण प्रकल्पासाठी जो निधी खर्च करणार आहोत त्याच्या ५ टक्के निधी पुनर्वसनासाठी खर्च करावा, असा कायदा आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर मी आणि माझ्या विभागाचे ॲडिशनल चीफ सेक्रेटरी प्रथम डिव्हिजनमध्ये जाणार आहोत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये पुनर्वसनाचे प्रोजेक्ट किती आहेत याची मी माहिती घेईन. (....अडथळा...) काळू आणि शाई प्रकल्पासंबंधी एमएमआरडीए कडून प्रस्ताव आलेला आहे. मी १५ दिवसांत त्यासंदर्भात निर्णय घेईन.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हरिष पिंपळे मला भेटले होते. मी अधिकाऱ्यांची बैठक सुद्धा घेतली होती. त्यांनी मला सांगितले की, शेतामध्ये जे बांबू लावले जातात ते बांबू तोडण्यासाठी अधिकारी खूप त्रास देतात. सन्माननीय सदस्य श्री. हरिष पिंपळे यांनी मला त्यासंदर्भात खूप कथा सांगितलेल्या आहेत. मी सांगू इच्छितो की, शेतात लावलेल्या बांबूसाठी वन विभागाची परवानगी लागणार नाही अशा प्रकारचा महत्त्वाचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. मी महसूल मंत्री असताना कुंभारांकडून मातीची रॉयल्टी घ्यावयाची नाही असा निर्णय घेतला होता त्याप्रमाणे बुरूड समाजासाठी लागणाऱ्या बांबूवर वन विभागाचे बंधन राहणार नाही. त्यांनी बांबू तोडावा आणि घेऊन जावा.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर साहेबांनी सांगितलेल्या मुद्द्याच्या संदर्भात हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात केसेस आहेत. कोर्टाच्या ऑर्डर आहेत की, त्यांना कोणत्याही सुविधा देऊ नका. मीच इन्फॉर्मल सांगितले की, आपण जोपर्यंत त्यांचे पुनर्वसन करीत नाही तोपर्यंत त्यांना काही सुविधा देण्याची आवश्यकता आहे. हे सर्व विषय आपल्याला माहिती आहेत. सुप्रीम कोर्टाचे आणि हायकोर्टाचे त्यासंदर्भात आदेश आहेत.

अध्यक्ष महोदय, मी सातपुडा जिल्ह्याचा दौरा करणार आहे. रानडुकराच्या बाबतीत तपासून योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे. याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी. अध्यक्ष महोदय, माझ्या विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष** : अध्यक्ष महोदय, रानडुकराच्या संदर्भात जो शासन निर्णय आहे त्यात थोडासा बदल करण्याची गरज आहे.

**डॉ. पतंगराव कदम** : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याला मी उत्तर देणार आहे. पूर्वी विहिरी आणि झाडांसाठी पैसे दिले जात होते. आता कायद्याची अडचण नसेल तर पैसे देताना जमीन, झाडे, विहिरी यांची एकत्रित किंमत पुनर्वसनाच्या माध्यमातून दिली जाणार आहे. तरी, सभागृहाने वन विभागाच्या मागण्या मान्य कराव्या अशी माझी विनंती आहे.

**श्री. गिरीश बापट** : अध्यक्ष महोदय, माननीय डॉ. पतंगराव कदम अतिशय चांगले उत्तर देत आहेत. प्रकल्प सुरू होत असताना ५ टक्के रक्कम ही शासनाकडे भरावयाची असते. कारण याचा संबंध उदरनिर्वाहाच्या भत्त्याशी येत असतो. एमआयडीसीच्या ठिकाणी पुनर्वसन करावे लागते. परंतु आपल्या खात्याकडे पैसा नाही म्हणून उदरनिर्वाह भत्ता बंद केलेला आहे सरकारने यासंदर्भात कायदा केला होता. जे प्रकल्प असे सुरू होतात, ते पैसे दिल्याशिवाय सुरू होणार नाहीत अशी ऑर्डर शासनाकडून का काढली जात नाही ? शासनाने उदरनिर्वाहाच्या संदर्भात घोषणा केली होती. यामध्ये गरजू लोकांना भत्ता मिळत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. कारण आपल्या विभागाकडे आवश्यक निधीच नसल्यामुळे तसे होत आहे. यासंदर्भात कोणती कार्यवाही केली जाणार आहे ?

**डॉ. पतंगराव कदम** : अध्यक्ष महोदय, प्रोजेक्टसाठी ज्या प्रमाणात निधी वितरित होतो, त्याच्या ५ टक्के रक्कम घेण्याची भूमिका शासनाकडून घेतली जाणार आहे. अशा प्रकारचा निर्णय प्राधिकरणामध्ये घेतलेला आहे.

**ॲड. आशिष जयस्वाल** : अध्यक्ष महोदय, नैसर्गिक आपत्तीमधील लोकांना मदत दिली जाते. तसेच गंभीर दुखापत झाली तरी शासनाकडून मदत दिली जाते. पण रानडुकराच्या हल्ल्यात एखादा जखमी झाला तर त्याला उपचारासाठी सहा-सहा महिने थांबावे लागते. तहसीलदार नैसर्गिक आपत्ती आली तर ट्रेझरीतून मदत करतो तशा प्रकारची तरतूद वन्य प्राण्याच्या हल्ल्यात केली जाणार काय ?

**डॉ. पतंगराव कदम** : अध्यक्ष महोदय, तशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला असून, शासन निर्णय काढलेला आहे.

**श्री. दीपक केसरकर** : अध्यक्ष महोदय, जंगली हत्तींच्या उपद्रवापासून सुटका करून घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचे सदनाने मान्य केले होते. परंतु काही कालावधीनंतर ही कार्यवाही काही कारणास्तव बंद केली होती. माकडांच्या उपद्रवापासून होणाऱ्या नुकसानीच्या संदर्भात माननीय वन राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिले होते. वन पर्यटनाच्या संदर्भात महाराष्ट्राचे धोरण वेगळे करणार की नाही ?

**डॉ. पतंगराव कदम** : अध्यक्ष महोदय, कर्नाटक जिल्ह्यातून सिंधुदुर्ग जिल्ह्यात तीन ते चार हत्ती येऊन उपद्रव करीत होते. हत्तींनी केलेल्या नुकसानभरपाईचा दर वाढविण्यात आलेला आहे. वन आणि पर्यटन विभागाने एमओयुच्या संदर्भात करार केलेला आहे. त्या माध्यमातून पैसे उपलब्ध होणार आहे. परिणामी पर्यटन विभागास चालना मिळणार आहे. तसेच माकडांच्या संदर्भात होणाऱ्या नुकसानीची तपासणी करून पुढील योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस** : अध्यक्ष महोदय, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना नोकरी देण्याच्या संदर्भात ५ टक्क्यांची तरतूद करण्यात आली होती. सध्या त्यावर बॅन लावलेला आहे. तो बॅन उठविण्याची गरज आहे. प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात जो बॅन लावलेला आहे तो उठविला जाणार काय ?

**डॉ. पतंगराव कदम** : अध्यक्ष महोदय, मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विषयाच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात येणार आहे. त्या संदर्भातील निर्णय अजून झालेला नाही. नजीकच्या काळात मंत्रिमंडळ आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

**श्री. संजय देवतळे** ( पर्यावरण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील पर्यावरण विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला त्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी मनापासून आभार मानतो. त्यांनी केलेल्या सर्व सूचनांची मी नोंद घेतलेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, ग्लोबल वार्मिंगसंदर्भात या सभागृहात चर्चा झाली. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रात होणाऱ्या परिणामांच्या बाबतीत श्री. आर. के. पचोरी, संचालक, डेरी या संस्थेकडील प्रेझेंटेशन मंत्रिमंडळाने पाहिले आहे. त्यानंतर ३१ मार्च २०१० रोजी डेरी या संस्थेशी करार करण्यात आला. त्यांना पर्यावरणा-संदर्भातील काम दिलेले आहे. दोन वर्षामध्ये त्यांच्याकडून याबद्दलचा कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून येणाऱ्या अडचणीवर पुढील कार्यवाही करता येईल. नवीन पिढीला प्रामुख्याने पर्यावरणाबद्दल आवड निर्माण व्हावी, जाणीव व्हावी, या दृष्टिकोनातून पर्यावरण सेवा योजना लागू करण्यात आली आहे. प्रत्येक विभागामधील दोन दोन प्रदूषित जिल्हे निवडलेले आहेत. १२ जिल्ह्यांमध्ये ५० शाळा आहेत. त्यातील ज्या शाळा यामध्ये समाविष्ट होण्यासाठी इच्छूक असतील, त्या समोर येतील. पर्यावरण सेवा योजनेच्या माध्यमातून त्यांना ही माहिती देण्याचे काम शासन करणार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य नदी संवर्धन योजना हा उपक्रम पहिल्यांदा या अर्थसंकल्पात हाती घेण्यात आला आहे. या अगोदर राष्ट्रीय नदी कृती योजना कार्यक्रम हा केंद्र शासनाचा कार्यक्रम आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांवर काही कामे ही राष्ट्रीय कृती आराखडयात बसत नाहीत, ती या राज्याच्या नदी संर्वधन योजनेमध्ये बसण्यिात यावी, त्या नद्यांचे प्रदूषण कमी व्हावे, या दृष्टिकोनातून ही योजना शासनाने आणली आहे. अगोदरची सरोवर संवर्धन योजनाही सुरू आहे.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य, श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील इरई, धरपट या नद्यांमधील पाण्याचे प्रदूषण कमी व्हावे यासंदर्भात उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात स्थानिक नगरपरिषदा तसेच महानगरपालिका यांच्याकडून प्रस्ताव आल्यानंतर त्यासंबधी राज्याच्या योजनेतून तसेच केंद्र सरकारच्या योजनेतून या नद्यांचे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. या अगोदरही पुष्कळशा नद्यांचे प्रदूषण दूर झालेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका यांच्या अखत्यारीत नद्या, सरोवरे प्रदूषित असतील तर त्यांनी तशा पद्धतीचे प्रस्ताव शासनास दिले पाहिजेत. त्यांच्या प्रस्तावानुसार केंद्र आणि राज्याच्या योजनेच्या माध्यमातून प्रदूषित सरोवरे, नद्या यांचे संवर्धन, स्वच्छता करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येतील. सन्माननीय सदस्य, प्रा. अतुल देशकर यांनी नागपूर येथील नाग नदी, वैनगंगा नदीमध्ये होत असलेल्या प्रदूषणाबाबतचा उल्लेख केला. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, महानगरपालिकेकडून तसा प्रस्ताव आला तर त्याबाबत प्रेझेंटेशन घेऊन आढावा घेण्यात येईल. त्यासाठी जवळपास २०० कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे. सदरहू प्रस्ताव शासनाकडे आल्यावर त्याला मान्यता देऊन केंद्र शासनाकडे पाठविता येईल. आपल्याला नाग-सरस्वती नदीचेही प्रदूषण कमी करता येईल.

सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी महाड एमआयडीसीमुळे सरस्वती नदीचे पाणी प्रदूषित झाले आहे, असा मुद्दा उपस्थित केला आहे. सीईटीपी च्या माध्यमातून ५ एमएलडी प्लाँटची क्षमता वाढवून ती जवळपास साडेसात एमएलडी करण्याचे प्रस्तावित आहे. त्यातून निश्चितपणे सुधारणा होईल. त्यासोबत एमआयडीसीकडूनही सुधारणा होण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न होत आहे. जून २०११ पूर्वी या सुधारणा करण्याबाबत निर्देश दिलेले असल्यामुळे महाड तालुक्यातील सरोवर आणि नद्यांच्या पाण्याच्या प्रदूषणात सुधारणा होऊ शकेल. सन्माननीय सदस्या श्रीमती पंकजा मुंडे-पालवे यांनी परळी औष्णिक विद्युत

[ श्री. संजय देवतळे ]

प्रकल्पाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. चंद्रपूर येथे थर्मल पॉवर स्टेशन आहे. त्यामुळे तेथील समस्यांची मला जाणीव आहे. तेथे वृक्ष लावले नसतील किंवा कमी प्रमाणात वृक्ष लावले असतील तर ते लावण्याबाबत संबंधितांना व महाजनको यांना निश्चित सूचना देण्यात येतील. प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुधारण्याकरिता फेब्रुवारी, २०१२ पर्यंत कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून राज्यातील प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाणार आहे. राज्याला विजेची गरज आहे. मात्र त्याच बरोबर प्रदूषणाचा विषय देखील तितकाच महत्त्वाचा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रवींद्र वायकर यांनी सांगितले की, नद्यांमध्ये सांडपाणी सोडले जाते. नोटिफाईड नद्यांमध्ये सांडपाणी सोडण्याकरिता निर्बंध घातलेले आहे. नोटिफाईड नद्यांमध्ये सुरक्षित अंतर ठेवून उद्योगांना सांडपाणी सोडण्याची परवानगी दिली जाते. मिठी, बोईसर या नद्यांना नोटिफाईड नदीचा दर्जा नसल्यामुळे, सीआरझेड धोरण लागू होत नाही. तरी देखील मिठी नदीच्या संदर्भात न्यायालयाच्या निर्णयानुसार दोन्ही तीरांवर ३० मीटरपर्यंत बंदी घातली आहे. त्या ठिकाणी काही प्रमाणात प्रदूषण आढळून आले तर निश्चितपणे विभागामार्फत तेथे सर्व्हे केला जाईल व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाईल.

अध्यक्ष महोदय, रेडिमिक्स प्लांटच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. आहे. हे प्लांट मेट्रोरेल व रोडचे कॉंक्रिटीकरण करण्याकरिता उभारण्यात आलेले आहेत. तो या प्रकल्पाचाच एक भाग आहे. त्याकरिता पर्यावरण विभागाकडून मंजुरी घेतलेली आहे. प्रकल्प पूर्ण होईपर्यंत त्यास तात्पुरती परवानगी दिलेली आहे. ही परवानगी प्रकल्प पूर्ण होईपर्यंत लागू राहील. सन्माननीय सदस्य श्री. विजय शिवतारे यांनी ज्युबिलियन्ट ऑर्गनायझेशन व इंडियन सीमलेस या संदर्भात मुद्दा मांडला. मी सांगू इच्छितो की, आमच्या विभागामार्फत अधिकारी पाठवून तेथील प्रदूषणाच्या बाबत अनियमितता होत असेल तर ते तपासण्यात येईल. तसेच प्रदूषण होत असल्याचे आढळून आल्यास कारवाई केली जाईल. या मध्ये संबंधित लोकप्रतिनिधी यांना देखील सहभागी करून घेतले जाईल. उद्योगांनी काही अटी व शर्तींचे पालन केल्यानंतर पर्यावरण विभागाकडून परवानगी दिली जाते. काही अटी व शर्तीमध्ये त्रुटी आढळून आली तर टाईम बाऊंडमध्ये त्याची पूर्तता करून घेतली जाते. एमआयडीसी, सीईटीपी व काही महानगरपालिका यांचे प्लांट कमी क्षमतेचे आहेत. त्यांची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल व प्रदूषण नियंत्रित केले जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्यांची नोंद घेऊन त्या प्रमाणे कार्यवाही केली जाईल. आपण पर्यावरण विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**डॉ. नितीन राऊत** ( जलसंधारण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन २०११ -२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांच्या संदर्भात बोलण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, २२ सन्माननीय सदस्यांनी जलसंधारण विभागाच्या संदर्भात सूचना केलेल्या आहेत. त्यांचे मी स्वागत करतो व आभार मानतो. जल, जमीन, जंगल हे पृथ्वीवरील महत्त्वाचे स्त्रोत आहेत. भूतलावरील जीवजंतु, मनुष्यप्राणी यांच्यासाठी पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. भूगर्भातील पाण्याची कमी होणारी पातळी लक्षात घेता, दूरदृष्टी समोर ठेवून तत्कालीन मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांनी सन १९९२ मध्ये जलसंधारण विभागाची निर्मिती केली होती. आज या विभागाला तब्बल १८ वर्षे पूर्ण झालेली

[ डॉ. नितीन राऊत ]

आहेत. या कालावधीत या विभागाने आतापर्यंत अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले असून १८ वर्षाच्या अनुभवातून आता निश्चितच निर्णायक कार्यक्रम हाती घेतले असून अनेक कार्यक्रम सद्य:स्थितीतीत प्रस्तावित आहेत. लघु पाटबंधारे विभागामध्ये शासन पुरस्कृत व जलसंधारण महामंडळामार्फत योजना कार्यान्वित करण्यात येतात.

राज्यात १०१ ते २५० व ० ते १०० हेक्टरच्या पूर्ण झालेल्या योजनांची संख्या ५५,१४१ इतकी असून ७६६१ योजना प्रगतीपथावर आहेत. राज्याचे आजचे निर्मित सिंचन क्षेत्र ५८.०४ लक्ष हेक्टर असून जलसंपदा विभागाचे ४४.८६ लक्ष हेक्टर, तर लघु पाटबंधारे विभागांतर्गत आता पर्यंत १०१ ते २५० हेक्टर व ० ते १०० हेक्टरच्या प्रकल्पांमधून १३.१८ लक्ष हेक्टर इतके सिंचन निर्माण झाले आहे. तर अंदाजे ६.२० हेक्टर इतके उद्दिष्ट आहे. जलसंधारणाकडील प्रगतीपथावरील योजनांमध्ये २.०३ लक्ष सिंचन क्षमता निर्माण होणार असून ४.१७ हेक्टर एवढे क्षेत्र सिंचनाखाली आणावयाचे आहे.

११ लाख ६१ हजार ८८३ हेक्टर इतकी सिंचन क्षमता आज राज्यात निर्माण झाली असून यात पाटबंधारे, लघु पाटबंधारे तलाव, साठवण तलाव, कोल्हापुरी बंधारे, उपसा सिंचन, वळवणी बंधारे, मालगुजारी तलाव, पाझर तलाव, गाव तलाव व भूमिगत बंधारे इत्यादी कामांचा समावेश आहे.

विभागनिहाय विचार केल्यास कोकण विभागात आतापर्यंत ३५ हजार २३४ हेक्टर, नाशिक विभागात २ लाख ३८ हजार ४४८ हेक्टर, पुणे विभागात २ लाख ४२ हजार ९०८ हेक्टर, औरंगाबाद विभागात ३ लाख, ६० हजार १३५ हेक्टर, नागपूर विभागात २ लाख, ४ हजार ५०१ हेक्टर आणि अमरावती विभागात ८० हजार ७५७ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

सद्य:स्थितीत महामंडळाचे एकूण बजेट हे १९५ कोटी रुपये एवढे असून एकूण ७०० कोटी रुपयांच्या योजना कार्यान्वित आहेत. महामंडळाकडे सर्वसाधारणपणे १०१ ते २५० हेक्टर प्रकल्पांसाठी निधी असला तरी, ० ते १०० हेक्टर योजनांची मागणी आज लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात करत आहेत. त्यामुळे ० ते १०० व १०१ ते २५० हेक्टर योजनांची मागणी व प्रत्यक्षात सुरू असलेली कामे व त्यावर उपलब्ध करून दिलेला निधी बघता यात मोठ्या प्रमाणावर कामाच्या निधीची वाढ करावी लागणार आहे.

या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीमध्ये निधी वाढीच्या मागणीला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. या ठिकाणी अनेक सदस्यांनी खास करून विदर्भ व मराठवाड्यातील सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडले की, सद्य:स्थितीत जलसंपदा विभागांतर्गत सुरू असलेल्या मोठ्या प्रकल्पांची क्षमता अनेक कारणांमुळे आता कमी झाली असून राज्यातील सिंचन क्षमतेमध्ये खऱ्या अर्थाने वाढ करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाकडे असलेल्या पर्यायांमध्ये मोठ्या प्रमाणात लक्ष घालण्याची आज गरज आहे. त्यामुळे जास्तीत जास्त प्रकल्प तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होण्यासाठी मापदंडामध्ये सुधारणा करण्याचा आग्रह सर्वांनी केलेला आहे. मी या ठिकाणी नमूद करू इच्छितो की, मापदंडामध्ये निश्चितपणे सुधारणा करण्यात येईल व सुधारणा करत असताना ती क्षेत्रनिहाय व्हावी असे आम्ही जलसंपदा विभागाला सांगितले आहे.

**[ डॉ. नितीन राऊत ]**

मागील आठवड्यातच प्रा. विरेंद्र जगताप यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याबाबत माननीय जलसंपदा मंत्री माननीय श्री. सुनील तटकरे साहेबांनी अधिवेशन कालावधी संपण्यापूर्वी निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे निश्चितच मापदंडाचा प्रश्न या वेळेला निकालात लागून मोठ्या प्रमाणात सिंचन क्षमता वाढविण्याबाबत लक्ष पुरविले जाईल. याबाबतीत माननीय राज्यपालांचे कडक आदेश असतानाही विदर्भातील लघु प्रकल्पांचा अनुशेष अजूनही कायम आहे. हे सगळे लक्षात घेता, यावेळेला या मापदंडामुळे निश्चितपणे विदर्भातील खास करून अमरावती विभागातील सिंचन क्षमता वाढविण्यास मदत होईल.

दुसरी एक गोष्ट माजी मालगुजारी तलावाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडले. विदर्भात ६६९४ मालगुजारी तलाव असून, त्यांची सिंचन क्षमता १ लाख ४ हजार २८४ हेक्टर इतकी आहे. या पैकी १६४१ तलावांची दुरुस्ती सध्या विभागांतर्गत घेतलेली आहे. या १६४१ तलावांची दुरुस्ती सध्या RKVY अंतर्गत आम्ही घेतली असून त्यापैकी ८३४ तलाव दुरुस्तींची कामे पूर्ण झालेली आहेत. त्यावर ३२ कोटी रुपये खर्च करण्यात आलेला आहे. यातील बहुतेक तलाव जलसंधारण विभागाने तयार केले असले तरी त्याची देखभाल व दुरुस्ती जलसंधारण विभागाकडे आहे. त्यातील गाळ काढणे, तलावांची दुरुस्ती करणे, डागडुजी करणे, तलावांची दुरुस्ती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मागण्या येत असून त्यावर दुरुस्तीचा स्वतंत्र कार्यक्रम तयार करण्याची योजना आम्ही आखली आहे व जलसंपदा विभागाकडे गोंदिया भागातील तलावांची मागणी करणार आहोत. जेणे करून तेथील अनुशेष दूर होण्यासाठी मदत होईल. जलसंपदा विभाग अनेक विभागांशी जोडलेला आहे. स्वत:ची अशी प्रशासन यंत्रणा या विभागाकडे नाही. या विभागाची स्वतंत्र अशी प्रशासन यंत्रणा उभी राहिली तर निश्चितपणे लघु पाटबंधारेचे काम घेण्यात येणार आहे, त्याद्वारे सिंचन क्षमता वाढविण्यास निश्चितपणे मदत होईल. म्हणून जलसंधारण विभागाचे स्वतंत्र आयुक्तालय व्हावे यासाठी सुद्धा प्रयत्नशील आहोत. उपअभियंता, शाखा अभियंता यांची अनेक पदे आमच्याकडे रिक्त आहेत. सदर पदे भरण्यासंबंधीच्या सूचना आम्ही दिल्या असून पुरेसा आकृतिबंध महामंडळाकडे नसला तरी महामंडळाचा दर्जा इतर क्षेत्रीय महामंडळे आहेत त्याप्रमाणे उभारण्याच्या कामी आम्ही प्रशासकीय पुनर्रचना करून ते काम हाती घेण्याचे ठरविले आहे.

सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पाणलोट विकास क्षेत्र हा महत्त्वकांक्षी कार्यक्रम अंमलात आणला. रिझ टू व्हॅली ही संकल्पना राबवित असताना छोट्या आकाराचे चेकस् डॅम्प, भूजलाच्या पातळीत वाढ करण्यासाठी प्रभावी ठरतील. असा पाणलोट विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवण्यात आला आहे. अपूर्ण पाणलोट पूर्ण करण्यासाठी शासनाने सन २००७ मध्ये गतिमान विकासाचा धडक कार्यक्रम हाती घेतलेला आहे. त्या माध्यमातून जवळपास ११.१३ कोटी इतका निधी उपलब्ध करून ३ वर्षांत १६८४ सूक्ष्म पाणलोट विकसित करण्यात आले आहेत. विदर्भ पाणलोट विकास मिशन, मराठवाडा पाणलोट विकास मिशन, नाशिक विभागातील कार्यक्रम असे अनेक प्रकारचे कार्यक्रम घेतले आहेत. RIDF अंतर्गत सुद्धा १५०० कोटींचा अर्थसहाय्य घेऊन पुढील ३ वर्षांचा कार्यक्रम राबविण्याची योजना आखली आहे. आदर्श गाव योजना आम्ही सुरू केली असून त्याद्वारे अनेक कार्यक्रम व उपाययोजना करण्यात येत आहेत.

[ डॉ. नितीन राऊत ]

११ एप्रिल म.ज्योतिबा फुले यांचा जन्मदिवस आहे. त्यांनी मृद आणि जलसंधारणामध्ये मोठे काम केले आहे. त्यामुळे या राज्यामध्ये ११ एप्रिल ते १ जुलैपर्यंत, म्हणजे श्री. वसंतराव नाईक यांच्या जन्मतिथीपर्यंत म. फुले जलभूमी संधारण अभियान मोठ्या प्रमाणावर राबविणार आहोत. त्या माध्यमातून तलावातील गाळ काढणे, सिंचन विहिरींची दुरुस्ती करणे, जवाहर विहिरीतील गाळ काढणे, त्याचे खोलीकरण करणे इत्त्यादी कार्यक्रम राबविण्यात येत असून, वृक्षलागवडीचा कार्यक्रम देखील हाती घेण्यात येईल. रुफ वॉटर हार्वेस्टिंग हे देखील महत्त्वाचे काम आहे. चेन्नईला पॅटर्न राबविण्यात आला आहे. त्यामुळे तेथील पाण्याची पातळी ५० टक्क्याने वाढली आहे. तेथे आम्ही आमचा अभ्यासगट पाठविणार आहोत. सागरमध्ये देखील त्यांनी चांगल्या प्रकारचे काम केले आहे. बसाल्ट असलेल्या परिसरामध्ये त्यांनी फार मोठ्या प्रमाणावर चांगले काम केले आहे. पाण्याची पातळी वाढविण्यासंबंधी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे आणि तो सफल झालेला आहे. या दोन्ही ठिकाणी आम्ही अभ्यासगट पाठवून तो कार्यक्रम येथे कशा प्रकारे राबविण्यात येईल यासाठी देखील प्रयत्नशील राहणार आहोत.

अध्यक्ष महाराज, शहरांमध्ये रेन हार्वेस्टिंगचा मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. शहरातील नद्या आणि नाले वाहत असतात किंवा त्या ठिकाणी पाण्याचा साठा नसतो. अशा नदी, नाल्यांचे खोलीकरण केले तर पाण्याची पातळी वाढू शकते, त्यादृष्टीने देखील कार्यक्रम हाती घेतलेला आहे.

अध्यक्ष महाराज, सामाजिक वनीकरण हा सुद्धा एक महत्त्वाचा विषय आहे. त्सुनामीसारख्या घटना घडतात, त्यादृष्टीने वनीकरणाला खूप महत्त्व आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात ६४९ हेक्टर किसान रोप वाटिका तयार करण्यात आलेल्या असून त्याद्वारे विविध प्रजातींच्या ६९ लक्ष रोपे तयार करण्यात आली आहेत. सदर योजनेवर गेल्या तीन वर्षांत ११५.७० कोटी रुपये खर्च करण्यात आलेला आहे. मागील तीन वर्षांत राज्यात सामाजिक वनीकरणासाठी सरासरी २,४०० हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, त्यासाठी १९ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्या श्रीमती पंकजा मुंडे-पालवे यांनी या ठिकाणी अतिशय उत्कृष्ट भाषण केलेले आहे. त्यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी औष्णिक वीज प्रकल्प आहेत त्या ठिकाणी पर्यावरणाचे संतुलन राखले पाहिजे. माझ्या मतदारसंघाच्या शेजारी कोराडी आणि खापरखेडा हे औष्णिक वीज प्रकल्प असल्यामुळे मला त्याबाबत अनुभव आहे. तेव्हा आम्ही त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षांची लागवड करण्याचा कार्यक्रम हाती घेत आहोत. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, राज्याचे सामाजिक वनीकरणाचे धोरण अजून निश्चित नाही. नवीन धोरण लागू करण्याचे काम आम्ही करीत आहोत. यामध्ये बांबू मिशनचा कार्यक्रम देखील आहे. बांबू मिशनचा कार्यक्रम राबवित असताना बांबूचे धोरण आणण्याचे काम करावे लागणार आहे, त्यासाठी आम्हाला वन विभाग निश्चितपणे मदत करेल असा विश्वास आहे.

सन्माननीय सदस्य श्री. राजकुमार बडोले यांनी सांगितल्याप्रमाणे प्रोटेक्टिव्ह सिंचन मामा तलावाच्या माध्यमातून होते. त्यासंबंधीचा अनुशेष दूर करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सन्माननीय सदस्य श्री. चिमणराव पाटील यांनी पुनर्वसनाच्या तरतुदी लावणे आणि जुन्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा मुद्दा उपस्थित केला, ती सुद्धा बाब मान्य करण्यात येईल.

[ डॉ. नितीन राऊत ]

सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी के. टी. वेअर्सच्या संदर्भात सूचना केलेल्या आहेत, त्याबाबत निश्चितपणे निधी उपलब्ध करून देण्याची काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी ज्या सूचना केल्या त्यांचा देखील विचार करण्यात येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्या निश्चितपणे विचारात घेतल्या जाणार आहेत. मी सभागृहाला विनंती करतो की, माझ्या विभागाच्या मांडलेल्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

**श्री. जयंत पाटील** ( ग्रामविकास मंत्री ) : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दोन सूचना केलेल्या आहेत. त्यांची पहिली सूचना अशी आहे की, सिनिअर ॲडीशनल सी.ई.ओं.कडे लहान जिल्हा परिषदांचा कार्यभार द्यावा. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, सरकारने यापूर्वीच लहान जिल्हा परिषदांची जबाबदारी ॲडीशनल सी.ई.ओं.कडे द्यावी असा प्रस्ताव केलेला आहे. सध्या त्यावर चर्चा सुरू आहे. असे करणे गरजेचे आहे, कारण सर्व ठिकाणी आय.ए.एस. अधिकाऱ्यांची नियुक्ती न करता ज्या ठिकाणी लहान जिल्हे आहेत त्या ठिकाणी ॲडीशनल सी.ई.ओ.कडे अधिकार दिले पाहिजेत. शेवटी स्टेट केडरला देखील वर येण्याची संधी दिली पाहिजे. तेव्हा जे अतिशय लहान जिल्हे आहेत त्याबाबत स्वतंत्रपणे विचार राज्य स्तरावर केला जाईल. आय.ए.एस. नॉमिनेशनसाठी या केडरमधून जास्त अधिकारी पुढे यावेत अशी सूचना त्यांनी केलेली आहे. त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. विवेक पंडित यांनी राजमाहची वस्ती अशी एक ग्रामपंचायत असल्याचे सांगितले. मी सांगू इच्छितो की, ती उदयवाडी नावाची ग्रामपंचायत आहे. त्या ठिकाणी ४ एसटी, २ ओबीसी, अनरिझर्व्हड अशा कॅटेगरीज आहेत. त्यांना सर्टिफिकेट न मिळाल्यामुळे, तेथे ते निवडणुकीला उभे राहू शकलेले नाहीत. सन २००३ पासून पुन्हा त्या ठिकाणी प्रशासक आहे. ही जी अडचण आहे, त्याबद्दल काही दुमत नाही. सन्माननीय सदस्यांनी सुद्धा त्याकडे लक्ष वेधले आहे. आपण ३५ गावांचा प्रश्न देखील विचारला होता. वसई-विरार महानगरपालिकेतून ३५ गावे वगळणे आणि २ गावे मनपामध्ये समाविष्ट करणे अशी नवी अधिसूचना निघाली आहे, अंतिम अधिसूचना निघालेली नाही. १४ पैकी २ गावे मनपामध्ये जाणार आहेत, असे प्रस्तावित आहे. शिल्लक १२ गावांपैकी ते मनपातून वगळल्यानंतर मग त्यासाठी आवश्यक असणाऱ्या ग्रामपंचायतीची व्यवस्था तत्काळ निर्माण करता येईल. तिनके, अकरण व तरकट या गावांमध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत प्रस्ताव मागविण्याची व्यवस्था तत्काळ करण्यात येईल.

महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जयस्वाल यांनी सभागृहात अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत, पूर्वी देखील केल्या आहेत. परफॉरमन्स ग्रँट द्यावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. त्याचबरोबर अतिक्रमण काढण्यासाठी वेगळी यंत्रणा उभी करावी, अशी सूचना देखील त्यांनी केलेली आहे. स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यासाठी स्वतंत्र विचार करता येईल. आपण आता जी नवीन पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजना केली आहे, त्यामध्ये सुरुवातीला परफॉरमन्स ग्रँट आहे. परफॉरमन्स ग्रँटटाईप त्याचा विषय आहे. जी गावे झाडे लावतील, टॉयलेट बांधतील आणि वसुली करतील त्या परफॉरन्सवर ग्रँट देण्यास सुरुवात केली आहे. मला सांगण्यास आनंद वाटतो की, राज्य शासन आतापर्यंत ग्रामपंचायतींना कोणत्याही स्वरूपात अनुदान देत नव्हते. राज्य शासनाची ही पहिली वेळ की ग्रामपंचायतींना अनुदान देण्याचा कार्यक्रम महाराष्ट्रात सुरू झाला आहे. मला सांगण्यास आनंद वाटतो की, महाराष्ट्रात जवळपास १९ हजारांच्या

[ श्री. जयंत पाटील ]

दरम्यान अशी गावे आहेत की, ज्यांनी लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाडे लावण्याचा प्रयत्न केला आहे. जवळपास १६,९०० गावे अशी आहेत की, ज्यांनी आपले गाव निर्मलग्राम करण्यासाठी ६० टक्क्यांपेक्षा जास्त कुटुंबांकडे शौचालय बांधण्याचा प्रयत्न केला. ११ ते १२ हजारांच्या दरम्यान अशी गावे आहेत की, ज्यांनी घरपट्टी आणि पाणीपट्टी यामध्ये ६० टक्क्यांपेक्षा जास्त वसुली केली आहे. त्यामुळे या योजनेमुळे गावात सुधारणा करण्याचे पाऊल टाकण्यात आले आहे. गावात लोक फार चांगल्या प्रकारे काम करताना आपल्याला दिसत आहेत. त्यासाठी आपल्याकडे १५२ कोटी रुपये होते, जे ३१ मार्चच्या अगोदर आपण रिलीज केले आहेत. बजेट मंजूर होईल त्यावेळी विभागाला देण्यात आलेले दोनशे कोटी रुपये ताबडतोब रिलिज होतील. जे ४० कोटी रुपये शिल्लक राहतील, ते देखील लवकर उपलब्ध करून देण्याचे माननीय अर्थमंत्री महोदयांनी मान्य केले आहे. आपण पहिल्या वर्षीचे अनुदान ॲट द मोस्ट जूनपर्यंत सगळे पोहोच करणार आहोत. कदाचित त्याच्या अगोदर होईल, म्हणजे या महिन्याच्या अखेर, बजेट मंजूर झाल्यानंतर कदाचित मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होईल.

अध्यक्ष महोदय, आपण गावांना झाडे लावण्याची मोकळीक दिलेली आहे व सगळ्या झाडांना नंबरिंग केले आहे. वैशिष्ट्य असे आहे की, गावाने झाडे लावल्यावर त्या झाडांना नंबरिंग करण्यात आले आहे. झाडे लावली आहेत त्याचे आपण ३ वेळा व्हेरिफिकेशन केले आहे. लावलेली झाडे २५ टक्क्यांपेक्षा कमी जगली तर ते गाव त्या ग्रँटमधून बाहेर जाणार आहे. यापूर्वी पंचायत राज अभियान किंवा संत गाडगेबाबा नावाचे स्वच्छतेचे अभियान सुरू केले आहे, त्या अभियानामध्ये गावांनी भाग घेतला पाहिजे आणि किमान ५० ते ६० टक्क्यांपर्यंत गुण मिळविले पाहिजेत. पहिले आले नाहीत, तरी चालतील. त्या गावांना दोन्ही अभियानांचा अवेअरनेस असला पाहिजे, याची काळजी यामध्ये घेतली आहे. मिळालेल्या ग्रँटमधून गावामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचे संतुलन निर्माण करण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो. घनकचऱ्याचे व्यवस्थापन, सांडपाण्याचा निचरा, सौरऊर्जेचा वापर, असे १२/१३ मुद्दे यामध्ये दिलेले आहेत आणि अशी फ्लेक्झिबिलिटी ठेवलेली आहे की, जर गावांनी या योजनेमध्ये दिलेले सर्व मुद्दे पूर्ण केले असतील आणि त्या गावांनी विशेष परवानगी मागितली तर इनोव्हेटिव्ह स्कीमसाठी देखील पैसे खर्च करण्यास शासन परवानगी देणार आहे.

अध्यक्ष महोदय, या योजनेचे हे पहिले वर्ष आहे. परंतु, एकंदर महाराष्ट्रातील अवेअरनेस बघितला तर मला खात्री आहे की, ही योजना गावामध्ये बऱ्यापैकी चांगल्या योजना निर्माण करण्यासाठी उपयोगी पडू शकेल. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी याबाबत अधिक लक्ष दिले, तर आपल्याला आपल्या मतदासंघातील सगळ्या गावांमध्ये या योजनेतील ग्रँट मिळविणे शक्य होईल. नाही तरी आपण आमदार फंडातील पैसे देत असतोच. परंतु, गावांनी परफॉरमन्स दाखविला तर या माध्यमातून सरकारचा निधी गावांना आपोआप मिळणार आहे. ही योजना चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी या गावांना जास्तीतजास्त प्रोत्साहन स्थानिक आमदारांनी दिले तर आपल्या मतदारसंघात अधिक निधी येऊ शकेल, असा मला विश्वास आहे.

[ श्री. जयंत पाटील ]

अध्यक्ष महोदय, आज या ठिकाणी पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या बाबतीतही अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत. सन्माननीय सदस्य, श्री. शशिकांत शिंदे जरी सभागृहात उपस्थित नसले तरी त्यांचा मुद्दा अतिशय गंभीर आहे. त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या मतदारसंघामध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या कामांची गुणवत्ता घसरलेली आहे. त्यामुळे त्याबाबतचे स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे, असे मला वाटते. मी या माध्यमातून त्यांना सांगू इच्छितो की, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील कामांच्या गुणवत्तेचे निरीक्षण ३ टप्प्यांमध्ये केले जाते. कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि काम सुरू असताना राज्यस्तरीय गुणनियंत्रण पथक या कामांची तपासणी करतात. त्याचप्रमाणे केंद्रीय पातळीवरील गुणनियंत्रण पथक त्यांना पाहिजे त्यावेळी क्वॉलिटी कंट्रोल चेकसाठी येतात आणि तपासणी करून जातात. यानंतर जरी एखादी स्वतंत्र तक्रार आली तरी आपल्याला पुन्हा त्या कामाचे निरीक्षण करता येते. सन्माननीय सदस्य, श्री. शशिकांत शिंदे यांना मला सांगावयाचे आहे की, त्यांची जर काही स्पेसिफिक तक्रार असेल तर ती त्यांनी माझ्याकडे किंवा माननीय राज्यमंत्र्यांकडे द्यावी. आम्ही तत्काळ त्याची चौकशी करू. पण रस्त्याचे काम झाले आहे, आता चौकशी करता येणार नाही, असे नाही. रस्ता झाल्यानंतरही रस्त्याच्या कामात किती लेअर घातलेले आहेत, त्याची क्वॉलिटी कशी आहे, याबाबतची तपासणी आपण करू शकतो. रस्ता तयार झाला की, आपण काही करू शकत नाही, असे नाही. कामाच्या दर्जाबाबत एखाद्याला काही शंका असेल आणि त्याबाबतची माहिती त्यांनी आम्हाला दिली, तर आम्ही निश्चितपणे सर्व चौकशी करू शकतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव गेडाम यांनी गडचिरोलीमधील पंतप्रधान ग्रामसडक योजनेबाबत मुद्दा मांडलेला आहे. गडचिरोली हा नक्षलग्रस्त जिल्हा असल्यामुळे या जिल्ह्याला या योजनेतून विशेष निधी मंजूर केलेला आहे. हा निधी खर्च होतांना एक अडचण अशी निर्माण झाली होती की, कंत्राटदार काम करण्यासाठी पुढे येत नव्हते. आता मात्र कंत्राटदार काम करण्यासाठी पुढे आलेले आहेत. पण ते ७० टक्के निधीची मागणी करीत आहेत. म्हणजे १०० रुपयांचे काम असेल तर ते १७० रुपये वाढवून मागतात. आता त्यांच्याशी निगोशिएट करून हे प्रमाण १५५ रुपयांपर्यंत खाली आणलेले आहे. मधल्या काळात शेड्युल्ड ऑफ रेट वाढले. त्यामुळे ४४ कामांना नेट २८ कोटी रुपये रक्कम एक्सेस लागेल, असे सध्याचे चित्र आहे. हा २८ कोटी रुपयांचा जादा खर्च राज्य सरकारने देण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे ही कामे पूर्ण होण्यात आता अडथळा नाही, याची कृपया सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य, श्री. ग. आ. देशमुख यांनी असे सांगितले की, अंमलबजावणी यंत्रणा नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, मागील ८-९ महिन्यांमध्ये जवळपास १,३४६ पदे निर्माण केली गेली आहेत. मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता या संवर्गातील पदे भरण्यात आली आहेत. तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील पदे भरण्याचे काम सुरू आहे, तेही पूर्ण होत आले आहे.

अध्यक्ष महोदय, पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधील कामे मोठ्या प्रमाणात बंद आहेत, असे म्हटले जाते. पण मी सांगू इच्छितो की, पंतप्रधान ग्रामसडक योजनेमध्ये आपण जे प्रस्ताव पाठविले होते, त्यामध्ये आपण टप्पा १० स्वतंत्रपणे प्रस्तावित केलेला आहे. याबाबत सहा हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविले आहेत. मार्च, २०११ पर्यंत जवळपास १,२५० कोटी रुपये केंद्र शासनाकडून प्राप्त झाले असून, त्यातून १,००८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. यामध्ये एकूण ३,६६४ किलोमीटर इतके रस्ते पूर्ण करण्यात

[ श्री. जयंत पाटील ]

आले आहेत. नवीन टप्पा ६ हजार कोटी रुपयांचा केंद्र शासनाकडे पाठविला आहे. या विभागाचे त्या वेळचे मंत्री श्री. सी. पी. जोशी यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली. तेव्हा असे लक्षात आले की, दुसऱ्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात पूर्वी प्लॅनमध्ये जे रस्ते मान्य केले होते, ते जवळपास पूर्ण झाले आहेत. त्यामुळे आता रि-डेव्हलपमेंट ऑफ रोड ही कन्सेप्ट मान्य करावी असा शासनाने प्रयत्न केला आहे. रोजगार हमी योजनेतील रस्ते चांगले आहेत असे आपण पूर्वीच केंद्र शासनाला कळविले आहे. या रस्त्यांवर रोजगार हमी योजनेतून पैसे खर्च केले आहेत. जे रस्ते कच्च्या अवस्थेत आहेत, ते रस्ते या योजनेमध्ये येणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मघाशी असा उल्लेख केला आहे की, एमडीआरचे ओडीआर करा, मग पैसे देण्यात येतील असे केंद्रीय मंत्री महोदयांनी सांगितले. माननीय केंद्रीय मंत्री श्री. विलासराव देशमुख व श्री. सी. पी. जोशी यांची भेट झाल्यावर सर्व राज्यांना समान वागणूक द्यावी लागेल, असे त्यांनी सुचविले आहे. त्यामुळे दुसऱ्या राज्यांतील रस्त्यांची स्टेज व आपल्या राज्यातील रस्त्यांची स्टेज यामध्ये रि-डेव्हलपमेंट करावे असे आपण म्हणत आहोत. दुसऱ्या राज्यात ५०० लोकसंख्या असलेल्या गावांना रस्त्यांनी जोडणे बाकी आहे. ती स्टेज महाराष्ट्र राज्याच्या लेव्हलपर्यंत येईल, तोपर्यंत महाराष्ट्र राज्यात नवीन कामे मंजूर करणे अवघड आहे. अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. पूर्वी केंद्र शासनाला राज्य सरकारने कळविले आहे की, एवढे-एवढे रस्ते झाले आहेत. त्यामध्ये जे शिल्लक राहिले ते जवळपास पूर्ण होत आहेत. महाराष्ट्र राज्याची पुढील स्टेज घ्यावयाची असेल तर दुसऱ्या राज्यांची सुद्धा पुढील स्टेज घ्यावी लागेल. मग त्या स्टेजपर्यंत तुम्ही थांबा असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री. विलासराव देशमुखसाहेबांशी माझी याबाबत दोनवेळा चर्चा झालेली आहे. आमचे राज्यमंत्री महोदय त्यांना भेटून आले आहेत. आपल्या राज्याचे मंत्री महोदय असले तरी आम्ही त्यांना विनंती केली आहे की, यातून विशेष काहीतरी मार्ग काढून या कॅटेगरीची जी राज्ये आहेत, त्यांना पुढची स्टेज कन्टिन्यू करण्यास परवानगी द्यावी. पुढील काही दिवसांत या संदर्भातील बैठक राज्य शासनाबरोबर ते घेणार आहेत. मला खात्री आहे की, ते यातून निश्चितपणे मार्ग काढतील. महाराष्ट्रात पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या कामांसाठी अधिक निधी यावा. याबाबत सदस्यांच्या ज्या भावना आहेत, त्यानुसार कामे पूर्ण करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मानसिंगराव नाईक, यांनी पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या बाबतीत काही मुद्दे मांडले आहेत. त्याप्रमाणे पाठपुरावा करण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती पंकजा मुंडे-पालवे यांनी देखील निर्मलग्राम योजनेच्या पाणी पुरवठ्याबाबत विषय मांडला आहे. त्याचप्रमाणे पर्यावरणाच्या बाबतीत मुलांना अधिक सहभागी करून घेण्यात यावे. तसेच लहान मुलांपासून याची सुरुवात करावी अशी त्यांची मागणी आहे. त्यांनी केलेली सूचना निश्चितपणे मान्य केली जाईल. त्या दृष्टिकोनातून शाळा आणि महाविद्यालय येथे रोपवाटिका तयार करण्यासाठी जास्त प्रोत्साहन देण्यात येईल. याबाबत आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील. सर्वच सन्माननीय सदस्यांनी मांडलेले मुद्दे कॉमन आहेत. त्यामुळे त्यावर जास्त बोलण्याची आवश्यकता नाही, असे मला वाटते.

[ श्री. जयंत पाटील ]

सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांनी कोतवाल-परसुले, कोरपन ते महाबळेश्वर रस्ता करण्याची सूचना केली आहे. हा रस्ता त्यांच्या गावचा आहे. तेथील जिल्हा परिषदेला सूचना देऊन हा रस्ता पूर्ण करण्यात येईल. तो मतदारसंघ सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांचा नसला तरी त्यांना ६ महिन्यांनंतर त्यांच्या गावी जाण्यास त्रास होणार नाही, याची निश्चितपणे दखल घेतली जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर घुले यांनी बचत गटांसाठी तालुक्याच्या ठिकाणी विक्रीकेंद्र असली पाहिजेत, अशी सूचना केलेली आहे. आपण सन २००९-१० मध्ये ३२ कोटी रुपये खर्च करून १२९ तालुक्यांच्या ठिकाणी विक्रीकेंद्र बांधण्याचे काम सुरू केलेले आहे. मला सांगण्यास आनंद होतो की, सन २०११-१२ मध्ये विक्रीकेंद्र बांधण्यासाठी आणि प्रदर्शनासाठी ४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मी सांगू इच्छितो की, बचत गटांच्या वस्तूंचे मार्केटिंग इफेक्टिव्ह व्हावे यासाठी आमच्या विभागाने जाहिरात दिली, काही संस्थांना निमंत्रित केले आणि त्यांनी मार्केटिंग करावे, असे प्रयत्न सुरू केलेले आहेत. अजून त्यांचे फायनलायझेशन झालेले नाही. गुजरात राज्याने मोठ्या बिझनेस हाउसेस बरोबर टाय-अप करून बचत गटांच्या वस्तू त्या बिझनेस हाउसेसच्या शॉपस्मधून विक्री करण्याची प्रथा सुरू केलेली आहे. इतर काही राज्यात अशी व्यवस्था आहे की, बचत गटांची ॲबिलिटी, प्रॉडक्टिव्हिटी आणि क्वॉलिटी वाढवायची आणि त्यानंतर रितसर मार्केटिंग करावयाचे. आम्ही मार्केटिंग एजन्सी मिळविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. नॅशनल रूरल लाईव्हलीहूड मिशन ही कन्सेप्ट आम्ही लवकरच मंत्रिमंडळासमोर मांडणार आहोत. आता जगामध्ये ही कन्सेप्ट मान्य झालेली आहे की, गरिबांनी गरिबांसाठी पैसे वाटप करण्याचे काम हाती घेतले, तर त्याची वसुली चांगली होते आणि वाटपही समान प्रमाणात व लवकर होते. ही कन्सेप्ट आता आपल्या देशातही मान्य झालेली आहे आणि त्यानुसार ही कल्पना पुढे आलेली आहे. महाराष्ट्र राज्य लवकरच त्याचा स्वीकार करेल आणि त्याबाबतचा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळासमोर मांडणार आहोत. याबाबतची कल्पना अशी आहे की, राष्ट्रीयकृत बँकांनी बचत गटांच्या जिल्हा संघांना कर्ज द्यावयाचे आणि बचत गटांच्या जिल्हा संघाने ते मॉनिटर करून ग्रामीण पातळीवरील बचत गटांना वाटावयाचे, वसुली करावयाची आणि त्याची परतफेड करावयाची. आपल्याकडे बचत गटांची संख्या जास्त आहे. परंतु बँकांकडून कर्ज घेणाऱ्या बचत गटांची संख्या कमी आहे. कारण महिलांना बँकोबरोबर डील करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यामध्ये बरेच अडथळे येतात, बरेच प्रश्न तयार होतात. याबाबत एक चांगला पिरॅमिड तयार करून, आपण ही व्यवस्था केवळ महिलांच्या बचत गटांसाठीच नाही तर गावामध्ये राहणारा जो दारिद्र्यरेषेखालील माणूस आहे त्याच्यासाठीही करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, आपण असे करणार आहोत की, प्रशिक्षण देऊन केशकर्तनालय, ब्युटी पार्लर इत्यादीचे स्कील्ड गाव पातळीवर निर्माण करून, त्या सर्व्हिसेस गाव पातळीवर उपलब्ध करून दिल्या तर गावातील कस्टमरला तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची आवश्कता नाही. आपण असे स्कील्ड डेव्हलप केले तर दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी फार मोठे काम महाराष्ट्रात सुरू होऊ शकते आणि त्यादृष्टीने आमच्या विभागामार्फत प्रयत्न सुरू आहेत. त्या योजनेचे मूर्त स्वरूप झाल्यानंतर मी सभागृहाला त्याची माहिती देईन.

[ श्री. जयंत पाटील ]

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये सौरऊर्जेचा वापर वाढला पाहिजे. इको पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्ध योजनेमध्येही त्याचा उल्लेख आहे. सौरऊर्जेचे दिवे लावणे हे फार महत्त्वाचे काम आपण सुरू केले पाहिजे. आपण यासाठी केंद्र शासनाकडून काही ग्रँट मिळविलेली आहे. केंद्र शासनाची ग्रँट आणि राज्य शासनाची ग्रँट किंवा तेराव्या वित्त आयोगातून १/३ रक्कम वापरून आपण पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्ध योजनेमध्ये जी गावे मंजूर झालेली आहेत, त्या गावांमध्ये आपण हे दिवे ऑफर करणार आहोत. एखाद्या लांबच्या वस्तीवर दोन दिवे लावले तरी आपल्याला पर्यावरण संतुलनाचा मेसेज देणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितल्याप्रमाणे आपण दोन महत्त्वाचे निर्णय घेतलेले आहेत. आपण डीपीडीसीमध्ये निधी ठेवलेला आहे. आपण ५ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांचा प्लॅन करण्याची व्यवस्था केलेली आहे. कारण मोठी गावे एवढी वाढलेली आहेत की, त्या ठिकाणी आगीचा बंब किंवा ॲम्ब्युलन्सला जाता येत नाही. त्यामुळे येथून पुढे ५ हजार लोकसंख्या असलेली जी गावे आहेत, त्यांच्या गावांचा प्लॅन करून देण्याची योजना केली जाणार आहे. शहराचा डीपी प्लॅन केला जातो. त्याचप्रमाणे ५ हजार लोकसंख्या असलेल्या गावांचा प्लॅन तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात डीपीडीसीचा निधी ठेवण्यात आलेला आहे. त्यामध्ये आपण आणखी दोन नवीन कल्पना मांडलेल्या आहेत. त्यामध्ये लहान गावांसाठी डीपीडीसीमध्ये स्मशानभूमीसाठी निधी देण्याची व्यवस्था केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. संजय देवतळे यांच्या विभागाशी विचारविनिमय करून आणखी एक योजना राबविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील एका गावाचा पर्यावरण प्लॅन करण्याकरिता जिल्हा परिषदेने नावे देण्याची गरज आहे. शासन क्लस्टर ऑफ व्हिलेजेसमध्ये पर्यावरणाचा एक प्लॅन करून देणार आहे. तो प्लॅन एक गावासाठी दिल्यानंतर, सायन्सच्या महाविद्यालयांनी इतर गावांसाठी राबविण्याचा प्रयत्न करणार आहेत. पर्यावरणाच्या प्लॅनमध्ये हवा, पाणी, जमिनींच्या प्रदूषणाचे मोजमाप केले जाणार आहे. यामध्ये नदी, नाले, ओढ्यांमधील अडथळे दूर करण्यासाठी काय केले पाहिजे ? असा एखाद्या गावाचा समग्र प्लॅन केला जाणार आहे. सांगली महानगरपालिकेत इको सिटी प्लॅन तयार केलेला आहे. तो प्लॅन अतिशय चांगला आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील प्रदूषित गावांच्या संदर्भात प्लॅनचा अवलंब केला तर खूप चांगला परिणाम होणार आहे. आपल्या गावात हवेचे आणि पाण्याचे प्रदूषण किती आहे आणि त्यातून पुढील मार्ग कसा काढायचा याची माहिती प्रत्येक गावांना समजली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या संदर्भात मी न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषदेची इमारत, पंचायत समितीची इमारत याविषयी कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी ग्रामविकास विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर मागणी केलेली नाही. हे मला कुठे तरी खटकले आहे. बजेटमध्ये यावर्षी त्या कामांकरिता निधी उपलब्ध करून दिलेला आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या ज्या इमारती बांधकामाधीन आहेत, त्यांना अर्थसंकल्पीय निधी उपलब्ध करून दिलेला आहे. ग्रामपंचायत उभारण्यासाठी डीपीडीसीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

[ श्री. जयंत पाटील ]

अध्यक्ष महोदय, दिनांक २५ मार्च २०११ रोजी तेराव्या वित्त आयोगाचा निधी सर्व गावांना वितरित करण्यात आलेला आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. ग. आ. देशमुख यांनी यशवंत ग्रामसमृद्धी योजनाचा त्यांच्या भाषणात उल्लेख केला होता. त्यांनी असे सांगितले की, एक दिवसच खिडकी ओपन केली होती आणि तो प्रकार पूर्वनियोजित होता. मला अशा आरोपांची कल्पना होती. ५ कोटी रुपये शासनाकडे आहेत. त्या पैशाचे वाटप व्यवस्थितरित्या करणे ही अशक्यप्राय गोष्ट होती. ५ कोटी रुपये इतरत्र वापरण्याऐवजी एकदा लोकांना यशवत ग्रामसमृद्धी योजनबद्दल किती ॲट्रक्शन आहे हे पाहण्यासाठी मी मुद्दाम हा प्रयोग माझ्या विभागात राबविण्याची सूचना संबंधितांना केली होती. या संदर्भातील माहिती वेबसाईटवर टाकण्यात आली. वेबसाईटवर कुठेही चर्चा न होता, इंटरनेटवर ५ कोटींसाठी लोकांनी ४०० कोटी रुपयांच्या मागणीचे प्रस्ताव दिले. एक ते दीड दिवसांच्या गॅपमध्ये लोकांनी ५३ कोटी रुपयांची वर्गणी भरली. याचा अर्थ मी असा काढतो की, महाराष्ट्रात लोकांना वर्गणी भरून शासनाचे पैसे मिळविण्याची खूप इच्छा आहे. १५ टक्के आणि १० टक्के निधी भरल्यानंतर या योजनेचा लाभ घेता येतो. गावातील लोकवर्गणी करून पैसे भरतात, ही वस्तुस्थिती आहे. ....(अडथळा) .......

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य, श्री. ग. आ. देशमुख म्हणाले की, हे सर्व पूर्वनियोजित आहे, परंतु तशी परिस्थिती नाही. शासनाने पाच कोटी रुपये यशवंत ग्रामसमृद्धी योजनेत वर्ग केले. लोकांनी पैसे भरलेले आहेत, त्यामुळे शासनाकडे पैशांची मागणी सुद्धा वाढली. म्हणून टक्केवारी वाढवायची आहे ....(अडथळा).... एवढे मोठे पैसे ठेकेदार भरणार नाहीत. उत्साहाने स्वत: पुढाकार घेऊन लोकांनी पैसे भरले आहेत. १५ टक्के लोकवर्गणी वेगाने भरली म्हणून, तर २५ टक्के, ३० टक्क्यांपर्यंत ही वर्गणी करावी असा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. ....(अडथळा) ......हा महत्त्वाचा विषय आहे. आता ११.५१ वाजले आहेत, मी ११.५९ ला माझे भाषण पूर्ण करतो. कारण विभागाच्या वर्षभरातील या मागण्या आहेत, त्या केवळ दीड-दोन मिनिटांत मंजूर करणे, हे सभागृहाला शोभणार नाही. २५ किंवा ३० टक्के रक्कमेची वर्गणी भरावी असा विचार प्रस्तावित आहे. अद्यापपर्यंत मंत्रिमंडळापुढे सदरहू प्रस्ताव आलेला नाही, परंतु तो मंजूर करून घेण्यात येईल. गावातील लोकांनी वर्गणी करून हे पैसे भरावेत, असा या योजनेमागील उद्देश आहे. या योजनेची आपणा सर्वांना संधी मिळेल. २५ टक्के आणि १५ टक्केची ही संकल्पना चांगली आहे. लोकांनी वर्गणी गोळा करून पैसे कमी पडायला लागले, हे आपणा सर्वांना मान्य करावे लागेल. सर्वच सन्माननीय सदंस्यांना या योजनेचा लाभ मिळाला नसेल. २५:१५ टक्क्यांची ही जी कल्पना आहे. यामुळे गावात काम करता येते. मी अर्थमंत्री असताना २५:१५ मध्ये पैसे ठेवले. सुरुवातीला केवळ प्रायोगिक तत्त्वावर खर्च केला. परंतु नंतर या योजनेला इतकी लोकप्रियता मिळाली की जवळपास दोन हजार कोटी रुपयांची मागणी आली. यावेळी ७५ कोटी रुपये होते, ते वाटप करण्यात आले. ज्यांना या योजनेचा लाभ मिळाला नसेल त्यांना भविष्यात देण्याचा प्रयत्न केला जाईल. काही या बाजूने दिले, काही त्या बाजूने दिले, तर काही समोरच्या बाजूने दिले, तरी सुद्धा सर्वांचे समाधान होऊ शकणार नाही अशी ही योजना आहे. पत्र द्यावयाचे आणि पैसे घेऊन जावयाचे अशी ही साधी योजना आहे. त्यामुळे ७५ कोटी रुपयांमध्ये आम्हा सर्वांना न्याय देता आला नाही. शक्य असेल तर भविष्यात निश्चितपणे न्याय दिला जाईल आणि ज्यांना न्याय मिळालेला नाही, त्यांनी नाराज होण्याची आवश्यकता नाही. जे शिल्लक राहिले असतील, त्यांच्यासाठी भविष्यात सहानुभूतीपूर्वक धोरण ठेवून सहकार्य करण्यात येईल.

**ॲड. यशोमती ठाकूर** : अध्यक्ष महोदय, यशवंत ग्रामसमृद्धी योजना ही अतिशय चांगली योजना आहे त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. पुणे जिल्ह्यातील जवळपास ३००० खेडे गावांमध्ये ही योजना यशस्वी झाली आहे. औरंगाबाद येथील २००० गावांमध्ये या योजनेचा समावेश झालेला आहे परंतु नाशिक, नागपूर या जिल्ह्यात फारच कमी गावांचा समावेश आहे. नागपूर जिल्ह्यात १००० च्या वर तर अमरावती जिल्ह्यात २९३ च्या आसपास गावांचा समावेश आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये तफावत का दिसत आहे ? ग्राम विकास विभागाकडून ही तफावत दूर करण्याच्या संदर्भात काही कार्यवाही केली जाणार आहे काय ?

**श्री. जयंत पाटील** : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारला आहे. ही योजना तयार केल्यानंतर मी प्रथम अमरावती विभागात बैठक घेतली होती. या योजनेत लक्ष घालून काम करावे, असे मी त्यांना सांगितले होते. तसेच मी सर्व विभागांमध्ये जाऊन सांगितले आहे की, या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात अवेअरनेस वाढवावा, विकासाच्या दृष्टीने कोणताही एक भाग मागे राहता कामा नये. सन्माननीय सदस्या ॲड. यशोमती ठाकूर यांनी सांगितल्याप्रमाणे, नागपूर विभागातील चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्यांमधील गावांनी चांगल्या प्रकारे सहभाग घेतलेला आहे. ज्या ठिकाणी संघटितपणे काम करण्याची इच्छा आहे, त्या गावांना या योजनेचा जास्त फायदा झालेला आहे. ज्या गावांमध्ये निर्मल ग्राम योजना राबविण्यात आली नाही, ती गावे मागे राहिली आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील बार्शी तालुक्यात १०६ गावे आहेत तेथील केवळ ६ गावांमध्ये ६० टक्क्यांपेक्षा जास्त वसुली झालेली आहे. त्यामुळे केवळ ६ गावांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. मी पुन्हा एकदा अमरावतीला येतो. आपण पुन्हा प्रयत्न करू. तेथे आपण सर्वांना बोलवावे. आपण जास्तीत जास्त प्रयत्न केला तर मला असे वाटते की, पुढील वर्षी या योजनेमध्ये सदर गावांचा समावेश होऊ शकतो.

**ॲड. यशोमती ठाकूर** : अध्यक्ष महोदय, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे ही योजना अंमलात आली नाही काय ?

**श्री. जयंत पाटील** : अध्यक्ष महोदय, गावामध्ये किती शौचालये बांधली आहेत, वसुली किती झाली आहे, हे बेसीक पॅरामिटर्स कमी प्रमाणात झाले असतील तर तेथे योजना चांगल्या प्रकारे राबविता येत नाही. एका गावात योजना सुरू केली तर दुसऱ्या गावातील लोकांना देखील असे वाटते की, आपल्या गावात देखील योजना लागू झाली पाहिजे. त्यामुळे आता लोकांमध्येच जागृती होण्यास सुरुवात झालेली आहे. सर्वांना निधी मिळाला पाहिजे. एकदा योजना सुरू केल्यानंतर ३ वर्षे योजना राबवली जाते. आपण प्रयत्न केल्यास आपल्या भागात देखील ही योजना राबवली जाईल. सन्माननीय सदस्या श्रीमती ॲड. यशोमती ठाकूर यांना ही योजना जाहीर झाल्यानंतर मी सांगितले होते की, आपल्या मतदारसंघातील बहुतेक भाग हा ग्रामीण आहे. त्यामुळे आपण जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे. त्याप्रमाणे त्यांनी प्रयत्न केला. मात्र त्यांच्या भागामध्ये शौचालय बांधण्याची संख्या कमी असल्यामुळे योजना राबविण्यामध्ये मर्यादा आली. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे मुद्दे मांडले आहेत, ते विचाराधीन आहेत. फॉगींग मशीन व फायर ब्रिगेड व्यवस्था राज्य शासनाच्या बजेट मधून देता येत नाही. मोठ्या लोकसंख्येच्या गावांना तेराव्या वित्त आयोगातून ही कामे अनुज्ञेय करता येईल. तसेच ज्या ठिकाण नगरपालिका आहे, तेथे फॉगींग मशीन व फायर ब्रिगेडची व्यवस्था करता येईल.

**श्री. हरिष पिंपळे** : अध्यक्ष महोदय, गावात शौचालय बांधण्यासाठी शासनाने अनुदान द्यावे.

**श्री. जयंत पाटील** : अध्यक्ष महोदय, शौचालयाकरिता अनुदान वाढविण्यात यावे किंवा राज्य शासनाने द्यावे, अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. मी सांगू इच्छितो की, हरियाणामध्ये ज्या व्यक्तिच्या घरात शौचालय नाही, त्या घरात कोणी मुलगी देत नाही, अशी चळवळ तेथे सुरू झालेली आहे. त्यामुळे तेथे शौचालय बांधल्याशिवाय मुली लग्नाकरिता मिळत नाहीत. मात्र एखाद्याची परिस्थिती अतिशय गरीब असेल तर सार्वजनिक शौचालयाचा वापर केला जातो. अध्यक्ष महोदय,मला बोलण्याकरिता रात्री १२.०० वाजेपर्यंत वेळ दिलेला आहे. रात्रीचे १२.०० वाजण्यास आणखी काही मिनिटे शिल्लक आहेत.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** : अध्यक्ष महाराज, एक महत्त्वाचा प्रश्न राहून गेला की, महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये शासन १०० टक्के स्ट्रीट लाईटचे बिल भरते आणि वॉटर सप्लायचे बिल ५० टक्के भरते, त्यासाठी सबसिडी देते. पण बिलांचे पैसे न गेल्याने, एमएसईबीने बहुतांश ग्रामपंचायतीचे स्ट्रीट लाईट व पिण्याच्या पाण्याचे इलेक्ट्रिसिटी कनेक्शन कट केले आहे. सरकारने MSEB ला हमी दिली पाहिजे की, कनेक्शन कट करू नका, हे पैसे दिले जाणार आहेत. शासन जर स्ट्रीट लाईटचे बिल १०० टक्के देणार असेल तर MSEB ला हे कनेक्शन कट करण्याचे काही कारण नाही.

अध्यक्ष महाराज, पंतप्रधान ग्राम सडक योजनेमधून जो वहिवाटीचा रस्ता आहे, तो फॉरेस्ट मधून जरी जात असला तरी, तेथून जाण्यासाठी परवानगीची आवश्यकता नाही, अशा केंद्र सरकारच्या गाईड लाईन्स आहेत. परंतु, बऱ्याच ठिकाणी रस्ते फॉरेस्ट मधून जात असल्याने लोकांना तेथून जाण्यास अडवले जाते. जे वहिवाटीचे जुने रस्ते आहेत तेथून लोकांना जाण्यास अडवू नये यासाठी केंद्र सरकारच्या धर्तीवर फेर ऑर्डर काढण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, तिसरा महत्त्वाचा विषय मी आपल्याला विशद करतो की, आपण छोट्या छोट्या जिल्हा परिषदांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी देण्याचा निर्णय घेतला, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. परंतु, त्याच बरोबरील जो विकास सेवेचा संवर्ग आहे तो संवर्ग बदलवून डी ग्रेड संवर्ग केला पाहिजे. त्यामुळे त्यांना अन्य ठिकाणी सेवेसाठी संधी मिळू शकेल. हे जर केले तर त्यांना त्याचा लाभ मिळू शकेल.

**श्री. जयंत पाटील** : अध्यक्ष महोदय, शेवटचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न जो इजीएसचा आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, एमआरइजीएसच्या योजनेचा लाभ महाराष्ट्रात कमी घेतला जातो. त्यामुळे ग्रामविकास विभाग व इजीएस विभागाने एकत्रितपणे ठरवून झाडे लावणे यासाठी व इतर योजनांसाठी एमआरइजीएसचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. प्रत्येक गावाने किमान ४० लाख रुपयांच्या एमआरइजीएसच्या योजनांचा फायदा घ्यावा अशा स्वरूपाचे नवीन आदेशही आमच्या विभागाने निर्गमित केलेले आहेत. एमआरइजीएसच्या कामासाठीचा निधी उपलब्ध होऊ शकतो. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपल्या मतदारसंघात एमआरइजीएसचा निधी मिळण्याबाबत आपण जर जागरुक राहिलात तर, त्यासाठी निधी मिळू शकेल.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

७ : ४० या प्रपोर्शनेटमध्ये बसवून ते करता येईल. त्यासाठी बाहेर जादा अर्थ वर्कचे काम केले तर तर ते ४० : ६० मध्ये बसते.

[ श्री. जयंत पाटील ]

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्ट्रीट लाईटचे कनेक्शन कट केल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला, त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, इलेक्ट्रिसीटीचे बिल शासन भरणार आहे. महाराष्ट्रातील ज्या गावांतील स्ट्रीट लाईटचे कनेक्शन तोडण्यात आले आहे, त्याबाबतची माहिती या महिनाभरात संकलित करून त्यासाठी जो अतिरिक्त निधी लागणार आहे, तो एमएसईबीला देण्याची व्यवस्था करून सगळ्या गावांतील स्ट्रीट लाईटचे कनेक्शन्स पुन्हा जोडण्याचे काम करण्यात येईल.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महाराज, १२ व्या वित्त आयोगामध्ये पंचायत समिती स्तरावर, रस्ते बांधकाम, गटारे बांधकाम व पिण्याच्या पाण्याच्या सोयीसुविधा याबाबतचा शासन निर्णय नंतर काढला होता. परंतु, १३ व्या वित्त आयोगात हे पुन्हा वगळण्यात आले. तर १३ व्या वित्त आयोगाच्या योजनेमधून पंचायत समिती स्तरावर रस्ते बांधकाम, गटारे बांधकाम व पिण्याच्या पाण्याच्या सोयीसुविधा इत्यादी कामे घेण्याची परवानगी दिली जाणार आहे काय ?

**श्री. जयंत पाटील** : अध्यक्ष महाराज, १३ व्या वित्त आयोगात केंद्र शासनाने काही गोष्टी अनुज्ञेय केलेल्या आहेत त्यामुळे त्याच्या बाहेर आपल्याला जाता येणार नाही.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महाराज, पहिल्यांदा १२ व्या वित्त आयोगामध्ये

श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांनी बदल करून या तिन्ही गोष्टी करण्याची परवानगी दिली होती.

माझी आपल्याला विनंती आहे की, पंचायत समिती स्तरावर या तिन्ही गोष्टी १३ व्या वित्त आयोगात करू दिल्या पाहिजेत.

**श्री. जयंत पाटील** : सन्माननीय सदस्य आपण माझे उत्तर पूर्ण ऐकून घ्या, मी असे म्हटले आहे की, १३ व्या वित्त आयोगात ज्या गोष्टी अनुज्ञेय आहेत, त्या गोष्टींमध्ये जर ते काम असेल तर ते नक्की लगेच होईल. परंतु, जर अनुज्ञेय नसेल तर त्याला विशेष परवानगी घेऊन मान्यता घ्यावी लागेल. सभागृहाने या मागण्या मंजूर कराव्यात, ग्रामविकास विभागाच्या मागण्यांवर उत्तर देण्यासाठी सभागृहाने एवढा वेळ दिला, त्याबद्दल मी सभागृहाचे आभार मानतो.

**उपाध्यक्ष** : आता मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, पर्यावरण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग म्हणजे मागणी क्रमांक सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, यू-२, यू-३, यू-४, यू-५, एल-२, एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-९ आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

---